# लोकसंस्कृती आणि लोकसाहित्य

## भारतीय संकल्पना आणि परंपरा

डॉ. अनिल सहस्रबुद्धे

प्रकाशक

**लोकसंस्कृती आणि लोकसाहित्य**

**भारतीय संकल्पना आणि परंपरा**

**Folk Culture and Folk-lore**

**Indian Concept and Tradition**

**लेखक डॉ. अनिल सहस्रबुद्धे**
'आई', समर्थनगर, हॉटेल सागरच्या पाठीमागे,
पाईपलाईन रोड, सावेडी, अहमदनगर.
भ्रमणभाष ९८८१५००९४२

**© सौ. उषा अनिल सहस्रबुद्धे**
भ्रमणभाष ९८५०७३१६४०

प्रकाशक

प्रथमावृत्ती :

**टाईपसेटींग :–**
कुलकर्णी टाईपसेटर्स, श्रीपाद कुलकर्णी,
अहमदनगर. मो. ९८५०२३२८९०

**लोकसंस्कृती आणि लोकसाहित्याच्या अभ्यासाला**
**वाहून घेणाऱ्या –**
**संस्कृतीस्वरुपिणी –**
**डॉ. दुर्गा भागवत आणि डॉ. सरोजिनी बाबर**
**यांना**
**कृतज्ञतापूर्वक**

# लोकसंस्कृती आणि लोकसाहित्य
## भारतीय संकल्पना आणि परंपरा

### अनुक्रमणिका


**(१)** **विषय प्रवेश : भारतीय आधुनिक अभ्यास परंपरांविषयी हितगुज :**
(Introduction : Few words about the Modern Indian Tradition & Study)
१. शास्त्रीय तथ्यांचा वा तत्त्वांचा सार्वत्रिक स्वीकार आवश्यक. २. पूर्वसूरींनी केलेल्या संशोधन कार्याचा अनुबंध आवश्यक. ३. संशोधन आणि ज्ञानक्षेत्रातही मनःस्थितीचा प्रभाव. ४. प्रतिष्ठित अभ्यासक्षेत्रांत लोकसाहित्य अभ्यासाचा समावेश. ५. डॉ. दुर्गा भागवत यांचे लोकसाहित्य अभ्यासक्षेत्रातील मूलगामी कार्य. ६. 'लोकबंध' ग्रंथामधील प्रयत्न. ७. समारोप.

**(२)** **लोकसाहित्य ज्ञानशाखेविषयी :** (About the faculty of folklore)
१. लोकसाहित्य अभ्यासक्षेत्राची सुरुवात. २. लोकसाहित्याचे सामान्य स्वरूप. ३. लोकसाहित्याच्या काही महत्त्वाच्या व्याख्या. ४. Folklore अभ्यासक्षेत्राचा वैविध्यपूर्ण स्वीकार. ५. भारतात Folklore चा अभ्यास विविध प्रांतात विविध पारिभाषिक शब्द योजून करण्याचा प्रघात. ६. जागतिक लोकसाहित्य अभ्यासक्षेत्रातील 'लोक' (Folk) आणि 'साहित्य' (lore) या पदांविषयी मांडलेल्या विचारातील संकल्पना आणि विस्तार. ७. लोकसाहित्य हे स्वतंत्र, अतिव्याप्त अभ्यासक्षेत्र.

**(३)** **दैवतविचार विषयक :** (About Mythology)
१. दैवतविचार विषयक शास्त्रीय मांडणीचा प्रयत्न. २. देव, दैवत आणि दैवतकथा. ३. दैवतकथाशास्त्र (Mythology) ४. मिथक संकल्पना. ५. दैवत निर्मिती आणि दैवतकथा निर्मिती : मानवी प्रवृत्ती. ६. मिथकचे अर्थात दैवतकथांचे सूत्ररूप स्वरूप वर्णन. ७. दैवत आणि दैवतकथांचे प्रकार. ८. समारोप.

(४) **लोकसंस्कृती : संकल्पना व स्वरूप :**
(The concept and Feature of Folk-Culture)
१. संस्कृती. २. लोकसंस्कृती. ३. लोकसंस्कृतीचे स्वरूप. ४. श्रीमद्भगवद्गीतेनुसार संस्कृती-लोकसंस्कृती अभिसरण प्रक्रिया. ५. लोकसंस्कृतीतील लोकदैवते. ६. लोकधर्म. ७. लोकसंस्कृतीमध्ये पुरोहित कलावंतांचे स्थान. ८. लोकसंस्कृतीतील भगत, मांत्रिक, वैद्य व भाकितकथक (भविष्यवेत्ता) यांचे स्थान. ९. स्थानिक पूर्वज दैवते, वीर, सिद्ध, साधू, गुरू, सद्गुरू, योगी, बुवा, महाराज यांचे लोकसंस्कृतीतील स्थान. १०. धर्म, वंश संप्रदायांचे संस्थापक आणि सांप्रदायिक मार्गदर्शक, प्रचारक, भक्त, तत्त्वज्ञ, संत यांचे एकूण लोकसंस्कृतीतील स्थान. ११. कला- दिव्यानुभूती आणि दैवते - दैवतकथा आणि गीते, लोकसंगीत, चित्रकला, वस्त्रेअलंकार, पाककला, केशरचना, भांडी, विणकाम, भरतकाम, शिवणकाम, शिल्पकला, स्थापत्य, भारतीय परंपरेतील चौसष्ट कला, कला आणि ज्ञातीसंस्था. १२. क्रीडा- बैठेखेळ, युद्धखेळ, मैदानीखेळ, जलक्रीडा, संभोगक्रीडा, रस्त्यावरील खेळकरी. १३. विद्या-शास्त्रे - भारतीय परंपरेने मानलेल्या विद्या, लोकसंस्कृतीतील विद्या व शास्त्रे - धर्मशास्त्र, नीतीतत्त्वज्ञान न्याय, लोकवैद्यक, लोकवाणिज्य, लोकगणित, लोकज्योतिर्विज्ञान-लोकजातक-भाकीत, कलाशास्त्रे. १४. कृषीसंस्कृती हीच लोकसंस्कृती. १५. एकविसाव्या शतकातील आदीम म्हणविणाऱ्या संस्कृती, प्राचीनतम ऋषी-कृषी संस्कृतीचे अवशेष लोकसंस्कृतीचे उगमस्त्रोत अवशेष होत. १६. लोकसंस्कृतीची मौखिक परंपरा. १७. लोकसंस्कृतीविषयी अर्धसत्य. १८. समारोप. १९. संदर्भ व टीपा.

(५) **लोकसंस्कृती आणि लोकसाहित्य अन्योन्य संबंध :**
(The Organic Relationship between Folk-Culture and Folk-Lore)
१. 'लोक' - 'लोकबंध' - 'लोकसाहित्य' (Peple, Folktype Folklore) २. लोकसंस्कृतीचे प्रयोगसिद्ध दृश्यरूप - लोकसाहित्य. ३. लोकसंस्कृती आणि लोकसाहित्य अनुबंध चिकित्सा - विवाह - मर्तिक प्रथा - जन्मप्रथा - कुळधर्म कुळाचार - गावपंचायत. ४. समारोप. ५. संदर्भ व टीपा.

(६) **वेदातील 'लोक' संकल्पना : पुरुषसुक्त :**
(Concept of Folk in the Vedas : Purushsukta)
१. सार्थ पुरुषसुक्त. २. पुरुषसुक्तातील 'लोक' कल्पना. ३. लोकव्यवस्था संकल्पनेचा झालेला विपर्यास. ४. समारोप. ५. संदर्भ व टीपा.

(७) **भारतीय दैवतकथा शास्त्रांनुसार 'लोक' संकल्पना :**
(Concept of Folk According to Indian Mythology - [Shruti, Smruti, Puranas])
१. वैदिक वाङ्मयातील समग्र 'लोक' उत्पत्ती संकल्पना (सृष्टी निर्मिती संकल्पना). २. लोक उत्पत्ती आणि विस्तार विषयक पौराणिक विवेचन. ३. व्यास पद किंवा पीठ आणि व्यासांचे कार्य. ४. पुराणांचा परिचय. ५. स्मृतिग्रंथांचा विचार. ६. महाकाव्ये. ७. डॉ. दुर्गा भागवत यांनी भारतीय परंपरांचा करून दिलेला परिचय. ८. लोकबंध ग्रंथातील 'लोक' संकल्पना. ९. भारतीय परंपरेतील विष्णूतत्त्व आणि लोक संकल्पना. १०. श्रीमद्भगवत गीतेतील 'लोक' संकल्पना. ११. समारोप. १२. संदर्भ व टीपा.

(८) **भारतीय परंपरेतील लोकसाहित्य आणि लोकसांस्कृतिक लोकबंध:**
(Traditional Indian Folk Types of Folk-Lore and Folk-Culture)
१. लोकसंस्कृती आणि लोकसाहित्यातील जन्म, जीवन आणि मरणविषयक लोकबंध. २. कृषीसंस्कृती अर्थात लोकसंस्कृतीतील आणि लोकसाहित्यातील लोकबंध. ३. कला, क्रीडा, संगीत, शास्त्रे, धर्मजीवन विषयक लोकबंधात्मक लोकसांस्कृतिक लोकसाहित्याविष्कार. ४. समारोप. ५. संदर्भ व टीपा.

(९) **लोकसंस्कृती व लोकसाहित्य आविष्कारातील विकृती :**
(Disorder, Perversity, Disguest and Loathing [Total Bad Uncultured Traditions] in Folk Culture and Folk-lore)
१. विकृती प्रतिबंधक लोकपारंपरिक संस्था. २. विकृती प्रतिबंधक

लोकपरंपरेतील प्रबोधक प्रयत्न. ३. लोक विकृतींवर पोट भरणाऱ्या मंडळ्या. ४. विकृत मनोवृत्तीच्या शाब्द परंपरा - सणोत्सव इ., शिव्या, लोकसाहित्यातील मंडळ्या. ५. व्यसनाधिन घडविणाऱ्या मंडळ्या. ६. मनोविकृती. ७. समारोप. ८. संदर्भ व टीपा.

(१०) **प्राचीनतम लोकबंधांचे लोकसंस्कृती व लोकसाहित्यातील स्वरूपः**
(Folk Typal Antiqs in Folk-Culture and Folk-lore)
१. लोकबंध आणि भाषा. २. प्राचीनतम लोकबंध. ३. भारतीय परंपरेतील प्राचीनतम लोकबंध. ४. आधुनिक भाषासारणीतील प्राचीन लोकबंधांचा प्रवास. ५. आदिबंध आणि भारतीय परंपरेतील प्राचीनतम लोकबंध. ६. समारोप. ७. संदर्भ व टीपा.

(११) **उपसंहार.**

●●●



## प्रकरण पहिले

# विषय प्रवेश

**(Introduction)**

## भारतीय आधुनिक अभ्यास परंपरांविषयी हितगुज

**(Introduction : Few words about the Modern Indian Tradition & Study)**

आधुनिक, भारतीय अभ्यास परंपरा, भारतेतर, पाश्चात्य आणि पौर्वात्य विश्वातील, अभ्यास परंपरांचे ऋण व्यक्त करतात. आधुनिक भौतिक, सामाजिक, शैक्षणिक, मानव्य आदि सर्व क्षेत्रातील शास्त्र अभ्यास परंपरा, अशा ऋणांसह, भारतात त्या-त्या शास्त्रांचा अभ्यास आणि विकास करण्याचा प्रयत्न करतात; असे म्हणणे अतिशयोक्तीचे होणार नाही. भारतेतर देशातच ज्ञानाचे स्फोट झाले, असे मानण्याची एक परंपराच भारतामध्ये निर्माण झालेली दिसते. फिजिक्स, केमेस्ट्री, ॲलोपॅथी, न्यायशास्त्र व पद्धती, राजव्यवस्थापन पद्धती, शिक्षणशास्त्र आणि पद्धती अशा भारतेतर देशात उदयास आलेल्या शास्त्र शाखांनी तर भारतीय लोक अक्षरशः दिपून गेले. विद्यापीठीय शिक्षण परंपरेमध्ये तर; या तथाकथित आधुनिकतेने, भारतीय प्राचीन किंवा मध्ययुगीन शिक्षणपरंपरा विस्मरणात गेल्या. ''साहेबाच्या चालीने चालावे, साहेबाच्या बोलीने बोलावे । आधुनिक म्हणूनी मिरवावे, सकल जनी ।।'' असा लोकबंध दृढावला.

**१. शास्त्रीय तथ्यांचा वा तत्त्वांचा सार्वत्रिक स्वीकार आवश्यकच :-**

कोणतेही शास्त्र तत्त्वतः त्रिकालाबाधित सत्याचा शोध घेत, तत्त्वदर्शन

घडविते. स्थल, काल, परिस्थिती या गोष्टी शास्त्रीय ज्ञानाच्या उपयोजन पद्धतीत, तपशीलात्मक बदल घडवितात, असे वरवर पाहाताही मानव्य शास्त्राच्या दृष्टीने जाणवते. भौतिक विज्ञानाच्या बाबतीत तीही शक्यता नसते. याकरिता शास्त्रीय ज्ञानाचा स्फोट कोणत्या भूभागात, लोकसमूहात झाला; हे महत्त्वाचे नसते. शास्त्रीय ज्ञान सर्वात्मक विचाराने स्वीकारलेच पाहिजे, हे खरे. त्यामुळे पाश्चात्य असो की पौर्वात्य असो; ज्ञान सर्वथा सर्वत्र स्वीकार्यच असते. तसे ते स्वीकारून त्या शास्त्रांचा अभ्यास आणि विकास करण्याचा प्रयत्न उपयुक्तच ठरतो. कोणत्या देशात, कोणत्या भाषेत, कोणी, शास्त्रीय तथ्य किंवा तत्त्व संशोधित केले आहे; याचा विचार न करता; त्या शास्त्रीय तत्त्वाचा किंवा तथ्याचा स्वीकार, जगातील सर्व साधकांनी, अभ्यासकांनी केलाच पाहिजे. ज्ञानप्रक्रियेतील ती प्राथमिक आवश्यकता आहे. असे शास्त्रीय ज्ञान, शास्त्रीय माहिती स्वीकारून; अनुसरण्यात गैर तर नाहीच पण ज्ञानसाधनेचे तेच औचित्यपूर्ण कर्म होय. तथ्य, तत्त्व किंवा ज्ञान असे ज्याला आपण म्हणतो; ते केवळ सत्यतेच्या कसोटीवर स्वीकारायलाच हवे. गती, गुरुत्वाकर्षण, पर्यावरण संतुलन, शारीरिक आरोग्यविषयक तथ्ये उर्जाविषयक नियम ह्या व अशा प्रकारच्या सर्व ज्ञानशाखांमध्ये संशोधनातून पुढे आलेल्या गोष्टी मानवी विकासाच्या दृष्टीने घडणाऱ्या ज्ञानप्रक्रियेचेच भाग असतात. असे निखळ ज्ञान स्वीकारण्यात कोणत्याही प्रकारचा अभिनिवेश असताच कामा नये.

**२. पूर्वसूरींनी केलेल्या संशोधन कार्याचा अनुबंध आवश्यक :–**

कोणतेही शास्त्रीय तथ्य, तत्त्व किंवा ज्ञान एकाएकी पुढे येत नाही. सकृतदर्शनी ते अचानक, एकाएकी, साक्षात्कारिक झाले, असे वाटतेही. मात्र त्या पाठीमागे पूर्वसूरींकडून, सनातनपणे संशोधित केलेले ज्ञानसंचित असतेच. या पूर्वसंचितालाही प्रश्न विचारणारी प्रतिभा त्या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न करते, आणि नवे तथ्य समोर येते किंवा नव्याने ज्ञान अधोरेखित होते. गुरुत्वाकर्षणाचा नियम प्रकट झाला, तो चमत्कार नव्हताच. फळ खालीच पडणार, वर फेकलेली जड वस्तू खालीच कोसळणार, एव्हढेच नव्हे तर वाऱ्यावर तरंगणारी हलकी वस्तू सुद्धा खालीच येऊन पडणार; या निसर्गनियमावर पूर्वसूरींचे अनुभवसंचित ठाम होते. कोणत्या शक्तीने हे घडते? असा प्रश्न पूर्वज्ञानाला पडला आणि तत्त्व सापडले, अशीच प्रक्रिया सामान्यतः घडत असते.



जगात असेही अनुभव समोर येत आहेत की, पूर्वीच एखादे विवक्षित तथ्य, तत्त्व किंवा ज्ञान गवसले होते. ते तत्त्व मांडलेही होते. त्याचे स्थलकाल परिस्थिती सापेक्ष उपयोजनही झाले होते. कदाचित त्यातील तपशीलात नव्याने बदल झाला असेल किंवा जुना तपशील विस्मरणात गेला असेल, किंवा भिन्न साधनेने, प्रक्रियेने तीच गोष्ट आविष्कृत होण्याची शक्यता असेल. उदाहरणार्थ विमान किंवा यान या संदर्भात असे घडले असावे; हे आता सर्वदूर मान्य केले गेले आहे. भाषाभिन्नता आणि अनुभवांची तपशीलात्मक भिन्नताही याला कारणीभूत असू शकते.

याकरिता पूर्वसूरींनी केलेल्या तपश्चर्येचा साद्यंत इतिहास, नवे म्हणून समोर आलेले ज्ञान किंवा ज्ञानशाखा संदर्भात अभ्यासूनच, अर्थात नव्याने पुढे आलेले पूर्णतः पारखून स्वीकारावयास हवे.

**३. संशोधन आणि ज्ञानक्षेत्रात मनःस्थितीचा प्रभाव :–**

संशोधन आणि ज्ञानक्षेत्रातील, निखळ ज्ञानप्रक्रियेसाठी, तटस्थ आणि पूर्वग्रहविरहित मनःस्थितीची आवश्यकता असते. भावनिक लोभ, मोह, मद, मत्सर, असूया इ.इ. प्रकारच्या मनःस्थितीला स्थान असता कामा नये. भौतिक शास्त्राच्या बाबतीत या मनःस्थितीचा प्रभाव असला तरी प्रत्यक्ष ज्ञानप्रक्रियेत कोणताही परिणाम होणे शक्य नसते. तरी सुद्धा अनेक कारणांमुळे संशोधन लपविणे, संशोधनाचा केवळ आपल्या हितसंबंध रक्षणासाठी प्रयत्न होणे; असे घडण्याचा संभव नाकारता येत नाही. उदाहरणार्थ अणु संशोधन, अंतराळ संशोधन आदि गोष्टींत असे घडल्याची ठळक उदाहरणे समोर आली आहेत.

मानव्यशास्त्रात मात्र मनःस्थितीचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. उदाहरणार्थ– जेते जितांवर आपल्या मानव्यशास्त्रीय परंपरांचा प्रभाव गाजवतात. असे इतिहासात अनेक मानवी समूहांच्या बाबतीत स्पष्टपणे जाणवते. भारताचेच उदाहरण घेतले तर, न्याय, नीती, भाषा, पेहराव, खानपान, औषधोपचार, साहित्य आदि सर्वच गोष्टींतील सनातन संशोधित धारणांवर मध्ययुगात आणि विशेषतः आधुनिक युगात प्रभाव पडला आहे. जेत्यांनी आपली धारणातत्त्वे लादली. जित मनःस्थितीतील लोकांनी जेत्यांचेच आदर्श या सर्व बाबतीत स्वीकारलेले पाहावयास मिळतात. स्थल, काल, परिस्थिती आणि परंपरा यांशी सापेक्ष संघर्षही त्यातून घडतो हेही भारतात अनुभवले जात आहे.

**३.१.** भारतीय शिक्षण परंपरेत आधुनिक काळात आमूलाग्र बदल

झालेला आहे. शिक्षण परंपरेतील सनातन पारंपरिक गुरुकुल शिक्षण पद्धती पूर्णतः लोप पावलेली दिसते. वैचारिक भाग आणि प्रात्यक्षिक भाग यात विभागलेली परंपरा, टिचर, गाईड, असिस्टंट अर्थात शिक्षक, मार्गदर्शक, सहाय्यक या स्वरूपात क्लासरुम, लॅबोरेटरी यात रुपांतरित झाली. अगदी कला आणि क्रीडा यांमध्ये देखील ही पद्धती मोठ्या प्रमाणावर संक्रमित झाली. हा पाश्चात्य पद्धतीचा प्रभाव सर्वच क्षेत्रात जाणवतो. मानव्य शास्त्रांतील संशोधन पद्धतीमध्ये विशेषतः पाश्चात्य ग्रंथांचे संदर्भ घेऊन; निष्कर्षापर्यंत पोचण्याची पद्धती आलेली दिसते. समग्र संशोधन क्षेत्रात, भारतीय अतिप्राचीन, प्राचीन परंपरा, स्थल काल परिस्थिती सापेक्ष परिवर्तन आणि विकासाचा संदर्भ फारसा घेतला जात नाही.

कोणतीही नवीन गोष्ट भारतेतर पाश्चात्य किंवा पौर्वात्य जगतात संशोधन म्हणून पुढे आली की अभिनिवेशपूर्वक आमच्या भारतात हे पूर्वीच अस्तित्वात होते किंवा आहे; असे प्राचीन वेद, उपनिषदे, पुराणे, बौद्ध आणि जैन वाङ्मय यांचा मोघम हवाला देऊन; सांगितले जाते. हे सर्वच शास्त्रांच्या बाबतीत अनुभवास येत आहे.

दुसरा एक वर्ग पाश्चात्य प्रभावाने मोठ्या अभिनिवेशाने प्राचीनतम भारतीय प्राचीन शास्त्रे, वाङ्मय यांतील गोष्टींना सरधोपट अंध, मागासलेले रानटी आणि भ्रामक ठरवून मोकळे होतो. सशास्त्र आणि प्रातीभ संशोधनालाही टाकावू म्हणून नाकारतो. वेदांगांच्या बाबतीत हे स्पष्टपणे जाणवते. शिक्षा, कल्प (सूत्र), व्याकरण, निरुक्त, छंद आणि ज्योतिष अशी वेदांची सहा अंगे आहे. यासह उपवेद यांच्याकडेही टाकावू किंवा मागासलेले म्हणून पाहिले जाते. मानव्यशास्त्रांच्या दृष्टीने न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, पूर्वमीमांसा, उत्तरमीमांसा अशी षड्दर्शने; मनुस्मृती, नारदस्मृती, याज्ञवल्क्यस्मृती अशा स्मृती तसेच रावणसंहिता, अगस्त्यसंहिता अशा विविध ऋषींच्या संहिता; हे प्राचीन टाकावू बाड म्हणून; दुर्लक्षित करण्याचे ओधत्य जीत मनःस्थितीत पाश्चात्य व पौर्वात्य भारतेतर जगतातून आलेल्या आधुनिक ज्ञान-तंत्रज्ञान यांच्या प्रभावाने घडते आहे.

खरेतर कोणतेही ज्ञान, माहिती, तंत्रज्ञान; मग ते कोणत्याही स्थल काल परिस्थिती प्रकट झालेले असो ते मानवी समूहमनाच्या अनुभूती संचितातून, प्रतिभावंतांच्या अंतःप्रेरणेतून प्रकट झालेले असते. त्यातील अनुभूतीसंचित



वर्तमानातील शास्त्र मांडणीला, संकल्पना संशोधनाला उपकारकच ठरते हे मान्य करणे क्रमप्राप्त आहे. भारतीय जीत मनःस्थितीने ते बाजूला सारले आहे. त्यामुळे सबंध शिक्षण प्रक्रिया अनिरीक्षण आणि अपनिरीक्षणाच्या दोषास पात्र झाल्याचा धोका निर्माण झाला आहे. अवघ्या मानवजातीच्या ज्ञानप्रक्रियेला त्यामुळे अपूर्णता आणि अवरुद्धता येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

पूर्वग्रहदूषित मनःस्थिती झटकून; जागतिक मानवी इतिहासातील आरंभबिंदूपासून मानवाने अर्जित केलेल्या ज्ञानकणांचे पूर्वसंचित विचारात घेऊन; त्यांच्या उपयोजनाच्या, मानसिक आणि भौतिक गोष्टींच्या परंपरा पारखून; त्या आधारावर नवे संशोधन उभे राहाणे ज्ञानप्रक्रियेच्या दृष्टीने उपकारक आहे.

**४. प्रतिष्ठित अभ्यास क्षेत्रांत लोकसाहित्य अभ्यासाचा समावेश :–**

अठराव्या शतकाच्या अखेरीस जगात लोकसाहित्याच्या अभ्यासाला चालना मिळाली आणि एकोणिसाव्या शतकात तर लोकसाहित्याची अत्यंत प्रतिष्ठित अभ्यासात गणना होऊ लागली. जगात म्हणजे अर्थातच पाश्चात्य जगतात या अभ्यासाची सुरुवात आणि विकास झाला असे म्हटले जाते. या अभ्यासासाठी अनेक अभ्यासकांनी आयुष्य वेचले. 'या विषयावर अनेक भाषांत, विशेषतः जर्मन, फ्रेंच, इंग्लिश, फिनिश, स्वीडीश, रशियन व इटालियन भाषांत अक्षरशः पर्वतासारखे प्रचंड व सागराप्रमाणे अफाट असे वाङ्मय आहे.' असे डॉ. दुर्गा भागवत यांनी 'लोकसाहित्याची रुपरेखा' या त्यांच्या प्रबंधात 'लोकसाहित्याचे जागतिक अभ्यासक्षेत्र' या प्रकरणात नोंदविले आहे. १७व्या व १८व्या शतकापासून युरोपमध्ये ग्रिम बंधूपासून लोकसाहित्यशास्त्राची प्राणप्रतिष्ठा झाली असे नोंदवून; दुर्गा भागवत यांनी 'सिद्धांतपरिपोष' या मथळ्याखालील चर्चेत लोकसाहित्याच्या अभ्यास परंपरेत; भाषाशास्त्रीय संप्रदाय (Philological School), निसर्गरुपवादी संप्रदाय (The Nature - Symbolists), भ्रांतकल्पनावादी संप्रदाय (Euhmerist School), स्पष्टीकरणवादी संप्रदाय (Acteological School), मानववंशशास्त्रीय संप्रदाय (The Anthropological School), सजीवावशेषत्ववादी संप्रदाय (Survival Theory), विभाजनवादी संप्रदाय (Distributionist School), संप्रसारणवादी संप्रदाय (Diffusionit Theory), ऐतिहासिक-भौगोलिक संप्रदाय (Historical - Giographical Theory), मानसशास्त्रीय संप्रदाय (Psychological

School), कार्यान्वयी संप्रदाय (Functional School) अशा, जागतिक पातळीवर उदयास आलेल्या संप्रदायांना मराठी/संस्कृत पारिभाषिक शब्द देऊन; संप्रदायांचा परिचय करून दिला आहे.[१] विशेषतः पाश्चात्य जगतात लोकसाहित्यशास्त्राचा अभ्यास सुरू झाला त्यात विविध संप्रदाय सुरू झाले. सिद्धांत प्रस्थापित झाले. 'लोकसाहित्य' असे सुप्रतिष्ठित शास्त्र म्हणून उदयास आल्यानंतर या ज्ञानशाखेचा अभ्यास भारतातही सुरू झाला. अर्थातच डॉ. दुर्गा भागवत यांनी लोकसाहित्यविषयक माहिती जशी मराठीत मांडली तसेच प्रयत्न अन्य भारतीय भाषांत झाले. अनुकरणातून त्याच पद्धतीने अभ्यासही सुरू झाला. मात्र भारतीय परिप्रेक्षात या क्षेत्रासाठीचे प्राचीनतम संचित काय आहे? तो लोकसाहित्यशास्त्रीय अभ्यास होता किंवा कसे? या विषयीचा धांडोळा घेणे आवश्यक होते.

**५. डॉ. दुर्गा भागवत यांचे लोकसाहित्य अभ्यासक्षेत्रातील मूलगामी कार्य:–**

पाश्चात्य आणि पौर्वात्य भारतेतर जगतातून परिचित झालेल्या या अभ्यासक्षेत्राचा स्वीकार करताना डॉ. दुर्गा भागवत यांनी भारतीय परंपरांचा धांडोळा करून लोकसाहित्याच्या जागतिक अभ्यासक्षेत्राबरोबरच बृहद भारत भूप्रदेशातील परंपरांचा आढावा घेऊन; तुलनात्मक ऐतिहासिक व मौलिक विचार केल्यास; लोकसाहित्यासारखे अतिव्यापक अभ्यासक्षेत्र अधिक शास्त्रीय अभ्यासासह विकसित होण्याची शक्यता अधोरेखित केली आहे.

'लोकसाहित्याची रुपरेखा' या ग्रंथातील 'लोकसाहित्याचे जागतिक अभ्यासक्षेत्र' या पहिल्याच प्रकरणाची सुरुवात करतांना, अभ्यासकांना एक व्यापक दृष्टी दिली आहे. – ''भारतीय लोकसाहित्याच्या प्रधान अंगांची चर्चा, वेदकालापासून तो आतापर्यंत, अखिल भारतीय क्षेत्र डोळ्यापुढे ठेवून ऐतिहासिक भौगोलिक पद्धतीने या पुस्तकांत केलेली आहे.''[२] जागतिक क्षेत्राचा परिचय घडवितांना, या अभ्यास प्रयत्नांचा सूचकतेने उल्लेख करणे; अभ्यासक्षेत्राच्या व्यापकता आणि निर्दोष शास्त्रविकास या गोष्टींवर लक्ष केंद्रित करते.

या ग्रंथातील दुसऱ्या प्रकरणात अर्थात 'भारतीय परंपरेची ओळख' यात सुरुवातीलाच 'इतिहास पुराणाभ्यां वेदं समुपबृंहयेत् ।' (मनुस्मृति) हे सूत्र वाक्य उल्लेखित केले आहे. भारतीय परंपरेमध्ये; भारतीयांची कथागीतविषयक भूमिका, ग्रंथनिविष्ट कथासाहित्य, परंपरागत कथासाहित्याचे तीन प्रकार–



१) धार्मिक ग्रंथ, रामायण, महाभारत, वेदवाङ्मय, पालीत्रिपिटक, जैन चूर्णी, पुराणकथा.

२) स्वतंत्र कथासंग्रह- बौधजातके, जैन कथाकोश, पंचतंत्र, कथासरित्सागर, वेताळपंचविशी, सिंहासनबत्तिशी, शुकबाहत्तरी, हितोपदेश.

३) पारंपरिक अद्भूतकथांना ललित वाङ्मयाचा घाट देणारे वाङ्मय– दंडीचे दशकुमारचरित, बाणाची कादंबरी, सुबंधुची वासवदत्ता.

यासंदर्भात त्यांनी ऋग्वेदापासून ते बाणापर्यंत सुमारे तीन हजार वर्षांचा काळ व्यापल्याचे मुद्दाम नमूद केले.

प्राचीन भारतीय परंपरेत त्यांनी (१) श्रौतविभाग (२) नैरुक्तिक वर्ग (३) दैवतवादी वर्ग (४) सूत वर्ग (५) वैय्याकरण वर्ग (६) बौद्ध व जैन वर्ग (७) बृहत्कथा असे लोकसाहित्य अभ्यासपरंपरांचे वर्ग केले आहेत. या सर्व प्रकारात किंवा वर्गात 'लोककथा' यांविषयी आढावा घेतला आहे.

तिसऱ्या प्रकरणात 'पारंपरिक वाङ्मयाचे संग्राहक' यांचा आढावा घेतला आहे. यात महीदासऐतरेय, मार्कंडेय, वररुचि, गुणाढ्य, सोमदेव, महावीर व त्यांची प्रभावळ, जमबु, प्रभव, नैमेत्तिक, बुद्धघोष, व्यासपुत्र शुक, याचबरोबर स्त्री लोकसाहित्य परंपरांचाही उल्लेख केला आहे. पौलेरम्मा, अंकम्मा, दिल्ली पोलासी, मातंगी, माडीग–कोम्भु, वंडलु धनगर यांच्या परंपरा तसेच महानुभावीय परंपरांचाही उल्लेख आहे.

पुढे प्रकरण चार ते तेरापर्यंत भारतीय परंपरेतील उदाहरणांसह चर्चा करून भारतातील अभ्यासपरंपरांचा विस्तृत आढावा घेतला आहे.

दैवतकथा, परिकथा किंवा अद्भूतकथा, दंतकथा, कल्पितकथा, प्रहेलिका, वाक्संप्रदाय व म्हणी, लोकव्युत्पत्ति, लोकसाहित्यातील विनोद, लोकसाहित्यातील वाङ्मयीन लालित्य, एक अभावात्मक संकेत, अशा या प्रकरणांमध्ये जागतिक लोकसाहित्य (Folk-lore) या अभ्यासक्षेत्रांतर्गत ज्या घटकांचे संकलन आणि संपादन होते, त्या सर्व घटकांची विपूल उदाहरणे दिली आहेत.

या डॉ. दुर्गा भागवत यांच्या प्रयत्नातून काही तथ्ये पुढे येतात ती म्हणजे १) गेल्या दोन–तीनशे वर्षात Folk (People in general) मध्ये अर्थात लोक मध्ये आढळणाऱ्या शाब्द किंवा वाङ्मय म्हणून म्हणता येईल

अशा गोष्टींचे जसे संकलन, संपादन व प्रसंगी रुपांतरण भारतेतर देशांमध्ये झाले, त्या प्रकारच्या संकलन, संपादन व रुपांतरण परंपरा भारतामध्ये अतिप्राचीन काळापासून सुरू असून या प्रयत्नांना ग्रंथनिविष्टता ही प्राप्त झाली होती. २) Folk-lore (लोकसाहित्यात अभ्यासाच्या ज्या परंपरा आढळल्या त्याही भारतात प्राचीन काळापासून सुरूच आहेत. ३) Folk-lore हे समग्र Folk चे जीवन सारणी संचित आहे.

या प्रयत्नात Folk-lore म्हणजे काय? Folk म्हणजे नेमके कोण? Folk हा शब्द कोठून आला? या शास्त्राचा विकास का होत गेला? अशा काही प्रश्नांच्या संदर्भात; मारीया लीच यांच्या १९४९ साली अमेरिकेत प्रसिद्ध केलेल्या लोकसाहित्यकोश - 'The Standard Dictionary of Folklore, Mythology and Legend' या कोशाचा हवाला दिला आहे.

लोकसाहित्याच्या अभ्यासक्षेत्रात प्रवेश करून आणखी काही काम करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना या अभ्यासक्षेत्राचे हे प्रवेशद्वारच म्हणावे लागेल.

एव्हढ्या सगळ्या गोष्टी नंतर Folk आणि lore, Folk आणि Culture या संदर्भात अनेक मतांतरे आजही दिसतात. भारतीय परिप्रेक्ष्यातील सामाजिक श्रेष्ठाश्रेष्ठतेविषयी तथाकथित विचारवंतांच्या मनात याविषयी संभ्रमच अधिक दिसतात. ऐतिहासिक आणि भौगोलिक तुलनात्मक असा व्यापक विचार Folk-lore आणि Folk-Culture या संदर्भात करणारे देखील खूप आहेत. त्यात ठळक उदाहरणे ग्रिमबंधू, मॅक्सम्युलर, सर जेम्स फ्रेझर, सर जॉर्ज, लॉरेन्स गॉम आणि भारतीय परंपरेतील डॉ. दुर्गा भागवत आणि डॉ. रामचंद्र चिं. ढेरे यांचे देता येईल.

एकूणच Folk-lore आणि Folk-Culture या अभ्यासक्षेत्राच्या व्यापकतेकडे डॉ. दुर्गा भागवतांनी लक्ष वेधले हे नमूद करावे लागते.

**६. 'लोकबंध' ग्रंथामधील प्रयत्न :-**

'दास्ताने रामचंद्र कंपनी' यांनी प्रस्तुत लेखकाने संशोधित केलेले लोकसाहित्यावरील आणि लोकसंस्कृतीवरील लेखन १९९५ मध्ये प्रसिद्ध केले. यात महत्त्वाचे संशोधन 'लोकबंध' अर्थात लोकधारणा करणारी सर्व प्रकारची सूत्रे, आणि 'लोक' या पदाचे व्यापकत्व प्रस्थापित करणे हे होते. या संशोधनाने Folk-lore आणि Folk-Culture यांचा अन्योन्य संबंधही प्रस्थापित झाला. या ग्रंथात 'लोक'चे व्यापकत्व, 'लोक'ची त्रिविधता स्पष्ट



करण्यात आली; त्यामुळे व्यक्तीसमूह आणि अखिल मानवजात यांचे एकात्म स्वरूप स्पष्ट होऊन; लोकसाहित्य व लोकसंस्कृतीचा जागतिक पातळीवर तुलनात्मक अभ्यास मूलभूततेने करण्याचा मार्ग प्रशस्त झाला. घटकलोक (An Individual in Society) अंगस्वरूप लोक (A Socio-Cultural Group) आणि विराटपुरुषलोक (Total Human Kind-Universe) यांची एकात्मता विचारात घेतल्यानेच अखिल मानव जातीच्या ज्ञानात्मक आणि सांस्कृतिक अवस्थेचे आणि परिवर्तन प्रक्रियेचे भान येऊ शकते, हे स्पष्ट झाले. लोकसाहित्याचे अभ्यास क्षेत्रांत, अंगस्वरूप लोक चा (A Socio-Cultural Group) आणि त्यातही त्यातील धुरिण, प्रमुख किंवा श्रेष्ठ ज्यांचा उल्लेख भारतीय अभ्यासक्षेत्रात सतत 'अभिजन' असा केला जातो; अशा Class ला वगळून; उर्वरित सर्वसामान्य मानवांच्या समूहावर 'लोक' म्हणून लक्ष केंद्रित केले जात होते आणि त्यातून सर्व ज्ञानशाखांच्या संदर्भात कयास बांधले जात होते. 'लोकबंध' ग्रंथाने लोकसाहित्याच्या अभ्यासाला व्यापक रूप देण्याचा प्रयत्न केला. 'लोकबंध' संकल्पना मांडून मौखिक परंपरांबरोबरच वर्तनपरंपरा आणि साधनपरंपरा विचारात घ्याव्या लागतील; कारण या तीनही परंपरा एकात्मतेने आविष्कृत होतात; याकडे लक्ष वेधले. या ग्रंथाच्या आवृत्त्या निघत आहेत आणि हळूहळू व्यापक संकल्पना अभ्यासक्षेत्रात रुजत आहेत. अर्थात हे काम प्राथमिक स्वरूपाचे आहे. मात्र त्यामुळे विश्वात्मक लोक आणि संस्कृती साकल्याने अभ्यासले जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. प्रस्तुत ग्रंथ मराठीत मांडला असला तरी जागतिक क्षेत्र आणि भारतीय परंपरा विचारात घेऊन संकल्पना इंग्रजी भाषेत अनुवादित करून; 'लोकबंध' या शब्दाला Folktype असा पारिभाषिक शब्द देण्याचे कार्य केले आहे. कोणताही Folktype हा लोक आणि लोकसंस्कृतीचा समग्र दर्शन घडविणारा किंवा ध्वनित करणारा 'अवशेष' असतो, हे अधोरेखित केले आहे. 'माणूस हा नावे ठेवणारा प्राणी आहे' असे लक्षवेधक विधान करून मौखिक परंपरेचे आणि भाषावैज्ञानिक अभ्यासाचे महत्त्व विषद केले आहे. लोकसाहित्य शास्त्राचा अभ्यास सुरू झाल्यापासून त्याचा साकल्याने विकास करण्याची प्रक्रिया सुरू झालेली दिसते. 'लोकबंध' हा त्यातीलच एक महत्त्वाचा प्रयत्न होय.[३]

**७. समारोप :-**

'लोकसाहित्य' हे शास्त्र सर्व शास्त्रांना अर्थात मानव्यशास्त्रे आणि

भौतिकशास्त्रे यांना सर्वांगे पायाभूत अशी, आरंभापासून ते वर्तमान स्थितीगतीपर्यंतची प्राथमिक सामग्री पुरविते; हे आता मान्य झाले आहे. खरेतर कोणतेही शास्त्र अथवा ज्ञान हे 'केवळ' किंवा 'एकले' पूर्णतः भिन्न नसते. विश्वाच्या चराचर, अर्थात जड चेतन, वस्तुमात्र, भूतमात्र यांशी सापेक्ष, अनुभूती संचितातून ते प्रकटते. पृथ्वीचा अर्थात जगताचा विचार केला; तर हे जगतही अंतरिक्ष आणि अवकाश यांत स्थित सर्व अस्तित्वमात्रांशी सापेक्ष असते. कोणत्याही ज्ञानशाखेचा संशोधन परीघ अर्थात क्षीतिज या सर्व अस्तित्वापलिकडे असलेल्या मूळ कारणापर्यंत रुंदावत जाऊ शकतो. मानवाच्या ज्ञानप्रक्रियेचे आरंभापासूनचे ध्येय तेच आहे. लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीच्या अभ्यासक्षेत्राने आपली मदार प्रामुख्याने दैवतकथाशास्त्रावर (Mythology) ठेवली असल्याने लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीची कक्षा आत्मभावाने मूळातच तेथपर्यंत पोचलेली असते. याचाच अर्थ असा की, समग्र अस्तित्वाच्या मूलकारणापासून वर्तमानातील दैनंदिन घडामोडींपर्यंत; अतीतातून वर्तमानापर्यंत, माणसाला घेऊन जाण्याची प्रक्रिया, लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीच्या आविष्कारात समाविष्ट असते. याकरिता या अभ्यासक्षेत्राचा विकास होताना; भारतीय संकल्पना आणि परंपरांचा विचार महत्त्वाचा ठरतो.

**८. संदर्भ व टीपा :-**


१. लोकसाहित्याची रुपरेखा : भागवत (डॉ) दुर्गा, वरदा बुक्स, सेनापती बापट मार्ग, पुणे, दु.आ. १९७७.

२. तत्रैव.

३. लोकबंध : सहस्रबुद्धे (डॉ) अनिल, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, सदाशिव पेठ, पुणे, प्र.आ. १९९७, (नवीन सुधारित आवृत्ती जुलै, २०१२, नितीन प्रकाशन, १४७, बुधवार पेठ, पुणे.


●●●



## प्रकरण दुसरे

# लोकसाहित्य ज्ञानशाखेविषयी

**(About the Faculty of Folk-lore)**

लोकसाहित्य हे आधुनिक काळातील अत्यंत प्रतिष्ठित असे अभ्यासक्षेत्र आहे. जागतिक पातळीवर या शास्त्राचा गांभीर्याने विचार केला जात आहे. लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती अभ्यासक्षेत्रासाठी स्वतंत्र संस्था, विद्यापीठे, समन्वय केंद्रे निर्माण होत आहेत. भारतात जवळपास सर्वच विद्यापीठांत साधारणतः पदव्युत्तर स्तरावर या ज्ञानक्षेत्राचा अभ्यास, स्वतंत्रपणे किंवा त्या-त्या प्रादेशिक भाषेच्या अंतर्गत होत आहे.

**१. लोकसाहित्य अभ्यासक्षेत्राची सुरुवात :-**

ट्युटानिक परंपरा, हा या अभ्यासक्षेत्राचा प्रारंभस्त्रोत मानला जातो. या परंपरेत होमर, स्नॉरी स्टर्लसन, सेमुंड, सॅक्सो आदींचा परिचय या परंपरांत होतो.

सतराव्या-अठराव्या शतकात युरोपमध्ये ग्रीम बंधूपासून लोकसाहित्य-शास्त्राची शास्त्र म्हणून अभ्यासास सुरुवात झाली असे मानले जाते. मात्र त्यापूर्वी सुमारे दोन शतकांत या ज्ञानक्षेत्रात अनेक प्रयत्न झालेले दिसतात. यात डब्ल्यू. जे. थॉम्स यांच्या Gentleman's Magazine या नियतकालिकाचे कार्य मोठे आहे. याचबरोबर थॉमस ब्राऊन यांची पुस्तके रेव्हरंड हेन्री ब्राऊन यांच्या Antiquates Vulgares किंवा Antiquities of the Common People या बहुमोल ग्रंथातून या अभ्यासात भर पडली आहे. जॉन ब्रँड, सिंक्लेअर, स्ट्रट, होन, चेंबर्स आदींची नावे या प्रयत्नासंदर्भात पुढे येतात. अठराव्या शतकात पर्सी, स्कॉटसारख्या साहित्यिक आणि कवींना पारंपरिक प्राचीन मौखिक परंपरांचे आकर्षण वाटले. यातूनच पुढे शास्त्रीय चौकटीत

पारंपरिक मौखिक परंपरांचे संग्रहीकरण सुरू झाले.

जर्मनीमध्ये ग्रीम यांनी केलेल्या कार्याला Volkskunde अर्थात लोकविद्या असे गौरव नाम लाभले. सामान्यतः Folklore हे नाव पुढे येण्याअगोदर अतिशय सूचक असे हे शास्त्रनाम पुढे आले होते. मात्र ''इंग्लंडमध्येही डब्ल्यू. जे. थॉम्सनें अँब्रोस मर्टन या टोपणनावाने Athenaeum या पत्रांत ता. २२ ऑगस्ट १८४६ या दिवशी Folklore हा शब्द जर्मन शब्दाची (Volkskunde) अनुकृति म्हणून पहिल्यानें वापरला. त्या पूर्वीचा Popular Antiquity (लौकिक पुराणपरंपरा) हा शब्द (Volkskunde आणि Antiquity ला पर्यायी शब्द) मागे हटला आणि Folklore हा शब्द तेव्हांपासून रूढ झाला'', अशी नोंद डॉ. दुर्गा भागवत यांनी केली आहे.[१] 'लोकसाहित्याची रुपरेखा' या डॉ. दुर्गा भागवत यांच्या प्रबंधानंतर एवढ्या तपशीलवार जागतिक आणि भारतीय परंपरेतील नोंदी, मराठी अभ्यासक आणि अन्य भारतीय अभ्यासक यांनी केलेल्या अभावानेच आढळतात. येथेही त्यांच्याच ग्रंथाधारे नोंदी नोंदविल्या आहेत.

भारतात, इंडियन अँटिक्वेरी हे नियतकालिक १९९३ पर्यंत चालले. याचेच अनुकरण डॉ. प. कृ. गोडे यांनी न्यू इंडियन अँटिक्वेरी असे नियतकालिक चालवले. १८८६ साली 'बाँबे अँथ्रॉपॉलॉजिकल सोसायटीची स्थापना झाली. १८६८ मध्ये मेरी फ्रियरचे Old Deccan Days हे पुस्तक आले. त्यापासून असे प्रयत्न भारतात पाश्चात्य अभ्यासकांच्या माध्यमातून होतच राहिले आहे. नाही म्हणायला शरश्चंद्र रॉय यांच्या नेतृत्वाखाली मानववंशशास्त्राला वाहिलेले नियतकालिक सुरू केले. भारतातील सुरुवातीचे हे प्रयत्न अर्थातच भारतेतरांच्या कार्यावर आधारित अनुकरणात्मक असे, हेतूपूर्वक केलेले होते.

लोकपरंपरेत रेंगाळणारे मौखिक परंपरेतील पुराण अवशेष, कथा, गीते आणि प्रामुख्याने दैवतकथा यांच्या संकलन संग्रहण स्वरूपात; भाषाविज्ञान आणि मानववंशशास्त्र यांना सामग्री पुरविणारे शास्त्र म्हणून या ज्ञानक्षेत्राचा उदय झाला असे दिसते. Comparative Mythology (तौलनिक दैवतकथावाद) हा फ्रीडरीश मॅक्स म्युलर यांनी महत्त्वाचा विषय मांडला. त्यातूनच पुढे Science of Mythology हा द्विखंडात्मक ग्रंथ अवतरला. पुढे १९३० मध्ये डॉ. ॲलेक्झांडर क्राप यांचा The Science of Folk lore हा ग्रंथ पुढे आला. या ग्रंथाने अभ्यासकांच्या अभ्यासाला गती मिळाली.



**२. लोकसाहित्याचे सामान्य स्वरूप :-**

लोकसाहित्याच्या अभ्यासक्षेत्रात विविध संप्रदाय निर्माण झाले. त्यात भाषाशास्त्रीय संप्रदाय, मानववंशशास्त्रीय संप्रदाय, मानसशास्त्रीय संप्रदाय, ऐतिहासिक व भौगोलिक संप्रदाय आणि दैवतकथाशास्त्रीय संप्रदाय होत. जवळपास दोनशे वर्षे अशा संप्रदायांच्या आश्रयाने अभ्यास झाला. या सर्व संप्रदायांचा एकत्रित व साकल्याने विचार करून शास्त्रीय मांडणी करणे अभिप्रेत होते. कोणतेही शास्त्र विकसित होतांना ही प्रक्रिया आवश्यक ठरते.

**२.१ डॉ. ॲलेक्झँडर क्राप यांचे कार्य :-** डॉ. दुर्गा भागवत यांनी डॉ. ॲलेक्झँडर क्राप यांच्या कार्याचे महत्त्व विषद करतांना म्हटले आहे, ''सर्व संप्रदायांचा समन्वय करूनही या विषयाचा अभ्यास करता येतो, एवढेच नव्हे, तर तो श्रेयस्करही ठरतो; याचे प्रत्यंतर म्हणजेच क्रापची कृती. त्याशिवाय लोकसाहित्याच्या प्रत्येक अंगाची स्पष्ट व्याख्या व मर्यादा त्याने विशद केली असल्यामुळे विषयपरिचयाच्या दृष्टीनेही त्याच्या कृतीचे महत्त्व उघड सिद्ध होते.''[२] The Science of Folk lore' असा ग्रंथ त्यांनी लिहिला. त्यात अठरा प्रकरणात लोकसाहित्य म्हणून ज्या गोष्टींचा विचार करायचा त्या अंगांचा विचार केला आहे. ''ती प्रकरणे अशी (१) परिकथा किंवा अद्‌भूतकथा (२) नर्मकथा (Merry Tale) (३) प्राणिकथा (Animal Tale) (४) स्थानिक कथा (Local Legend) (५) भटकी कथा (Migratory Legend) (६) गद्य सागा (७) म्हणी (८) लोकगीत (९) पोवाडा (१०) मंत्र, तोडगे व कोडी (११) लोकभ्रम (Superstition) (१२) वनस्पतिविद्या (Plantlore) (१३) प्राणीविद्या (Animalelore) (१४) खजिनविद्या (Mineralore) (१५) नक्षत्रविद्या (Starlore) (१६) उत्पत्तीकथा (१७) प्रथा, विधी जादुटोणा (१८) लोकनृत्य व लोकनाट्य''[३] डॉ. दुर्गा भागवत यांनी क्रापच्या या प्रकरणांना अनुसरून भारतीय परंपरांचा समग्र आढावा घेऊन भारतात लोकसाहित्याच्या अभ्यासाची सनातन परंपरा अधोरेखित केली आहे. 'यद्यपि शुद्धं लोकविरुद्धम् ना करणीयम् ना चरणीयम्' या उक्तीतून लोकसाहित्याची परंपरा आणि परिवर्तनशीलता आणि नित्यवर्तमानताही स्पष्ट झाली आहे. लोकसाहित्याचे सामान्य रूप लक्षात घेताना ह्याचा विचार केला पाहिजे.

२.२ 'लोकबंध' या ग्रंथात लोकसाहित्याचे सामान्य स्वरूप स्पष्ट करतांना पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण दिले आहे- 'लोक'धारणा करणारे कल्पनाबंध

म्हणजे 'लोकबंध' होय. हे लोकबंध लोकमानसातून प्रकट होताना मनाच्या सृजनशील स्वभावानुसार अनेक माध्यमे वापरली जातात. ही माध्यमे सहानुभूती आणि सौंदर्यभावना यानुसार घडलेल्या मनाच्या सृजनशीलतेतून आलेली असतात. ही माध्यमे प्रतिके, प्रतिमा, संकेत, रूपके अशा स्वरूपात असतात. ही प्रतिके, प्रतिमा, रूपके, संकेत बहुधा वस्तुरूप, चित्ररूप, नाट्यरूप, विधीरूप, चिन्हरूप इत्यादी स्वरूपात असतात. या माध्यमातूनच आजची भाषा विकसित झाली असावी. त्यामुळे ह्या सर्व माध्यमांबरोबरच या माध्यमांचे वर्णनात्मक भाषिकरूप मौखिक स्वरूपात प्रकटते. हेच लोकसाहित्य होय. लोकजीवनात, अगदी स्वाभाविकपणे, लोकबंधांचे प्रकटीकरण मनाच्या स्वभावविशेषांनुसार लोकसाहित्य स्वरूपात होते. 'लोक'चे जगणेच लोकसाहित्यात सुरू असते. लोकसाहित्य, लोकसंगीत, लोककला ह्या सर्व प्रकारच्या प्रकटीकरणास 'लोकसंस्कृती'चे कलारूप असे म्हणता येईल. या एकूण कलारूपाला 'लोकसाहित्य' असे म्हणता येईल. तत्त्वज्ञान, शास्त्रे व कला या तिन्ही गोष्टींचा स्त्रोत या लोकसाहित्यातूनच प्रकट होऊन वाहत असतो. – एकूण लोकसाहित्य निर्मिती प्रक्रियेसह लोकजीवन व संस्कृतीशी लोकसाहित्याचा अन्योन्य संबंध व लोकसाहित्याची व्यापक अवस्था तसेच सर्व ज्ञानक्षेत्रांना सामग्री पुरविण्याची क्षमता आणि लोकबंधात्मक नित्यवर्तमानता या सामान्यस्वरूप विवेचनातून 'लोकबंध' ग्रंथात आली आहे.[४]

**२.३** 'लोकसाहित्याचे स्वरूप' या ग्रंथात डॉ. प्रभाकर मांडे यांनी लोकसाहित्याची सर्वसाधारण लक्षणे, विविध व्याख्यांवरून नोंदवून लोकसाहित्याचे सर्वसामान्य स्वरूप कसे नोंदविले गेले आहे; हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. ते म्हणतात, ''सर्वसाधारणपणे लोकसाहित्याची पुढील प्रमुख लक्षणे असल्याचे दिसते. (१) लोकसाहित्य मौखिक किंवा अलिखित स्वरूपात असते. (२) ते एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत याप्रमाणे चालत येते. (३) पारंपरिकता हा लोकसाहित्याचा एक महत्त्वाचा विशेष असतो. (४) पूर्वकालीन संस्कृतीच्या अवशेषरूपाने ते समाजजीवनात प्रचलित आहे. हे संस्कृतीचे किंवा पूर्वकालीन जीवनाचे अवशेष असले तरी मृत अवशेष नसतात तर वर्तमानकालीन जीवनाच्या संदर्भात त्याला अर्थपूर्णता असते. त्यामुळेच या अवशेषांना सजीव अवशेष मानण्यात येते. (५) ते लोकसमूहाचे किंवा समाजगटाचे असते. ती समूहाची निर्मिती (मान्यता) असते. व्यक्तीने



निर्माण केलेले असले तरी त्याला असे स्वरूप प्राप्त होते की, ती व्यक्तीची निर्मिती न राहता सर्व समूहाची बनते. त्याचा मूळ निर्माता हा अज्ञात असतो. व्यक्तीचे व्यक्तिविशिष्टत्व त्यात व्यक्त न होता समूहविशिष्टत्व व्यक्त होते. (६) लोकसाहित्यातून लोकसंस्कृतीचा आविष्कार होतो. त्यामुळे ते लोकसंस्कृतीच्या अध्ययनाचे एक महत्त्वपूर्ण साधन असते. मौखिक संस्कृतीत सर्व काही लोकसाहित्यच असते. (७) लोकसाहित्य हे लोकमानसाचा आविष्कार असते. (८) लोकसाहित्य हे भौतिक (Material) किंवा मनोमय स्वरूपात असते. (९) लोकसाहित्यातून परंपरा टिकविणे आणि पुनरुज्जीवन करणे या क्रिया घडतात. त्यात पारंपरिकता आणि परिवर्तनशीलता असते. (१०) लोकसाहित्य हे लोकसमूहाच्या भ्रमातून किंवा आभाससृष्टीतून निर्माण झालेले असते. (११) लोकसाहित्य हे लौकिकज्ञान असते. ते मानवाने युगानुयुगे घेतलेल्या अनुभवांचे साररूप असते. ते पारंपरिक ज्ञान असते. (१२) लोकसाहित्य हे कला, वाङ्मय यांचे स्त्रोत असते. (१३) लोकसाहित्याचे संपादन, विकसन आणि एका पिढीकडून दुसऱ्या पिढीपर्यंतचे संक्रमण स्वाभाविकपणे व सहजपणे होत असते. (१४) लोकसाहित्याच्या अभ्यासाचा समावेशही लोकसाहित्यात होतो. इतिहासात ज्याप्रमाणे सामग्री आणि त्याचे अध्ययन या दोहोंचा समावेश असतो; त्याचप्रमाणे लोकसाहित्य या संकल्पनेत पारंपरिक लोकजीवनाचा विविध माध्यमातून झालेला आविष्कार आणि त्यांचे अध्ययन या दोहोंचा अंतर्भाव होतो. म्हणजेच अध्ययन-सामग्री आणि अध्ययन या दोहोंना लोकसाहित्य असे म्हणतात.'' डॉ. मांडे यांनी लोकसाहित्याच्या अभ्यासकांनी केलेल्या व्याख्यांच्या आधारे आजवरचे लोकसाहित्याचे सामान्यस्वरूप आकलित करून देण्याचा प्रयत्न केला आहे.[५]

### ३. लोकसाहित्याच्या काही महत्त्वाच्या व्याख्या :–

लोकसाहित्याचे सामान्य रूप विचारात घेता पुराणपारंपरिक वारसा म्हणजे लोकसाहित्य असे वाटणे स्वाभाविक आहे. १९८४ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'स्टॅन्डर्ड डिक्शनरी ऑफ फोकलअर, मायथॉलॉजी ॲन्ड लीजन्ड'[६] या मारियालीच यांच्या द्विखंडात्मक कोषातील व्याख्यांचा परामर्श घेतला तर, सांस्कृतिक वारसा जपण्याच्या दृष्टीनेच लोकसाहित्याचा अभ्यास घडत गेला असावा हे दृढावणेही शक्य आहे. काही व्याख्यांचा उदाहरणादाखल परामर्श घेणे योग्य होईल.

(1) Folklore is the generic term to designate the customs, beliefs, traditions, tales, magical practices, proverbs, songs etc. in short the accumulated knowledge of homogeneous unsophisticated people tide together not only by common physical bonds but also by emotional ones which colour their every expression, giving it unity and individual distinction all aspects of folklore, probebaly originally the product of individuals are taken by the folk and put through a process of re-creation which conststant variation and receptition become group product : MACEDWARD LEACH.

(२) १८७८ मध्ये स्थापन झालेल्या Folklore Society च्या Handbook of Folklore ह्या मार्गदर्शिकेच्या नंतर सर जॉर्ज लॉरेन्स गॉम यांनी १८८० मध्ये केलेल्या लोकसाहित्याच्या व्याख्येचे डॉ. दुर्गा भागवत यांनी केलेले भाषांतर असे- 'लोकसाहित्य हे पुरातन समजुतींच्या आणि चालीरीतींच्या आजमितीस उपलब्ध असलेल्या सजीवावशेषांची (Survials) चर्चा करणारे शास्त्र आहे.'[८] या शास्त्रात पुढील विषयांचा समावेश होतो. (१) पारंपरिक कथने- लोककथा, वीरकथा, पोवाडे व गीते, स्थानिक दंतकथा. (२) पारंपरिक प्रथा किंवा चालीरीती- स्थानिक प्रथा, उत्सव प्रथा, विधीप्रसंगीच्या प्रथा, खेळांच्या प्रथा. (३) लोकभ्रम व पारंपरिक समजुती- जादुटोणा, ज्योतिष, पारंपरिक क्रिया किंवा रूढ आचार आणि भ्रम, लोकवाणी, म्हणी, लौकिक नामपद्धती, कोडी, समस्या, बडबडगाणी इ.

(३) ॲलेक्झांडर क्रॉप यांच्या व्याख्यात्मक स्पष्टीकरणाचा विचार वर आला आहेच.

(४) डॉ. प्रभाकर मांडे यांनी मारीआलीच आणि डॉ. दुर्गा भागवत यांनी नोंदविलेल्या अभ्यासकांच्या व्याख्यांचा परामर्श घेऊन 'लोकसाहित्य म्हणजे नेमके काय?' या प्रश्नाचे एकच उत्तर नाही असे स्पष्ट करून लोकसाहित्याची सामान्य लक्षणे मांडली आहेत. त्यांचा परामर्श वर घेतला आहेच.

**३.१** व्याख्यांच्या संदर्भात एकूणच लोकसाहित्याच्या अभ्यासाला दिशा देणारा विचार आणि स्पष्टीकरण प्रस्तुत लेखकाने 'लोकबंध' या ग्रंथात



'लोकबंध आणि लोकसाहित्य' या मथळ्याखालील व्याख्यात्मक विवेचनात दिले आहे. त्यानुसार पुढील व्याख्या दिली आहे. ''एकूण लोकबंधांचे मानवी जीवनातील म्हणजे लोकमानसाचे जीवननिष्ठ कलात्मक आत्मप्रकटीकरण म्हणजे लोकसाहित्य होय. लोकमानसाचे जीवननिष्ठ कलात्मक आत्मप्रकटीकरण दोन स्तरावर होते :- (१) निसर्ग, जीवन, धर्म, अनंतकाल आणि अवकाश या विषयीची श्रद्धा (२) निसर्ग आणि लौकिक जीवन यांशी संबंधित व्यवहार.''[९]

लोकबंध हा व्यापक आणि नवा विचार असल्याने प्रस्तुत लेखकाने केलेले स्पष्टीकरण द्विरुक्तीचा दोष पत्करून मांडणे आवश्यक वाटते ते स्पष्टीकरण असे, ' 'घटकलोक' (व्यक्ती) आणि 'अंगस्वरूपलोक' (व्यक्तींचा एकात्म समूह) यांचे भावबंध, कल्पनाबंधाचे रूप धारण करतात. हे 'कल्पनाबंध' (Motif) (कल्पनासूत्रे) लोकधारणांचे काम करीत असतात. म्हणूनच लोकधारणा करणाऱ्या सर्व कल्पनाबंधांना 'लोकबंध' असे म्हणता येईल. या लोकबंधाचे प्रकटीकरण करण्यासाठी वस्तुरूप, चित्ररूप, चिन्हरूप, नाट्यरूप, विधीरूप माध्यमे (साधने) वापरली जातात व या माध्यमांच्या आधारे हे 'लोकबंध' अंगस्वरूपलोकच्या (समूहमनाच्या) आत्मप्रकटीकरणाच्या स्वरूपात प्रकट होतात. मनाच्या सौंदर्यभावना आणि सृजनशीलता या स्वभाववैशिष्ट्यांसह सहानुभूतीपूर्वक हे आत्मप्रकटीकरण जास्तीत जास्त कला आणि क्रीडा रूप धारण करते. येथेच **लोकसाहित्य जन्माला आलेले असते**. म्हणजेच **लोकसाहित्य हे लोकबंधांची म्हणजे अंगस्वरूपलोकच्या जाणिवांची प्रयोगसिद्ध वाङ्मयकला** असते. क्रीडा, कष्ट, प्रयत्न, शिकार आणि जीवनातील सर्व प्रकारची कामे सुरू असताना हे आत्मप्रकटीकरण सुरू असते. ही वाङ्मयकला प्रकटते ती शब्दरूपांतून. प्रतीके, प्रतिमा, तालबद्ध शब्द, रूपके यांचा वापर ही कला प्रकटताना होत असतो. म्हणजे लोकबंधाचे आत्मप्रकटीकरणातून प्रत्ययास येणारे दृश्यरूप हे; कलात्मक अनुभवकथन, कथात्मकतेने सूचकपणे लोकबंधांचे प्रकटीकरण, गीतांच्या माध्यमातून आत्मप्रकटीकरण, शब्द, पदे, शब्दसमूह, वाक्प्रचार, म्हणी, सूत्रकथन, नीतिकथन स्वरूपाची वाक्ये, यांतून आत्मप्रकटीकरण या प्रकारचे असते. लोकव्यवहाराच्या सर्वच अंगांवर असे आत्मप्रकटीकरण प्रसंगीसुद्धा जास्तीत जास्त कलात्मक रूपे प्रकटतात. येथेच लोकमानसाची सृजनशीलता आणि प्रतिभाशक्ती अनुभवास येते. लोकव्यवहारात पारंपरिक कल्पनारूपांचा वापर मोठ्या प्रमाणावर होत

असतो. ही कल्पनारूपे 'लोकबंध' रूपानेच प्रकट होत असतात. लोकजीवनच लोकसाहित्यरूप असते. म्हणजे मानवी जीवनाचे प्रकट वाङ्मयरूप (शाब्द, वर्तन, साधन-स्वरूप) **हे लोकसाहित्यच** असते.'[१०]

**४. 'Folk lore' अभ्यासक्षेत्राचा वैविध्यपूर्ण स्वीकार :-**

**४.१** 'Folk lore' ला पर्याय म्हणून Folk lore अंतर्गत प्रकार नामांचा वापर; Folk lore Synonyms - Word Hippo The Saurus (http// www.wordhihippo.com) नुसार Folk lore म्हणजे The traditional beliefs, customs, and stories of a community, passed through the generations by word of mouth. 'Folk lore' या नामाचे अर्थ किंवा पर्यायी शब्द किंवा पर्याय म्हणजे (अंतर्गत प्रकार) Mythology, Tradition, Lore, Mythos, Fables, Legend, Legendry, Legends, Myth, Myths, Mythus, Ballad, Custom, Fable, Folk Tradition, Oral History, Superstition, Wisdom, Folk-Stories, Folk Tales, Folk Story, Oral Literature, Oral Tradition, Traditional Beliefs, Storeys[uk], Stories[us], Belief, Conviction, God Lore, Mythicism, The tales, legends and superstition of a particular ethnic population; Received Wisdm, Tradition Stories, Urban Myths; Study of Humans and their Culture, Anthropology, Sociology. (The Old School) A Style, Way of Thinking, or Method of Accomplishing a task that was employed in a former era - old school, Tradition, Past Histor, Yester Year, Experience, Legend Customs, Habit, Lore, Routine Former times bygone days, Long ago; Synonyms, Antonyms, Definitions, Rhymes, Sentences Translations, Find Words, Word Forms, Times of Yore, Good old days" - या सर्व पर्यायांचा विचार करता ठळकपणे लक्षात येते ते म्हणजे - समूह जीवनात वर्तमान सारणीत अद्यापही, अतिप्राचीन काळापासून दृढपणे रेंगाळलेल्या, परिवर्तनासह आलेल्या, परिवर्तन होऊ पाहाणाऱ्या समूहमनाच्या शाब्द, वर्तनात्मक (सारणी वैशिष्ट्यात्मक) आणि साधनात्मक धारणाबंधांचा अर्थात लोकबंधांचा, समूहमन आणि जीवनदर्शी अनुभवांचा दृश्य प्रवास म्हणजे Folk lore होय. Folk typs चा आविष्कार



अर्थात लोकबंधांचा आविष्कार म्हणजे लोकसाहित्य होय. लोकबंधच्या या आविष्कार प्रवासाविषयी व्याख्यात्मक स्पष्टीकरण 'लोकबंध' या ग्रंथात आले आहे ते असे- 'लोक' धारणेसाठी कार्यान्वित झालेला, परंपरेत लवचिकतेने परंतु मूलभूततेने वाहत राहणारा, सनातनातून आलेला, वर्तमानात जाणवणारा, भविष्यकाळात प्रगटण्याची क्षमता असणारा, लोकमानसातील जाणिवेचा, आनंद किंवा सौंदर्याभावनाप्राप्त कल्पनाप्रवाह म्हणजे 'लोकबंध' होय. लोकबंध वर्तनपद्धतीतून, विधिस्वरूपातून, चिन्हे, प्रतीके, प्रतिमा यांमधून आणि या सर्वांच्या भाषिक रूपातून प्रकट होतो.[१२]

**४.२** विविध शास्त्रांच्या आकलनासाठी Folk lore च्या अभ्यासक्षेत्राचा स्वीकार; आपण अर्थात मानवजात जगते ते लोकसाहित्यात हे सूत्र विचारात घ्यावे लागते. 'लोकसाहित्य ही जीवन कला आहे.'[१३] जीवनधारणा आणि जीवनाचा अप्रतिहत प्रवाह अनेकानेक शास्त्रीय ज्ञानांच्या लौकिक उपयोजनातून सुरू असतो. त्याचा प्राथमिक स्तरावर अंतस्त्रोतात्मक अनुभव सातत्याने येत राहतो. जागतिक पातळीवर, उपरोक्त संकेतस्थळावर याची नोंद घेण्यात आली आहे.[१४] (Folklore Synonyms - Word Hippo Thesaurus)

1) Symbolic Representation - iconography, drawing, emblem badge, icon, idol, ikon, image, logo, motif, picture etc.

2) The ideas customs, and social behavior of a particular people or society - cultuare, lifestyle, customs, tradition, habit, background, civilisation[uk], civilisation[us], habits, heritage mores, society, values, ways, life convention, development ethinicity, ethonology, folkways, grounding humanism, ideas, knowledge, arts and sciences, the arts, way of life, priciplies, community, belifes, ethos, philosophy, social order, the social order, the world tradition, world human activity, humanity humankind, mankind.

3) A theory or attitude that acts as a guiding principle of behavior- Philosophy, ideology, doctrine wisdom, belief, principle, value, conviction, credo knowledge, outlook,

reasoning teaching, thinking, understanding creed, custom, dogma, scholarship, science, tenet, view point, argument, attitude, axiom, culture, ethic, faith, idea, logic, rationale rationality sense system, theory, thought, tradition, view, argumentation, gospel, line, lore, notion, saying, truth, conception, idealog, legend, superstition, testment, dialecitics, asthetics[uk], esthetics[us], legendry, myth, mythology, beliefs, ethics, ideas, notions, principles, saings, teachings, truths, values, attitude to life school of thought, worldview basic idea, formal system, way of life, chain of thought folk-wisdom, logical thought welthan schauang, oral tradition, traditional wisdom, line of reasoning, chain of reasoning, how to know-how process of reasoning.

4) Related words and Phares for Folk-lore - Folkloric, Folklores, Folklorically, Folkly, Folkmedicine, Folk literature, Folklike, Folkie Folk History Etc.

जीवनाच्या सर्व तपशीलांना, विचारांना, आकारांना, व्यवहारांना भाषिक, साधनात्मक, वर्तनात्मक गोष्टींसाठी folk lore कसे कार्यान्वित असते याचे देशविदेशातील अभ्यासकांनी नोंदविलेले तपशील पाहिले की हे सहज लक्षात येते की सामान्यतः मानवी समूहजीवनात अनुभवातून पारंपरिक झालेली सामग्री, शास्त्रीय म्हणविणाऱ्या अवस्थेने घेऊन, परिवर्तनपूर्वक किंवा तथाकथित शास्त्रीय पद्धतींसह, पुनर्‌शुद्ध आणि काहीशी तथाकथित सुधारलेली किंवा विकसित अवस्था प्रकटते. मानवी समूहजीवनाच्या सर्व प्रयोगात त्याचे उपयोजन करतांना त्याला समूहमनाच्या आविष्कारांचे रूप येते आणि ती रूपे, मानवी जीवनाच्या पुढील प्रवासासाठी, सामान्यतः मानवी समूहाकडून प्रमाणित सामग्रीच्या आधारावर पुनः तथाकथित शास्त्रीय आणि स्थलकालपरिस्थितीसापेक्ष जाणिवांचे विरोपण करून पुन्हा समूहजीवनाच्या उपयोजनासाठी प्रदान होऊन पुन्हा मानवी जीवन परिवर्तनात्मकतेसह पुढे जाते. हा folk lore चा सनातन प्रवासच, देशविदेशातील folk lore ला निर्माण झालेल्या पर्यायातून, कल्पनातून, उपयोजनातून पुढे आलेला दिसतो.



पर्यायांचा देशविदेशातील तोचतोचपणा किंवा वारंवारिता पाहिली की folk lore च्या प्रक्रियेचे शास्त्र बांधता येते. कोणत्याही मानवी समूहात, कोणत्याही स्थलकालपरिस्थितीत folk lore ची निर्मिती उपयोजन, शास्त्रीय बांधणीतील सहभाग, पुनर्‌उपयोजन, पारंपरिकता या गोष्टी समान प्रक्रियेनेच घडतात. त्यामुळे जागतिक पातळीवर मानवी अस्तित्वाचे सामान्यीकरणही अनुभव्यास किंवा आकलित करण्यास सहज शक्य होते. याच कारणाने folk lore अभ्यासक्षेत्राचे प्रतिष्ठित स्थान, सर्व अभ्यासक्षेत्रांसाठी मानले गेले आणि जागतिक पातळीवर folk lore चा अभ्यास सुरू झाला. भारत, ग्रीक आदि प्राचीनतम संस्कृतीत ही प्रक्रिया अधिक ठळकपणे जाणवते. त्यांचा प्रभाव जागतिक पातळीवर अनुभवता येतो. म्हणूनच भारतीय अभ्यासपरंपरांचा विचार अधिक करणे क्रमप्राप्त होऊन बसले.

४.३ लोकसाहित्याच्या अभ्यासकांनी लोकसाहित्याचा अन्य शास्त्राशी असलेल्या संबंधावर चर्चा केलेली दिसते. डॉ. दुर्गा भागवत यांनी लोकसाहित्याच्या अभ्यासाचे जे विविध संप्रदाय उल्लेखिले आहेत[१५] हे त्याचेच उदाहरण आहे. डॉ. प्रभाकर मांडे यांनी 'लोकसाहित्याचे स्वरूप'[१६] विशद करतांना; 'लोकसाहित्याची व्याप्ती' या विषयाची चर्चा केली आहे. त्यात त्यांनी मानववंशशास्त्र, समाजशास्त्र, भाषाशास्त्र, इतिहास व पुरातत्त्वशास्त्र, मानसशास्त्र आणि धर्म यांशी लोकसाहित्याचा संबंध काय; हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. 'लोकबंध'[१७] या ग्रंथातही असे स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केला आहे. ही मराठी अभ्यासकांची उदाहरणे यासाठी दिली; की लोकसाहित्याचा सर्व शास्त्रांशी पायाभूत संबंध आहे याकडे सर्व अभ्यासकांचे लक्ष गेले आहे. उपरोक्त दिलेल्या नोंदीमध्ये Folk lore ला आलेले पर्याय, विविध शास्त्रांच्या आणि आकलनासाठी Folk lore अभ्यास क्षेत्राचा स्वीकार यातील Symbolic representation, The ideas etc. आणि A theory यात संकेत स्थळांवरून केलेल्या नोंदीत, सर्व शास्त्रांना अर्थात मानवी शास्त्रे आणि भौतिक शास्त्रे यांना प्रत्यक्ष अनुभूती संचिताच्या स्वरूपात प्राथमिक सामग्री मिळण्याचे क्षेत्र म्हणजे folk lore हेच सूचित होते हे स्पष्ट करणे होय.

**५. भारतात Folk lore चा अभ्यास विविध प्रांतात विविध पारिभाषिक शब्द योजून करण्याचा प्रघात :–**

भारतात जवळपास सर्व भाषांत आणि सर्व प्रांतात लोकसाहित्य अभ्यास

क्षेत्राचा अभ्यास सुरू आहे. स्वाभाविकपणे प्रादेशिक भाषेस अनुसरून folk lore ला पारिभाषिक शब्द देण्याचा प्रयत्न भारतात झालेला दिसतो.

i) महाराष्ट्रात मराठीमध्ये 'लोकसाहित्य' हा शब्द रूढ झाला आहे. तरी मराठीत लोकवाङ्मय, लोकविद्या असे शब्द पर्याय पुढे आले होतेच.

ii) कन्नडमध्ये जानपद, जानपद साहित्य, नाडाडी कथे, नाडाडी हाडू असे शब्द पारिभाषिक शब्द म्हणून पुढे आले आहेत.

iii) तमीळमध्ये Nttu ppuramay irukumnilai - असा शब्द आला त्याचबरोबर Mara paro ycci हाही शब्द आला.

iv) तेलगुमध्ये फोकलोअर असा इंग्रजी शब्दच वापरला गेला/जातो.

v) आसाममध्येही फोकलोअर हाच शब्द स्वीकारला.

vi) उडियामध्येही फोकलोअर हा इंग्रजी शब्द स्वीकारला.

vii) हिंदीमध्ये कहावत, लोकसाहित्य, घरेलु कथा कहानी, पौराणिक बाते, जनकथा-विज्ञान, लोकगाथा, लोकरिती, पौराणिक कथा आणि अलिखित विद्या असे शब्द वापरले गेले.

viii) उर्दूमध्ये Who Baten Jo Awam Mein Paui Jayen असे म्हटले गेले.

ix) पंजाबीमध्ये folk lore हाच शब्द स्वीकारला गेला.

x) गुजरातीमध्ये पौराणिक कथा, मौखिक परंपरा, लोककथा, लोकआस्था, लोकवार्ता असे शब्द वापरले जातात.

xi) बंगालीमध्ये Lokacharbidya - लोकाचार विद्या, lokatita, lokokti, lokadekhana, लोककहाणी, लोकप्रभा, लोकप्रसिद्धी असे शब्द वापरले जातात.

**६) जागतिक लोकसाहित्य अभ्यासक्षेत्रातील 'लोक' (Folk) आणि 'साहित्य' (Lore) या पदांविषयी मांडलेल्या विचारांतील संकल्पना आणि विस्तार :-**

**६.१** 'लोक' (Folk) आणि साहित्य (Lore) अशा दोन शब्दांचा किंवा पदांचा स्वतंत्र विचार मांडणे; हे अभ्यासाच्या परंपरेत आवश्यक झाले. कोणत्याही ज्ञानक्षेत्राचा अभ्यास सातत्याने होत गेला; की त्या अभ्यासक्षेत्रात वापरल्या गेलेल्या पारिभाषिक शब्दांना अधिक व्यापक क्षितीज लाभत जाते ही अगदी स्वाभाविक प्रक्रिया आहे. www.vocabularycom / dictionary/ folklore या संकेत स्थळावर "Folklore is a combination of the words folk and lore which 1846. The former refers to a community of people, and latter comes from the old English 'Lar', meaning learning or knowledge. Folk in this sense is also used interms like 'folk music', folk dance and folk tale. Although traditionally folklore is passed along by words of mouth."[१८] याचा अर्थ असा folk (लोक) आणि lore (साहित्य) हा शब्द शब्दघटनेच्या दृष्टीने लोक+साहित्य असा संधी शब्द आहे. त्यामुळे तो एकत्रितपणे 'लोकसाहित्य' (folklore) असा वापरला गेला आहे. मात्र लोकनृत्य, लोकसंगीत, लोककथा, लोकरूढी, लोकपरंपरा असे परंपरेने शब्द अभ्यासक्षेत्रात वापरून, आणखी अभ्यासविस्तार सूक्ष्माकडे जाऊ लागला. अन्यथा folk (लोक) म्हणजे community of pleople अर्थात लोक म्हणजे एकात्म मानवी समूह असा अर्थ folk (लोक) या पदाचा आहे आणि lore (साहित्य) म्हणजे traditional knowledge अर्थात साहित्य म्हणजे पारंपरिक ज्ञान किंवा माहिती किंवा आलकन हे ज्ञान - knowledge gaind though tradition or ancedote असा अर्थ दिसतो. आता पारंपरिक ज्ञान यात नृत्य, संगीत, कथा आणि समग्र व्यवहार आणि विद्या, संस्कृती समाविष्ट होत नाहीत का? जागतिक लोकसाहित्यात folklore (लोकसाहित्य) या अभ्यासक्षेत्रात व्यापकपणे या सर्व गोष्टी सामावलेल्या आहेत. या अभ्यासक्षेत्रात सर्वाधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे 'लोकजीवनातच परंपरेने चालत आलेलं ज्ञान' याचा अभ्यास करणे हे महत्त्वाचे ठरते. एकूण या अभ्यासक्षेत्राचा विचार करता Folklore लोकसाहित्य या संधी शब्दातील folk (लोक) हे पद पारंपरिक सामूहिक जीवन जगणारा एकात्म असा मानवी समूह असा अर्थ प्रेषित करतो आणि lore (साहित्य) हे पद अशा मानवी जीवनाच्या पारंपरिक आधार असलेले सतत मानवी जीवनाबरोबरच परिवर्तनासह पारंपरिक होत वर्तमानात प्रकटून पुढे स्वाभाविक प्रवास करत राहणारे ज्ञान असा अर्थ प्रेषित करतो.

मानवी सामूहिक जीवन हे अगदी लहानात लहान मानवी समूहांपासून, समूहांचे समूह स्वरूपात वैश्विक मानवी समूह येथपर्यंत विस्तारत जाते. त्यामुळे लोकसाहित्य अभ्यासक्षेत्र विश्वात्मकतेपर्यंत विस्तारत जाते. लोकसाहित्याचा अभ्यास व्यापक अभ्यासक्षेत्राचा अभ्यास ठरतो.

**६.२** लोकसाहित्याचा त्रिविध परंपरा विचार केला तर; लोकसाहित्याच्या

(Folk lore) परंपरा, ह्या अभिजात शास्त्रीय मांडणीसाठी, सर्वप्रकारे प्राथमिक शास्त्रीय सामग्री देण्याचे कार्य करतात असे दिसते. भौतिकशास्त्रे असोत की मानव्यशास्त्रे, मानववंशशास्त्र, पुरातत्त्वशास्त्र आणि मानसशास्त्र यांना तसेच विविध कौशल्याधिष्ठित कला आणि नृत्य, नाट्य, संगीत, चित्र शिल्प आदि अभिजात कला विकसित करण्यासाठी अशी प्राथमिक सामग्री लोकसाहित्य परंपरांमधून मिळते.

लोकसाहित्याच्या त्रिविध परंपरा पुढीलप्रमाणे दिसतात. (१) शाब्दपरंपरा अर्थात वाङ्मयपरंपरा (२) वर्तन, वर्तन पद्धती, वर्तनात्मक संकेत आणि (३) वस्तू किंवा साधने यांच्या व्यवहार, मांडणी, उपयोजन आणि प्रतिकांच्या स्वरूपात परंपरा.

मानवी समूहजीवनातील कोणतीही स्थिती, वर्तन, व्यवहार, विचार, मांडणी, विधी उदाहरणार्थ घेतले; तर या त्रिविध परंपरा त्यात समाविष्ट असल्याचे लक्षात येते. शाब्दपरंपरांचा विचार केला तर संपूर्ण भाषा घटना ही परंपरेतून प्रकट होत वर्तमानातील भाषेचे रूप धारण असे दिसते. वर्तन, वस्तू किंवा साधन, व्यवहार यातील प्रत्येक घटकाला शाब्दपरंपरेने नामात्मक, क्रियात्मक किंवा निर्देशात्मकतेने पारंपरिक केलेले असते. उदा. भोजन विधी पाहिला, बसण्याची, खाण्यापिण्याची पद्धती, पदार्थांची नावे, पदार्थांची वाढप करण्याची मांडणी, पदार्थांचे साहचर्य या सर्व गोष्टींविषयी अशी त्रिविध प्रकारे परंपरा दिसते.

**६.३** लोकसाहित्य परंपरा समूहमनात प्रवाहित असतात. समूहमनातील या परंपरांचे मौखिक वाङ्मय स्वरूपातील शाब्द आकार, वर्तनशैलीचे आकार आणि वस्तू किंवा साधनपरंपरांचे आकार म्हणजेच समूह मनातील पारंपरिक धारणा करणारी सूत्रे होत. अगदी साधे उदाहरण घेऊ : जवळ बोलावतांना; 'इकडे ये' ही शाब्दपरंपरा हाताची हालचाल होणे यात हात हे साधन, मुखाने विशिष्ट आवाज काढणे यात मुख्य हे साधन आणि हाताच्या पंजाने, बोटांनी विशिष्ट दिशेनं पालवणे हे वर्तन ह्या गोष्टी पारंपरिक समूहमनाची धारणाशक्तीसह प्रकट झालेली सर्वमान्य कृती किंवा विधान असते. या पारंपरिक आकारांना 'लोकबंध' या प्रस्तुत ग्रंथ लेखकाने 'लोकबंध' असा पारिभाषिक सुचविला आहे. लोकसाहित्याच्या जागतिक अभ्यासक्षेत्रात 'लोकबंध' या पारिभाषिक शब्दाला 'folktype' असा पारिभाषिक शब्द देता येईल. समूहमनाची



धारणाशक्तीसह प्रकट झालेली कृती किंवा विधान हाच तर समूहमनाचा ज्ञानात्मक किंवा शहाणपणाचा आविष्कार असतो. हेच फोकलोअर लोकसाहित्य असते. 'लोक' (Folk) ची धारणासूत्रे म्हणजे 'लोकबंध' folktype होत. लोकबंधांचे प्रकटीकरण म्हणजेच लोकसाहित्य. folklore.

**६.४** लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीच्या अभ्यासाविषयी अभ्यासकांमध्ये संभ्रम आढळतो. लोकसाहित्याचा अभ्यास खरेतर संस्कृतीच्या समग्र आविष्काराचा अभ्यास होतो. शास्त्रे आणि कला तत्त्वज्ञान आणि न्याय यांच्या शास्त्रीय ज्ञानपरंपरांचा विचार संस्कृती या अभ्यासक्षेत्राच्या दृष्टीने महत्त्वाचा असतो. मात्र शास्त्रे, कला, तत्त्वज्ञान आणि न्याय या ज्ञानशाखांचे उपयोजन समूहजीवनात होऊनच लोकपरंपरा निर्माण होतात. या परंपरा स्थलकालपरिस्थिती सापेक्षतेने परिवर्तनासह प्रवाहित असतात. त्यातूनच शास्त्रे, कला, तत्त्वज्ञान आणि न्याय यांना नवे आणि व्यापक आयाम मिळत असतात. त्यामुळे शास्त्रे, कला, तत्त्वज्ञान आणि न्याय या क्षेत्रांना अभिजातता प्राप्त होते. ह्या गोष्टी लक्षात घेतल्या तर लोकसाहित्याचा अभ्यास, लोकसाहित्य शास्त्राच्या पद्धतीने सर्वस्पर्शी होणे आवश्यक ठरते. जागतिक पातळीवर शोध घेतला तर असे प्रयत्न सुरू झाले आहेत असे लक्षात येते. मराठी भाषा आणि साहित्य क्षेत्रात प्रस्तुत लेखकाने 'लोकबंध'[१९] आणि 'लोकसाहित्य संशोधन पद्धती'[२०], 'लोकनिष्ठ अध्यात्मवाद'[२१], 'लोकधर्म'[२२] आणि 'लोकार्थ'[२३] यासारख्या पुस्तकांतून करण्याचा प्रयत्न केला आहे. असे प्रयत्न अधिक व्यापक स्वरूपात करणे आवश्यक आहे.

**७) लोकसाहित्य हे स्वतंत्र, अतिव्यापक अभ्यासक्षेत्र :–**

डॉ. गं. ना. मोरजे यांनी लोकसाहित्य हे स्वतंत्र अभ्यासक्षेत्र आहे याकडे लक्ष वेधले आहे.[२४] 'लोकबंध'[२५] या ग्रंथात प्रस्तुत लेखकाने हे क्षेत्र विश्वव्यापक अर्थात अखिल मानव जातीला व्यापणारे असल्याचे स्पष्ट केले आहे. लोकसाहित्याचा अभ्यास प्रामुख्याने भाषाविज्ञानाच्या अंगाने झाला आहे. इतिहास, मानववंशशास्त्र, मानसशास्त्र या शास्त्रांच्या आधाराने हा अभ्यास करण्याचा प्रयत्न झाला आहे. लोकसाहित्याच्या संकलनाचे, संपादनाचे, वर्गीकरणाचे सूक्ष्म आणि निश्चित असे शास्त्र मांडण्याचा जो क्रॉप पासून प्रयत्न झाला आहे; तो प्रयत्न एकप्रकारे अभ्यासकांना लोकसाहित्य अभ्यासाचे स्वतंत्र अभ्यासपद्धती मांडण्यासाठी संशोधकांना खुणावतो आहे. कालसापेक्षता,

स्थलसापेक्षता आणि समूहसापेक्षता यांची नेमकी परिमाणे ठरवून असे संकलन, संपादन, वर्गीकरण, तौलनिकतेचे नियमन असे प्रयत्न करण्यास खूप वाव आहे. प्रस्तुत लेखकाने 'लोकसाहित्य संशोधन पद्धती' या पुस्तकात असा प्रयत्न केला आहे. लोकसाहित्याचे स्थूल स्वरूप, लोकसाहित्याचा आढळ, लोकसाहित्य अभ्यासविषय विविध संप्रदाय अद्यापही ढोबळ आणि चाचपडण्याच्या अवस्थेत आहेत. लोकसाहित्याची 'विराटपुरुषरुपलोक' या दृष्टीने अतिव्यापकता लक्षात घेऊन; समग्रजीवसृष्टीसह मानवी समूहजीवन हा या अभ्यासक्षेत्राचा व्याप आहे; तसेच अनादिभूतकाळ, वर्तमान ही अभ्यासाची कालसापेक्षता आहे. भविष्यात प्रवाहित होऊन परिवर्तनशीलतेने प्रकटण्याचे सामर्थ्य लोकसाहित्यात आहे हे लक्षात घेऊन हे प्रयत्न; व्यक्तिगत, सामूहिक आणि शासकीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर होणे अभिप्रेत आहे.

**८) संदर्भ व टीपा :–**


१) लोकसाहित्याची रुपरेखा : भागवत दुर्गा, वरदा बुक्स, सेनापती बापट मार्ग, पुणे, दु.आ. १९७७.

२) तत्रैव.

३) तत्रैव.

४) लोकबंध : सहस्रबुद्धे अनिल, नितीन प्रकाशन, १४७, बुधवार पेठ, पुणे, नवीन सुधारित आवृत्ती जुलै २०१२.

५) लोकसाहित्याचे स्वरूप, मांडे प्रा.डॉ. प्रभाकर, गोदावरी प्रकाशन, अहमदनगर, आ. ६ वी २०१८.

६) Standard Dictionary of folk lore, Mythology & Legend : Funk & Wagnalls First Horper & Row-Paper back edition published in 1984, United states of America Editor - Maria Leach Associate, Editor - Jerome Friend.

७) तत्रैव.

८) उनि., भागवत दुर्गा.

९) उनि., लोकबंध.

१०) तत्रैव.

११) Folk lore Synonyms - World Hippo Thesaurus (https// www.wordhihippo.com)





१२) उनि., लोकबंध.

१३) लोकसाहित्य जीवनकला : (संपा) गावित डॉ. माहेश्वरी : दास्ताने रामचंद्र आणि कं., पुणे, प्र.आ. २००८.

१४) उनि., Folk lore synonyms.

१५) उनि., भागवत दुर्गा.

१६) उनि., लोकसाहित्याची रुपरेखा.

१७) उनि., लोकबंध.

१८) www.vocabulary.com / dictionary folklore.

१९) उनि., लोकबंध.

२०) लोकसाहित्य संशोधन पद्धती : सहस्रबुद्धे अनिल, नितीन प्रकाशन, बुधवार पेठ, पुणे, नवीन सुधारित आवृत्ती, जुलै २०१२.

२१) लोकनिष्ठ अध्यात्मवाद : सहस्रबुद्धे अनिल, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्र.आ. २९ फेब्रुवारी २०१६.

२२) लोकधर्म : सहस्रबुद्धे अनिल, आनंदोत्सव प्रकाशन मंच, प्र.आ. २०१७.

२३) लोकार्थ : सहस्रबुद्धे अनिल, आनंदोत्सव प्रकाशन मंच, प्र.आ. २०१७.

२४) लोकसाहित्य – एक स्वतंत्र अभ्यासक्षेत्र, दास्ताने रामचंद्र आणि कं., पुणे, आ.प. १९८५.

२५) उनि., लोकबंध.


●●●

# प्रकरण तिसरे
# दैवतविचार विषयक
## (About Mythology)

पृथ्वीवरील, अर्थात जगातील माणूस प्राण्याचा, मानवी समूहांचा, मागोवा घेतला तर; देव आणि दैवतकथा यांचा आढळ नाही; असा एकही मानवी समूह सापडणार नाही. देव आणि दैवतकथा न मानणारांचा माणसांचा वर्गसुद्धा आहे. तो वर्ग देव मानणाऱ्या माणसांच्या त्याच्या दृष्टीने, भ्रामक विचारांविषयी भरभरून चर्चा करतो. हा वर्गही काही अतिंद्रिय, अनाकलनीय, अज्ञात अशी तथ्ये मानतो. हा वर्ग, देव आणि दैवतकथा मानणाऱ्या माणसांच्या तुलनेत अत्यल्प आहे; त्याचबरोबर तोही साशंक अवस्थेतच आहे. मानवी जीवनातील देव आणि दैवतकथा यांचे; मानवी जीवनाच्या आरंभबिंदूपासूनचे अढळ स्थान विचारात घेता; मानवी जीवन हे त्याच्या जीवनधारणांच्या संदर्भात; देव आणि दैवतकथा केंद्रित आहे असे म्हणता येते. माणसाचा जीवन व्यवहार पाहिला तर; माणसाने मानवनिर्मित व मानवस्वीकृत साधनांनाही देवपण दिले आहे; याचा प्रत्यय समस्त मानवी अस्तित्वात येतो.

**१. दैवतविचार विषयक शास्त्रीय मांडणीचा प्रयत्न :-**

दैवत आणि दैवतकथा हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग असल्याने, यासंबंधी शास्त्रीय मांडणीचा प्रयत्न घडणे स्वाभाविकच होते. या प्रयत्नातूनच दैवतकथाशास्त्राचा किंवा दैवतशास्त्राचा (Mythology) उदय झाला असे म्हणता येईल. या शास्त्राची मांडणी करण्याचा मान आणि श्रेय हे प्राचीन संस्कृतींना जाते. त्यात भारतीय संस्कृती, ग्रीक संस्कृती इ.चा समावेश होतो. संस्कृतीप्रमाणेच, मानवी समूहांना धारणांचे निश्चित आणि उदात्त असे परिमाण देणाऱ्या; धर्म, पंथ, संप्रदाय यांनीही शास्त्रमांडणीत मोठे योगदान दिलेले



आहे. मात्र तार्किकदृष्ट्या विचार केला; तर संस्कृती आणि धर्मस्थापना, यांच्या पूर्वीच सर्व मानवी समूहांमध्ये आणि व्यक्तिगणित, दैवत आणि दैवतकथा यांनी मानवी मनामनात, समजुतीत; ज्ञानस्वरूपात दृढ विश्वास आणि धारणात्मक स्थान मिळविलेले होते; हे कोणालाही नाकारता येणार नाही. क्रम पाहाता आधी दैवत आणि दैवतकथा त्यानंतर सांस्कृतिक रूढीपरंपरा आणि त्यानंतर धर्मादिपरंपरा असाच क्रम लावावा लागतो. याचा स्पष्ट अर्थ असा की; दैवत आणि दैवतकथा यांची शास्त्रीय मांडणी करण्याचा प्रयत्न हा माणसाच्या अधिक पुढच्या प्रवासातील आहे.

**२. देव, दैवत आणि दैवतकथा :-**

२.१ देव या पुल्लिंगी संस्कृत शब्दाचा वापर देव किंवा देवता या स्वरूपात केला जातो. दैवत हा देव या शब्दापासून बनलेला शब्द, स्वीकृत देव किंवा देवता या अर्थाने वापरला जातो. देवांच्या उत्पत्तीचा संबंध भारतीय परंपरेने कश्यपऋषी पत्नींपासूनच्या उत्पत्तीकथेशी जोडला आहे. देव, देवता आणि दैवत या शब्दांचा सामान्य अर्थ, दिव्यशक्ती असलेली, पालनपोषण करणारी, संकटनिवारण करणारी, जीवनधारणा वाटणारी, सर्व जाणणारी, पावित्र्य असलेली हवे ते देणारी अशी तत्त्व शक्ती होय. भारतीय वैदिककालपूर्व, वैदिक, पौराणिक आणि पुराणोत्तर, तसेच आधुनिक काळापर्यंत, मानवी समूहामधील चांगल्या आणि वाईट समजल्या जाणाऱ्या, शोषक आणि शोषित, देव, दानव आणि मानव – प्रवृत्ती असणाऱ्या सर्व मानवमात्रांनी, देव, देवता आणि दैवत ही दिव्यशक्ती कोणत्या ना कोणत्या स्वरूपात मान्य केलेली आहे असे दिसते. कोणताही मानवी समूह याला अपवाद दिसत नाही.

देव या शब्दाचा स्त्रीलिंगी शब्द देवी असा होतो. इंग्रजी परंपरेत या शब्दांना God, Idol, Deity, Divinity, Goddess असे शब्द दिसतात. देव या शब्दाला प्रत्यय किंवा शब्द चिकटून परंपरेतील विशिष्ट गोष्टी, कृती, परंपरा यांचा उल्लेख होतो. उदा. देवक म्हणजे विवाह प्रसंगी विशिष्ट देवदेवतांना आवाहन स्थापन करून; त्यांची पूजा करणे. देवघर म्हणजे घरातील देव मांडण्याची आणि पूजनाची जागा किंवा देऊळासारखी केलेली जागा. देवताअर्चन म्हणजे देवाला भजणे, आरती करणे. देवदूत म्हणजे देवाचा निरोप्या किंवा प्रेषित देवधर्म म्हणजे धार्मिक कार्य. देवभोळा म्हणजे देवावर अंधविश्वास ठेवून राहणारा, देवमाणूस म्हणजे वर उल्लेखित देव विषयक गुणांसह, सहाय्यभूत

होणारा माणूस, देवलोक म्हणजे स्वर्ग, देवस्थान म्हणजे पवित्र क्षेत्र इ. असे कितीतरी शब्द प्रचारात दिसतात.

देव किंवा देवी अर्थात दैवते यांचे गृहदेवता किंवा दैवत कुलदेवता किंवा कुलदैवत, स्थानदैवत, क्षेत्रदैवत, पुराणदैवते, वैदिकदेवता किंवा दैवते असे अनेक प्रकार जनमानसात दिसतात.

२.२ दैवतकथा म्हणजे देव, देवता, दैवत या संबंधीच्या कथा. या कथा सर्वच देव, देवता, दैवते यांविषयी असतातच. या कथांना दिव्यकथा, पुराकथा, पुराणकथा इ. नावे भारतात दिलेली दिसतात. दैवतकथा या शब्दाला इंग्रजीमध्ये Myth (मिथ) असा पारिभाषिक शब्द आहे. भारतीय अभ्यासपरंपरेने आधुनिक काळात हाच शब्द भारतीय आकार देऊन; अर्थात 'मिथक' किंवा 'मिथ्यकथा' असा आकार देवून वापरलेला असतो. यातील मिथ्यकथा हा शब्द काही विपरित अर्थछटा व्यक्त करतो; कारण मिथ्या या संस्कृत शब्दाचा अर्थ, खोटे किंवा भ्रामक असा आहे ती अर्थछटा मिथ्यकथेमध्ये डोकावते. त्यामुळे 'मिथक' हा शब्द अधिक प्रचलित झाला आहे. डॉ. दुर्गा भागवत यांनी दैवतकथा असा शब्द भारतीय परंपरेत वापरण्याचा आग्रह धरला आहे.[१] प्रस्तुत लेखकाने 'लोकसाहित्य संशोधन पद्धती' या ग्रंथात 'मिथक' या नावाने स्वतंत्र प्रकरणात विस्तृत चर्चा केली आहे.[२] तसेच प्रस्तुत लेखकाने 'लोकनिष्ठ अध्यात्मवाद' या पुस्तकात 'दैवतकथाशास्त्र' या मथळ्याखाली चर्चा केली असून; परिभाषेच्या संदर्भात एकवाक्यता ही शास्त्रविकासाच्या दृष्टीने उपकारक ठरते, हे लक्षात घेऊन Myth या शब्दाला मराठी पर्याय 'मिथक' हा शब्द सादृश्यभावाने स्वीकारायला हरकत नाही असा निर्वाळा दिला आहे.[३] उषा पुरी विद्यावाचस्पती यांनी 'भारतीय मिथक कोश' या ग्रंथासाठी हीच भूमिका स्वीकारून चर्चा केली आहे.[४] दैवतकथा या शब्दाला 'मिथक' हा पर्याय रूढ होत आहे असे दिसते.

**३. दैवतकथाशास्त्र Mythology :–**

दैवतकथांविषयीचे किंवा दैवतांविषयीचे शास्त्र म्हणजे दैवतकथाशास्त्र होय. Myth या शब्दाला Logy असा शब्द जोडून Mythology असा दैवतकथाशास्त्र या अर्थाचा पारिभाषिक शब्द निर्माण झाला आहे. यात मिथकची निर्मिती का व कशी होते? याचा विचार केलेला असतो. मिथकचे काही प्रकार करता येतील का? याचाही विचार येतो. दैवतकथांचा विविध



मानव्यशास्त्रांशी तसेच भौतिकशास्त्रांशी कोणत्या प्रकारचा संबंध येतो याचे विवेचन होऊ शकते. मानववंशशास्त्र, धर्मशास्त्र, संस्कृती, लोकसाहित्य, न्याय, समाजशास्त्र, राज्यशास्त्र यांशी दैवतकथांचा नेमका संबंध कोणता हे सांगण्याचा प्रयत्न असतो. दैवतकथाशास्त्राधारे पुराणे आणि इतिहास यांचे मानव्यशास्त्रांच्या दृष्टीने स्पष्टीकरण करता येते.

दैवतकथाशास्त्र लोकसाहित्याचा खूप मोठा भाग व्यापून असते. परिकथा, जादुटोणे यांच्या कथा व परंपरा, राक्षसकथा, उत्पत्तीकथा, नक्षत्रकथा, भविष्यकथा अशा कितीतरी कथाप्रकारांचा थेट संबंध दैवतकथांशी असतो. यामुळे दैवतकथांचा आणि दैवतकथाशास्त्राचा समावेश लोकसाहित्याच्या अभ्यासात खूप महत्त्वाचा ठरतो. भाषाउत्पत्ती आणि भाषाघटनेतील अनेक शब्द, वाक्‌यसंप्रदाय, म्हणी, उखाणे, आहाणे, कोडी, पारंपरिक लोकगीते ही दैवतकथांचीच प्रसृती असते. जागतिक पातळीवरील लोकसाहित्याच्या अभ्यासाच्या सर्व संप्रदायांनी; उदा. निसर्गरूपवादी (The Nature Symbolists), भ्रांतकल्पनावादी (Euhemerist School), स्पष्टीकरणवादी (Actiological School), उत्तरजीवित्ववादी संप्रदाय (Survival Theory) आदि संप्रदायांनी; दैवतकथाशास्त्राचा (Mythology) विचार आपल्या अभ्यासांतर्गत केला आहे.

**३.१** दैवतकथाशास्त्र विषयक मॅक्सम्युलर यांचे विचार :– डॉ. दुर्गा भागवत यांनी मॅक्सम्युलर यांच्या या संबंधातील विचाराचा संक्षिप्त स्वरूपात आढावा घेतला आहे.[५] तो माहितीसाठी येथे घेणे आवश्यक वाटते– ''१८४७ साली पंचतंत्राचा फ्रेंच भाषांतरकार बेनफे याच्याशी मॅक्सम्युलरचा परिचय झाला. ६ डिसेंबर १८२३ रोजी जर्मनीत जन्मलेला मॅक्सम्युलर हा प्राच्य पंडित म्हणून ओळखला जातो. बेनफेमुळे भारतीय कथावाङ्मयाकडे पाहण्याची वेगळीच दृष्टी मॅक्सम्युलरला मिळाली. बेनफेही वेदांचा अभ्यासक होता. जागतिक कथावाङ्मयाचे अत्यंत प्राचीन अधिष्ठान भारतीय वाङ्मयात आहे, ह्या बेनफेंच्या बीजरूप सिद्धांताचा मॅक्सम्युलरने हां हां म्हणता वटवृक्ष बनवला. कालांतराने या सिद्धांताला पुढे इंडियानिस्ट थिअरी (भारतमूलक सिद्धांत) असे नाव मिळाले.

पुढे मॅक्यम्युलर ऑक्सफर्ड विश्वविद्यालयात प्राध्यापक झाला. ऑक्सफर्ड येथेच त्याची तौलनिक भाषाशास्त्र, ऋग्वेदाची सटीक प्रत व भाषांतर, Chips

from a German Workshop आणि Sacred Books of the East या ग्रंथमालेतील, अनेक पांडित्यपूर्ण कृती बाहेर पडल्या. दीर्घकाळ ऑक्सफर्ड येथे प्राध्यापकाचे काम करून प्रचंड ग्रंथनिर्मितीने विश्वविख्यात झालेल्या मॅक्सम्युलरने मतभेदांमुळे १८७५ साली नोकरीचा राजीनामा दिला. शेवटची पंचवीस वर्षे त्याने स्वतंत्र व्यासंगात घालवली.

मॅक्सम्युलरच्या कार्याचे विवरण करतांना एक गोष्ट प्रामुख्याने लक्षात ठेवली पाहिजे ती ही की, आडव्यातिडव्या पसरलेल्या विसंगत अशा दैवतकथांतून किंवा पुराणकथांतून काही सुसंगत शास्त्रीय सूत्र शोधून काढण्यात तो अग्रगण्य होता. जगांतल्या प्राचीनतम अशा ऋग्वेदाच्या अवगाहनामुळे त्याने आर्य किंवा आर्यन् या शब्दाला प्रथम वांशिक महत्त्व दिले. आर्यांच्या मूलस्थानाचा व परिभ्रमणाचा मूळ सिद्धांतही त्यानेच मांडला. (भारतीय दृष्टीने पूर्ण चुकीचे सिद्धांत या अभ्यासातून त्याने मांडले. उदा. आर्य हा वंश नसून आर्य हे ज्ञानवान या अर्थाचे विशेषण आहे.)

तौलनिक दैवतकथाशास्त्राच्या त्याच्या व्यासंगाचा परिपाक Science of Mythology (१८९५) या सुप्रसिद्ध द्विखंडात्मक ग्रंथात झालेला आहे. त्याच्या भाषाशास्त्राच्याही अभ्यासाची फलश्रुती तीच. दैवतकथासंबंधी त्याचा मुख्य सिद्धांत असा की, दैवतकथा या अशुद्ध व विकृत व्युत्पत्तींतून जन्मलेल्या असून त्यांना भाषेला आलेली सूज किंवा 'भाषेला जडलेला रोग' (diseases of the language) म्हणायला हरकत नाही. या भाषारोगाची मीमांसा म्हणजेच दैवतकथाशास्त्र (Mythology is the pathology of language).

सोप्या भाषेत सांगायचे झाल्यास, भाषेचा मूळ अर्थ दुर्बोध झाला की विकृत अर्थ शब्दांना चिकटतो. त्यामुळे कल्पना बदलतात. यात कल्पनांच्या कथा होतात. दैवतकथा या प्राचीनतम कथा असल्यामुळे त्यात या विकृतीचे प्राधान्य आढळते.

मॅक्यम्युलरचा दुसरा एक उपसिद्धांत म्हणजे दैवतकथाशास्त्राचा आत्मा म्हणजेच सूर्यकथा होत. ऋग्वेदात त्याला सूर्योपासना मुख्यत्वे आढळली. हीच उपासना अवेस्ता वाङ्मयाचा प्राण. इजिप्तमध्येही सूर्य हाच सर्वात प्रभावी देव. अशाप्रकारे तौलनिक दैवतकथाशास्त्राचा मूलाधार सूर्यकथाच होत हे मॅक्सम्युलरने दाखविले. रे. कॉक्सला लिहिलेल्या एका पत्रात मॅक्सम्युलर म्हणतो, "Always the sun always the Sun!' People exclaim, and yet it is not our fault if the Sun has inspired so many legends and received so many names. And what else do you expect at the bottom of Mythology if not the reflection of heaven and earth in the mind and language of man?" सूर्यसिद्धांताची टवाळी करणारांना त्याने हा सवाल टाकलेला आहे. मॅक्सम्युलर यांच्या एकूण व्यासंगपूर्ण अभ्यासावर, अर्थात 'भाषेला जडलेला रोग' यासारख्या विधानावर आक्षेप घेतले जातील. गेलेही. तथापि दैवतकथांचा मानवी जीवनाशी असलेला मूलगामी संबंध त्यांच्या विवेचनातून स्पष्ट झाला हे विसरून चालणार नाही. दैवतकथा या मानवी जीवनाचा आधार आहेत; हेच त्यातून निष्पन्न होते. त्या दृष्टीने दैवतकथाशास्त्राची मांडणी विविध मानवी शास्त्रांना मूलगामी तपशीलात्मक आणि तत्त्वात्मक सामग्री देते हे लक्षात घ्यावे लागते.

**३.२** प्राचीन मौखिक परंपरा आणि लिखित परंपरा हा प्रामुख्याने दैवतकथांचा पुनरुच्चार होय, याकडे लक्ष वेधण्याचे कार्य मॅक्सम्युलर यांच्या संशोधनाने केले. भारतीय वेद, उपनिषदे, ब्राह्मणे, अरण्यक, निरुक्ते, आर्षमहाकाव्ये, पुराणे यांतील दैवतकथांकडे दैवतकथाशास्त्राच्या दृष्टीने मानवी जीवनाचा मूळ आधार म्हणून अर्थात Folk lore चा प्राचीनतम संग्रहित ठेवा म्हणून पाहण्याची दृष्टी मिळाली. भारत, ग्रीक, इजिप्त आदि प्राचीनतम संस्कृतीतील दैवतकथांचा तौलनिक अभ्यास करून; Science of Mythology चे मंडन केले गेले. जागतिक प्राचीनतम दैवतकथांचा दैवतकथाशास्त्रीय अभ्यास (Mythological Study) हा मानव्यशास्त्रांच्या दृष्टीने मूलभूत आधार ठरला. हे मॅक्सम्युलरच्या कार्याचे यश होय.

भारतीय परिप्रेक्ष्यातील, प्रामुख्याने महाराष्ट्र, कर्नाटक इ. दक्षिणेकडे असलेल्या प्रदेशातील, तुलनात्मक दृष्टीसह; लिखित आणि मौखिक परंपरेतील कथागीते आणि दैवतकथा यांचा विचार डॉ. रा. चिं. ढेरे यांनी केलेला दिसतो. दैवतकथांच्या बाबतीत पुराभिलेख, हस्तलिखिते, स्थलमहात्म्ये, संतसाहित्य, लोककला, मूर्तिविज्ञान अशा विविध प्रकारची सामग्री वापरून त्यांनी प्राचीनतम दैवतांचा वर्तमानापर्यंतचा प्रवास उलगडण्याचा केलेला खटाटोप हा दैवतकथाशास्त्राचा महत्त्वाचा टप्पा मानता येईल; एवढा महत्त्वाचा आहे. लोकदेव खंडोबा, लज्जागौरी, विठ्ठल एक महासमन्वय, श्री नरसिंहोपासना उदय आणि विकास, श्री तुळजाभवानी, श्री महालक्ष्मी, नाथसंप्रदायांचा इतिहास,

दत्तसंप्रदायाचा इतिहास, अशा ग्रंथातून त्यांनी दैवतकथांचा असा विकसनात्मक किंवा परिवर्तनात्मक प्रवास नोंदवून; पुरातत्त्वशास्त्र, मानववंशशास्त्र आणि मानव्यशास्त्र आणि संस्कृतीला दैवतकथाशास्त्राचे योगदान अधोरेखित केले आहे. 'मिथकांचे अवतरण' या विषयावरील 'पद्मगंधा' या दिवाळी अंकात डॉ. ढेरे रा. चिं. यांच्या या कार्याचा नेमका मतितार्थ नोंदवला आहे. तो डॉ. रा. चिं. ढेरे यांच्या अवतरणाच्या उल्लेखातून-[६] ''मिथक हे साऱ्या मानवी वाग्व्यवहाराला दिव्यता, सूचकता आणि विलक्षणता प्रदान करणारे तत्त्व आहे. साऱ्या मानवजातीचे आदिम, रहस्यमय अनुभवसंचित मिथकातूनच व्यक्त झालेले असल्यामुळे मिथकाच्या द्वारा एकूणच मानवी अस्तित्वाच्या गाभ्याशी भिडणे कोणत्याही युगातील प्रज्ञेला उपकारक ठरते.'' ''साहित्यादी कलांचा आणि मिथकांचा संबंध अत्यंत निकटचा आहे. मिथकाच्या आश्रयाने घडलेल्या कलाविष्कारांचा संभार जगभराच्या सांस्कृतिक परंपरांत आढळून येतो. संहारभयाने संभ्रांत झालेल्या आजच्या मानवी प्रज्ञेला तर अस्तित्वाचे अन्वयार्थ शोधण्यासाठी मिथकाइतके अन्य महिमामय साधन उपलब्ध नाही.'' दैवतकथाशास्त्राच्या मांडणीची आवश्यकताच या अवतरणातून डॉ. रा. चिं. ढेरे यांनी स्पष्ट केली आहे.

**४. मिथक संकल्पना :-**

दैवतकथा म्हणजे नेमके काय याविषयी व्याख्यात्मक स्पष्टीकरणे मिथक संकल्पना नेमकेपणाने स्पष्ट करतात. डॉ. दुर्गा भागवत यांनी 'लोकसाहित्याची रुपरेखा'[७] या ग्रंथात दैवतकथा-संकल्पना स्पष्ट करण्याचा प्रयत्न जागतिक अभ्यासकांच्या आधारे केला आहे. त्यात (१) दैवतकथा म्हणजे मानवजातीच्या प्रारंभकाळाचा इतिहास एवढेच नव्हे तर आधिभौतिक शास्त्रही आहे असे अँड्रूलँग म्हणतो. (२) मानव समाजाच्या आद्यतमकथा दैवतकथा आहेत, असा निष्कर्ष मॅक्सम्युलरच्या विवेचनातून पुढे येतो. (३) मानवेतिहासाचे हे प्रभावी माध्यम होय, असा निष्कर्ष डॉ. दुर्गा भागवत काढतात. (४) दैवतकथांचे स्वरूप स्पष्ट करतांना डॉ. दुर्गा भागवत लिहितात- दैवतकथा पुराण व पूज्य कथा असल्याने त्यांचा संबंध धर्माशीं - तो संबंध शिथिल व अनियमित असला तरी - जगभर जुळलेला आढळतो. पुष्कळ ठिकाणी मूळ धर्म गेला. पण कथा टिकून राहिल्या. युरोपांतले पुरातन ग्रीक, केल्टिक, ट्यूटॉनिक धर्मसंप्रदाय यांचे उत्तम उदाहरण आहेत. दैवतकथा या साऱ्या प्रभूत दैवतवादी



(Polytheistic) धर्मसंप्रदायांतूनच जन्मलेल्या आहेत. परिकथा या मूळच्या दैवतकथा आहेत. भारतीय दैवतकथाशास्त्राची परंपरा वैदिक काळापासून आहे याचे उदाहरण म्हणजे सर्पविद्या होय.

प्रस्तुत लेखकाने 'लोकनिष्ठ अध्यात्मवाद'[८] या ग्रंथात दैवत आणि दैवतकथास्वरूप विवेचन भारतीय परंपरेच्या आधारे, परंतु विश्वात्मक विचार संदर्भात केले आहे ते असे- सृष्टीचे द्विविध आणि एकात्म मूलकारण मानवाने देव स्वरूपात शिव-पार्वती म्हणून स्वीकारले. सतत विविध रूपात प्रकट होऊन अस्ति, जायते, वर्धते, मृततेचे दातृत्व धारण करून; सतत अविनाशी ब्रह्मतत्त्वाच्या नव्या-नव्या आविष्काररूपाचे, दातृत्व धारण करणाऱ्या अनंत, विभ्रमांना, नवाकारांना 'त्या' आत्मतत्त्वासह अनुभवण्याची शक्ती जीवात्म्यात अनुभवता येते. हे अनुभूती ज्ञान जीवात्म्याला जसजसे होत गेले, तसतसे प्रत्येक आविष्कृत आणि द्रष्टेपणाला अनुभूत होणाऱ्या शक्तिविभ्रमांना, अवस्थेला मानवाने आपल्यातील आत्मतत्त्वात अनुभवण्यासाठी देवत्व बहाल करून; प्रत्यक्ष ब्रह्मतत्त्वाचे बल या देवतांच्या नित्य दर्शनातून स्वतःत पाहण्याची कुवत प्रत्येकात निर्माण केली. त्यासाठी लोकनिष्ठेने दैवतांचे मूलाकार आणि त्यांचे प्रातिनिधिक प्रतीके, प्रतिमा यांचे संस्थापन सनातनपणे केले आणि त्या-त्या शक्तिआविष्काराची उजळणी करीत त्या-त्या शक्तिआविष्काराची मानवी जीवनसापेक्ष उपयोजिता; सौंदर्य आणि कर्मशील भावनेने केली. मानवाच्या समूहजीवनाचा हा प्रातीभ ज्ञानपूर्वक आविष्कार दैवतांच्या रूपाने आज अनुभवास येतो आहे.

एनसायक्लोपीडियामध्ये (Vol. IPX) मॉयथॉलॉजीविषयी पुढीलप्रमाणे टीप दिली आहे.[९] "Myth deal with customs especially relegious customs, with rituial phenomena. They are of the most varied kind, form. They are about the creation of the world to the shape of a rock and with the supposed character and activities of whatever Gods or other supernatural beings are worshiped."

"Myth is a true story because it is a sacred story, not a true story because content but because of the concrete sacred forces which it sets to work. The recital myths of the beginings of things is part and parcle of cult, because it is cult itself and

helps to gain the ends for which cult is carried on namely, the preservation and increse of life." (R. P. Hazzont, Mitie leggerlde Vol I.P.X.)[१०] अशीही टीप दिली आहे. संकल्पनात्मक व्यूह ग्रीक विचारपरंपरेतील इथॉस (Ethos) व मायथॉस ह्या दोन प्राचीन संकल्पनात्मक व्यूह परंपरातून Myth अर्थात दैवतकथा संकल्पनेचा उदय झाला. 'इथॉस' एखाद्या कालखंडाचे unique (वैशिष्ट्यपूर्ण वेगळेपण) दर्शवितो आणि 'मिथॉस' अनेक कालखंडाचे समान धर्म दर्शवितो. विविध कालखंडात लागू पडणाऱ्या कथानकांना ग्रीक भाषेत Myth म्हणण्यात आले. असे गणेश देवी यांनी स्पष्ट केले आहे.[११]

आनंद पाटील यांनी इंग्रजी-संस्कृत आणि ओईडीमधील पृ. ७ Myth च्या अर्थाची तुलना करून Myth संकल्पना स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.[१२] Myth म्हणजे पुराण कथा असे म्हणून Mythology क्षेत्र किंवा पुराण कथांचा अभ्यास करण्याचे शास्त्र असे स्पष्टीकरण केले आहे. मिथक हे आदिबंध म्हणून मानता येतील, असे स्पष्ट करण्याकडे त्यांच्या चर्चेचा कल आहे.

मिथक हा शब्द साधारणतः दोन अर्थांनी वापरला जातो. पहिल्या अर्थानुसार मिथक म्हणजे देवादिकांचा वा अतिवास्तविक घटनांचा समावेश असलेली, सृष्टीच्या वा समाजाच्या उत्पत्तीविषयीची, अथवा एखादी समजूत कशी रुजली वा एखादी प्रथा कशी रुळली हे सांगणारी पारंपरिक गोष्ट. दुसऱ्या अर्थानुसार मिथक म्हणजे असत्य, आधाररहित वा तर्करहित समजूत, असे प्रशांत बागड यांचे म्हणणे आहे.[१३] ह्यातील दुसरा अर्थ मराठीत रुढावलेला नाही हेही त्यांनी स्पष्ट केले आहे. दुसरा अर्थ स्वीकृतही नाही. पुराणकथांत इतिहास व तथ्य दडलेले असते हे आता सर्वमान्य झाले आहे.

मधुकर वाकोडे यांच्या म्हणण्याप्रमाणे, ''मिथक समूहमनाचा आविष्कार तर असतोच पण लोकमानसाने दिव्येतिहास म्हणूनच त्याचा स्वीकार केलेला असतो.''[१४]

हेमंत खडके यांनी आदिवासींच्या साहित्य संस्कृतीतील मिथकांविषयी लिहितांना, ''आदिम व प्रगत अशा सर्व धार्मिक समाजामध्ये कोणत्या ना कोणत्या स्वरूपात निश्चितपणे आढळणारी विशिष्ट प्रकारची आद्यतम पवित्र कथा म्हणजे मिथक होय. मिथकांमध्ये विषयांची आत्यंतिक विविधता असते.



विश्वाची उत्पत्ती, वाढ, विनाश, कालचक्र व ऋतुचक्राप्रमाणे बदलणाऱ्या विविध पदार्थांच्या अवस्था, विश्वाला व्यापून असणाऱ्या व त्यावर नियंत्रण ठेवणाऱ्या चांगल्या-वाईट शक्ती, अशा शक्तींची विविध रूपे व त्यांचा महिमा, धर्म आणि यातुविद्येची कर्मकांडादी आणि तंत्रमंत्रादि विविध अंगे - या सर्वांविषयी धार्मिक श्रद्धेने केलेले निवेदन म्हणजे मिथक होय.''[१५]

महेंद्र कदम 'मिथ'चे स्पष्टीकरण करतांना लिहितात, ''मिथ म्हणजे एक पारंपरिक कथा असते, ज्या कथेत मानवी संस्कृतीचे प्राचीन अवशेष दडलेले असतात. हे अवशेष त्या-त्या संस्कृतीचे चिरंतन सत्याचे अंश असतात. हे अंश कथांच्या रूपाने चालत आलेले असतात. या कथा काळानुरुप बदलत असतात, पण त्यातील सांस्कृतिक संदेश मात्र बदलत नसतो. कोणत्याही भाषेतील आणि संस्कृतीतील मिथकांमागे काही लोकसंचित आणि लोकसत्ये दडलेली असतात. मिथ ही कधी बदलत नसते. ती शैलीत किंवा भाषेत नसते; तर ती कथातत्त्वात असते.''[१६]

Myth करिता मराठीत 'मिथक' असा पर्यायी शब्द वापरून बहुतेक लोकांनी चर्चा केली आहे. 'मिथ्यकथा' किंवा 'मिथ्य' हे शब्द मात्र काहीसा चुकीचा संदेश देणारे आहेत. मिथकात अनादिकाळाची सत्यता अंतरगर्भात दडलेली असते हे निरीक्षण त्यामुळे बाधित होते.

मिथकांचा संबंध किंवा मिथकाचे नाते मानवी समूहजीवनाच्या आदिम अवस्थेपासून त्याच्या आत्मानुभूतीला आणि प्रतिभेला जाणवलेल्या देव किंवा दैवत या अनुभवाशी जोडलेले आहे. स्वतःच्या व चराचर सृष्टीच्या; उत्पत्ती, स्थिती, परिवर्तन, लय आदि अवस्थांशी दैवतकथा आधारभूत वाटत आल्या आहेत.

धर्म, नीती, तत्त्वज्ञान, कला आणि जीवनव्यवहाराला मिथकांनी मूलभूत आधार दिला आहे असे जाणवते. जीवनप्रवाहातील परंपरा आणि परिवर्तन यांत सनातन अस्तित्वाचा हुंकार भरण्याचे कार्य मिथक करतात त्यादृष्टीने मिथके हे मानवी जीवनाचे सांस्कृतिक मूलाकार (Architypes) आहेत किंवा सनातन लोकबंध आहेत (Eternal Folktype) असे म्हणता येते.

काळ आणि अवकाश यातून अनुभूत होणाऱ्या अनेक गूढ जाणिवांना आकार मिथकांतून मिळालेला दिसतो. मानवी जीवनाचा समग्र ऐतिहासिक प्रवाह मिथकांतून स्पष्ट होत जातो. कोणत्याही वर्तमानातील इमारतींना,

जीवनबांधणीला भक्कम मानवी आणि अमानवी संवेदनांसह पायाभूत आधार देण्याचे कार्य या दैवतकथा करतात.

भाषा, धर्म, न्याय, प्रारब्ध, सांस्कृतिक जीवनधारणा यांच्या प्राचीन अवस्थांपासूनचे पट उलगडणारे मानवाच्या आत्मिक जीवनाचे अवशेष आणि मूलभूत आधार म्हणजे दैवतकथा होत. या दृष्टीने मानवी मौखिक परंपरा आणि लिखित वाङ्मय, मानव्यशास्त्रे आणि भौतिकशास्त्रे, कला आणि संस्कृती यांच्या आकलनात दैवतकथाशास्त्राला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

**५. दैवत निर्मिती आणि दैवतकथा निर्मिती : मानवी प्रवृत्ती :–**

दैवत निर्मितीबरोबरच दैवतकथा निर्मिती होत असते. मात्र कालौघात दैवताविषयी अनेक कथा निष्पन्न होतच जातात.

**५.१** दैवत निर्मितीबरोबरच निर्माण होणारी कथा ही त्या दैवताविषयीची अनुभूती कथा असते. या अनुभूतीचे दोन प्रकार संभवतात. एक त्या दैवत निर्मितीची उत्पत्ती कथा. ही कथा दैवत केव्हा, कसे, का निर्माण झाले व मानवी मनाला व्यक्ती व समूहमनाच्या पातळीवर कसे अनुभूत झाले ते सांगते. उदा. स्वयंभू लिंग प्राकट्यकथा इ. दुसऱ्या प्रकारात दैवत निर्मिती झाल्याचे, परिणाम जाणवल्याने निर्माण झालेली असते. परिणाम हा मानवी जीवनासंदर्भाने मनावर, शरीरांवर, समूहावर, भोवतालच्या परिसरातील डोंगरदऱ्या, नद्या, शेतजमीन, गुहा, घरेदारे, गाव किंवा वस्ती अशा भौतिक गोष्टीवर झालेला असतो. उदा. नदीचा प्रवाह बदलल्याच्या कथा, लोकदेव प्राकट्याच्या कथा इ. ह्या दोन्ही कथधा त्या-त्या दैवत निर्मिती प्रक्रियेतील प्रथम अनुभूती स्वरूपात असल्यामुळे त्या दैवतकथा ह्या दैवताच्या मूळ स्वरूपकथा किंवा मूलाकार कथा ठरतात (Architype).

**५.२** दैवत निर्माण झाल्यानंतर हे दैवत समूहजीवनाशी भावात्मक आधार म्हणून जोडले जाते. त्या दैवताशी व्यक्ती व समूहपातळीवर जीवनसंवेदना जोडल्या जातात. त्यातूनच कालौघात त्या दैवतांविषयी अनेकानेक दंतकथा, आख्यायिका जोडल्या जातात आणि दैवतांविषयी कथांची मालिकाच तयार होते. यांतूनच दैवताविषयीचे पुराण किंवा इतिहास जन्माला येतो. या पुराण कथांचेही कालौघात अनेक पर्याय निर्माण झालेले दिसतात आणि दैवताचा स्थानदैवतापासून ते क्षेत्रिय दैवतांपर्यंतचा प्रवास घडत जातो. उदा. महाराष्ट्रात खंडोबा, भैरवनाथ, अष्टविनायक, साडेतीन शक्तीपीठे यांची ठळक उदाहरणे



देता येतील.

**५.३** दैवत व दैवतकथा निर्मिती ही एक मानवी सर्व प्रवृत्ती समावेशक प्रवृत्ती आहे; असे म्हणता येते. मानसशास्त्रीयदृष्ट्या, ज्या मानवाच्या सहज प्रवृत्ती नोंदविल्या गेल्या आहेत; त्या सर्व प्रवृत्ती एकप्रकारे दैवत निर्मिती तसेच दैवतकथा निर्मिती यांच्या समाविष्ट असतात किंवा मुळाशी असतात असे म्हणता येते. याचा अर्थ असा की, दैवत निर्मिती किंवा दैवतकथा निर्मिती हा मानवी समूहजीवनाचा आणि पर्यायाने समूहाचा घटक असलेल्या मानवी व्यक्तीचा जीवनाधिकार आहे. त्यामुळे स्वाभाविकपणे दैवत आणि दैवतकथा निर्मितीचे महत्त्व आत्मतत्त्वाएवढे होऊन बसल्याचे जाणवते. तथाकथित भौतिक विज्ञान पुरस्कर्ते या भावनिक मूलाधाराचा तिरस्कार करतांना दिसतात. प्रसंगी विज्ञाननिष्ठेच्या नावाखाली संघर्षही करतात. त्यावेळी समूहमनातील दैवत आणि दैवतकथा यांविषयीची आत्मियता त्यांनाही जाणवलेली असते. यांतील बरेच लोक प्रसंगपरत्वे या आत्मियतेला शरण गेलेले दिसतात. एवढा भक्कम मूलाधार या प्रवृत्तीने मानवी जीवनाला दिलेला दिसतो.

दैवत निर्मिती आणि दैवतकथा निर्मिती ही मानवाची अशी समावेशक प्रवृत्ती असल्यानेच दैवत आणि दैवतकथा या मानवी जीवनानुभूतीच्या सत्यतेच्या परिणामाने विचारात घ्याव्या लागतात. या अस्तित्वांना केवळ भाकड, गूढ, अंध, मौखिक परंपरा म्हणून मानता येत नाही. त्या इतिहासाचे श्रेष्ठ साधन असतात. 'इतिहासपुराणे' हा शब्द याही अर्थाने आलेला असतो.

हा प्रवृत्ती विचार निसर्ग प्रक्रियात्मक वाटला; तरी दैवत निर्मिती आणि दैवतकथा निर्मिती ही मानवाने अर्जित केलेले ज्ञान आणि ज्ञानाचे स्पष्टीकरण असते. यातून विशेषतः धर्म, नीती, तत्त्वज्ञान, कला, क्रीडा, समाजव्यवस्था, वंशनिष्पत्ती, वंशविस्तार आणि वंशपरंपरा यांसह मानवी व्यक्तिमन आणि समूहमन या सर्व गोष्टींना अर्थात सर्वच मानव्यशास्त्रांना आणि वाङ्मयकलेलाही, महत्त्वाची, मूलभूत सामग्री पुरवितात. एवढेच नव्हे तर शास्त्रांची निर्मिती आणि शास्त्रांचे समूहजीवनातील उपयोजन यांनाही आधार देतात.

**५.४** दैवतांच्या आणि दैवतकथांच्या आविष्करणांविषयी धारणा अर्थात दैवतकथा आणि दैवतांच्या उद्गम आणि विकासासंदर्भात तसेच विस्तार आणि प्रसारासंदर्भात अनेक तर्क जगभरात मांडले गेले आहेत. डॉ. दुर्गा भागवत यांनी अनेक संप्रदाय नोंदविलेले आहेत. प्रस्तुत ग्रंथाच्या प्रथम

प्रकरणात या संप्रदायांचा उल्लेख आलेला आहे.[१७] या सर्व संप्रदायांमध्ये दैवते आणि दैवतकथांचा उद्‌गम आणि विकासविषयक विचार मांडण्याचा प्रयत्न झालेला आहेच. प्रस्तुत ग्रंथलेखकाने 'लोकबंध'ची चर्चा करतांना 'लोक' ही संकल्पना स्पष्ट केली आहे. ''लोक म्हणजे एकत्रितपणे जास्तीतजास्त सुखकर जीवन जगण्यासाठी एकत्र आलेला माणसांचा समुदाय. हा समुदाय समानमनस्क असतो.''[१८] एकत्रितपणे म्हणजे व्यष्टी आणि समष्टी या दोन्ही स्तरावर होय. यातच धारणातत्त्वाच्या संदर्भात मिथक आणि दैवत निर्मिती-प्रवृत्तीचे मर्म दडलेले आहे.

माणूस हा नावे ठेवणारा प्राणी आहे. म्हणजेच तो त्याला प्राप्त अशा वैखरी, मध्यमा, पश्यंती आणि परावाणीच्या सहाय्याने जगत असतो. तो त्यांच्या आत्मानुभूतींचे आविष्करण या वाणीच्या आधारे करतो. या वाणीच्या आधारे माणसाच्या सहजप्रवृत्तींचे प्रकटीकरण सांस्कृतिक रूप घेऊन प्रकटते. दैवतांची नामे आणि दैवतकथांची परंपरा हे त्याच्या या सांस्कृतिक प्रवासाचे आत्मप्रकटीकरण असते. ते आत्मप्रकटीकरण, त्याच्या समूहमनाने, घटकलोक, अंगस्वरूपलोक आणि विराटपुरुषलोक अशा त्रिविधतेने चैतन्यशाली होऊन प्रकटते. प्रवाहित होते. परिवर्तनशीलतेसह पारंपरिक होते. या माणसाच्या आत्मप्रकटीकरणाचा तपशीलवार अभ्यास करण्याचा प्रयत्न केला तर; मिथकप्रवृत्तीतून नियमित होत गेलेली मानवी भावना आणि प्रवृत्तींची काही नियमित सूत्रे पुढे येऊ शकतात. त्यातून दैवते आणि दैवतकथा यांची निर्मिती आणि कथात्म पारंपरिक अस्तित्व कसे प्रकट होऊन; संवेदित होते, हे ध्यानात येईल. या संबंधीचा सशास्त्र आणि सविस्तर विचार 'लोकबंध' ग्रंथात आणि 'लोकसाहित्य संशोधन पद्धती' या पुस्तकाच्या 'मिथक' या प्रकरणात केला आहे. जिज्ञासूंनी हे दोन्ही ग्रंथ सूक्ष्मपणे, लक्षपूर्वक वाचावेत.

**६. 'मिथक'चे अर्थात दैवतकथांचे सूत्ररूप स्वरूप वर्णन :-**

दैवतासंबंधीच्या दैवतकथांचे अर्थात 'मिथक'चे स्वरूप वर्णन करणारी एक्कावन्न सूत्ररूप विधाने प्रस्तुत लेखकाने 'लोकसाहित्य संशोधन पद्धती' या ग्रंथात दिली आहेत.[१९] पुनरुक्तीचा दोष पत्करून साकल्यपूर्वक अभ्यासाच्या सोयीसाठी ती विधाने येथे देत आहे.

(१) मिथकांना 'लोक' मध्ये श्रद्धा, विश्वास आणि सत्यत्वाचे स्थान असते. (२) मिथके, सृष्टी उत्पत्ती आणि लय याविषयी स्पष्टीकरण, कथात्मक



स्वरूपात देतात. (३) दैवत, दैत्य, यक्ष, तारे, नद्या यांच्या निर्मितीविषयक कथा सांगून; त्यांच्या गुणदर्शनाचे कार्य करतात. (४) देवता व तत्सम शक्तींचे वर्णन, त्यांनी स्वीकारलेल्या, वापरलेल्या, आयुधांचे वर्णन यात असते. (५) प्राणी, वृक्ष, फुले, फळे, पर्वत, दरी इत्यादींना दैवत्व कसे लाभले व त्यांना भजल्याने कोणती फलनिष्पत्ती होते, हे सांगितले जाते. (६) दैवतकथांमध्ये देवतांच्या क्रोध आणि प्रसन्नता या संबंधातील कथा सांगून व्रते, परंपरा इ. बाबतीत उपकथानके आलेली असतात. (७) दैवतकथांमधून दैवतांनी परंपरा व त्यांच्यापासून मानवी वंशपरंपराही सिद्ध केलेल्या दिसून येतात. (८) शाप, उःशाप, वरदान, अटी, तप, शक्तीपरीक्षा, शक्तीपात यांच्यासंदर्भात कथा सांगून त्यातून युद्धे, आक्रमणे शक्तीसंपादन इ. गोष्टींचे स्पष्टीकरण करून; इतिहास कथन करण्याचे प्रयत्न असतात. (९) हिंस्र पशू, पक्षी, सरपटणारे प्राणी यांचे कथांच्या माध्यमातून दैवत सिद्धीकरण, दैवतांशी असलेले संबंध, मानव, प्राणी उत्पत्तीविषयीची संकर स्पष्टीकरणे आलेली असतात. (१०) पुनर्जन्म, सामाजिक, संकेतबाह्य स्त्री-पुरुष संबंध, अपत्य जन्म, याविषयी स्पष्टीकरणात्मक कथा सांगून नैतिक ऐतिहासिक संगती साधण्याचा प्रयत्न व सत्य प्रस्थापनाचा प्रयत्न असतो. (११) घराणी, राज्ये, क्षेत्रे, जमिनी यांच्याशी लोक व्यक्ती आणि दैवते यांचा पवित्र संबंध प्रस्थापित करून; परंपरा कथनाचा प्रयत्न असतो. (१२) क्षेत्रीय दैवते, स्थानिक दैवते, स्थल दैवते, मानवी दैवते यांचा व्यापक, सनातन दैवतांशी असलेला अवतार-संबंध, या कथांतून व्यक्त होतो. (१३) रूढी, परंपरा, नैतिकता यांच्या निर्मिती व प्रवाह यांचे स्पष्टीकरण सनातनातून वर्तमानापर्यंत आणून पोचविण्याचा प्रयत्न असतो. (१४) विभूतींचे दैवतीकरण सिद्ध करणाऱ्या घटना व चमत्कारांचे वर्णन यात असते. (१५) धर्मउत्पत्ती, धर्मसूत्रे, धर्मविधी आदि सिद्ध करणाऱ्या कथा यात असतात. (१६) पूजाविधी, पूजासाहित्य, पूजाक्रिया यातील प्रत्येक गोष्टीची परंपरा, महत्त्व व दैवत संबंध स्पष्ट केलेला असतो. (१७) सांप्रदायिक परंपरांची स्पष्टीकरणे देण्याचा प्रयत्न स्पष्ट केलेला असतो. (१८) तीर्थनिष्पत्ती, तीर्थाटन परंपरा, फलप्राप्ती यांची स्पष्टीकरणे असतात. (१९) गायन, वादन, नर्तन, चित्रण, शिल्प, नाट्य, काव्य, लेखन इ. कलानिष्पत्ती - त्यांची दैवतपरंपरा, दैवतप्रसाद यांची स्पष्टीकरणे या कथांतून होत असतात. (२०) रोग, व्याधी, विकृती निवारणासाठीचे तोडगे, यातुक्रिया यासंबंधातील दैवतपरंपरा व क्रिया

विधी यांची स्पष्टीकरणे व त्यांचा मानवी जीवनाशी असलेला संबंध सांगितला जातो. (२१) स्वर्ग, नरक, लोक (सूर्यलोक, चंद्रलोक इ.) काल, युगे या गोष्टींची उत्पत्ती, स्थिती यांची वर्णने, स्पष्टीकरणे व त्यांचा मानवी जीवनाशी असलेला संबंध सांगितला जातो. (२२) न्याय, तत्त्वज्ञान, धर्मसमाजनीती. (२३) भूगोल, वैद्यक, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र इ. शास्त्रांच्या, उत्पत्ती, विकास यांविषयी, दैवता वर्णने यात येतात. (२४) मानवी प्रवृत्ती, भावना, शारीरशक्ती स्थळे, भविष्य, योगायोग इ. विषयी, देवता, दैव याविषयी उत्पत्ती, मार्ग, विधी, स्थाने, परंपरा, संकेत इ. विषयी स्पष्टीकरणे यात येतात. (२५) चमत्कार स्वरूप, जननघटनांची वर्णने, फळे, सर्प देवता यांचा जननाशी संबंध यांची स्पष्टीकरणे या कथांतून आलेली असतात. (२६) देवतांचे परस्परसंबंध. (२७) देवतांचे विश्वचालकत्व, सर्वशक्तिमानत्व यातून सिद्ध केलेले असते. (२८) परमात्मतत्त्व, जीव, शरीर यांचे पृथकत्व व एकत्व यांची स्पष्टीकरणे करणाऱ्या कथा यात येतात. (२९) महाकाव्ये, इतिहास, ललित साहित्य यांचा देवतांशी असलेला संबंध यांतून स्पष्ट केलेला असतो. (३०) वन, जल, गड (पर्वत) यांच्या ठिकाणी असलेल्या शक्तींचे, देवत्वस्वरूप वर्णन करणाऱ्या, त्यांच्या परंपरा सांगणाऱ्या कथा येतात. (३१) देवावतार, महान विभूती यांची भ्रमंती व त्या भ्रमंतीवेळी त्यांनी केलेल्या लीला तसेच त्यातून निर्माण होणारे स्थळमहात्म्य, परंपरा इ. वर्णने या कथांत येतात. (३२) अनेक ठिकाणी देवतांनी घेतलेली निसर्गरूपे (पर्वत, गड, नद्या, वृक्ष, तळी, वनस्पती, आवाज, विशिष्ट पक्षी इ.) व त्यांच्या परंपरांचे, स्पष्टीकरण यात आलेले असते. (३३) व्रते, त्यांची निर्मिती, परंपरा, फलश्रुती यांचे स्पष्टीकरण यांतून आलेले असते. (३४) समंध, मुंजा, चेहेडा, खवीस, चेटकी आदि भूतप्रेत शक्तीवर्णने, त्यांची भ्रमंती, त्यांची वसतिस्थाने त्यांना प्रसन्न करणारे विधिनिषेध आदींची वर्णने यात येतात. (३५) प्रलय भाकिते, प्रलय संकेत आदि गोष्टी या कथांमधून आलेल्या असतात. (३६) माता, पिता, गुरू, राजा यांना देवत्व बहाल करणाऱ्या परंपरा व स्पष्टीकरणे. (३७) समाधी, थडगी (पीर) जागृती वर्णने यात येतात. (३८) अस्त्रनिष्पत्ती, अस्त्रसाधन, घटना वर्णने यात येतात. (३९) ऐतिहासिक महाविभूतींमधील अवतारित्व किंवा देवत्व सिद्ध करण्याचा प्रयत्न यात असतो. (४०) अतिमानवी शक्तींची वर्णने व तत्संबंधीच्या घटना, शक्ती वर्णने यात येतात. (४१) पक्वान्न निष्पत्ती त्यांचा दैवतसंबंध, विधिसंबंध



यांची परंपरा वर्णने यात येतात. (४२) खाणे, पिणे, झोपणे, काम, अभ्यास करणे, मैथुन करणे आदींचे संकेत, नियम, रूढी परंपरा व दैवतसंबंध स्पष्ट करण्याचा प्रयत्न असतो. (४३) तिथी, वार आणि दैवते यांचा संबंध स्पष्ट करण्याचा प्रयत्न असतो. (४४) सणोत्सव साजरे करणे हा मागील घटना, कारणपरंपरा स्पष्ट करण्याचा प्रयत्न यात असतो. (४५) रंगभूषा, केशभूषा, वेशभूषा, अलंकार या संदर्भातील दैवत निगडित, धर्मनीतीकल्पना निगडित परंपरांचे स्पष्टीकरण यांतून करण्याचा प्रयत्न असतो. (४६) निसर्ग, मानवी शरीर व मन, आरोग्य, मानवी वर्तन यामागील शास्त्रीय संकेतांना पापपुण्य, दैवतकोप, प्रसन्नता इ.चा संबंध सिद्ध करण्याचा प्रयत्न असतो. (४७) धातू, रत्ने यांचा दैवत संबंध व उत्पत्तीविषयक स्पष्टीकरणे यात आलेली दिसतात. (४८) स्थापत्य संकेत व दैवत संबंध व परंपरा यांचे वर्णन करण्याचा प्रयत्न होणे. (४९) अतिथी व दैवतरूपे यांच्या परंपरा व स्पष्टीकरणे यात येतात. (५०) अप्सरा, पऱ्या, वनदेवता आदींच्या आख्यायिका यात येतात. (५१) ग्रंथमहात्म्य व तत्संबंधी आख्यायिका, संकेत कथन, यांचा अंतर्भाव यात होतो.

ह्या सर्व स्वरूप वर्णनात्मक विधानांचा विचार करता; यात आणखी भर पडतच राहणार हे उघड आहे. धर्मश्रद्धात्मक सत्याचे अधिष्ठान मिळवून देणाऱ्या सूक्ष्मातिसूक्ष्म गोष्टी विचारात घ्याव्या लागतात. धर्मश्रद्धा यांचा संबंध तथाकथित मानल्या जाणाऱ्या ख्रिश्चन, मुस्लिम आदि धर्मांशी नाही तर धारणाश्रद्धांशीही आहे हे लक्षात घेणं आवश्यक आहे. दैवत आणि दैवतकथा धारणाश्रद्धा निर्माण करतात किंवा धारणाश्रद्धातून दैवत आणि दैवतकथा निर्माण होतात, हे लक्षात घेतले तर मानवी जीवनाच्या इतिहास, परंपरा, संस्कृती, कला, समाजशास्त्रे, भौतिकशास्त्रे इ. सर्व गोष्टी मिथकांच्या अवगुंठनातून प्रवाहित होत असतात. म्हणूनच 'मिथक' ही गोष्ट मानवी जीवन व्यापून टाकणारी सर्व प्रमुख असा 'लोकबंध' ठरते. मानवी जीवनाच्या, समग्र व्यावहारिक, ऐहिक आणि पारलौकिक जीवनासह सुखदुःखादी सर्व गोष्टी आणि सौंदर्यभावनांची अर्थचिकित्सा करतांना मिथक विचार महत्त्वाचा ठरतो.

वरील स्वरूपवर्णनात्मक विधानांच्या आधारे मिथकांचे आणि दैवतांचे प्रकार करता येतात. दैवतकथाशास्त्र अशी प्रकार व्यवस्था अभ्यासाच्या सोयीच्या दृष्टीने करत असते.

**७. दैवत आणि दैवतकथांचे प्रकार :–**

दैवत आणि दैवतकथांचे तीन दृष्टींनी प्रकार करता येतात. एक स्थान किंवा क्षेत्र परत्वे. दुसरे म्हणजे दैवतांचा स्वभाव स्वरूप यानुसार अथवा आशयानुसार असेही म्हणता येईल व तिसरे पंथ, संप्रदाय यानुसार होय.

**७.१** स्थान किंवा क्षेत्र परत्वे दैवत आणि दैवतकथांचे प्रकार पुढील प्रमाणे सांगता येईल. (१) कुलदैवत – कुलस्वामी आणि कुलस्वामिनी. या दैवतांचा संबंध कुल, घराणे किंवा गोत्र यांशी असतो. 'देवक' हा प्रकार याच प्रकारात मोडतो. देवक एकप्रकारे गोत्रनामक असते. मात्र त्याचा थेट संबंध ऋषीकुळाशी नसतो. तो काहीसा दुरान्वयाने लावता येतो. 'देवक' पान, फुल, फांदी, रोप, झाड, वृक्ष यांच्या स्वरूपात प्रामुख्याने वनस्पतींशी निगडित असतो. 'कुळ' अस्तित्वाचे किंवा मानवी वंश अस्तित्वाचे मूळ स्थान असते. त्या स्थानाशी निगडित दैवतांचा संदर्भ कथात्मक स्वरूपात कुळ इतिहास सूचित करतो. (२) उपास्य दैवत याचा समावेश हा स्थान आणि आशय या दोन्ही संदर्भात करता येत असतो. उपास्य दैवत हे कुलदैवतही असू शकते. मात्र उपास्य दैवत हे व्यक्तिपरत्वे भिन्नभिन्न असू शकते. एकाच कुळात किंवा कुटुंबात प्रत्येक व्यक्तीचे भिन्न उपास्य दैवत असू शकते. उदा. एकाच कुटुंबात गणपती, साईनाथ, देवी अशी भिन्न उपास्य दैवते असू शकतात. (३) स्थान दैवत हे दैवत विशिष्ट स्थानीच प्रकटलेले आणि त्या स्थानापुरतेच मर्यादित असते. यात मुंजा, भूत, प्रेत, पिशाच्च या प्रकारच्या दैवतांबरोबरच, विशिष्ट कारणांनी प्रकटलेली, परंतु त्या स्थानापुरतीच मर्यादित दैवते असतात. यात दैवतांत विरगळ अथवा वीरदैवते, विभूतिमत्वे या स्वरूपाची दैवते व त्यांच्या स्थान मर्यादित कथा येतात. अनेकदा एकाच भावात भिन्न भिन्न ठिकाणी भिन्न भिन्न स्थानदैवते असतात त्यांचा संबंध परस्परांशी नसतो. एवढ्या मर्यादेतही ही स्थानदैवते आढळतात. (४) ग्रामदैवते ही त्या त्या गावांपुरती गावातील सर्वांच्या जाणिवांशी लोकबंध स्वरूपात असतात. त्यांच्या दैवतकथा स्थानदैवतकथांप्रमाणे त्या त्या गावाशीच मर्यादितपणे आढळतात. काहीवेळा ग्रामदैवतकथा जवळपासच्या गावांतील ग्रामदैवतकथांचे पर्याय असल्यासारख्या असतात. अतिप्राचीन प्रमुख दैवतांचे अवतरण काही वेळा ग्रामदैवतांच्या स्वरूपात झालेले दिसते. काही वेळा गावांतील ऐतिहासिक श्रेष्ठ विभूतिमत्त्वाचे, पूज्य व्यक्तिमत्त्वाचे ग्रामदैवत म्हणून रूप पुढे येते. मात्र त्यांचे महात्म्य गावापुरते



लोकदेव म्हणूनच असल्याचे दिसते. (५) क्षेत्रीय दैवते दोन प्रकाराने विचारात घ्यावी लागतात. (अ) विशिष्ट स्थानाला तीर्थक्षेत्राचे माहात्म्य तेथील विशिष्ट दैवतांच्या दैवतसंचार किंवा प्राकट्यकथा यातून प्राप्त झालेले असते. तसेच तेथील जलप्रवाह, जलस्थान, जलकुंभ, तलाव, सरोवर या स्वरूपातील जलाला दैवतांच्या प्राकट्याने पवित्र स्थानाचे अर्थात तीर्थक्षेत्राचे माहात्म्य प्राप्त झालेले असते. अशा क्षेत्रांशी पंचक्रोशीपासून, प्रदेश, देश, विदेश, विश्व एवढ्या विस्तीर्ण होत जाणाऱ्या मानवी समूहांच्या धारणा किंवा लोकबंध दृढ झालेले असतात. या क्षेत्रांच्या यात्रांना महत्त्व असते. अशा क्षेत्रात एकच किंवा अनेक दैवतांचा माहात्म्यासह वास आहे अशी श्रद्धा असते. या संबंधातील दैवतकथाही प्रचलित असतात. उदा. काशी. (ब) क्षेत्र म्हणजे विशिष्ट भूप्रदेश. काही दैवतांचा विशिष्ट क्षेत्रात लोकबंध प्रचलित असतो. हा भूप्रदेश पंचक्रोशीपासून विश्वात्मकतेपर्यंत विस्तारत जाऊ शकतो. अशा देवतांची संख्या मर्यादित असते. मात्र संपूर्ण क्षेत्रांमध्ये क्षेत्रिय दैवतांच्या कथांचे अनेक पर्याय तसेच विशेष कथास्वरूपातील कथा आढळतात. क्षेत्रांच्या बाबतीत समान दैवतांसाठीची पर्यायी क्षेत्रेही आढळतात. उदा. भारतातील नाथसंप्रदायातील नवनाथांची स्थाने; मूळ उत्पत्तीकथांसह उत्तरपूर्व भारतात दिसतात तशीच ती महाराष्ट्रातही दिसतात. ऋषीदैवतांचा संचार असाच झालेला दिसतो. उदा. अगस्त्यऋषी, विष्णूधाम भारतात चार ठिकाणी मानले गेले आहे. विशालबदरी, भुवनेश्वर, द्वारका आणि रामेश्वर अशी अनेक उदाहरणे देता येतील. काही वेळा स्थानदेवतेचे क्षेत्रिय दैवतात कथांसह रुपांतरण झालेले दिसते. उदा. शिर्डीचे साईनाथ अशीही अनेक उदाहरणे दिसतात.

क्षेत्रिय दैवतांचा संचार स्थलांतरित लोकांबरोबर झाला तरी विशिष्ट क्षेत्रांशी त्याची नाळ तुटत नाही. हा प्रश्न कुलदैवते व उपास्य दैवतांच्या संदर्भात येत नाही.

क्षेत्रिय दैवतांमध्ये, क्षेत्रांशी निगडित अर्थात लोकवस्तीशी निगडित दैवतेही मानलेली दिसतात. त्यात अंतरिक्ष देवता, आकाश देवता, जलदेवता, गडदेवता असे प्रकार दिसून येतात. यात जल, वन, गड यांशी संबंधित मातृकांचा भरणा किंवा परिदैवतांचा भरणा पाहावयास मिळतो.

**७.२** दैवतांचा विचार शक्तीमत्ता, स्वभावस्वरूप, सृष्टीसंवेदन, सृष्टीनिर्माण यांशी निगडित आशयनिष्ठेने करता येतो. या दैवतांशी आशयनिष्ठ कथांचे

साहचर्य असल्याचे लक्षात येते. डॉ. दुर्गा भागवत यांनी दैवतकथा या स्वतंत्र प्रकरणात[२०] उत्पत्तीकथा, प्रलयकथा, ज्योतिषकथा, आकाश व पृथ्वी सूर्यकथा, चंद्रकथा, नक्षत्रकथा, तारे याशिवाय इंद्र आणि पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश यांशी संबंधित पंचमहाभूतांच्या कथा. तसेच ब्रह्मा, विष्णू, महेश, तसेच शक्तीस्थाने यांच्या कथा दिल्या आहेत. डब्ल्यू. के. सी. गुथरिय यांनी 'द डिव्हाइन फॅमिली' मध्ये १२ देवतांची यादी दिली आहे. झु (Zeus), हीरा (Hera), पोसेइडन (Poscidon), डीमेटर (Demeter), अपोलो (Apollo), अर्टेमिस (Artemeis), Ares (अरेस), अफ्रोडाइट (Aphrodite), हरमेस (Hermes), अथेन (Athena), हे फाएस्टस (He Phasestus) आणि हेसटिआ (Hestia). या यादीबरोबर पुराणकथांची चर्चा केली आहे.[२१] या कथांबरोबरच कथांतून दैवतीकरण कसे होते याचीही चर्चा केली आहे. डॉ. उषा पुरी यांनी 'भारतीय मिथक कोष' करतांना भारतीय कल्पना परंपरेतील वैदिक, पौराणिक, महाकाव्यात्मक कथांबरोबरच बौद्ध व जैन परंपरेतील दैवतकथाही नोंदविल्या आहेत.[२२]

साकल्याने विचार करता दैवते आणि दैवतकथांची संख्या वाढत जाईल. आशयानुसार ढोबळमानाने उत्पत्तीकथा, प्रलयकथा, दैवत महात्म्यकथा, पंचमहाभूत दैवतकथा, इतिहासपुराणकथा, महाकाव्य दैवते, सृष्टी व मानव, समाज, भाषा, वंशकथा, विभूतीदैवते, प्राणीदैवते, वृक्षदैवते, पर्वत, नद्या यांना दैवत्व प्रदर्शित करणाऱ्या कथा, भूतकथा, परिकथा, ज्योतिषकथा, शास्त्र, कला, विधिकथा, धर्म तत्त्वज्ञान निष्पत्तीकथा असे प्रकार सांगता येतील.

**७.३** संप्रदायानुसार दैवते असा प्रकार करता येतो. एकेश्वरवादात हा भाग संभवत नाही. भारतात सनातन परंपरेमध्ये शैव, शाक्ते, गाणपत्य, वैष्णव, नाथ, भागवत, महानुभाव असे संप्रदाय दिसतात. त्यात विशिष्ट दैवतांच्याच उपासना व कथा आढळतात.

**८. समारोप :–**

दैवते आणि दैवतकथा यासंदर्भात दैवतकथाशास्त्र अजूनही सुविहितपणे मंडित झालेले नाही. दैवतकथाशास्त्राचे लोकसाहित्य व लोकसंस्कृती अंतर्गत स्थान अनन्यसाधारण आहे. तथापि मानवी जीवनातील सर्व ज्ञानशाखांना प्राथमिक स्वरूपात परंतु मूलभूत सामग्री पुरविण्याचे कार्य दैवतकथाशास्त्र करते हे आता सर्वमान्य झाले आहे. वैश्विक पातळीवर विचार केला तर; हे



अभ्यासक्षेत्र विश्वाएवढेच व्यापक आहे, असे जाणवते. त्याच भूमिकेतून गांभीर्याने या शास्त्राचा अभ्यास घडणे आवश्यक आहे. येथे आपण स्वीकृत अभ्यासविषयांतर्गत दैवतविचाराचा स्थूल आढावा घेत तात्त्विक चर्चा जमेल तेव्हढी करण्याचा प्रयत्न केला आहे.

**९) संदर्भ व टीपा :–**

१) लोकसाहित्याची रुपरेखा : भागवत (डॉ) दुर्गा, वरदा बुक्स, पुणे, सुधारून वाढवलेली आवृत्ती १९७७.
२) लोकसाहित्य संशोधन पद्धती : सहस्रबुद्धे अनिल, नितीन प्रकाशन, पुणे, नवीन सुधारित आवृत्ती जुलै २०१२.
३) लोकनिष्ठ अध्यात्मवाद : सहस्रबुद्धे अनिल, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्र.आ. २०१६.
४) भारतीय मिथक कोश : पुरी विद्यावाचस्पती नेशनल पब्लिशिंग हाऊस, २३, दिल्ली, प्र. संस्करण १९८६.
५) उनि., लोकसाहित्याची रुपरेखा.
६) पद्मगंधा दिवाळी २०१६ : संपा. जाखडे अरुण, 'मिथकांचे अवतरण', प्रास्ताविक, डॉ. रा. चिं. ढेरे यांच्या उल्लेखातील अंश, पृ. ४५.
७) उनि., लोकसाहित्याची रुपरेखा.
८) उनि. लोकनिष्ठ अध्यात्मवाद.
९) ENCYCLOPAEDIA BRITANICA A New Survey of Universal Knowledge Volume 16, Muskroom to Ozonolysis Chicayo 1962 London, Toronto / Mythology Classification.
१०) तत्रैव.
११) उनि., पद्मगंधा, 'मिथक' गणेश देवी.
१२) तत्रैव, पद्मगंधा 'मिथक आणि संस्कृतीचा अभ्यास', आनंद पाटील.
१३) तत्रैव, पद्मगंधा, 'मिथक आणि तत्त्वज्ञान', प्रशांत बागड.
१४) तत्रैव, पद्मगंधा, 'मिथकामागील लोकसमूहाचे भावविश्व', मधुकर वाकोडे.
१५) तत्रैव, 'आदिवासींच्या साहित्य संस्कृतीतील मिथके', हेमंत खडके.
१६) तत्रैव, पद्मगंधा, 'मिथ आणि मराठी कादंबरी', महेंद्र कदम.

१७) उनि., लोकसाहित्याची रुपरेखा.
१८) 'लोकबंध', सहस्त्रबुद्धे अनिल, नितीन प्रकाशन, पुणे, आ. २०१२.
१९) उनि., 'लोकसाहित्य संशोधन पद्धती'.
२०) उनि., लोकसाहित्याची रुपरेखा.
२१) उनि., लोकसाहित्य संशोधन पद्धती.
२२) उनि., भारतीय मिथककोश.

●●●



## प्रकरण चौथे

# लोकसंस्कृती : संकल्पना व स्वरूप

**(The Concept and Feature of Folk-Culture)**

'लोक' हे अस्तित्व, घटकलोक (व्यक्ती), अंगस्वरूप लोक (एकात्म मानवी समूह) आणि अखिल लोक किंवा वैश्विक लोक (संपूर्ण जगतातील मानवजात) अशा तीन स्तरावर, विचारात घेता येते. असे विचारात घेतांना, घटकलोक मध्येच अंगस्वरूप लोक व वैश्विक लोकचेही दर्शन एकाचवेळी संवेदित होते. याचा अर्थ वैश्विक लोक या व्यापक अस्तित्वात, काही वैशिष्ट्यांच्या आधारे अंगस्वरूप लोक आणि घटक लोक यांचे पृथक अस्तित्व स्पंदित होते. ही वैशिष्ट्ये, शारीरिक, मानसिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक, कला, कृषीव्यवहार, चराचराविषयीच्या आणि अवकाश, काल, अंतरिक्ष यांतील दृश्यादृश्य अनुभूती; या व अशा अनेक गोष्टींच्या संदर्भात असतात. ही वैशिष्ट्ये समूहमनाची मान्यताप्राप्त, अनुसरित परंपरांच्या, रूढींच्या स्वरूपात असतात. या वैशिष्ट्यांनी अनेकदा लिखित वा मौखिक संहितांचे, शास्त्रीय ग्रंथांचे स्वरूप धारण केलेले असते. यालाच लोकजीवन परंपरा असे म्हणतात. यातील परंपरा जेव्हा लिखित किंवा शास्त्रीय स्वरूपांची अवस्था धारण करीत असतात तेव्हा अंगस्वरूप लोकमधील विविध अर्थाने नेतृत्व करणारे किंवा धुरिण त्यांत विचारपूर्वक सर्वहितैशी स्वरूपाचे बदल किंवा त्यात अधिक गोष्टींचे समावेशन करून; परंपरांना आकार देतात. हे धुरिण एकप्रकारे सुधारित किंवा विकसित परंपरा पुढे नेण्याचे काम करतात. त्यातून त्या परंपरा लोकरूढ होतात. असे लोकजीवन लोकच्या आरंभबिंदूपासून अनंत काल सुरू आहे, सुरू असणार आहे. यांतूनच सामाजिक, सांस्कृतिक इ.इ. विशेषणात्मक ज्ञानशाखांचे अवतरण झाले. येथे आपण लोकसंस्कृतीची

चर्चा करणार आहोत. त्या चर्चेच्या नेमकेपणासाठी 'संस्कृती' ही संकल्पना समजावून घेणे आवश्यक वाटते.

**१. संस्कृती :–**

**१.१** संस्कृती या शब्दाचा शब्दकोशातील अर्थ पाहता उदाहरणे म्हणून काही नोंदी घेऊया. वि. शं. ठकारांच्या 'पयार्य शब्दकोश' या कोशात, संस्कृती (स्त्री) समाजस्थिती (सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, नैतिक, साहित्य, कला, ज्ञान, तत्त्वज्ञान, शास्त्र इत्यादी विषयक), परंपरा, चालीरीती, रीतीभाती, आचार, सुसंस्कृतता, सुधारणा, विकास, सभ्यता, अर्थप्रधान उदा. पोटभरू संस्कृती. (n) Civilization, culture, cultivation, state of humanity (social, educational, religious, moral, relating to literature - art - learning - philosophy - science etc.) tradition, customs, mores way of life; refinement.[१] असे पर्याय दिले आहेत. प्रोफेसर एम. के. देशपांडे यांच्या मराठी–इंग्लिश डिक्शनरीमध्ये संस्कृतीचा अर्थ Civilisation असा दिला आहे.[२] 'संस्कृती' या शब्दापासून संस्कृती हा शब्द निर्माण झाला आहे यात दुमत असण्याचे कारण नाही. 'संस्कार' या शब्दात साठवलेली संकल्पना समजावून घेणे योग्य होईल. प्रो. दे. द. वाडेकर संपादित मराठी तत्त्वज्ञान कोशात वि. म. बेडेकरांची नोंद अशी– संस्कार याचा व्युत्पत्यर्थ शुद्ध करणे (सं+कृ), एखाद्या वस्तूच्या ठिकाणी असलेल्या मूळ गुणांत परिवर्तन घडवून आणून, त्या वस्तूच्या ठिकाणी 'अधिक चांगले गुण उत्पन्न करणे. उदा. 'हिऱ्याला पैलू पाडणे.' 'मलापकरण' आणि 'सद्गुणाधान' ही दोन कार्ये करून मानवाला सुधारण्याचे कार्य संस्कार करतात, असे तंत्र वार्तिकाकार म्हणतात.' प्राचीन भारतीयांच्या वाङ्मयातून व त्यांतून प्रतिबिंबित होणाऱ्या त्यांच्या आचारविधींतून या संस्कारांना धार्मिक अर्थ (सॅक्रॅमेंट) आला आहे. त्यामुळे धार्मिक विधी करणे म्हणजे संस्कार करणे होय. उदा. उपनयन. यातूनच 'जन्मना जायते शूद्रः संस्कारात द्विज उच्युते' असे वचन आले आहे.

संस्कारामागील तात्त्विक दृष्टी पाहता; संस्कार म्हणजे, कृतज्ञतापूर्वक विश्वनियंत्याचे स्मरण ठेऊन; कर्तव्यबुद्धीने कर्म करणे होय. संस्कारांनी आत्मगुणांची प्राप्ती होते, असा विचार या संस्कार विधीमागे आहे.[३]

संस्कार या शब्दापासून संस्कृती हा शब्द निर्माण झाला. संस्कृती या संकल्पनेत उपरोक्त शब्दकोशात दिलेले सर्व पर्यायी शब्द येतात, हेही स्पष्ट



आहे.

याचा अर्थ **मानवी समूहजीवनात सामाजिक, राजकीय, आर्थिक, आरोग्यविषयक, संरक्षणविषयक, प्रजननविषयक, निवारा, आहारनिद्राविषयक; या सर्व गोष्टीसाठी लागणाऱ्या साधनसामग्रीविषयक व्यवस्था करण्याचा; निसर्ग आणि मानव यांच्या परस्पर, कृतज्ञता, श्रद्धा प्रेम, आनंदपूर्वक संबंधासाठीची व्यवस्था, चाकोरी किंवा सारणी, अनुसरण्याचा; पारंपरिक तरी परिवर्तनशील प्रयत्न म्हणजे संस्कृती असे म्हणता येते.** हा प्रयत्न समूहजीवनातील त्या त्या क्षेत्रातील तसेच सर्वांगीण विचार करणारे धुरिण करतात आणि समूहजीवनात त्यांचे प्रामाण्य प्रस्थापित होत जाऊन; एक समूहसापेक्ष सर्वांगे सुखकारक अर्थात सुलभ, आनंददायक आणि सहज अशी अवस्था निर्माण होते. ही अवस्था संस्कृती म्हणून ओळखली जाते.

ही समूहजीवनाची व्यवस्थापित अवस्था साधण्यासाठी विद्या आणि कला यांची, शास्त्रीय अर्थात नियमित आणि निश्चित तसेच न्याय्य अशी निर्मिती व उपयोजनांची प्रक्रिया मानवी समूहजीवनात घडत असते. या प्रक्रियेचे दृश्यस्वरूप, स्थलकालपरिस्थिती सापेक्ष आणि मानवी जीवनसापेक्ष स्वरूपात दिसते. म्हणजेच संस्कृतीमध्ये मानवी समूहजीवनातील, भूत, वर्तमान आणि भविष्यकाळातील, अपेक्षापूर्तीची प्रक्रिया, विद्या आणि कला यांच्या उपयोजनात अपेक्षित असते.

भारतीय परंपरेत 'चौदा विद्या चौसष्ट कला' यांचा विचार सतत पुढे येतो. या विद्या आणि कलांचे मानवी समूहजीवनातील दर्शन म्हणजे संस्कृतीचे दर्शन होय. या विद्या आणि कला, मानवी जीवनाच्या अध्यात्मिक धार्मिक, सामाजिक, राजकीय, औद्योगिक, शैक्षणिक आदि सर्व व्यवहारात उपयोजित होत असतात. 'लोकनिष्ठ अध्यात्मवाद' या प्रस्तुत लेखकाने लिहिलेल्या ग्रंथात 'विद्या, कला आणि संस्कृती' यांच्या अन्योन्य संबंधांचे स्वरूप उलगडण्याचा प्रयत्न केला आहे. ''विद्या आणि कला ही संस्कृतीची महत्त्वाची अंगे आहेत. **समग्रलोकजीवन उन्नत करण्यासाठी वेळोवेळीच्या लोकधुरिणांनी मूल्यात्मकतेने निर्देशित केलेली सारणी म्हणजे संस्कृती होय.** विज्ञान, ज्ञान आणि सौंदर्यभावना या मानवी मनःशक्ती स्त्रोतातून, मानवी संघजीवनात, समूहहिताच्या आणि आनंदाच्या दृष्टीने विज्ञान, ज्ञान आणि संस्कृती क्षेत्रात

शास्त्रे, कलाशास्त्रे आणि संस्कृतीविषयक नीती आणि तत्त्वज्ञान; तसेच धर्मशास्त्रे विकसित करण्याचा प्रयत्न मानव सातत्याने करीत आला आहे.

या मानवी जीवनसारणी प्रक्रियेत, सत्‌चित्‌आनंदापर्यंत पोचण्याचे ध्येय असते. अर्थात या प्रक्रियेच्या मुळाशी, सत्य, शिव, सुंदर ही जीवात्म्याची सर्वश्रेष्ठ आणि निरपेक्ष आनंदप्रद मूल्ये असावीत; ही अपेक्षा असते. याच ध्येयाने प्रेरित होऊन लोकधुरिणांनी वेळोवेळी लोकनिष्ठ अध्यात्मवादी भूमिकेतून मार्गदर्शन केले आहे, अशी परंपरा दिसते. विद्येचा अंतिम हेतू कोणता? कलांचा अंतिम हेतू कोणता? आणि संस्कृतीचे सारणीयोजक प्रचलन अंततः कोणत्या हेतूने? या तीनही प्रश्नाचे उत्तर एकच आहे – शांती! ही निरामय अशी अपेक्षा सर्वांचीच असते.''[४]

विद्या आणि कला यांच्या शास्त्रीय मांडणीवर आधारित, जास्तीतजास्त शास्त्रोक्त पद्धतीने कार्यान्वित होण्याचा प्रयत्न, ज्या मानवांकडून घडत राहतो, ते त्या त्या समूहात अभिजन म्हणून ओळखले जातात. अर्थात श्रेष्ठ किंवा धुरिण म्हणून ओळखले जातात. त्यांचे अनुकरण ह्या समूहजीवनात अन्य सर्व घटक करतात. अशा शास्त्रीय मांडणीसह कार्यान्वित असलेली संस्कृती अभिजात संस्कृती म्हणून मानली जाते. आणि ती अनुसरणाऱ्यांना अभिजन असे म्हटले जाते. इंग्रजीतील Class आणि Mass ही कल्पना अशीच आहे. **मात्र अभिजन आणि अन्य जन हे एकाच मानवी समूहाचे एकात्म जीवन जगत असतात. ते भिन्न समूह नसतात, हे लक्षात घ्यावेच लागते.** अभिजन आणि अन्य जन यांच्या अभिसरणात्मकतेने समूहजीवन अर्थात लोकजीवन प्रवाहित होत असते. येथेच लोकसंस्कृतीचे दर्शन घडते. या प्रक्रियेतूनच भावी मूल्ये संशोधित करण्याचे कार्य लोकधुरिण करीत असतात. त्यातूनच अभिजात विद्या व कला निर्माण होतात.

**१.२** अभिजन हा शब्द वापरून धुरिण, ज्ञानी, शास्त्रीय पद्धती अनुसरणारे, वास्तव आणि मौखिक परंपरा यांचे भान ठेवणारे, तार्किक, अन्यजनांना मार्गदर्शन करणारे, एकाच मानवीसमूहात आपले श्रेष्ठत्व ज्ञानात्मक व्यवहाराने जपणारे, डोळस, द्रष्टे असे लोक अर्थात कवी, लेखक, कलावंत, शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, चिंतक, ज्ञानात्मक दृष्टीसह नेतृत्व करणारे समूहघटक म्हणजे अभिजन होत. समाजातील विविध क्षेत्रातील ज्येष्ठ अनुभवी, व्यासंगी, ऋषीतुल्य, समाज व्यवस्थापक या सर्वांना अभिजन म्हणून संबोधले जाते. त्यांच्या अवगत विद्या आणि कला ह्या शास्त्रीयदृष्ट्या जास्तीत जास्त शुद्ध स्वरूपात प्रकटविण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. त्यांचा सर्वार्थे आधार त्याच समूहातील अन्य जनांना वाटतो. एकाच कुटुंबातील कुटुंब कर्तेधर्ते असावेत, तसे अभिजनांचे स्थान समाजजीवनात मानले जाते. स्वाभाविकपणे एकाच समाजात, इच्छा, आकांक्षा, समजुती, धर्म, नीती, तत्त्वज्ञान, आर्थिक व्यवहार सर्व समूहाचा एकात्म असला तरी अभिजनांच्या ज्ञानात्मक आणि सशास्त्र वर्तनपद्धतीमुळे, त्यांचा एक वेगळा स्तर किंवा त्यांचे एक वेगळे स्थान, त्या समूहात असते. ते त्या समाजातील कर्ते, धुरिण, अनुकरणीय वाटत असतात. अन्यजन जीवनप्रवाहात अभिजनांची त्या त्या क्षेत्रातील सत्ता मान्य करतात व आपल्या सारणीयुक्त जीवनाला त्यांच्या सारणीचा धर आहे असे मानतात.

अन्यजनांचा अर्थात अभिजनेतर लोकांचा नित्य, समग्र व्यवहारामधील, वर्तनामधील अर्थात सारणीमधील वावर हा अनुकरणांतून मौखिक पारंपरिक ज्ञानातून घडत असतो. अभिजनांकडून पाझरत आलेले शास्त्रीय किंवा श्रेष्ठ ज्ञान किंवा वर्तनपद्धती त्यांनी अनुकरणात, मौखिक परंपरेने स्वीकारलेली असते. आईकडून लेकीला मिळावे तसे या मौखिक परंपरेला शास्त्रीय ज्ञानात्मक मांडणीचा वारसा असला तरी त्याची जाणीव किंवा भान असत नाही. 'महाजनो येन गतःसःपंथः ।' या न्यायाने आणि शुद्धाशुद्ध आदि विवेक व शास्त्रीय दृष्टीच्या फारसे भानगडीत न पडता, अन्य जनांचे सारणीतील वर्तन सुरू असते. धर्म, न्याय, नीती, व्यवहार एव्हढेच नव्हे तर कृषीजीवन, समाजजीवन, विद्या आणि कला यांचे उपयोजन हे अभिजनांवर विसंबून असते.

मात्र अन्यजन स्थलकालपरिस्थिती सापेक्ष सहज आणि तरल पणाने आपल्या व्यवहाराला, वर्तनाला, भाषिक संवादाला, धार्मिक व्यवहाराला सामाजिक व्यवहाराला, पारंपरिकतेचे पालन करतांना; सहज वळण देऊन जातात. हे वळण अभिजनांच्या सावधानतेतून सुटत नाही अशा वळणाला शास्त्रीय ज्ञानात्मक वळण देण्याचे कार्य अभिजन सर्वसमावेशक व हिताय स्वरूपात करण्याचा प्रयत्न करीत असतात. अन्यजनांना येणाऱ्या स्वैर, सहज, नैसर्गिक, नाविन्यपूर्ण अनुभवांना सामावून घेत; त्या अनुभवांना अधिक सत्यत्वाच्या आणि हितकारकतेच्या कसोटीवर घासून; व्यवहारात आणण्याचे कार्य ते करीत असतात. असे करतांना आपण याच समूहातील असल्याची

जाणीव व जबाबदारी त्यांच्या ठायी असते.

मानवी समूह म्हणजे लोक. व्यक्ती अर्थात घटकलोक, एकात्म मानवी समूह म्हणजे अंगस्वरूप लोक आणि विश्वात्मक मानव म्हणजे विश्वलोक किंवा विराटपुरुषरूप लोक अशी लोक स्वरूपात जाणीव प्रत्येक व्यक्ती अर्थात घटकलोकच्या ठिकाणी असते. हे लक्षात घेतले तर कोणत्याही एकात्म जनसमूहात अभिजन आणि अन्यजन किंवा अभिजन आणि लोक असे मानून पृथकत्व दर्शविणे अन्याय्य किंवा अपसमज स्वरूपातील दोषात्मक होईल. त्याचबरोबर 'लोक' या शब्दाच्या व्यापक अर्थापासून च्यूत होऊन लोक म्हणजे सर्वसामान्य, अज्ञ, मागास, डोंगरी, अप्रतिष्ठित असे न्यूनतादर्शक मानवी समूह असा अर्थ निष्पन्न होईल. दुर्दैवाने लोकसाहित्य या ज्ञानशाखेमध्ये असा अर्थ रूढ होऊ लागला होता; हे अनेक अभ्यासकांच्या ग्रंथातून केलेल्या मांडणीतून पुढे आले आहे. लोकसाहित्यातील 'लोक'ची मांडणी करतांना किंवा जनवाङ्मय अथवा जनसाहित्य असे म्हणताना हा प्रमाद घडला आहे. उपरोक्त समूहजीवनातील अभिसरण प्रक्रिया समजावून घेतली तर तो प्रमाद नाहीसा होईल. भारतीय परंपरेने 'लोक' कल्पना प्रकट करतांना अशा प्रमादाला वाव दिला नाही. कुटुंब असे म्हणतांना कुटुंबकर्ता म्हणजे कुटुंब नसते तर कुटुंबातील सर्व सदस्य मिळून कुटुंब मानले जाते. तसे लोक, जन या संकल्पनेचे आहे.

या तऱ्हेने विचार करता एकात्म मानवी जीवनसारणीची स्तरीय किंवा वर्गीय विभागणी करून पृथगात्मता शोधणे इष्ट नाही म्हणजे अभिजनांची संस्कृती आणि अन्य जनांची संस्कृती अर्थात लोकसंस्कृती पृथक नसते तर एकाच संस्कृतीची ती तात्त्विक आणि व्यावहारिक किंवा ज्ञानात्मक आणि उपयोजनात्मक रूपे असतात. उपयोजनात अनुभूती प्रक्रिया घडत असते. म्हणून उपयोजनात्मक अर्थात लोकसंस्कृतीतून शास्त्रीय ज्ञानाला अधिकाधिक सामग्री, अनुभूती प्रक्रियेतून मिळत राहते. त्यातून एकूण संस्कृतीची प्रगती, विकास अर्थात सनातन प्रवास सुरू राहातो. याचा सरळ अर्थ संस्कृतीचे दर्शन लोकजीवनात घडते. मात्र त्या संस्कृतीचे मानव्यशास्त्रीय, कलाशास्त्रीय आणि धर्मशास्त्रीय रूप त्याच लोकमधील अभिजनांच्या चिंतन आणि मंडनातून तसेच त्यांच्या सारणीतील उपयोजनातून प्रत्ययास येते.

**१.३** संस्कृतीचे घटक म्हणून किंवा संस्कृतीची अंगे म्हणून जी विचारात घेतली जातात त्यात धर्म, नीती, तत्त्वज्ञान, कुटुंब, समाज यांतील संस्कार विधी, भविष्य, न्याय आणि कला यांत धर्मनिगडित विधिविधाने व विधिनाट्ये तसेच नर्तन, वादन, गायन, अर्थात संगीत, चित्र, शिल्प, स्थापत्य, विणकाम आदि सर्व कलांचा अंतर्भाव होतो. खरेतर संपूर्ण समूहजीवनाची पारंपरिक सारणीचा अंतर्भाव संस्कृती शब्दात करायला हवा. याचे कारण मानव अर्जित, भौतिक, अतिभौतिक, मानसिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक, न्याय, शारीरविज्ञान तथा आरोग्यविज्ञान, कृषी आदि सर्व शास्त्रे आणि सर्वकला या मानव अर्जित ज्ञानाचे सारणीस्वरूप उपयोजन आणि प्रक्रियात्मक परिवर्तनात्म पारंपरिक स्वरूप असते. परंतु संस्कृती म्हणून काही विशिष्ट घटकांचा विचार संस्कृती या अवस्थे संदर्भाने करण्याचा प्रघात आहे.

**२. लोकसंस्कृती :-**

लोकसंस्कृती म्हणजे लोकजीवनातील मौखिक परंपरागत प्रचलित असे जीवन दर्शन होय. धर्म, कुळधर्म, कुलाचार, जन्मप्रथा, विवाहप्रथा मर्तिक प्रथा, न्यायपद्धती, कृषीजीवन, देवदेवता उपासना, जत्रायात्रा, नर्तन, वादन, गायन अर्थात संगीत, चित्र, शिल्प, स्थापत्य, कपडालत्ता, दागदागिने, विधीविधाने, विधिनाट्ये आरोग्यादि औषधोपचार पद्धती जीवन, कुटुंब व कौटुंबिक सगेसोयरेदी मानीव नातेसंबंध, अन्नपदार्थ परंपरा, पारंपरिक मृत, खेळ, नाट्ये इ. सर्व गोष्टींचे सारणीतील दर्शन म्हणजे लोकसंस्कृती होय. या संस्कृतीचे अनुसरते भोक्ते अभिजन आणि इतरजन अर्थात लोक मिळून एकात्म मानवी समूह असतो. या समग्र दर्शनाचे 'लोक' हा शब्द जोडून लोकधर्मसंस्कृती, लोककला, लोकक्रीडा, लोकचित्रे, लोकवैद्यक, लोकजातक असे लोकसांस्कृतिक घटक करता येतात. **लोकसंस्कृतीचे खास वैशिष्ट्य म्हणजे मौखिक परंपरानिष्ठा आणि रुढीमान्यता हे होय.** शास्त्रीय ज्ञानाचे वावडे असते असे नाही; तर शास्त्रीय ज्ञानाचे उपयोजन जीवनसारणीत होऊनच लोकपरंपरा अस्तित्वात येतात आणि नवनव्या अनुभवांच्या संवेदनांमधून शास्त्रीय ज्ञानाला सहज लोकजीवनातील तत्संबधीची प्राथमिक सामग्री पुरवितात, याचा अर्थ लोकपरंपरेतून नवानुभूतींसह परिवर्तन, परिवर्तनातून नवी सामग्री नव्या सामग्रीतून शास्त्रीयज्ञान विकास- शास्त्रीय ज्ञान विकासाचे लोकजीवनात उपयोजन, त्यातून पुन्हा परंपरा व रुढी असे लोकजीवनाचे ज्ञान आणि सारणीचे चक्र सुरू असते. मानवी जीवनाच्या अर्थात लोकजीवनाच्या आरंभबिंदूचा

विचार केला तर अगोदर लोकसंस्कृती अस्तित्वात येते त्यातून शास्त्रीय सांस्कृतिक वैशिष्ट्ये लोकधुरिणांच्या ज्ञानकर्म प्रक्रियेत स्वीकारली जातात. लोकज्ञानातून, अभिज्ञान प्रकट होत जाते. अशी ही प्रक्रिया जगाच्या सुरुवातीपासून सुरू झाली ती जगाच्या अंतापर्यंत सुरूच राहणार आहे. लोकसंस्कृती ही लोकबंधात्मकते, लोकधारणा भक्कमपणे राखत, सतत नवे नवे रूप लोकपरंपरेत परंपरागत करीत असते.

**३. लोकसंस्कृतीचे स्वरूप :–**

लोकसंस्कृती ही मानवी एकात्म समूहातील अर्थात लोकमधील जास्तीत जास्त घटकलोकांची कलात्मक आणि भावात्मक धर्मसारणी असते. जास्तीतजास्त घटकलोक म्हणजे बहुजन (बहुजन या शब्दाचा अलीकडे विवक्षित अर्थ घेतला जातो– ब्राह्मणेत्तर, मागासलेले, भारतीय शेड्यूलच्या बाबतीत वर्णव्यवस्थेच्या दृष्टीने ब्राह्मण, क्षत्रिय सोडून, अर्थात वैश्य शूद्र स्त्रिया इ.) अर्थात १०० घटकलोकातील ९५ ते ९९ टक्के लोक होत. लोकसंस्कृतीत भावनात्मकतेने, श्रद्धेने प्रसंगी अंधविश्वासाने आणि रुढीग्रस्ततेने पारंपरिकतेने झिरपत आलेले, स्थलकाल परिस्थिती सापेक्ष लोकबंध स्वाभाविकपणे अनुसरले जातात. उदा. जनावरांच्या बाजारात जनावरांच्या किंमतीचा, देवाणघेवाणीचा व्यवहार हातात हात घेऊन; त्यावर वस्त्र पांघरून; बोटांच्या सांकेतिक भाषेत केला जातो. आता, ही प्रथा प्रत्यक्ष बाजारात अनुसरली जाते, यामागील धर्मतत्त्वज्ञानात्मक लोकबंध किती उदात्त असतो पहा. सर्वभूतमात्र परमेश्वराची लेकरं आहेत किंवा परमेश्वराचे अंश आहेत किंवा परमेश्वराची रूपे आहेत. त्यांची व्यावहारिक किंमत करणे म्हणजे पाप होय. म्हणून ती किंमत गुप्त व सांकेतिक भाषेत सर्वात्मक परमेश्वर हा 'लोकबंध' (खरेतर 'तत्त्व'– धर्मतत्त्वज्ञान) स्मरून घडतो. हीच गोष्ट अन्न म्हणून पशूपक्षी यांची हिंसा करतांना त्यांना पाणी दाखवून इष्टदेवतेचे स्मरण करून; हिंसा करणे. लोकसंस्कृतीतील वर्तनपरंपरा, साधनपरंपरा आणि शाब्दपरंपरा या अशा पारंपरिक 'लोकबंध' घट्टपणे अनुसरतात. यात सौंदर्यभावना आत्मियता आणि स्थलकालपरिस्थिती सापेक्षता यांसह कल्पनाबंध (Motif) भावबंध (Feelingtype) समूहमनाच्या धारणात्मकतेने अनुसारित होतात. उदा. भाऊ आणि बहीण यांचे नाते व्यक्त करणारे धर्मविधी–भाऊबीज इ., वाढदिवस साजरे करण्याच्या पद्धती. इ. सर्वविद्या, संगीत चित्रशिल्प नाट्यादीकला यांचा समूहसारणीतील आकार



(type) हा स्थलकालपरिस्थिती सापेक्ष परंपरागत समूहमनातील कल्पनाबंध आणि भावबंध अर्थात भावनाबंध यासह सारणीत, जीवनपद्धतीत प्रकटतो. यातील जेवणे, उठणे, बसणे, झोपणे, जन्मप्रथा, विवाहप्रथा, मर्तिकप्रथा, न्यायव्यवस्था, जत्रायात्रा, सणोत्सव साजरे करणे, आरोग्यराखणे, मानवी संबंध, नातेगोते, पैपाहुणे आदींसह घरेदारे, कृषीजीवन, व्यापारउदीम, राज्यव्यवस्था या सर्व गोष्टींच्या बाबतीत, रुढीपरंपरा ह्या धर्मनीती तत्त्वज्ञानाचा समूहमनातील लोकबंधाचा आकार घेऊन; धाटणीत कार्यान्वीत असतात. देवधर्म आणि मानवी नातेसंबंध हा या धाटणीचा गाभा असतो. लोकसंस्कृतीत विविधसमूहात धाटणीतील संबंध राखण्याचे तपशीलात्मक लोकबंध (folk-type) स्थलकाल परिस्थिती सापेक्षतेने बदलतात. तपशील बदलले तरी कल्पनाबंध आणि भावबंध यांची मध्यवर्ती तात्त्विक समूहधारणा (एकात्मता) एकत्र असते. उदा. नवोढाचे स्वागत करण्याची परंपरा जगभरात विविध विधिविधानांनी संपन्न होते. त्यांत सौंदर्यभावना, धर्मभावना आणि पारंपरिक विधिनिषेध तात्त्विक लोकबंधात्मकतेने प्रकटतात. डॉ. दुर्गा भागवत, इरावती कर्वे यांनी या संबंधातील अनेक तपशील, प्रदेश, देश, जात, धर्म, पंथ परत्वे कसे बदलतात याची अनेक उदाहरणे दिली आहेत. काही वेळा लोकसंस्कृतीत एकच भावबंध परस्परविरोधी लोकसमूहात अनुसरलेले पाहावयास मिळतात. उदा. भारतीय परंपरेत वाढदिवस साजरे करताना दीपप्रज्वलनासह ओवाळण्याची प्रथा आहे. तर पाश्चात्यपद्धतीनुसार पेटविलेल्या मेणबत्त्या (दीप) विझविण्याची प्रथा आहे. अलीकडे जागतिक लोकसंस्कृतीच्या अनुसरणात या दोन्ही प्रथा एकाच प्रसंगात भारतात अनुसरतांना पाहावयास मिळतात. लोकसंस्कृतीत कोणत्याही शुभप्रसंगी या ना त्याप्रकारे नर्तन, वादन, गायन, चित्र, शिल्प, नाट्य, सादर करण्याची परंपरा दिसून येते. सामूहिक जत्रायात्रा असोत की कौटुंबिक धार्मिक विधिविधाने, व्रतवैकल्ये अथवा सामाजिक, राजकीय संस्थात्मक कार्ये असोत; या ना त्याप्रकारे त्यात सौंदर्यभावनेने आणि धर्मनीतीतत्त्वज्ञान अनुसारकतेने, अगदी पेहरावापासून हालचालींपर्यंत वर्तनपद्धती आणि कलात्मक मांडणी अथवा प्रयोग, यांसह शब्दपरंपरांचा अनुसार केलेला असतो. थोडक्यात सांगायचे झाले तर लोकधुरिणांनी वेळोवेळी प्रकट केलेली सांस्कृतिक तत्वे 'लोक'मध्ये परंपरागत होत अथवा रुढी स्वरूप धारण करून अनुसरली जातात.

**४. श्रीमद्‌भगवतगीतेनुसार संस्कृती-लोकसंस्कृती अभिसरण प्रक्रिया :-**

श्रीमद्‌भगवतगीतेत 'कर्मबंधन' विचार स्पष्ट केला आहे. जन्माला आलेल्या-'घटकलोक'ला समूहजीवनात कर्म अपरिहार्य आहे. म्हणजे 'लोक'च्या समूहसारणीत अर्थात लोकसारणीत कर्म करीतच रहावे लागते हे कर्म लोकसापेक्ष असते. 'गावासाठी गाढव खावे लागते' एवढे हे लोकजीवन सारणीबद्धतीतील कर्मबंधनात असते. विचार किंवा दृष्टिकोन काहीही असला तरी सांस्कृतिक परंपरांचे अवलंबन हेच प्राप्त कर्म असते. मुमुक्षुला सुद्धा कर्म अपरिहार्य आहे; असे सांगतांना भगवंत अर्जुनाला संबोधित करतात-

**''यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र लोकोऽयं कर्मबन्धनः ।**
**तदर्थं कर्म कौन्तेय मुक्तसङ्गः समाचर ।।३.९।।''**[५]

ही कर्मसारणी कोणत्या प्रकारे प्रकट होऊन; प्रक्रिया स्वरूपात परंपरागत होते हे सांगतांना भगवंतांनी अभिजन आणि सामान्यजन यांचा 'लोक' मधील अन्योन्य संबंध प्रक्रिया स्पष्ट केली आहे. भगवंत म्हणतात-

**''यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनाः । स यत्प्रमाणं कुरुते**
**लोकस्तदनुवर्तते ।।३.२१।।**[६]

अर्थात श्रेष्ठ पुरुष जे जे आचरण करतो (ते देवाने सांगितल्याप्रमाणे) त्याप्रमाणेच इतर जनही (लोक) आचरण करतात. त्याने सांगितलेले प्रमाण मानून (बाबा वाक्यम् प्रमाणम्) त्याप्रमाणे मनुष्य समुदाय वागू लागतो. त्याच्याच परंपरा निर्माण होतात. या परंपरांना आपण संस्कृती, अर्थात लोकपरंपरांना लोकसंस्कृती असे म्हणतो. श्रेष्ठ लोक आणि इतर लोक एकत्रितपणेच एकात्म मानवी समुदाय असतो. श्रेष्ठ जन अर्थात अभिजन जे तत्त्व अर्थात शास्त्र म्हणून (लोकहितैशित्वाने) जाणीवपूर्वक संशोधन, चिंतन करून सांगतात तेच अन्य जन स्थलकालपरिस्थिती सापेक्षतेने वर्तनात आणण्याचा आपल्या परीने, मात्र, स्वाभाविक प्रयत्न करतात. त्यांचे असे वर्तनात परंपरागत करणे; ही समूहजीवनाची प्रक्रिया असते. त्या तत्त्वाला असा 'लोकबंध'च झालेला असतो. 'शब्दाला जागावे' हा नैतिक लोकबंध होय. असे लोकबंध स्वरूप प्राप्त होते आणि ते लोकबंध लोकधारणा करतात. अर्थात एकात्म जीवनसारणी अस्तित्वात येते. याचाच अर्थ असा की अभिजन आणि लोक हे वेगळे स्तर किंवा वेगळे समुदाय नसून लोकधुरिण आणि लोक असा अन्योन्य संबंध असलेले एकाच एकात्म 'लोक' मधील ती अस्तित्वे होत. याचाच अर्थ आपल्याला सामान्यतः



परंपरागत लोकसारणीमध्ये धर्मनीती तत्त्वज्ञान, विद्या व कला यांचे सर्वांगे दर्शन घडते ते लोकसंस्कृतीचेच दर्शन असते. याच एकात्म अस्तित्व भावाचे स्पष्टीकरण भगवंतांनी पुढीलप्रमाणे केले आहे.

**यस्मात्क्षरमतीतोऽ हमक्षरादपि चोत्तमः ।**
**अतोऽस्मि लोके वेदे च प्रथितः पुरुषोत्तम ।।१८।।**[७]

नाशवान जडवर्ग-क्षेत्रापासून अलिप्त असलेला मी अविनाशी जीवात्म्यापेक्षाही उत्तम अर्थात 'तत्त्व' केवळ स्वरूप चैतन्य आहे. हेच चैतन्य वेदांत (अभिजन, श्रेष्ठ, ज्ञान, शास्त्र-ज्ञानवान, शास्त्रज्ञ) आणि 'लोकांत' सर्वसामान्यात पुरुषोत्तम अर्थात चैतन्य म्हणून प्रसिद्ध अर्थात प्रकट आहे. सर्वांत असून सर्वांच्या पलीकडे असलेले परमात्मतत्त्व लोकधुरिण आणि लोक यांत एकत्वानेच अर्थात एकात्मभावानेच असते; हे लक्षात घ्यावे लागते. म्हणूनच संस्कृतीचे वर्णन करतांना शास्त्रीय ज्ञानाची माहिती समोर आली; तरी लोकसंस्कृतीतच त्याचे प्रत्यक्ष अनुभवन घडते; हे लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीच्या अभ्यासकांनी लक्षात घेतले पाहिजे.

**५. लोकसंस्कृतीतील लोकदैवते :-**

लोकसंस्कृतीत लोकदैवतांना लोकधारणेच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्त्व आहे. लोकदैवतांमध्ये धर्मग्रंथ, इतिहासपुराणे यातील दैवतांच्या शक्तींचा लोकदैवतांच्या स्वरूपात, कौटुंबिक, ग्रामजीवन, घराणी, यांशी निगडित, विशेष जिव्हाळ्याचा, संबंध प्रस्थापित झालेला असतो. लोकजीवनाचा धारणात्मक लोकबंध, विशेष मालकी हक्क स्वरूपात परंपरेने प्रकटतो. उदा. बार्शीचा भगवंत-वस्तुतः हे धर्मग्रंथ, इतिहास पुराण यातील विष्णू या देवतेशी संबंधित, अवतार स्वरूपात अवतीर्ण दैवत आहे. मात्र या भगवंताच्या लोककथा-दंतकथा, आख्यायिका वरील स्वरूपात प्रकट झालेल्या आढळतात. त्या कथा त्या दैवताचे त्या एकात्म समुदायाशी नाते स्पष्ट करीत; पृथकपण अधोरेखित करतात. अशी अगणित उदाहरणे स्थान, परिसर, क्षेत्र, प्रदेश, कुटुंब आणि एकात्म समूह, या संदर्भात जगभर आढळतात.

लोकदैवतांचे कुलदैवत, स्थानदैवत, ग्रामदैवत, क्षेत्रिय दैवत असे भेद आढळतात. लोकदैवतांचे प्रतिमारूप अथवा आकार रूप पाहू जाता डोंगर, झाड, मोठा स्वयंभू दगड किंवा धोंडा, खांब, घडीव विरगळ, घडीव खांब, तांदळे अर्थात शेंदूर भोगलेले दगड, मूर्ती, रंगविलेल्या मूर्ती, पायरी, कोपरा

असे प्रकार दिसतात. जगभरात अशा लोकदैवत आकारांची भरमार असली तरी त्यातील प्रत्येक दैवतपरंपरेने विशिष्ट 'लोक' अथवा मानवी समूहासाठी धारणात्म लोकबंधासह वैशिष्ट्य राखून असते.

मानवी जीवनातील अर्थात लोकजीवनातील घटकलोक (व्यक्ती) अंगस्वरूप लोक (विशिष्ट एकात्म मानवी समूह), आणि वैश्विक लोक या तीनही पातळीवर अशा लोकदैवतांचा धारणात्मक लोकबंध वावरत असतो. उदा. एखाद्या भैरवनाथाचे हुईक, स्थानिक, क्षेत्रिय एवढेच काय वैश्विक स्थितीगतीवर, अर्थात पाऊसपाणी, राजकीय, सामाजिक, नैसर्गिक, आर्थिक घडामोडींवर भाष्य करतो. हे भाकित विधिलिखित असल्याप्रमाणे तो विशिष्ट लोक श्रद्धेने स्वीकारतो आणि लोकजीवनात व्यवहारात अनुभव घेण्याचा प्रयत्न करतो.

लोकदैवते व्यक्ती, कुटुंब, सामाजिक, राजकीय व्यवस्थेतील अधिकारपदे यांच्या समस्या स्वीकारून; त्यातून सापेक्षतेने मार्ग काढतात, अशी श्रद्धा असते. नवसाला पावणे, कोप होणे, कृपा होणे संकटनिवारण करणे; अशा गोष्टींचे, अर्थात प्रपंचातील अडीअडचणीसंबंधात आधार देणे, पाठीशी असणे असे अनुभव त्या त्या संबंधित एकात्म मानवी समुदायाला येतात, असे परंपरेने मानले जाते. लोकदेवतांचे परंपरागत अनुसारक, पुजारी आणि मानकरी असतात.

लोकदैवतांच्या उपासना पद्धतींच्या परंपरांचे अवलोकन केले तर संबंधित मानवीसमुदायाची समग्र सांस्कृतिक परंपरा सूचित होते; एवढे लोकदैवतांना लोकसंस्कृतीत केंद्रिय स्थान असते.

**६. लोकधर्म :–**

''धारणात धर्ममित्याहुः धर्मो धारयते प्रजाः । यत् स्यात् धारणसंयुक्तं स धर्म इति निश्चयः'' असा महाभारतात धर्म ह्या संकल्पनेचे सूत्ररूपाने स्पष्टीकरण दिले आहे. अर्थात व्यक्तीचे व समाजाचे धारण पोषण करतो म्हणून धर्माला धर्म म्हणतात. याशिवाय ''लोकयात्रार्थमेवेह धर्मस्य नियमः कृतः । उभयत्र सुखोदर्क इच चैव परत्रच ।'' अर्थात लोकांचे जीवन सुखी होऊन इह परलोकी सुख मिळावे हाच धर्माचा हेतू असल्याचे निश्चित होते. अशी सूत्रे उद्धृत करून प्रस्तुत लेखकाने 'लोकधर्म' या स्वतंत्र पुस्तकात विस्तृत चर्चा केली आहे.[८] पारलौकिक जीवनाशी संबंधविचार लक्षात घेऊन; ईहलोकीचा तत्त्वज्ञान, नीती, सामाजिक, राजकीय उद्योग व व्यापारउदीमविषयक, तसेच कौटुंबिक व



समग्र मानवजातविषयक आचारधर्माची विधिनिषेधात्मक चर्चा धर्माच्या क्षेत्रात केली जाते. प्रचलित सनातन हिंदू धर्म व त्या अनुषंगाने कालौघात निर्माण झालेले बौध, जैन, सिख आदि मते प्रदर्शित करणारे धर्म, त्याचबरोबर मुस्लिम आणि ख्रिश्चन असे धर्म विविध उपासनापंथ, विविध मतप्रमाणित पंथ, यांच्या तत्त्वज्ञानाचे व्यवहारतः उपयोजन; संबंधित एकात्म लोक मध्ये, पारंपरित होते. या पारंपरित धर्माचाराला लोकधर्म असे म्हणतात. 'लोकधर्म' प्रत्यक्ष आचरतांना मौखिक पारंपरिक, वर्तनपरंपरा, साधनपरंपरा आणि शाब्दपरंपरांना विशेष महत्त्व आलेले असते. या सारणीपरंपरा मूळ धर्मनीतीतत्त्वज्ञानाला अनुबंधित असल्या; तरी मूळ शास्त्रीय मांडणीचा थेट अनुसार असतोच असे नाही. त्यात स्थलकालपरिस्थिती सापेक्ष परिवर्तनशीलतेने लोकपरंपरा निर्माण झालेल्या असतात. एकप्रकारे मूळ धर्मनीतीतत्त्वज्ञान विस्मरणात गेलेले असते. रूढी स्वरूपातील वर्तनालाच विशेष महत्त्व आलेले असते. विधिनिषेधाला एकप्रकारे लोकजीवनाचे सुलभीकरण प्राप्त झालेले असते. धर्मानुसारच्या कर्मठपणालाही रूढीग्रस्ततेने काहीसे बोथट आणि बदललेले किंवा बदलते स्वरूप प्राप्त झालेले असते. लोकधर्माचे दृश्यरूप; कुलधर्म कुलाचार, उपासना पद्धतीपरंपरा या लोकदैवतांशी निगडित असतो. मर्तिकप्रथा, जन्मप्रथा, विवाहप्रथा, आणि लोकन्यायालय अर्थात जातपंचायत या प्रसंगीच्या रूढीपरंपरांमधून प्रकट झालेले असते. लोकधर्माकडून मूळ शास्त्रीय स्वरूपात मंडित धर्मग्रंथांकडे उलटा प्रवास करावा लागतो. मनुस्मृती, नारदस्मृती, याज्ञवल्यस्मृती ह्या धर्मशास्त्र म्हणून मिरवितात. वास्तविक हे स्मृतिग्रंथ त्या त्या स्थलकालपरिस्थिती सापेक्ष लोकधर्माची संकलनेच असतात. लोकधर्मपरंपरा, भाषेप्रमाणे गाव, पंचक्रोशी, प्रदेश, क्षेत्र, नगरे, जातीनुसारता तपशीलात्मकतेने बदललेल्या दिसतात. त्यामुळे लोकसमूहात्मकता पृथकत्वाने विचारात घेता येते. 'लोकधर्म' हा स्वतंत्र असा धर्म नसतो.

**७. लोकसंस्कृतीमध्ये पुरोहित कलावंतांचे स्थान :–**

औद्योगिक प्रगतीनंतर पुरोहित तथा भिक्षुक कलावंतांचे स्थान क्रमाक्रमाने अधोगतीस जाताना अनुभवास येते आहे. नागरी भागात त्यातही विशेषतः महानगरीय भागात, यांना भिक्षेकऱ्याचे स्थान प्राप्त झाले आहे. सामाजिक क्रांतीमुळे पुरोहितवृत्ती किंवा भिक्षुकवृत्ती लयाला जाते आहे. डॉ. रा. चिं. ढेरे यांनी या वर्गाला लोकसंस्कृतीचे उपासक असे म्हटले आहे.

पुरोहितांची वृत्ती ही अनादिकालापासून चालत आली आहे. याचे उल्लेख वेदवाङ्मयापासून पाहावयास मिळतात. वास्तविक पाहता पौराणिक देवदेवतांशी या पुरोहित किंवा भिक्षुकांचा संबंध दिसतो. अतिप्राचीन काली धर्मदंड घेऊन, धर्मशास्त्र म्हणून या पुरोहित वर्गाला अतिमहत्त्वाचे स्थान होते. ख्रिश्चन आणि मुस्लिम, बौद्ध आणि जैन अशा प्रकारच्या धर्मपंथांमध्ये हे स्थान आजही महत्त्वाचे असल्याचे दिसून येते.

धर्मतत्त्वज्ञानाचा सुविहीत विनियोग सर्वसुखाय, सर्वहिताय स्वरूपात करवून घेण्याचे कार्य, पुरोहित किंवा भिक्षुक वर्गाने स्वीकारलेले दिसते. गृहस्थाश्रमामध्ये अर्थात कुटुंब व समाजवत्सलतेने म्हणजे कुटुंब व समाज घटक म्हणून, जीवनव्यवहार करणाऱ्यांना, अध्यात्मसाधना, उपासना या मार्गाने दैवीशक्ती, प्रसन्न व्हाव्यात; त्यांना दैवी शक्तींचा मानसिक आधार मिळून; त्यांच्यातील धर्मतत्त्वज्ञानात्मक लोकबंधात्मकता समृद्ध व्हावी; त्या समृद्धतेने कुटुंब व सामाजिक जीवनाला सुखरुपता व स्थैर्य राहावे या दृष्टीने; श्रद्धा या उदात्त भावनेचे जीवनातील विनियोजन घडावे; यासाठी लोकनिष्ठ अध्यात्मवादी भूमिकेने हा पुरोहितांचा वर्ग निर्माण होत गेला. प्रत्यक्ष दैवीशक्ती आणि लोकजीवन यांतील धार्मिक अध्यात्मिक दुवा किंवा समन्वयकसाधक म्हणून पुरोहित किंवा भिक्षुकवर्गाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले.

कौटुंबिक व सामाजिक जीवनातील कुलधर्म, कुलाचार, विविध संस्कार किंवा प्रथा उदा- जन्मप्रथा, विवाहप्रथा, मर्तिकप्रथा, उद्योगव्यवहार शुभारंभ, भयमुक्तता, भविष्यकथन इ. गोष्टीमध्ये दैवी शक्ती आणि लोकजीवन यांत पवित्र मध्यस्थाची भूमिका हा वर्ग निभावतो अशी या वर्गाची परंपरा दिसते.

मध्यस्थ, दुवा, समन्वयक म्हणून कार्यरत, सेवारत असतांना त्या त्या दैवतांचे स्वभाववैशिष्ट्य, शक्तीमत्ता यांचा कुटुंबसंस्थेला व समाजसंस्थेला, विशिष्ट धर्म म्हणून अनुसार करणाऱ्यांना लाभ घडावा व कुटुंब व सामाजिक जीवनात धर्माधिष्ठित, नीतीमत्तेने, विशिष्ट स्थिर जीवनाचा आकार मिळावा, यासाठी देवतांना प्रिय असा परिवेश, प्रिय वाद्ये, प्रिय नर्तन, गायन परंपरा, प्रिय अशी विधिविधाने प्रिय अशी पवित्र साधने यांसह दैवतानुसार वैशिष्ट्यपूर्णतेने व व्रतस्थतेने, प्रसन्नतेने आणि यजमान म्हणून सेवारत असणाऱ्या कुटुंब व समाजवत्सलांना, रंजनप्रधानतेने, धार्मिक कार्य संपन्न करता यावे म्हणून; विधिनाट्यात्मकतेने, पुरोहित लोक धर्मविधिविधाने सादर करू लागल्याने,



त्यांना नाट्यकलात्मकतेने सामोरे जाणे भाग होते. संगीत आणि नाट्य यांचा लोकजीवनाशी सुसंगत असा प्रवास ते करू लागले. याच गोष्टीमुळे ते लोककलावंत म्हणून ओळखले जाऊ लागले.

अलिकडच्या भौतिक प्रगतीच्या काळात आणि साधनांसह गतिमान जीवनामध्ये धार्मिकता. विधिविधानात्मक धर्मपालन, श्रद्धा. संकुचित होतांना; केवळ कलात्मकतेला महत्त्व प्राप्त होऊन; रंजनप्रधानतेकडे या कलावंतांचा कल गेला आहे. दैवतांच्या उत्सवप्रियतेत वाढ होऊन रंजनप्रकार म्हणून आणि जाताजाता दैवतसेवा म्हणून; या कलावंतांचा उपयोग केला जात आहे. पावित्र्य आणि धार्मिक अपरिहार्यता नाहीशी होऊ लागल्याने; त्यापाठोपाठ आर्थिक विपन्नता निर्माण झाली. या कारणाने नवी पिढी, पिढीजात पुरोहित किंवा भिक्षुक परंपरेपासून तुटत चालली आहे.

भारतीयपरंपरेत ज्यांना ब्राह्मण म्हणून संबोधिले जाते ते प्रामुख्याने पुरोहित व भिक्षुक परंपरेतील होत. भारतात वैदिक काळात ऋषी म्हणून तपश्चर्येत मग्न असणाऱ्या ऋषींनीदेखील लोकनिष्ठ अध्यात्मवादी भूमिकेतून पौरोहित्य स्वीकारलेले आहे. उदा. वशिष्ठ ऋषींनी अर्थात ऋषीकुळाने ईश्वाकु वंशाचे पौरोहित्य स्वीकारले होते. तर अगस्त्य ऋषींनी पांड्य वंशाचे पौरोहित्य स्वीकारले होते. सर्व समाज कल्याणासाठी, अर्थात विश्वकल्याणासाठी लोकसहभागातून सहाय्य मिळवून विजन ठिकाणी यज्ञसंस्था संपन्न करण्याचे कार्य ऋषी करीत असत. राजव्यवस्था यजमान म्हणून आवश्यक होती तेव्हा उपस्थित राहात असे. यज्ञसंस्थेचे पौरोहित्य स्वतः ऋषी आणि होतापदी विराजमान ऋषी करीत असत.

भारतीय परंपरेत, देवदेवतांची अनेक अवतरणे पुरुषदैवते व शक्तीदैवते म्हणून झालेली आढळतात. या दैवतांचे पौरोहित्य करणाऱ्या संस्था अस्तित्वात आल्या. त्यांच्या उपरोक्त प्रकाराने कार्य करणाऱ्या परंपराही निर्माण झालेल्या दिसतात. उदा. मराठी संस्कृतीत गोंधळी, वाघ्ये, पोतराज, वासुदेव, पांगुळ, जोशी, जोगतीण, भोप्ये अशा अनेक संस्था अशा तऱ्हेने पौरोहित्याचे काम करताना दिसतात. मुस्लिम समाजात काझी, फकीर, मुल्ला, मौलवी तर ख्रिश्चन समाजात फादर मंडळी, बौद्धांमध्ये भिक्कु मंडळी अशी जागतिक परिप्रेक्ष्यात असंख्य उदाहरणे देता येतील.

'लोक' या अवस्थेत अभिजन हा घटक असतो. त्याबरोबरच असा

पुरोहितांचा वर्ग असतो. हे घटक लोकजीवनाचे धुरिणत्व करणारे असतात. लोकजीवनाचा प्रवाह अप्रतिहत चालण्यासाठी स्थलकाल परिस्थिती सापेक्षतेने परिवर्तनासह धर्मश्रद्धा जागवित, तत्त्वज्ञान आणि पारंपरिक नीतिमत्ता जागवित लोकजीवनात या पुरोहित-भिक्षुक कलावंतांचे कार्य सुरू असते.

लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीच्या अभ्यासक्षेत्रात लोककला विधिनाट्ये आणि लोककलावंत म्हणून पुरोहित वर्गाचा विशेष अभ्यास केला गेला. लोकनाट्य तमाशा ही पूर्णतः रंजनप्रधान लोककलादेखील 'आतमध्ये कीर्तन वरून तमाशा' म्हणूनच गणली जाते. एव्हढेच नव्हे तर शाक्तपरंपरेत व ग्रामदैवतपरंपरेत लोकनाट्य तमाशालादेखील विधिनाट्यासारखाच मान आहे.

पुरोहितांची विधिविधानांची मौखिक परंपरा, वही, बाड स्वरूपातही उपलब्ध असते. पारंपरिक मांडणी आणि विधी उपयुक्त वस्तूंबरोबरच पारंपरिक संगीतसाधनेही असतात. नर्तन, वादन, गायन कलेअंतर्गत उपलब्ध असते.

**८. लोकसंस्कृतीतील भगत, मांत्रिक, तांत्रिक, वैद्य व भाकित कथक (भविष्यवेत्ता) यांचे स्थान :-**

भगत म्हणजे विशिष्ट दैवताच्या वारी अंगात येणारा अर्थात संचार होणारा भक्त. हा स्त्री अथवा पुरुष असू शकतो. विशिष्ट साधनेमुळे त्याच्या अंगात हा संचार होतो. यातुक्रिया करण्याची परंपरा या भगत मंडळींनी अवलंबिलेली असते. गंडेदोरे (रक्षाकवच धागा), उतारे, विशिष्ट वस्तू, उदा. अंडी, लिंबे, भात इ. लागीर किंवा बाधा झालेल्या, व्यक्तिस्थळ, वास्तूंवरून ओवाळून; विशिष्ट ठिकाणी उतारा टाकणे, उदा. तीढ्यावर अर्थात तीन रस्ते एकत्र आलेले ठिकाण, अशुभ तिथी, अशुभ वेळ पाहून असे उतारे टाकले जातात. उदा. अमावस्या, कर, ग्रहण इ. भगत संचार झाल्यावर देवस्वरूप असतो. या देवता पुरुष वा स्त्री देवता, भूते, खवीस, मुंजा, समंध, पूर्वज या प्रकारचीही असतात. लागीर झालेल्या व्यक्तीच्या अंगात लागीराचा संचार होतो. तो नष्ट करण्यासाठीही, भगत विधिविधाने करतो. तोडगे उतारे सांगतो. लोकसंस्कृतीतील संकटे, भयग्रस्तता, प्रपंचातील अडीअडचणी, अपेक्षा संबंधीचे प्रश्न लोक भगताकडे घेऊन जातात. भगत भाकिते सांगण्याचेही कार्य करतो. जत्रा, यात्रा, उत्सव व ठराविक तिथी, वार या दिवशी किंवा गरजेनुसार भगत अंगात वारे घेतो. भगतापुढे गाऱ्हाणे मांडण्यासाठी मध्यस्थ असतो. त्यास गाडीवान म्हणतात. ही परंपरा गाव, वस्ती, तांडे, स्थाने, दैवते अशा सर्व ठिकाणी असते. सर्व धर्मांमध्ये साधारणतः थोड्याफार फरकाने ही परंपरा लोकसंस्कृतीत आढळते.

मांत्रिक किंवा तांत्रिक हे व्रतस्थ साधक असतात. विशिष्ट साधना करून; या मंडळींनी मंत्रतंत्र सिद्ध केलेले असतात. विशिष्ट प्रकारचे होमहवन ही मंडळी करतात. भगत आणि मांत्रिक, तांत्रिक यांचा एकत्रित व्यक्तिमत्त्व असलेलेही लोक दिसतात. दैवत विशेषतः शाक्त, शैव अशी तंत्र असतात. थोड्याफार फरकाने सर्वच मार्गांमध्ये असे लोक असतात. प्राचीन लिखित संहितांतील स्थलकाल परिस्थिती सापेक्ष भाषा व सामग्री यांच्या सहाय्याने या मंत्रतंत्रांची मांडणी असते. वैदिक परंपरेतून ही विद्या पाझरत वळण घेत आलेली असते. मंत्र, तंत्र, यंत्र सिद्ध करून इच्छुकांसाठी अथवा आपद्ग्रस्तांसाठी देण्याची प्रथा आहे. याशिवाय रत्ने, कवड्या, वनस्पती अशा काही गोष्टीही मंत्रयुक्त भारावून देण्याची प्रथा दिसते. लोकसंस्कृतीत या मांत्रिक तांत्रिकांना साधू, योगी, सिद्ध, महाराज असा दर्जा असतो. उदा. नाथसंप्रदायातील नाथ मंडळी शाबरी विद्येचा वापर यासाठी करतात.

काळी जादू किंवा 'अघोरी विद्या' म्हणून एक विद्यामार्ग असतो. त्यातील लोक जारण-मारण विद्या अवगत करून; काही यातुक्रिया करतात. यांवरही लोकमानसाची श्रद्धा असते. यासंदर्भात विशिष्ट अनुभव मौखिक परंपरेने सांगितले जातात.

भगत, मांत्रिक यांच्याकडेच 'लोकवैद्य' ही भूमिका सांभाळण्याचे उत्तरदायित्व असते. अशी मंडळी औषधे देतात. भविष्य सांगतात आणि मंत्रतंत्र, जादुटोणे करतात. काही ठिकाणी व्रतस्थ भिक्षुक वर्ग यात ब्राह्मण म्हणविणाऱ्या वर्गाचा समावेश होतो. वंशपरंपरेने यांनी आयुर्वेदाचा अभ्यास व मंत्रतंत्रासह संहितेनुसार अभ्यास केलेला असतो. त्याचबरोबर ज्योतिर्विज्ञान अवगत केलेले असते. त्यांच्या परंपरा वेदकालीन ऋषीपरंपरेशी जोडल्याचे सांगितले जाते. लोकपरंपरेत या व्यक्तींना कुळधर्म कुळाचार व भविष्य यादृष्टीने महत्त्वाचे स्थान असते.

अनेक ठिकाणी भगत तांत्रिक, मांत्रिक, वैद्य आणि ज्योतिषी ही सर्वच कार्ये एकच व्यक्ती करतानाही आढळते.

गावगन्ना लोकदैवतांच्या संदर्भातील अशा मंडळींची वंशपरंपराही आढळते. संपूर्ण समूहमनाशी त्यांचा श्रद्धापूर्ण लोकबंध अतिशय घट्ट असतो.

ब्रह्मवाक्य म्हणून त्याकडे पाहिले जाते.

या मंडळीत अनेक भोंदू फसवे लोक देव्हारे माजवून, लोकसंस्कृतीतील समाजकंटकांचे हस्तक म्हणूनही कार्य करतांना दिसतात.

पुरोहित किंवा भिक्षुक परंपरेतील अनेक लोक भगत, मांत्रिक, तांत्रिक या स्वरूपाची वृत्ती स्वीकारून कार्य करतांना दिसतात.

धर्मजागरण, दैवतजागरण, अशुभनिवारण, कुळधर्म, कुळाचार, जत्रायात्रा, सणोत्सव, शुभाशुभसंकेत या दृष्टीने ही सर्व मंडळी लोकसंस्कृतीत प्रतिष्ठित स्थानी असतात. गावपंचायतीतही यांचे मत काही ठिकाणी महत्त्वाचे मानले जाते. राजव्यवस्थेपेक्षा किंवा राजदंडापेक्षा यांचा धर्मदंड अधिक महत्त्वाचा व विश्वासार्ह मानला जातो.

**९. स्थानिक पूर्वजदैवते, वीर, सिद्ध, साधू, गुरू, सद्‌गुरू, योगी, बुवा, महाराज यांचे लोकसंस्कृतीतील स्थान :–**

पूर्वजदैवते, वीर, सिद्ध, साधू, योगी, गुरू, सद्‌गुरू, बुवा महाराज यांचे मृत्यूपूर्व व मृत्योत्तर असे स्थान लोकसंस्कृतीत निर्माण झालेले दिसते. मृत्यूपूर्व आदर, पूज्यभाव, अनुसरणभाव, भक्तिभाव; व्यक्ती, कुटुंब, ज्ञाती, वंश, समाज यांचा पाठीराखे, मार्गदर्शक, रक्षणकर्ते व पोषणकर्ते असे लोकबंध या संस्थांविषयी असतात. मृत्योत्तर हे लोकबंध अधिकाधिक विस्तारत जाऊन; या विभूतिमत्त्वांची लोकदैवते होतात. त्यातील काही वंशदैवते, ज्ञातीदैवते, समूहदैवते होतात. तर काहींना ग्रामदैवतांचे स्वरूप प्राप्त होते. या ग्रामदैवतांचाच कालांतराने क्षेत्रिय आणि वैश्विक दैवतांपर्यंत विस्तार होत जातो. यांना लोकजीवनात प्रभू, परमात्मा, मूलदैवते, तत्त्वे म्हणून अनुभव घेण्याची परंपरा सुरू होते व ती कालौघात वाढतच जाते.

काही संप्रदाय, पंथ, धर्मप्रवाह अथवा उपसंप्रदाय यांच्यातूनही अशी दैवते निर्माण झालेली दिसतात. लोकसंस्कृतीतील दैवतनिर्मिती मानवी प्रवृत्तीतून घडलेली असते. या दैवतांच्या निस्सीम, अनन्यभक्तांना व्यावहारिक, राजकीय, सामाजिक, नीतीव्यवहार व न्याय या संबंधातही अंतिम संकटमोचक शक्ती म्हणून हीच दैवते अनुभूत होतात. महाराष्ट्रात आणि बृहन्महाराष्ट्रात, गजानन महाराज, अक्कलकोट महाराज, शंकर महाराज, गोंदवलेकर महाराज आदि महाराजांना असे स्वरूप प्राप्त झालेले आहे. यांच्या उपासनापोथ्या, अनुष्ठानेही घडतांना दिसतात. शिर्डीचे साईबाबा हे तर आता विश्वात्मक लोकदैवत झाले



आहे. सूफी औलियांचे दर्गेही या प्रकारे पुढे आलेले दिसतात.

पूर्वज दैवते आणि वीर दैवते हे मात्र, ग्राम, जमिनींचे बांध, क्षेत्र यापुरते मर्यादित असतात. तरीसुद्धा कुटुंब, वंश, ज्ञाती आणि ग्राम यांनाही दैवते, अंतिम निर्णायक दैवी शक्ती असल्याची अनुभूती असल्याचे अनुभव दैवतकथांतून, लोकजीवनात परंपरेने सांगितले जातात.

वीर व पूर्वज दैवतांचा जत्रा (जेथे पशूपक्षी बळी असतात) भरविल्या जातात; तशा काही ठिकाणी यात्राही भरविल्या जातात, यांना कुळधर्माचे रूप आलेले दिसते. सिद्ध, साधू, योगी, औलिया यांच्या मात्र उत्सव यात्रा साजऱ्या होताना दिसतात. या दैवतांच्या जयंत्या, पुण्यतिथ्या साजरे करणे. विशिष्ट पवित्र तिथींना दैवत दर्शन अतिमहत्त्वाचे मानले जाते. असे असले तरी, कुळदैवतांतात या दैवतांची गणना होत नाही. काही ठिकाणी कुळदैवतांपेक्षाही सद्‌गुरू म्हणून या दैवतांना सर्वोच्च स्थान दिलेले दिसते. गुरुपौर्णिमा या उत्सवप्रसंगी या दैवतांना सर्वाधिक महत्त्व प्राप्त झालेले दिसते.

**१०. धर्म, पंथ, संप्रदायांचे–संस्थापक आणि सांप्रदायिक मार्गदर्शक, प्रचारक भक्त, तत्त्वज्ञ, संत यांचे एकूण लोकसंस्कृतीतील स्थान :–**

धर्म, पंथ, संप्रदाय यांच्या संस्थापकांना सर्वात्मक मूळ दैवतांचा दर्जा, त्या त्या धर्म, पंथ, संप्रदाय मार्ग यांच्या अनुयायांनी दिलेला असतो. ती परंपरा लोकसंस्कृतीमध्ये दृढमूल झालेली दिसते. विशेषतः ख्रिश्चन आणि मुस्लिम धर्मांत ही परंपरा लक्षणीयरित्या आढळते. विशिष्ट प्राचीनतम पौराणिक दैवतांचे पंथ निर्माण झालेले दिसतात. भारतीय लोकसंस्कृतीमध्ये शाक्त, शैव, भागवत, गाणपत्य, नाथ, महानुभाव, रामदासी, दत्त असे अनेक संप्रदाय व त्यांच्या उपशाखा निर्माण झालेल्या दिसतात. पंथीय अभिनिवेशांचा काही वेळा संघर्ष जाणवला तरी एकात्म लोकसंस्कृतीत त्यांचा अडसर येत नाही. धर्म, पंथ, संप्रदायांच्या संस्थापकांची मठमंदिरे बांधली जातात. त्या त्या संप्रदाय किंवा मार्गातील गुरुपरंपरा आढळते. या पुरुपरंपरेतील अनन्य भक्त आणि प्रचार, प्रसार आणि परंपरा पुढे नेण्यासाठी दिव्यकार्य करणारांना आचार्य, महंत, महात्मे, संत, सद्‌गुरू, जगद्‌गुरू, प्रभू अशा उपाधींनी गौरविले जाते. उदा. महाराष्ट्रात भागवत किंवा वारकरी संप्रदायात श्री संत ज्ञानेश्वर ते तुकाराम या मालिकेतील किंवा प्रभावळीतील सर्व दिव्य, निस्सीम आणि अनन्य भक्तांना संत म्हणण्याची परंपरा आहे. तर महानुभावांत महात्मे, महंत असे म्हणण्याची

प्रथा आहे. संप्रदायातील धुरिण विभूतिमत्त्वे स्वतःचा 'दास' म्हणून संबोधित असले तरी परंपरेतील अनुयायी त्यांना महाराज, संत, महंत आदि नावाने किंवा उपाधीने संबोधतात. महाराष्ट्र संस्कृतीमध्ये गेल्या शे-दीडशे वर्षामध्ये सर्वच पंथोपपंथातील विभूतिमत्त्वांना संत म्हणण्याची परंपरा निर्माण झाली आहे.

पंथोपपंथातील प्रचारक, प्रसारक, प्रवक्ते, प्रवचनकार, कीर्तनकार आदि विभूतींना 'महाराज' म्हणण्याची परंपरा रुजली आहे. ही सर्व मंडळी धर्माधिकारी पदाला पोहचली असून; त्यांना समाजप्रबोधक म्हणूनही संबोधले जात आहे.

कीर्तनपरंपरा पंथोपपंथानुसार भिन्नभिन्न ढाच्याची असली; तरी 'कीर्तन' या विधिनाट्याला, कलारूप म्हणून मान्यता आहे.

त्या त्या पंथोपपंथातील अनुयायांविषयी; वृत्ती, प्रवृत्ती, वर्तन यांविषयीचे विविध लोकबंध लोकसंस्कृतीत आढळतात. उदा. माळकरी हा सहिष्णू हरीभक्तीपरायण असतो.

**११. कला :-**

सौंदर्यभावना आणि सौंदर्यदृष्टी हा जीवाचा स्थायीभाव आहे. जीवाला प्रत्येक गोष्ट सुलभ, स्वच्छ, आकर्षक आणि आनंददायक हवीशी वाटते. मानवप्राणी निसर्गप्राप्त गोष्टी आपल्याला हव्या तशा उपरोक्त भावाने बदलून घेतो. त्यांची हवी तशी व्यवस्था लावतो. हवेतशे आकार देतो. एव्हढेच नव्हे तर या स्वअर्जित बदललेल्या रूपाला धर्मनीती तत्त्वज्ञानाशी जोडतो. मानवाचा हा कल प्रदर्शित करते ती कला. या सर्व गोष्टी घडत असतांना या व्यवहाराला समूह एकात्म मन सापेक्षता असते. समूहमनातील नित्यनाविन्याची ओढ ही या माणसाच्या सौंदर्यभावना आणि सौंदर्यदृष्टीची द्योतक असते. त्यामुळेच कलानिर्मिती ही समूहमनाची निर्मिती ठरते. सर्वांना हवेसे ते सर्वांतील एखाद्याला स्फुरते आणि सर्वांचे मन ते मनोमनी स्वीकारून, त्यात भर घालून, त्याला अधिक नेटके करण्याचा प्रयत्न करीत पुनः प्रकटविते. ही कलानिर्मितीची प्रक्रिया म्हणजे मानवीमनाचा स्वाभाविक व्यवहार होय. या कलात्मक संवेदनेसह माणूस आपल्या दैनंदिन जीवनातील भूमिका सादर करीत असतो. प्रस्तुत लेखकाने 'लोकसाहित्य : जीवनकला' या ग्रंथात लोकसाहित्य अर्थात लोकजीवनाची पारंपरिक शैली किंवा धाटणी ही जीवनकला आहे असे म्हटले आहे.[९] म्हणजे कला ही मानवी जीवनाला व्यापून असते. हाच तर मानवी जीवनाचा दिव्यात्मक, सौंदर्याविष्कार आहे. त्याच्या जीवनाची आनंदमयता



अशी कलात्मकतेने सादपडसाद स्वरूपात प्रकटते. डॉ. गंगाधर मोरजे यांनी तर समग्र लोकसाहित्य ही 'प्रयोगसिद्ध वाङ्मयकला' आहे असा लोकसाहित्य स्वरूप सिद्धान्त मांडला आहे.[१०] प्रस्तुत लेखकाने 'लोककला' या स्वतंत्र पुस्तकात यासंबंधी विस्तृत चर्चा केली आहे.[११] 'लोककला' हे लोकसंस्कृतीचे दृश्य स्वरूप असते. लोककलेचे जीवनव्यापी आविष्कार- (अ) मानवाने लोकजीवनात दिव्यानुभूतींना देवत्वाचे रूप देऊन दैवते आणि दैवतकथा, दैवतकथागीते, दैवत उपासना गीते, दैवत पूजा पद्धती, पूजासाधने, उपासना आचार धर्म; यांची रूपे कल्पिली. ही सर्व रूपे स्थलकालसापेक्ष एकात्म मानवी समूहात, अर्थात 'अंगस्वरूप लोक' मध्ये आपले वेगळेपण राखित समूहभावनेने मौखिक परंपरागत झालेली असतात. दैवतांची नित्य पूजा करतांना, रंग, रेखा, ताल, स्वर, लय, नर्तन आणि हालचाली पारंपरिक विधिनाट्यात्मकतेने प्रकटतात असे आपण अनुभवतो. लोकमानसाच्या दिव्यानुभूतींची ही कलात्म जाणीव असते. (ब) लोकसंगीत : शेताभातातील आणि विविध प्रसंगीची श्रमगीते त्या कामांची लय घेऊन ओठावर येतात. पारंपरिक गीतात समूहमनातून आपसूक भर पडत जाते. ही गाणी आणि लय श्रम आणि भावना यांचे उमाळे असतात. पुरोहित किंवा लोकसंस्कृतीच्या उपासकांची गाणी आणि त्यांना साथ देणारी पारंपरिक वाद्ये विधिनाट्यामधील पारंपरिक व्रतस्थता, शरण्यमंगलता आणि रंजनासह क्रीडानंद प्रकट करतात. वाघ्यामुरळीची गाणी, गोंधळी गीते, धनगरांची सूंबरान गीते, पोतराजाची संवादगीते, नंदीबैलवाल्यांची गुबूगुबु ढोल गीते आणि संवाद, पांगुळगाणी, लोकनाट्यातील नर्तन, वादन, गायन आणि यांत वापरली जाणारी पारंपरिक साधने, कीर्तनकारांची गायने आणि साथ साधने ही आणि अशी लोकसंगीताची अनेक उदाहरणे देता येतील. डॉ. सरोजिनी बाबर, डॉ. दुर्गा भागवत, डॉ. प्रभाकर मांडे आदि सर्वच लोकसाहित्यविशारदांनी लोकसंगीताची उदाहरणे दिली आहेत. लोकसंगीतात श्रमगीतांप्रमाणे खेळगीतांचा अंतर्भाव होतो. जगभरात असा एकही मानवी समूह नाही; की त्यात खेळगीते प्रकट होत नाहीत. महाराष्ट्रात पंचमी, मंगळागौर, गणगौर, लेझीम, टीपरी, फुगडी, पिंगा, अशा अनेक सणोत्सवांनिमित्त खेळगीते प्रकटतात. दिंड्या, मिरवणुका, फेऱ्याच्या निमित्ताने, खेळसंगीत विशिष्ट वाद्यांसह प्रकट होताना दिसते. जन्मप्रथा, विवाहप्रथा आणि मर्तिक प्रथा याप्रसंगीदेखील विशिष्ट वादन, लोकगायन, नर्तन यांसह पारंपरिक संगीत

प्रकटते. लोकवाद्ये म्हणून ज्यांचा उल्लेख होतो त्यात माठ, खंजिरी, डफ, तंतुवाद्य, पानाच्या पिपाण्या, शिंग, पावा किंवा वेणू, थाळी, डबा, फुलपात्र ही लोकवाद्ये प्राचीनतम म्हणता येतील. त्यांतच बदल होत वाद्ये विकसित होत गेली असावीत. शेंगांच्या चिपळ्या, सागरगोट्यांचे खुळखुळे, असेही काही प्राचीन अवशेष सांगता येतील. लोकवाद्ये ही पक्ष्यांचे शब्द, शीळ, विजांचा कडकडाट, प्रवाहांचे आवाज आणि माणसाची वाणी यांतून अनुकरणातून प्रकटली असावीत असे म्हणता येते. मात्र वाद्ये धर्मश्रद्धांसह विकसित आणि व्यवस्थापित झालेली दिसतात एवढे मात्र खरे. निसर्गाच्या सान्निध्यातील श्रमजीवन, अन्नशोधन आणि निसर्गसौंदर्य आस्वाद, यांच्या अनुभूतीतून संगीत निर्माण झाले असावे असे मानता येते. वायूविभ्रम आणि आपविभ्रम यांचे पृथ्वीवरील आणि आकाशात उमटलेल्या पडसादांचा मोठा परिणाम संगीतावर असल्याचे जाणवते. निसर्गाची लय आणि स्वर घेऊन निसर्गाच्या गतीचा न्यास नर्तनाला लाभला आहे असे जाणवते. औद्योगिक प्रगतीबरोबर वाहनांचे आवाज व गती ही संगीतकलेस विविध आकार देणारी ठरली आहेत. संगीत कलेमध्ये स्त्रीपुरुषसंग आणि सामूहिक जीवातील हालचाली आणि निसर्ग-मानव, मानव-मानव, पशू-मानव, पक्षी-मानव या संबंधाचा प्रभाव जाणतो. रंग, रुप, नाद, लय, स्पर्श या गोष्टींमधून मानवाने समूहसापेक्षतेने अर्जित केल्या आणि लोकजीवनाला लोकसंगीताचे रूप प्राप्त झाले, असे लाक्षणिकतेने म्हणता येईल. (क) चित्रकला : चित्र ही मानवाची प्रथम लिखित वाणी आहे. गुहेतील शिकारचित्रे, संभोगचित्रे, पशूपक्षी यांची चित्रे पाहिली की याची खात्री पटते. लोकजीवन सजविण्यासाठी चित्रकला प्रकटलेली दिसते. निसर्गविभ्रमांची रेखात्मक पुनर्मांडणी असे चित्रकलेचे स्वरूप दिसते. कोनाडेकपाटे, प्रवेशद्वारे, मंडप कपडेलत्ते यावरील पशू, पक्षी, वृक्ष गेली शंखशिंपले, तारेनक्षत्रे, तेजोगोल, चक्रे, फुलेफळे यांच्या सुविहित मांडणी, निसर्गातील खनिजांच्या, वनस्पतींच्या प्राप्त रंगांतून सजविलेले पाहायला मिळते. स्थलकाल परिस्थितीसापेक्ष बदलांसह ही चित्रे धर्मभावना, व्यवहारभावना, इतिहास, निसर्ग यांना प्रकट करीत; लोकमानसातील सौंदर्यभावना जागविताना दिसतात. दिव्यत्वाला प्रसन्न करण्यासाठी संगीताचे उपयोजन होते तसे चित्रकलेचेही उपयोजन होते. रंग रेखांची रचना आणि व्यवस्थापन मानवी प्रतिभेने अनुकरणात्मकतेने केलेले दिसते. सणोत्सव, शुभकार्य, अशुभ दर्शन,



या सर्व प्रसंगीची चित्रे लोकजीवनात परंपरेने आलेली दिसतात. (ड) लोकजीवनातील वस्त्रे अलंकार यांच्या परंपरा पाहिल्या की वल्कलांपासून आणि पानाफुलांपासून पेहराव, शृंगार करायला सरसावलेले 'लोक' पाहतापाहता त्यांच्या श्रेष्ठपरंपरा निर्माणकर्ते झाले. वस्त्र विणण्याची कला, त्यावर चित्रे छापण्याची कला, शृंगारासाठी शंखशिंपले, काष्ठतुकडे, हाडेकाडे, वापरता वापरता धातूंचे अलंकार वापरू लागला. देश, काल, परिस्थितीसापेक्ष समूहभावना वस्त्रालंकारातून प्रकटू लागल्या. शृंगाराच्या वर्ग, स्तर, स्त्री-पुरुष, वयोगट या नुसारच्या परंपरा निर्माण झाल्या. लोकसंस्कृतीचे दर्शन त्यातून घडू लागले. (इ) गोंदण, गंधन, परंपरा-गोंदण आणि गंधनाची लोकपरंपरा अक्षरशः थक्क करून टाकणारी आहे. गोंदण गंधनपरंपरेतून लोकसमूह, प्रदेश, वंश, जात, धर्म, स्वभावांचे दर्शन घडविण्याचे सामर्थ्य आहे. गोंदण गंधनाची कला मानवी जीवनाच्या अहेवपणाचे अर्थात जीवनासक्तीने जगण्याचे निदर्शन करते. चौसष्ट कलापरंपरांमध्ये गोंदण कलेला स्थान आहे. गोंदणगंधन कला सणोत्सवप्रसंगी, संस्कारप्रसंगी मेहंदी चित्रांत प्रकटते. रांगोळीचित्रे गाणी मेहंदी चित्रात साम्य दिसते. (ई) पाककला ही भारतीय परंपरेप्रमाणे चौसष्ट कलातील कला आहे. स्थलकालपरिस्थितीप्रमाणे पाककृती भिन्नभिन्न आढळल्या तरी त्या त्या कुटुंब, जाती, समाज, प्रदेश, समुदाय, संप्रदाय यांचे निरीक्षण केले. पदार्थांचे विशेषतः व त्यांचा धर्मनीतीतत्त्वज्ञान, दैवते, ऋतु आणि आरोग्य यांशी थेट संबंध असतो. कुलधर्मकुलाचारानुसार पाककृती तयार केल्या जातात. पाककृतींची पात्रातील मांडणी किंवा रचना हीदेखील एक पारंपरिक कलासारणी आहे. पात्रात उजव्या बाजूला, डाव्या बाजूला, वरच्या बाजूला कोणते पदार्थ वाढावेत हे मौखिक परंपरेने नियमित केलेले दिसते. त्याचा संबंध पात्र आकर्षक करणे एवढाच मर्यादित नसतो; तर केवळ किंवा घास तयार करतांना विशिष्ट मिश्रण सहज आणि नेमके व्हावे अशी योजना असते. पाककृती कलासाधना ही पूर्णतः मौखिक परंपरेनेच पुढे आलेली दिसते. पाककृतीच्या पुस्तकांत दिलेल्या पाककृती त्या परंपरांचे संकलन असते. नवनव्या पाककृती पारंपरिक होण्यासाठी समूहमान्यतांचे परिमाण उपयोगी पडते. पाककलेमध्ये कालौद्यात व व्यापारउदीम यांच्या निमित्ताने प्रादेशिक व समूहमनांचे अभिसरण झालेले दिसते. त्यावरूनच पाककलापरंपरांना विशिष्ट प्रदेशांची, स्थलांची नावे पडलेली असतात. कोकणी, दाक्षिणात्य, पंजाबी, भोजपुरी, बनारसी, कोल्हापुरी इ.

पाककलेमध्ये पाकनिर्मितीसाठी प्रतिभेची आणि कौशल्याची आवश्यकता असते हे विशिष्ट सुग्रणपणावरून सिद्ध होते. खानदेशी मांडे प्रसिद्ध असले तरी ते, विशिष्ट कलावंतांचे वेगळे खास किंवा सर्वगुणसंपन्न वैशिष्ट्यपूर्ण वाटतात. एखादा पदार्थ अमक्यानेच करावा अशी प्रसिद्धी यातूनच होते. परंपरेनुसार पदार्थ असले तरी त्याची विशेष चव किंवा रसपूर्णता विशेष हातांच्या निर्मितीमुळे होते. पाककलेत प्रतिभेबरोबरच श्रद्धा, प्रेमभाव, वात्सल्य, आपलेपणा, सन्मान या भावनांना विशेषस्थान असलेले दिसून आले आहे. (प) केशरचना, कला– केशरचना ही पारंपरिक लोककलादेखील स्थलकालपरिस्थिती, सौंदर्यदृष्टी, यांनी निगडित असते; तशीच ती प्रतिष्ठा, आवड, धर्मनीतीतत्त्वज्ञान आणि लोकसारणी यांशी अनुबंधित असते. त्याचबरोबर वयोगटाशीही या कलेचा अनुबंध आढळतो. स्त्री, पुरुष व त्यातील विशिष्ट अवस्था, लोकधुरिण, कवी, नर्तक, योगी, संन्यासी यांनुसार केशरचना कशी असावी यांविषयीचे लोकबंध आढळतात. विशेषतः जगभरात स्त्रियांच्या केशरचनेच्या अनेक परंपरा आढळतात. केवळ वेण्यांचे, आंबाड्यांचे, टोपांचे, विविध प्रकार आढळतात. केशरचनेत नागहालचालींचा लोकबंध आढळतो. केशरचनेत पुष्परचनेला विशिष्ट स्थान असते. कोणत्या प्रकारच्या केशरचनांना कोणत्या प्रकारे पुष्परचना करावी; याच्या परंपरा असतात. केशरचना आणि पुष्परचनेवरून लोकसमूहातील घटकलोकचे स्थानही निश्चित ओळखता येते. पुरुषांच्या केशरचनेत डोक्यावरील केशरचनेबरोबरच दाढी आणि मिशांच्या पारंपरिक रचना आढळतात. मिशांचा आकार, आकडे, झुपके यांच्या रचनांवरून व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये प्रदर्शित करण्याची परंपरा दिसते. (फ) भांडी तयार करण्याची कला– भांडी तयार करण्याची कला प्राचीन परंपराधिष्ठित आहे. अष्मयुग, लोहयुग, ताम्रयुग, यांतील परंपरांवरून याची कल्पना येते. तांबेपितळीची भांडी तयार करणारांचा एक स्वतंत्र वर्ग किंवा जात जगभरात आढळते. महाराष्ट्रात यांना तांबटकर असे म्हणतात. संसारप्रपंच व व्यवहारातील खाणेपिणे, साठवण करणे यांसाठी विशिष्ट आकाराची भांडी तयार करण्याची परंपरा दिसते. त्या आकारांना घाट असे म्हणतात. घाट हे स्थलकालपरिस्थिती सौंदर्यदृष्टी यानुसार, लोकसमूहात पारंपरिक झालेले असतात. महाराष्ट्रात कोल्हापुरी घाट, नाशिक घाट अशी भांडी आढळतात. कुंभकार मातीची तर तांबटकर तांब्यापितळीची भांडी बनवतात. स्वयंपाकाची, देवपूजेची, दागिन्यांची, साठवणींची, पाणी वाहण्याची,



स्नानादी कर्मे करण्याची भांडी परंपरेने भिन्न आकाराची व घाटाची असतात. (भ) शिवणकाम, विणकाम, भरतकाम– कपडे तयार करणे हे विद्या व कला या सदरात मोडणारी परंपरा आहे. पेहराव, अंथरुणे पांघरणे, पडदे, जाजमे, मंडप यांसाठीचे कापड अर्थात चांदवे याप्रकारचे कापडकाम याविषयी ही कौशल्याधिष्ठित कला आहे. त्यांत कलाकुसरीला विशेष महत्त्व आहे. कापूस, रेशीम, ताग इ. यांच्यापासून धागे तयार करून विणकाम व शिवणकाम करण्याची प्रथा आहे, तसेच चामड्यापासून वहाण, परवेश व कपडे तयार केले जातात. शिवणकाम करणारे आणि विणकाम करणारे भिन्नभिन्न वर्ग लोकसमूहात परंपरेने आहेत. भरतकाम करणाऱ्या कलावंतांचा स्वतंत्र वर्ग दिसत नसला तरी विणकाम आणि शिवणकाम करणाऱ्या वर्गाशी संलग्न अशी ही कला सामान्यतः स्त्रीवर्गामध्ये अधिक दिसते. विणकामामध्ये जाळे किंवा वाघुर विणण्याची कला कोळी व वन्य जमातीमध्ये विशेषत्वाने दिसते. बोरुड समाजात बांबूपासून टोपल्या, कणश्या तसेच चटया आदि विणण्याची कला आढळते. (म) शिल्पकला (दगड, काष्ठ, माती) ही स्वतंत्र कला लोकपरंपरेने आलेली दिसते. टाकारी, बेलदार, पाथरवट अशा नावाच्या काही जमाती पारंपरिक शिल्पकार म्हणून आढळतात. दगड पाडणे, दगड घडविणे, दगडाच्या नक्षीकामासहित शिला तयार करणे, मूर्ती तयार करणे अशी कामे परंपरेने कलात्मकतेने करण्यात ही मंडळी वाकबगार दिसतात. शिल्प आणि स्थापत्याच्या विविध शैली प्राचीन काळापासून या लोकपरंपरेतून निर्माण झाल्या आहेत. काष्ठशिल्पकला अवगत असलेले सुतार म्हणून प्रसिद्ध आहेत. विद्या व कला या दोन्हीमध्ये मोडणारी ही कला आहे. (च) स्थापत्य– स्थापत्य हे शास्त्र असले तरी ती लोकपारंपरिक कलाही आहे. विशेषतः यात प्रत्यक्ष काम करणारी माणसे कामगार म्हणून ओळखली जात असली तरी मौखिक परंपरेने त्यांना ही कला अवगत झालेली असते. माती, चुना, अलीकडे सिमेंट वापरून विविध प्रकारची घरे, महाल, मंदिरे, वाडे तयार करण्याचे काम ही मंडळी करतात. (ट) भारतीय परंपरेतील चौसष्ट कला पुढीलप्रमाणे आलेल्या दिसतात– नीतीसूत्रे आणि तंत्रे यात कलांचे उल्लेख आढळतात. तथापि सर्वत्र ते सारखे नाहीत. याचाच अर्थ लोकपरंपरेमध्ये कलांविषयीच्या ज्या परंपरा आहेत; त्यातूनच हे प्रकार विचारात घ्यावे लागतात. कामसूत्राच्या आधारे संस्कृतीकोशात दिलेली यादी अशी– १) गीत, २) वाद्य, ३) नृत्य, ४) नाट्य, ५) आलेख

(चित्र), ६) विशेषकच्छेद्य (तिलक लावण्यासाठी साचे बनविणे, ७) तंडुळकुसुमाबलिविकार (तांदूळ आणि फुलांची रांगोळी), ८) पुष्पास्तरण (फुलांचा शय्या करणे), ९) दशन वसनांगराग (दात, वस्त्र व शरीर रंगविणे), १०) मणि भूमिकाकर्म (ऋतुमानानुसार घर शृंगारणे), ११) शयनरचना, १२) उदकवाद्य, १३) उदकघात (पिचकारी मारणे) जलक्रीडा, १४) चित्रयोग (अवस्थापरिवर्तन वृद्धाला तरुण करणे), १५) माल्यग्रंथविकल्प (माळा गुंफणे), १६) केशशेखरपीडयोजना (केसात फुले गुंफणे, मुगुट घालणे), १७) नेपथ्ययोग (देशकालानुरुप पेहेराव करणे), १८) कर्णपत्रभंग (पानाफुलांची कर्णफुले), १९) गंधमुक्ती (सुगंधी द्रव्य तयार करणे), २०) भूषण भोजन (अलंकार घालणे), २१) इंद्रजाल, २२) कौचुमारयोग (कुरुपाला सुरुप बनविणे), २३) हस्तलाघव, २४) चित्रशब्दापूपभक्ष्यविकार क्रिया (सूपकर्म), २५) पानकरसरागास्तव्य-योजन (पेय तयार करणे), २६) सूचिकर्म, २७) सूत्रकर्म (वेलबुट्टी काढणे, रफू करणे), २८) प्रहेलिका (उखाणे कोडी घालणे), २९) प्रतिमाला (अंत्याक्षरांची योग्य ती ठेवण), ३०) दुर्वाच योग (कठीण शब्दांचा अर्थ लावणे), ३१) पुस्तकवाचन, ३२) नाटिकाख्यायिका दर्शन, ३३) काव्य समस्यापूर्ती ३४) पट्टिका-वेत्रवाणविकल्प (नेवार किंवा वेत यांची बाज विणणे), ३५) तुर्ककर्म (चरखा किंवा टकली चालविणे), ३६) तक्षण (दगडावरील कोरीवकाम), ३७) वास्तुविद्या, ३८) रोप्यरत्नपरीक्षा, ३९) धातुवाद (कच्चाधातू पक्का करणे), ४०) माणिकरागज्ञान (रत्नांचे रंग ओळखणे), ४१) आकारज्ञान (खाणीचे ज्ञान) ४२) वृक्षायुर्वेदयोग (उपवन तयार करण्याची कला), ४३) मेष-कुक्कुट लावक युद्धविधी (बोकड कोंबडे आदि प्राण्यांची झुंज लावण्याची क्रिया, ४४) शुकसारिका-प्रलापन, ४५) उत्सादन (मालीश करणे), ४६) केशमार्जनकौशल, ४७) अक्षरमुष्टिकाकथन करपल्लवी, ४८) म्लेच्छित कला विकल्प (विदेशी भाषा तज्ञ), ४९) देशभाषातज्ञ, ५०) पुष्प-शकटिकानिमित्त-ज्ञान (प्राकृतिक लक्षणांच्या आधारे भविष्य वदविणे, ५१) यंत्रमातृका (यंत्र निर्माण करणे), ५२) धारणा मातृका (स्मरण वाढविणे), ५३) संपाठ्य (दुसऱ्याचे ऐकून जसेच्या तसे म्हणणे), ५४) मानसी काव्यक्रिया (शीघ्रकाव्य), ५५) क्रियाविकल्प क्रियेचा प्रभाव पालटणे, ५६) छलिक योग (चलाखी करणे), ५७) अभिधानकोष (छंदोज्ञान), ५८) वस्त्रगोपन (फाटलेले वस्त्र शिवणे), ५९) द्यूत, ६०) आकर्षण क्रीडा, ६१) बालक्रीडाकर्म



(मूल खेळवणे), ६२) वैनायिकी विद्याज्ञान (विनय व शिष्टाचार), ६३) वैजापिकीज्ञान (दुसऱ्यावर विजय मिळविणे), ६४) व्यायामिकी विज्ञान[१२] पारंपरिकने यांना चौसष्ट कला असे म्हटले जात असले तरी प्रत्यक्षात विविधग्रंथातून कलांची संख्या वाढते. (त) कलांची वर्गवारी विविध प्रकारे करता येणे शक्य आहे. व्यवसायांतर्गत कला, शरीरसौंदर्य वर्धन कला, संपर्ककला, प्रभावकला, युद्धकला, यंत्रचलन कला, धातूकला या प्रकारेही कलांची वर्गवारी करता येईल. (न) कला आणि ज्ञाती संस्था यांचा अन्योन्यसंबंध लोकसंस्कृतीमध्ये निर्माण झालेला दिसतो. अवगतकला हेच ज्ञाती अर्थात जाती ज्ञान झालेले दिसते जसे सुतार, लोहार, चर्मकार, कुंभार, बुरुड, इ. जातीसंस्थेच्या इतिहासाचा धांडोळा लोकपरंपरेनुसार करीत गेल्यास सर्वच कलातून जाती निर्माण झालेल्या दिसतील.

**१२. क्रीडा (खेळ) :-**

लोकसांस्कृतिक परंपरेत बैठेखेळ, युद्धखेळ, मैदानीखेळ जलखेळ संभोगक्रीडा, रस्त्यावरील खेळकरी असे प्रकार दिसतात. बैठ्याखेळांमध्ये द्यूत खेळ किंवा जुगार खेळदेखील प्रतिष्ठित खेळ समजला जातो. यात पत्ते, सोंगट्या, कवड्या, सागर गोटे, चिंचोके यांच्या सहाय्याने खेळ खेळण्याची प्रथा दिसते. भारतात अतिप्राचीन दैवतकथा म्हणजे शंकरपार्वतींचा सारीपाट. कौरवपांडवांचा द्यूतप्रसंग सर्वप्रसिद्ध आहे. चिंचोके, सागरगोटे, कवड्या यांच्या सोंगट्या करून खेळण्याची प्रथा सर्वदूर दिसते. हस्तीदंत, काष्ठ यांचे फासे तयार करून त्यांच्या आधारे दान टाकून द्यूत खेळण्याची प्रथा दिसते. गाण्याच्या भेंड्या, उखाणे, ओहाणे आदि खेळणी यात येतात. युद्ध खेळामध्ये शिकार, कुस्ती, हत्यारबाजी, उड्या धावण्याच्या शर्यती इ. खेळ येतात. असे खेळ खेळतांना यात प्राण्यांचाही उपयोग करून झुंज घडविली जाते, कोंबडे, बोकड, बैल, हत्ती, मगर, कुत्रे अशा अनेक प्राण्यांचा यात उपयोग केला जातो. सर्प आणि मुंगूस यांचा गारुड्याचा खेळ सर्वश्रुत आहेच. मैदानी खेळात आटापाट्या, हुतूतू, सूरपारंब्या, चेंडूफळी, लपंडाव, फुगड्या, पिंगा, चिलीपाटी, लेझीम, टिपऱ्या, लाठीकाठी आदी प्रकारचे खेळ समाविष्ट होतात. जलक्रीडा पोहणे व पोहण्याबरोबर अनेक खेळ यात येतात. संभोगक्रीडा ही वास्तविक नैसर्गिक भावनापूर्ती असते तथापि ही क्रीडा करण्याच्या अनेक परंपरा आढळतात. रस्त्यावरील खेळकऱ्यांमध्ये गारुडी, माकडवाले, कठपुतली, वाद्यवाले, कोल्हाटी,

डोंबारी, सपेरे, कसरतवाले आदी खेळकरी येतात.

**१३. विद्या, शास्त्रे :–**

लोकसंस्कृतीत भौतिक, रसायन, गणित, ज्योर्तिविज्ञान, काळमापन, मानव्य, धर्म, न्याय आयुर्वेद, संगीत आदि सर्वशास्त्रे अनादिकाळापासून विकसित होत आली आहेत. निसर्गाचे निरीक्षण, पशुपक्षांचे कीटकांचे निरीक्षण, त्यांशी संबंधातून घेतलेले अनुभव, आहार, निद्रा, भय आणि मैथुन या चारही मूलभूत प्राणीप्रवृत्ती किंवा प्रकृतीचा समाधानकारक आणि आनंदप्रद स्वरूपात अनुभव घेण्यासाठी सातत्याने, चुकत शिकत केलेले प्रयत्न, यांतून निर्माण झालेले समानमनस्क मानवीसमूहातील लोकबंध यांतून मानवाने समूहमनस्कतेने मानसिक शारीरिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय, भौतिक स्वरूपातील उपाय योजण्याचा आणि त्या उपाययोजनांना पारंपरिक स्वरूपात जतन करण्याचा अखंड दीर्घोद्योग सुरू ठेवला आहे. या दीर्घोद्योगाचे फलित म्हणजे 'लोक'ची साधनपरंपरा, कर्मवर्तन परंपरा आणि भाषिक परंपरा होय. लोकसंस्कृतीत सर्व शास्त्रे मौखिकपरंपरेने प्रचलित असतात. या लोकसंस्कृतीच्या दीर्घोद्योगातून लोकधुरिण अर्थात ऋषी, मुनी, तपस्वी, शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, चिंतक, कवी, लेखक, कलावंत शास्त्रांची सुविहित मांडणी आणि सतत संशोधन करतात. या संशोधित शास्त्रमांडणीचे उपयोजन तत्त्व आणि साधनांच्या स्वरूपात करण्याचा प्रयत्न करतात. हीच तत्त्वे आणि साधनेपरंपरेत लोकसांस्कृतिक तत्त्वे आणि साधने निर्माण होत राहतात. या परंपरा 'लोक' मधील त्या त्या क्षेत्रात रस असणाऱ्या व्यक्ती सामरस्याने लोकसंस्कृतीत ज्ञान जतन आणि ज्ञान प्रसार करीत राहतात. लोकसंस्कृतीतील अशा शास्त्रपरंपरांवरून लोकसंस्कृतीचे स्थलकालपरिस्थिती सापेक्ष दर्शन घडत राहाते. विद्या व शास्त्रे ही लोकसंस्कृतीतील लोककलांनाही उपकारक व तात्त्विक आणि साधनांसह आकार देत लोकसंस्कृतीचा प्रवाह पुढे नेतात. लोकसंस्कृतीत शास्त्रीय ज्ञानासह धुरिणत्व करणारे 'लोक'ही 'अभिजन' म्हणून ओळखले जातात आणि त्यातून भावना संबंधनिरपेक्ष शास्त्रज्ञान प्रकटविणारेही अभिजन म्हणूनच ओळखले जातात. भारतीय परंपरेमध्ये 'ऋषीलोक'ला अभिलोक असे मानले आहे याचे कारण देव, दानव, आणि मानव या स्वरूपातील 'भूलोक'ची सर्व प्रकारची, भूलोकपरंपरेत अनुसरलेली सर्व विद्या-शास्त्रे ऋषीलोक तील विभूतिमत्त्वांनी मंडित केली आहेत व त्यात वेळोवेळीचे संशोधनही ऋषीलोकने केले आहे. असे असूनही 'भूलोक'मधीलच



धुरिण म्हणून ऋषी गणले जातात, हे लोकसंस्कृती निर्मिती वहन आणि पुनर्निमिती प्रक्रियेच्या दृष्टीने आहे.

**(अ)** भारतीय परंपरेने मानलेल्या विद्या पाहिल्या तर; भारतीय संस्कृतीकोशातील नोंदीप्रमाणे, 'प्राचीनांनी चौदा किंवा अठरा ही विद्यांची संख्या मानली आहे. चार वेद, चार उपवेद, आणि सहा वेदांगे मिळून चौदा विद्या होतात. त्यांची उत्तरांगे म्हणून दर्शने, इतिहास, पुराणे व यज्ञ ही मानली तर संख्या अठरा होते. जैन धर्मग्रंथात चार वेद, इतिहास, निघंटू, सहा वेदांगे आणि सहा उपांगे मिळून अठरा ही विद्यांची संख्या मानली आहे. भारतीय विद्या या निगम आणि आगम अशा दोन स्वरूपात विकसित झाल्या. बहुतांश विद्या या निगम विद्या होत. आगम विद्यांचे भेद, प्रभेद व प्रायोगिक क्षेत्र फार मोठे आहे. कल्प, सिद्धान्त, संहिता, तंत्र, यामळ व डामर हे आगम विद्यांचे मुख्य भेद आहेत. आगम विद्यांना (भौतिक) प्राकृत विद्या असेही म्हणतात. कारण त्यांचा प्राकृतिक पदार्थांशी विशेष संबंध असतो. पाश्चात्य विज्ञान प्रामुख्याने याप्रकारे कार्य करते. आत्मबलाने किंवा योगबलाने प्राप्त होणाऱ्या अशाही दिव्य विद्या आहेत. त्यांना सिद्धी असे म्हणतात. अशी नोंद प्रस्तुत लेखकाने आपल्या 'लोकनिष्ठ अध्यात्मवाद' या ग्रंथात केली असून त्यावर चर्चा केली आहे.[१३]

**(ब) लोकसंस्कृतीतील विद्या व शास्त्रे–**

**१) धर्मशास्त्र** म्हणून दैवत उपासना कुळधर्मकुळाचार, जत्रायात्रा, नवससायास आणि संस्कार केले जातात. त्यांविषयी मौखिक परंपरेत काही नियम व संकेत रूढ असतात. उदा. देवाच्या उपासना पद्धतींची परंपरा. यांविषयी वडीलधारे व पुरोहित वर्ग शास्त्र सांगत असतो. स्थलकाल परिस्थितीनुसार धुरिणांनी समूहमनस्कतेने, धर्मसिंधू सांगितलेले असतात. उदा. जन्मप्रथा, मर्तिकप्रथा आणि विवाहप्रथा यांतील विधिविधाने आणि वर्तन संकेत.

**२) नीती तत्त्वज्ञान आणि न्याय :–** कोणत्याही अंगस्वरूप लोकमध्ये गावपंचायत अर्थात निवडक लोकधुरिणांचे नेतृत्व मानले जाते. धुरिणनिवड लोकमनाची निर्मिती असते. या लोकधुरिणांचा धाक लोकमधील प्रत्येक घटकाला असतो. 'गावासाठी गाढव खावं लागतं', 'पांचामुखी परमेश्वर', 'गाव करी ते राव न करी' या म्हणी या नीती, तत्त्वज्ञान आणि न्याय यांच्या

लोकसंस्कृतीतील प्रचलनाच्या सूचक आहेत.

**३) लोकवैद्यक :-** हे शास्त्र आरोग्यविषयक अनादी परंपरांचा निष्कर्ष आहे. शुभाशुभ वेळा व संकेत प्रहर आणि आरोग्य संकेत, झाडपाला, पशुपक्षी यांचे रक्त, मूत्र, नखे, केस, पिसे यांचा औषधी म्हणून उपयोग, नाडीपरीक्षा, वात पित्त कफ प्रकोपावरील तोडगे, दंश, विषबाधा, ज्वर यांवरील मंत्र, तंत्र, तोडगे, वनौषधी, भस्माषौधी यांचा उपयोग करणारे धुरिण लोकजीवनात दिसतात. हे धुरिण विशेषतः पुरोहित वर्गातून आलेले दिसतात. त्यांना लोकसांस्कृतिक जीवनात विशेष मान असतो. अनेकदा जारणमारण विद्याही, लोकवैद्यकात आढळते. विविध धान्ये, धातू, फळे यांचा विनियोग मिश्रण, संयुग पद्धतीने हे लोक करीत असतात. औषधे तयार करण्याच्या पारंपरिक पद्धती आढळतात. विशिष्ट जमात यात मक्तेदारी करतांना दिसते. उदा. वैदु, ठाकर या भारतीय जमाती. भगत मंडळीही वैद्यकाचे काम करतात. हळद, बिब्बा, तुळस, आलं, चांदवेल, मोरपीस, कबुतराचे रक्त अशा काही पारंपरिक औषधांची उदाहरणे देता येतील. औषधे विकणाऱ्या 'सूया घे बिबा घे' म्हणत फिरणाऱ्या विशेषतः वैदू समाजातील फिरस्त्या स्त्रिया औषधे विक्री करीत आजही हिंडतांना दिसतात. 'आजीचा बटवा' ही लोकवैद्यकातील महत्त्वाची गोष्ट म्हणावी लागेल. साप विंचू उतरविणारे मांत्रिक, काविळीसारख्या रोगावर औषध देणारे मांत्रिक अशी, असंख्य उदाहरणे लोकवैद्यकसंदर्भात देता येतील.

**४) लोकवाणिज्य :-** लोकसंस्कृतीतील वाणिज्यव्यवसाय लोकवाणिज्य शास्त्राप्रमाणे चालतो, देवाण-घेवाण, धनको-रिणको, बाजारहाट, शब्दाचा पक्का, 'व्यापारीका बच्चा कभी न बोले सच्चा, जो बोलेगा सच्चा उसका गुरु कच्चा' पैशाकडे पैसा ओढतो, दामदुप्पट, अर्धेली, वाट्यानं, गहाणवट, 'उसन्यावर पासनं' या अशा मौखिक परंपरा या लोकवाणिज्य शास्त्राच्या द्योतक आहेत. सावकाराची चोपडी म्हणजे विधिलिखित, वेठबिगार, असे अनेक संकेत या व्यवसायात आहेत. 'बोलेल त्याचे चणे विकतील पण न बोलेल त्याचे बक्षी गहू मातीमोल होतील', 'वेळंला केळं अन् उपासाला शिताफळं', 'आवळा देवून कोहळा काढणे', 'गुंजभर द्यायचं तोळाभर सांगायचं', अशी असंख्य उदाहरणे देता येतील. आवक तसा भाव, बाजाररचनाही करावं काय, अशा सूत्रांमधून विशेषतः शब्दावर व्यवहार, व्यापार करण्याची प्रथा दिसते. वाराई, भराई, चटाई, भाडंतोडं असे कितीतरी पारिभाषिक शब्द लोकवाणिज्यविषयक



उदाहरणे म्हणून सांगता येतील.

**५) गणित :-** लोक-संस्कृतीतील गणित काटेकोर आकड्यात असण्याबरोबरच संकेतांवर अधिक चालते, जमीन मोजणी काठीवर, विहीर मोजणी परसावर, गर्दी मोजणी अंदाजे खूप पक्की, अगगग, अशा संकेतार्थी शब्दात, वार, आठवडे, महिने हे परंपरेने मोजायचे पंचांगांची ढोबळ सांकेतिक माहिती, लोकसंस्कृतीत पारंपरिकतेने दिसते. आठवडा; पंधरवडा, महिनादोनमहिने, वर्षसहामहिने अशी मोघम भाषा दिसते. धन मोजण्यासाठी वापरलेले परिमाण परंपरेने जागवायचे. तसेच कालगणना करतांना फारफार वर्षांपूर्वी, युग लोटलं, सत्ययुगातली, त्रेतायुगातली, द्वापारातली, कलियुगातली गोष्ट, प्रहर मोजतांना पहिला प्रहर, रामप्रहर, दुसरा प्रहर, माध्यान, दिवस ढळला सांजच्या प्रहरी, रातला मध्यरात्री, पहिल्या कोंबड्याला, झुंजूमुंजू झाल्यावर, तांबड फुटलं, अशा शब्दात प्रहर मोजणी दिसते. पारंपरिक अशी काही साधनही आढळतात. उदा. घटिका यंत्र, अभिषेक पात्र इ. वेळ मोजायला, वित आणि बोटे यांचा उन्हाच्या दिशेने खेळ, किंवा सावलीवरून वेळ ठरवायची, नदीच्या पुराचं पाणी मोजायला खुणा ठेवायच्या इ. याचा अर्थ गणित, पंचांग लोकसंस्कृतीत नाही असे नाही. तेही लोकसंस्कृतीत पारंपरिक होत. प्रकरणाच्या सुरुवातीला शास्त्रीय ज्ञान आणि लोकव्यवहार यांचे चक्र याच उद्देशाने स्पष्ट केले आहे. नवे परिमाण जुन्यावर कलम करून; पारंपरिक करण्यावर लोकगणिताचा भर असतो. कोडी, उखाणे, आहाणे ही लोकगणितातील उदाहरणे किंवा प्रमेयेच असतात. त्यांच्या आधाराने लोकव्यवहार चालतो. स्वयंपाकघरात तर वाटीभर, पेरभर, चमचाभर, चिमूटभर अशी अनेक परिमाणे महिला योजतांना दिसतात. पदार्थ शिजण्याचा कालावधी वासावर ठरविला जातो. भोजनविषय अंदाज अदमासे घेतला जातो. गणित शास्त्राचे लोकव्यवहारातील हे उपयोजन असते.

**६) लोकज्योतिर्विज्ञान-लोकजातक-भाकित :-** लोकसंस्कृतीमध्ये भविष्याविषयी कुतूहल उदंड प्रमाणात पाहावयास मिळते. लोकसंस्कृतीतील अभिजनदेखील याला अपवाद नाहीत. लोकजातक सांगण्याचे काम पांगुळ, वासुदेव, नंदीबैलवाले, कुडमुडे जोशी आदि लोकसंस्कृतीचे उपासक करतात; तसेच भगतमंडळीही करतात. भविष्याविषयीचे असंख्य प्रश्न माणसाला भयग्रस्त करतात. विवाह, अपत्यप्राप्ती, पैसा-अडका, जमीनजुमला, भाऊबंदकी आणि समाजातील भांडणतंटे, पीकपाणी, राजकीय घडामोडी, अशा अनेकानेक

गोष्टींविषयी माणसाचे भविष्यविषयक कुतूहल जातक सांगून पूर्ण करण्याचा प्रयास केला जातो. सूर्य, चंद्र, तारे, नक्षत्र यांच्या चालनानुषंगाने जातककथा प्रसिद्ध असतात. पशू, पक्षी यांचे आवाज, ओरडणे, त्यांच्या हालचालींचे संकेत निसर्गविषय भाकित करतात. कीटकांच्या हालचाली, वनस्पतींचे बहर, फुलणे फळणे ही अन्य वनस्पतींविषयी संकेत देतात. याची असंख्य उदाहरणे गावगन्ना मौखिक परंपरेने आलेली असतात. पांगुळ रोजचे भाकित सांगतो. देवीचे भूत्ये कुटुंबप्रश्न, लागीरादीप्रश्न सोडवतात. भगत तर बाधा आणि त्यावरील तोडगे सांगतो. सूर्य चंद्राला खळे पडणे, तारे नक्षत्रांचे रंग अंधुक वा प्रखर होणे, धुमकेतू उगवणे हे तर राजकीय भविष्यही कथन करणे. पशुपक्षी विशिष्ट पद्धतीने हालचाली व आवाज करू लागले की पुढील भाकित, संकेत कळतात. कुत्र्यांचे विव्हळणे, पालीचे चुकचुकणे, घुबडाचे धुतकारणे, टिटवीचे भुकारणे अशुभ भविष्याचे संकेत देतात. चिंच जास्त आली तर आंबा जास्त येत नाही. 'आंबा की चिंच' असा खेळही त्यावरून आलेला दिसतो. भैरवनाथ अर्थात अष्टभैरव हे अष्टदिशांचे रक्षक किंवा लोकपाल असतात. त्यांच्यासमोर भगत हुईक मांडतो. धनगरांचं हुईक प्रसिद्ध आहेत. ऋषींनी नाडीशास्त्र संहिता विकसित केल्या. त्यातून भविष्य कथनाच्या अनेक परंपरा पुढे आल्या. काही पुरोहित किंवा जातपुराणिकांना कर्णपिशाच्च भविष्य कथन करते. नाडी जाणणारे परंपरेने निर्माण झालेले दिसतात. लोकजातक आणि गणित यांचा संबंध आहे. पृथ्वी, चंद्र, तारे आणि नवग्रह (नवग्रहांचा शोध कोणी कसा लावला?, त्यांचा मानवी जीवनाशी असलेला संबंध कोणी सांगितला? यांविषयी गूढ आहे. मात्र त्यांच्या संबंध आणि परिणामविषयक अनेक कथा प्रसिद्ध आहेत.) यांच्या चलनाचे गणित जातकशास्त्रात किंवा ज्योतिर्विज्ञानात मांडलेले असते. त्यात नित्य संशोधन घडते आहे. या शास्त्राच्या बाबतीत ऋषीपरंपरेकडे बोट दाखविले जाते. सप्तऋषींचा तर तारकापुंजही दाखविला जातो. मात्र या परंपरा संहितास्वरूपात, उदा. अगस्त्य नाडी, रावण नाडी, भृगुसंहिता या स्वरूपात उपलब्ध आहेत. या संहितातील अनेक संकेत लोकजीवनात जगभर आढळतात. ज्योतिर्विज्ञानातील या तारे, ग्रह, नक्षत्र यांच्या आधारे कालगणना, तिथीवार मानले जातात. अर्थातच हे सारे ज्योतिर्गणित लोकजातकांतून संशोधित झाले असणार हे स्पष्ट आहे. जातकाची आणखी एक स्वतंत्र शाखा म्हणजे मुद्रा आणि रेषा शोधन होय. हस्तसामुद्रिक



पाहणारे कुडमुडे जोशी बाजारहाट आणि रस्त्यावरही दिसतात. चेहरावाचन (Face Reading) करणारेही चेहऱ्यांवरील ठेवण, डोळ्यांतील चमक, कान, कपाळ यांचे आकार, पायांचे आकार यावरून भविष्य कथन करतात. सपाट पावले अशुभ असतात, भव्य कपाळ भाग्यवान असते. गुप्तधन प्राप्ती होईल किंवा कसे; हेही चेहरावाचनातून सांगितले जाते. कौल लावण्याची प्रथा पुरोहित आणि वडीलधाऱ्या माणसांकडूनही पारंपरिकतेने सुरू आहे. सिद्ध, साधू, महाराज मंडळी भविष्यकथन संकटनिवारण करतात यावर लोकसंस्कृतीत दृढ विश्वास आहेत. पाऊसपाणी, अशुभहरण, साथीचे रोगनिवारण यासंबंधीचे तोडगे या पुरोहित, सिद्ध आणि कुटुंबसमाजातील वडीलधारी माणसे यांच्याकडून पारंपरिकतेने आलेले दिसतात. भाकितासंदर्भात अनेक दंतकथा, आख्यायिकाही आढळतात. उदा. जगबुडी नदीची कथा, शिवनंदीचे चलन इ. लोकजातक परंपरेतून अनेक संकेत प्रस्तुत शुभाशुभ सिद्धीकार्य प्रत्येक जीवांस सिद्धी प्राप्त असतात. या योगशास्त्रामुळे अधिक विकसित करून कार्यान्वित करता येतात. सिद्ध, साधु, ऋषी, तपस्वी, योगी यांच्याकडील सिद्धी पूर्ण विकसित होऊन; त्या कार्यान्वित झालेल्या असतात; अशी श्रद्धा लोकमानसात आढळते. चांगल्या आणि वाईट सिद्धीकार्यांविषयीचे संकेत लोकसंस्कृतीत अनुभवातून प्रकट झाले आहे. देवदर्शन, आईवडील, वडीलधारे यांचे आशीर्वाद, हे शुभसिद्धीकारक होत; तर दृष्ट लागणे, मांजर आडवी जाणे, डोळे शुभाशुभ स्वरूपात लवणे, बाहू स्फुरणे असे अनेक संकेत असतात. दृष्ट काढणे, 'तिन तिघाडा काम बिघाडा' होऊ नये म्हणून एखादे फळ वा खडा बरोबर घेणे; असे असंख्य संकेत हे भविष्या संबंधातून लोकसंस्कृतीत प्रचलित दिसतात.

**७) कलाशास्त्रे** :– लोकसंस्कृतीतील उपरोक्त सर्वकलांना पारंपरिकता आणण्याचे काम त्या–त्या कलाक्षेत्रातील निष्णात आणि धुरिण कलांच्या विशिष्ट मांडणीतून साधत असतात. त्यातूनच लोकपरंपरेत सर्वकलांची शास्त्रे, घराणी, परंपरा निर्माण झाल्या आहेत. लोककला ही मुक्त आविष्कृती असते; असे म्हटले गेले; तरी त्यात गुरुशिष्य परंपरा, श्रद्धा, कलावंत आणि आस्वादक सापेक्षता, यांविषयीचे नियमित संकेत निर्माण होतात. या संकेतांचे शास्त्र बनते. लोकनाट्य तमाशा या कलेचे एक शास्त्र मांडलेले दिसते. त्या शास्त्रीय सूत्रांनुसारच परंपरेत लोकनाट्याचे समग्र सादरीकरण होते. संगीतशास्त्र, नाट्यशास्त्र, विधिनाट्यशास्त्र एवढेच नव्हे तर प्रत्येक कलेमध्ये कौशल्यांविषयी, स्थल

काल परिस्थिती सापेक्षतेने निश्चित स्वरूपात, धर्मनीतीतत्त्वज्ञान सामाजिकता, यांतील लोकबंधांना पूरक असे संकेत, नियम, कायदे, न्यायनिवाडे यांच्या परंपरा तयार होतात. मौखिक परंपरेने ह्या शास्त्रांच्याही परंपरा होऊन त्यांना शास्त्रदर्जा प्राप्त होतो. संगीत घराणी अशी तयार झाली आहेत. कलाशास्त्रांच्या समन्वयातून, सहजीवनातून नव्या कला तयार होतात. उदा. लोकनाट्य तमाशा या कलेत पुरोहित वर्गांच्या नर्तन, गायन, वादन यांच्या शास्त्रपरंपरा येऊन मिसळलेल्या दिसतात. त्यातूनच लोकनाट्य तमाशाचे एक नवे शास्त्र तयार झालेले दिसते. कुंभकार, लोहकार, सुवर्णकार, बेलदार, सुतार या विशिष्ट कौशल्याधिष्ठित कला तथा विद्यांची पारंपरिक शास्त्रे आढळतात हे लक्षात घेणे आवश्यक आहे. नर्तनपरंपरांतील कथक, मणिपुरी, कुचीपुडी, भरतनाट्यम्, यक्षगान, दशावतारी, नवटंकी, बोहाडा आदि सर्व कलाप्रकारांची लोकशास्त्रे आढळतात. मौखिक वाङ्मयालाही विशिष्ट ताल, लय, छंद यांनी बांधलेले दिसते. या सर्व गोष्टींचा अर्थ असा की शास्त्रे आणि कला लोकजीवनात सामरस्याने प्रकट होतात. कुटुंबव्यवस्था, समाजव्यवस्था, राजव्यवस्था व अर्थव्यवस्था यासंदर्भातही शास्त्रे प्रकट झालेली असतात. ती प्रयोगसिद्ध परंपरा निर्माण करतात.

**१४) कृषीसंस्कृती हीच लोकसंस्कृती :–**

जागतिक पातळीवर संस्कृतीचा विचार, ‘भूलोक’शी निगडित; मानवी एकात्म अशा जीवनातील धर्म, नीती, तत्त्वज्ञान, न्याय, विद्या, कला यांशी अनुबंधित; निर्भय, सुखरूप, व्यवस्थापित जीवनसारणीचा, सारणी प्रवाहाचा विचार; या दृष्टीने केला जात आहे. हा वैश्विक मानवाच्या स्थिर आणि पारंपरिक जीवनाचा विचार असतो. संपूर्ण जीवसृष्टीचा विचार केला तर; थोड्याफार फरकाने सर्वच जीवमात्रात हा विचार, नैसर्गिकप्रवृत्ती म्हणूनच केला जात आहे. अनादिकालापासून सुरू असलेल्या, स्थिरसुखरूप जीवनप्रवासात अन्य सर्व जीवमात्रांपेक्षा मानव आपले वेगळेपण राखून सारणीबद्ध तरी परिवर्तनशीलतेने, आपली सारणी (जीवनपद्धती) सांभाळतो आहे. याचे कारण निसर्गातील सर्व उपलब्धींना, आपल्याला हवे तसे बदलून, साधनस्वरूप देऊन; उपयोजित करण्याची, निसर्गदत्त प्रतिभा त्याच्याजवळ आहे. निसर्गाचं देणं माणसानं सुंदर, आनंदप्रद करून; उपयोजिलं आणि संस्कृती निर्माण झाली. (अर्थात मानवी दृष्टीने – प्रसंगी निसर्गाचा व अन्य जीवमात्रांच्या स्वातंत्र्याचा विचार न करता) एकप्रकारे माणसाने ‘लोक’ म्हणून जगतांना स्वतःची अशी वेगळी अवस्थापद्धती आणि सारणी निर्माण केली. एकप्रकारे नवी सृष्टी निर्माण केली. या अवस्थापद्धती आणि सारणीला आपण अर्थात ‘लोक’ची ‘लोकसंस्कृती’असे म्हणतो. संस्कृती ही निसर्गाला मानवाच्या प्रतिभेने दिलेले रूप असते. मानव हाच परमेश्वर आहे असे मानव म्हणू लागला हेही त्याच्या प्रतिभाबलानेच. भूलोकी प्रागऐतिहासिक काळापासून अनेक संस्कृतीसंगर घडले त्या पाठीमागे हेच लोकमानस दडले आहे.

या लोकसंस्कृतीची सुरुवात कदाचित, सृष्टी – अर्थात सृजन, प्रजनन, अग्नी, वायू, पर्जन्य आणि चाक या मानवाने अनुभवून उपयोजित केलेल्या, अनुभूतीतून प्रवाहित झाली असावी. लोकधुरिणांनी ‘लोक’च्या समूहमनस्कतेने केलेला विचार या अनुभवनातून घडला असावा. जे बीज भूगर्भात रूजते तेच पुन्हा तीच असंख्य बीजे निर्माण करते. ज्या तऱ्हेची प्रजनन प्रक्रिया घडते तशी प्रजा निर्माण होते. उद्‌भिज, स्वेदज, अंडज, जारज या चार प्रकाराने ही उत्पत्ती सतत होत असते. हे माणसाच्या प्रतिभेला जाणवले. यातूनच लोकधुरिणांनी कृषीजीवन उभे केले. भारतीय परंपरेत या प्रतिभावंत द्रष्ट्यांना ऋषी असे संबोधले आहे. यांनी निसर्गशक्तींचे आणि चेतन जीवप्रणालीचे दर्शन घेतले. प्रतिभाबलाने त्यांना आकळले आणि त्यातून स्थिर लोकसंस्कृतीची मुहूर्तमेढ रोवली. ही लोकसंस्कृती म्हणजे कृषीसंस्कृती होय. ऋषींना कृषी असे म्हणत, कवी असे म्हणत ते यासाठीच होय. चेतन जीवांना जगण्यासाठी अन्नशोधन करावेच लागते. या अन्नशोधनासाठीच दाहीदिशा प्रयास जीवांचे प्रयास सुरू असतात. ते अन्न स्थिरपणे मिळविण्याची किमया ऋषीस्वरूप लोकधुरिणांनी केली येथून कृषीसंस्कृती झाली. या कृषीजीवनकेंद्रित समूहमन स्थिरावले आणि कृषीजीवनाच्या गरजा, भागविण्यासाठी ‘लोक’वस्त्या निर्माण झाल्या. औद्योगिक, नवाधुनिक क्रांतीत साधनांच्या गर्दीत, कृषीसंस्कृती, अर्थात लोकसंस्कृती हरवली असे वरवर पाहता वाटत असले; तरी कृषीकेंद्रितता कधीच हरपू शकत नाही. कृषीजीवनाची अर्थात लोकजीवनाची नाळ ही पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश यांशी अनुबंधित जीवमात्रांच्या प्रजनन प्रक्रियेशी म्हणजे कृषीसंस्कृतीशी जोडलेली आहे. म्हणूनच कृषीसंस्कृती हीच लोकसंस्कृती असते.

या कृषी लोकसंस्कृतीची संकल्पना स्वयंपूर्ण ग्राम, स्वयंपूर्ण पंचक्रोशी,

स्वयंपूर्ण राज्य यांत दडलेली आहे. भारतीय परंपरेतील लोककथांमध्ये ‘एक गाव होते. तेथे एक राजा राज्य करीत होता’ अशी सुरुवात होते. ‘त्याला होत्या दोन राण्या’ ‘एक होती आवडती दुसरी होती नावडती’ या रूपककथेतून राजाची आवडती प्रकृती (निसर्गवृत्ती) आणि नावडती (त्याला व्यक्तिशः बंधनात टाकणारी व्रतस्थ करणारी) परंतु लोकमानसाला शाश्वतता देणारी लोकसंस्कृती होय. लोकसंस्कृती समूहाचा विचार करायला भाग पाडून, आत्मक्लेश भोगविते. या रूपककथेने पुढे असे वळण घेतले आणि आवडती म्हणजे प्रिय, नावडती म्हणजे अप्रिय असा लोकबंध निर्माण झाला. ‘गावासाठी गाढव खावं लागतं’ हे संस्कृतीचे नावडतेपण सूचित करते. रूपककथांतील ही रूपकता लोकसंस्कृती सारणी सूचित करते. स्वयंपूर्ण ग्राम-पंचक्रोशी-राज्य यांतील लोकसंस्कृती जपणाऱ्या संस्था म्हणजे; लोकधुरिणांनी निर्माण केलेली धर्म, नीती, तत्त्वज्ञान आणि न्याय जतन करणारी ‘पांचामुखी परमेश्वर’ अशी श्रद्धा जोपासणारी, गावपंचायत होय. अर्थात न्यायव्यवस्था होय. लोकधुरिणांतील समूहनायक हा राजा तर स्वयंपूर्णता साध्य करण्यासाठी पुरोहितांचा वर्ग, बलुतेदारांचा वर्ग, कौशल्याधिष्ठित काम करणारे अलुतेवर्ग, सौदागरवर्ग अर्थात मध्यस्थी करणांचा वर्ग; असे वर्ग गावात पंचक्रोशीत राज्यात अस्तित्वात आले. सर्वांवर संरक्षणाची जबाबदारीही आली. या सर्व वर्गांची अवलंबिता कृषीजीवनातील खळ्यावर आणि मळ्यावर प्रस्थापित झाली. कृषींनी सृष्ट करायचं या वर्गांनी त्यांच्या जीवनाच्या आणि परस्परजीवनाच्या गरजा भागवायच्या. अर्थात वाण द्यायचे वाण घ्यायचे, अशी विनिमय व्यवस्था करायची. अशी कृषीकेंद्रित जीवनसारणी हीच लोकसंस्कृती होय. कृषीसंस्कृती म्हणजे कृषीकेंद्रित संस्कृती. हीच जगतातील आद्यतम संस्कृती होय. हीच आदिम संस्कृती. त्यात स्थल काल परिस्थितीनुसार साधने आणि ज्ञान (माहिती व कौशल्य) यांच्यावर आधारित साधनकेंद्रित, संस्कृती निर्माण होत जाते. हे खरे. असे असले तरी मूलभूत कृषीकेंद्रितता ढळत नाही. शास्त्रीय ज्ञानावर आधारित अशा, ज्या संस्कृतीचा अभ्यास करू पाहातो; तिची मूलतत्त्वे आणि सारणीबीजेही लोकसंस्कृतीत दडलेली असतात. कृषीसंस्कृती अर्थात लोकसंस्कृती ही जलउपलब्धीच्या साहचर्याने स्थिरावली. जलाची जीवनातील आवश्यकता कधीही नाहीशी होऊ शकणार नाही. नद्यांच्या काठावर फुललेल्या कृषीसंस्कृतीचा अर्थात लोकसंस्कृतीचा विस्तार, आता दळणवळणाच्या



मुखरस्त्याश्रसाने होतांना दिसतो आहे. तरीदेखील पाण्याचे महात्म्य कमी झाले नाही की होऊ शकले नाही. पुरोहित अलुते, बलुते, सौदागर वर्ग नव्या रूपात निर्माण होतात. कृषीजीवन तंत्रज्ञान निष्ठ साधनांच्या सहाय्याने सारणीबद्ध होतांना दिसते. हा केवळ तपशीलातला बदल होत असतो. निसर्गाश्रयी अर्थात पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश यांच्यावर अवलंबित जीवजीवन अनादि आणि अनंतपणे असते. ते कृषीकेंद्रिततेनेच लोकजीवन म्हणून प्रकटते. म्हणूनच कृषीसंस्कृती हीच लोकसंस्कृती म्हणून पुढे येते. अन्य सर्व संशोधने साधने बनून या संस्कृतीशी जोडली जातात.

**१५) एकविसाव्या शतकातील आदिम म्हणविणाऱ्या संस्कृती प्राचीनतम ऋषी-कृषीसंस्कृतीचे अवशेष अर्थात लोकसंस्कृतीचे उगमस्त्रोत-अवशेषः-**

भारतातील जातीजमातींच्या संदर्भात ब्रिटिशांनी अनुसूची (शेड्यूल) तयार केली. त्यातील जमाती, भटक्या जमाती, विमुक्त जमाती यांची स्वतंत्र सूची केली आहे. या जमातींना ‘अब ओरिजीन’, आदिवासी किंवा आदिम या नावाने ओळखले जाते. जगभरात अशा जमाती आपले स्वतंत्र लोकसमूह म्हणून, एकात्म मानवी समूह म्हणून; परंपरेने जगतांना दिसतात. भारत, ऑस्ट्रेलिया, युरोप आदि देशांतील यांची अनेक उदाहरणे देता येतील. या सर्व जमाती जास्तीत जास्त निसर्गाश्रयी अर्थात निसर्गावलंबी पद्धतीने परंपरेने जगत; भाषा आणि समग्र सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, जीवनव्यवस्था पाहाता स्वतंत्र आणि स्वयंपूर्णतेने जगतांना आढळतात. येथे लोकसमूहातील वस्ती, गाव, प्रदेश स्तरावरील स्वयंपूर्णता आजही अनुभवता येते. आज, वैश्विक पातळीवरील देश, राष्ट्र स्वरूपातील व्यवस्थेत, त्यांचा पूर्णतः समावेश करण्याचा सपाटा सुरू आहे. नव्या उत्क्रांत व्यवस्थांना, अत्याधुनिक व्यवस्थांना, मुख्य प्रवाह मानून त्या प्रवाहात या लोकसमूहांना आणण्याचा विशेष प्रयत्न, सर्वच राजव्यवस्था, समाजव्यवस्था आणि प्रचलित धर्मव्यवस्था करीत आहेत. असे असूनही ‘कृषीलोकसंस्कृती’चे प्रचलन या लोकसमूहात स्पष्टपणे जाणवते. याच एकात्म स्वयंपूर्ण लोकसंस्कृतीतून, व्यापक लोकसंस्कृती विकसित झाली असावी हे सतत जाणवत राहाते. ऋषी लोककार्यांचा, कृषीसंस्कृती आणि या आदिम म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लोकसंस्कृतींचा तौलनिक अभ्यास केला तर आदिम म्हणविणारांची लोकसंस्कृती ही प्राचीनतम अशा ऋषीसंस्कृती आणि कृषीसंस्कृती याचे वर्तमानातील अवशेष होत असे म्हणता येते. याचा

अर्थ स्थलकालपरिस्थितीसापेक्ष लोकसंस्कृतीचे वेगळेपण जाणवते इतकेच. तथापि लोकसंस्कृतीची निर्मिती आणि पारंपरिकता हीही 'लोकजीवनाशी' नैसर्गिक अवस्था असते हे मान्य करावे लागते.

**१६) लोकसंस्कृतीची मौखिक परंपरा :–**

लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीमध्ये मौखिक परंपरा खूप महत्त्वाची असते. मौखिक परंपरा म्हणजे मागीलांनी पुढीलांना वितरित केलेले अर्थात सांगितलेले ज्ञान. अनुभव, धुरिणांची संगत, देशाटन, निसर्गविभ्रम, ग्रंथावलोकन यांतून मागीलांना मिळालेली माहिती आणि ज्ञान ते सतत आपल्या पुढील पिढीकडे, आपल्या वर्तनातून, संवादातून, साधनांच्या सारणीतून; आपल्या वाणीद्वारे देत असतात. मौखिक परंपरा या (१) वर्तन परंपरा अर्थात कामे, कार्ये आणि हालचाली, (२) साधन परंपरा, (३) शाब्द परंपरांच्या माध्यमातून प्रसारित होतात. मग या सर्व परंपरांना मौखिक परंपरा म्हणण्याचे कारण कोणते. (अ) पहिले कारण म्हणजे परंपरा पुढे वितरित करतांना; मागील लोक थेट ग्रंथांतील संदर्भ दाखवून; किंवा प्रत्यक्ष वर्तनपाठ देऊन किंवा साधनांचा नेमका अर्थ, उपयोग आणि वापर काय आणि कसा; हे प्रात्यक्षिक मुद्दाम दाखवून; करीत नाहीत; तर या सर्व गोष्टी प्रत्यक्ष सारणीतील प्रयोगसिद्धतेमुळे होत असतात. गवयाचे पोर सूरात रडते. सुगरण आई तशी लेक, असे घडते. कारण पुढील पिढ्या या गोष्टी सारणीतील प्रयोगांतून सहज, अवलोकन, निरीक्षण, आकलन ग्रहण, अनुसरण या प्रक्रियेने, आत्मसात करीत असतात. दुसरे कारण म्हणजे यातील वर्तन परंपरेला, साधन परंपरेला समूहमनाने शाब्दपरंपरेत बांधलेले असते. 'लोक' किंवा माणूस हा नावे ठेवणारा प्राणी आहे' अशी माणसाची एक व्याख्या प्रस्तुत लेखक नेहमीच करीत आला आहे. मानवी प्राण्याने त्याला लाभलेल्या स्वरांना किंवा वाणीला किंवा शब्दवृत्तीला आकार दिले. या वाणीचे वाङ्मयस्वरूप अर्थात शब्द रूप निर्माण झाले. प्रत्येक स्फोटित शब्द हा खरेतर कोणत्यातरी अनुभवाला दिलेले नाव असते. त्यामुळे अनुभवाला नाव आणि नाव उच्चारता अनुभव; अशी प्रक्रिया सुरू होते. नावामागे अनुभवाचे संचित दडलेले असते. विश्वात आजवर अनुभवास आलेल्या प्रत्येक अनुभवाला माणसाने शब्द प्रतिमा दिली. समूहमनाने ती पारंपरिक केली. दगड, डबकं, देव, आई, जा, ये, कर, धर, सुंदर, किळस, नव्हे नव्हे कोणताही शब्द अनुभवसंचिताशिवाय नसतो. त्यामुळे लोकसंस्कृती



ही अनुभूत होते. ती शाब्दज्ञानातून अर्थात शब्दब्रह्मातून शब्द प्रकटतो तो मुखातून. याच दृष्टीने मौखिक परंपरेला शाब्दवर्णनाला संस्कृतीत महत्त्व प्राप्त झाले. पृथ्वीलोक हा शब्दब्रह्माने कवळलेला आहे. प्रत्येक शब्द हा 'लोकबंध' असतो असे प्रस्तुत लेखकाने 'लोकबंध'मध्ये स्पष्ट केले आहे.[१४] लोकसंस्कृती मौखिक परंपरेने पुढिलांकडे प्रवासत राहाते.

**१७. लोकसंस्कृतीविषयी अर्धसत्य :–**

लोकसंस्कृतीविषयी बोलताना किंवा अभ्यास मांडताना मोठ्या काळजीपोटी असे म्हटले जाते की; लोकसंस्कृती लयाला जाते आहे. तिचे जतन केले पाहिजे. वास्तविक पाहता लोकसंस्कृती हा अनादिअनंत असा लोकसारणीप्रवाह आहे. यात जुन्या परंपरांना स्थलकालपरिस्थिती सापेक्षतेने नवे तपशील येऊन मिळतात. जुन्या तपशीलातही तत्त्वे, भावना तशाच राहात. नवे संदर्भ, नवी रूपे निर्माण होतात. जुने तपशील सर्वथा नष्ट होत नाहीत. नव्या रूपात अवशेषात्मकतेने ते असतातच. उदा. शुभप्रसंगी अभीष्टचिंतनाचा लोकबंध. या अभीष्टचिंतनाची नवी रूपे येतात. पूर्वी भेटून, भेट देऊन, आशीर्वाद, शुभेच्छा देऊन अभीष्टचिंतन होत होते. आज मोबाईलवर प्रतिकात्मक चिन्हे, चित्रे टाकून होते. याचा अर्थ संस्कारात्मक लोकबंध मृत होत नाही. जतन करायचे असतात तो स्थलकालपरिस्थिती सापेक्ष तपशील रूपे. सांस्कृतिक परिवर्तने होतांना काही वेळा पारंपरिक आणि नव्या स्वीकृत परंपरा दोन्ही गोष्टी अवलंबिल्या जातात. उदा. वर्धापनदिनी औक्षण करणे आणि केक कापणे दोन्ही गोष्टी केलेल्या दिसतात. विवाहप्रथेमध्ये सोळा दिवस चालणारा सोहळा ४-३-२ आणि १ दिवसावर येऊन ठेपला आहे. मर्तिकप्रथेत विद्युतदाहिनी आली आहे; तरी काही प्रेतसंस्कार खालीच केले जात आहेत. रुदनाऐवजी शोकसभांचे आयोजन होत आहे. अशी असंख्य तपशीलात्मक उदाहरणे देता येतील. याचा अर्थ एवढाच की वर्तमानात रेंगाळणारे जुन्यात जुने अवशेष जतन करून; भूतकाळातील संस्कृतीवर प्रकाश पडतो. ग्रंथनिविष्ट वाङ्मयपरंपरेप्रमाणे शाब्द स्वरूपातील परंपरांची वर्णने स्थलकालपरिस्थिती सापेक्ष तपशीलात्मक अवशेषांची उदाहरणे समोर आणतात. उदा. ज्ञानेश्वरीमधून यादवपूर्व काळापासून; यादवकाळातील लोकसंस्कृतीचे दर्शन घडते. असे असले तरी वर्तमानात त्या संस्कृतीचे दर्शन आणि अनुभवन त्या तपशीलवर्णनातून घेता येते. याच दृष्टीने संस्कृतीचे आजचे रूप हे जुन्यावरील आधुनिकतेचे

कलम घडून सुरूच असते. याचा अर्थ आजचे वर्तमान उद्याचा भूतकाळ असतो; तरी वर्तमान भूतकाळासह संक्रमित होत असते. लोकसाहित्याच्या अर्थात मौखिक परंपरांच्या रूपाने लोकसंस्कृतीचे दर्शन आणि जतनही घडत असते. म्हणजेच लोकसंस्कृतीचा लय प्रलयापर्यंत होणे शक्य नाही.

**१८. समारोप :–**

मौखिकपरंपरा अर्थात वाङ्मयपरंपरा ही सजीव आणि लोकमन प्रगट करणारी संस्था आहे. लोकसंस्कृतीत प्रचलित असलेल्या बोलीभाषा परंपरेत वाङ्मयनिर्मिती आणि लोकसाहित्याचे संकलन आणि जतन हे लोकसंस्कृतीच्या अभ्यासाच्या दृष्टीने अतिमहत्त्वाचे असते. लोकबंधांच्या आधारे लोकसंस्कृतीचे जे प्रयोगसिद्ध आविष्काररूप प्रकट होते तेच लोकसाहित्य किंवा लोकविद्या जनवाणी म्हणून ओळखले जाते. ते संवादित होते ते प्रामुख्याने शब्दपरंपरांतून आणि लोकसारणीच्या स्वरूपात, लोकसाधनांच्या सहाय्याने याच दृष्टीने लोकसंस्कृतीचा अभ्यास लोकसाहित्याच्या अभ्यासाने घडतो.

**१९. संदर्भ व टीपा :–**


१. पर्याय शब्दकोश : ठकार वि. शं., नितीन प्रकाशन, पुणे २, चौथी आ. जानेवारी २००८.

२. Marathi-English Dictionary: Deshpande M. K. Published by P. G. Pusalkar-Suvichar Prakashan Pune 30 Reprint 2008.

३. मराठी तत्त्वज्ञान–महाकोश : प्रमुख संपादक, वाडेकर (प्रो) देविदास दत्तात्रय, मराठी तत्त्वज्ञान – महाकोश मंडळ, पुणे ३०, १९७४.

४. लोकनिष्ठ अध्यात्मवाद : सहस्रबुद्धे (डॉ) अनिल, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, फेब्रुवारी २०१६.

५. श्रीमद्भगवतगीता : अ.३. श्लो.९.

६. तत्रैव, अ. ३. श्लोक २१.

७. तत्रैव, अ. १५ श्लोक १८.

८. लोकधर्म : सहस्रबुद्धे अनिल, आनंदोत्सव प्रकाशनमंच, नगर प्र. आ. २४ ऑगस्ट २०१६.

९. लोकसाहित्य– जीवनकला : (संपा) गावित (डॉ) माहेश्वरी, दास्ताने रामचंद्र आणि कं., पुणे ३०, प्र. आ. २००८.





१०. लोकसाहित्य– एक स्वतंत्र अभ्यास क्षेत्र : मोरजे (डॉ.) गंगाधर, दास्ताने रामचंद्र आणि कं. पुणे, ३० प्र. आ. १९८५.

११. लोककला: सहस्रबुद्धे (डॉ.) अनिल. E.Book-www.anilsahasrabuddhe.in. २०१७– प्रेसकडे पद्मगंधा प्रकाशन, पुणे.

१२. उनि., लोकनिष्ठ अध्यात्मवाद.

१३. तत्रैव, लोकनिष्ठ अध्यात्मवाद.

१४. लोकबंध : सहस्रबुद्धे अनिल, नितीन प्रकाशन, पुणे, नवीन सुधारित आवृत्ती २०१२.


●●●

## प्रकरण पाचवे

# लोकसंस्कृती आणि लोकसाहित्य अन्योन्य संबंध

**(The Organic Relationship between Folk-Culture and Folk-Lore)**

लोकसंस्कृतीची संकल्पना आणि स्वरूप समजावून घेतले; तसेच लोकसाहित्यविषयक विचार केला. या दोन्ही गोष्टींचा नेमका संबंध कोणत्या प्रकारचा आहे; हे आता समजावून घ्यायचे आहे. लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीचा अभ्यास करतांना; लोकसंस्कृती आणि लोकसाहित्य यांचा स्वतंत्र अभ्यास करणे आवश्यक आहे का? मुळात संस्कृतीचा अभ्यास करतांना, संस्कृती म्हणून मानवी जीवनाच्या कोणकोणत्या घटकांचा विचार करावयाचा? संस्कृतीत मानवी जीवनातील सर्वच घटक समाविष्ट असतात असे अनुभवास येते. ते सत्यही आहे. परंपरेत मात्र सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक असा वेगवेगळा विचार करण्याची प्रथा आहे. लोकजीवन हे एकात्म स्वरूपात प्रवाहित असते. संस्कृतीतील किंवा लोकजीवनप्रवाहातील, कोणताही घटक पूर्णतः स्वतंत्र, पृथक असा, जलाभेद्य किंवा वाताभेद्य दालनासारखा, विचारात घेता येत नाही. ही गोष्ट सतत लक्षात घेऊनच लोकसंस्कृती आणि लोकसाहित्य यांचे संबंध निश्चित करावे लागतात. यांसाठी 'लोकबंध' ही संकल्पना 'लोक'- लोकबंध- लोकसाहित्य या स्वरूपात लक्षात घेतली पाहिजे.

**१.'लोक'–'लोकबंध'–'लोकसाहित्य' (People-Folktype-Folklore):–**

प्रस्तुत लेखकाने 'लोकबंध'[१] या ग्रंथात 'लोक', 'लोकबंध' या संकल्पना स्पष्ट केल्या आहेत. लोकधारणा करणारे सर्व बंध, धारा, सूत्रे म्हणजे 'लोकबंध' होय. या लोकबंधांचा प्रत्यक्ष लोकजीवन सारणीतील आविष्कार म्हणजे लोकसाहित्य; असे स्पष्टीकरण या ग्रंथात केले आहे. याचा अर्थ लोकसाहित्याचा अभ्यास करायचा म्हणजे लोकबंधांच्या अनुषंगानेच अभ्यास करायचा असतो. लोकचे लोकबंधात्मक प्रकटीकरण म्हणजे लोकसाहित्य होय. 'लोक' म्हणजे एकात्म मानवी समूह असे मानले; तर ही एकात्मता म्हणजेच धारणात्मकता, निर्माण करण्याचे कार्य, लोकमानसातून प्रकट झालेल्या लोकबंधांमुळे घडते. आहार, निद्रा, भय आणि मैथुन या प्राणीपातळीवरील मूलभूत वृत्तींसह हे लक्षात घ्यायला हवे. माणूसपणाचे, जीवाआगळे वेगळेपण जपण्याच्या नैसर्गिक प्रतिभेमुळे, समग्र मानवी जीवनाला, परिवर्तनशील, स्थलकालपरिस्थिती सापेक्ष, सर्वसुखाय हेतूने, समूहमनाने निर्माण केलेली, एक व्यवस्था म्हणजे मानवी जीवनसारणी होय. यालाच लोकसारणी अथवा लोकधर्म असे म्हणता येते. ही लोकसारणी ज्या ज्या सूत्रांमुळे आकार घेते ते ते 'लोकबंध' (Folk type) लोकच्या समूहमनात दृढ आणि परिवर्तनशील स्वरूपात प्रवाहित असतात. हे 'लोकबंध' दोन प्रकाराने अस्तित्वात येतात. एक शाश्वत, स्थिर असे लोकबंध तर दुसरे अशाश्वत. ते लोकबंधात कार्यान्वित होऊन लोकसारणी पुढे नेणारे परिवर्तनशील लोकबंध असतात. हे लोकबंध तपशीलात्मक असतात. शाश्वत लोकबंध हे तत्त्वात्मक असतात. उदा. मानव समाजशील प्राणी आहे. विवाहसंस्था समाजशीलतेचा कणा आहे. योग्य नर आणि नारी समूहमनाच्या मान्यतेसह, समूहधारणात्मकतेने पतिपत्नी म्हणून सर्व व्यापार करतात. मृत्यू अटळ आहे. मरणोत्तर आत्म्यास चिरशांती मिळावी, खरा मित्र निःस्वार्थी असतो. भूतदया हा मानवधर्म आहे. अशी असंख्य तात्त्विक स्वरूपाचे लोकबंध लोकजीवनात दृढ व शाश्वत असतात. या शाश्वत लोकबंधांचे अनुसरण तपशीलात्मक वर्तन, साधन व शाब्द स्वरूपातील लोकबंधांआधारे घडत असते. या तपशीलात्मक लोकबंधांच्या व्यवहारात, शाश्वत लोकबंध अंतःस्त्रोतासारखे प्रवाहित असतात. या लोकबंधांतच लोकसंस्कृतीचे दर्शन घडत असते. हे लोकसंस्कृतीचे दर्शन लोकबंध प्रकटीकरणासाठी जे मौखिक, वर्तनात्मक आणि साधनात्मक आविष्करण घडते ते मौखिकपरंपरा प्राप्त असते. यालाच मौखिकपरंपरेने आलेली 'लोकविद्या', 'लोकसाहित्य', 'जनवाणी' अर्थात फोकलोअर असे म्हणतात.

**२. लोकसंस्कृतीचे प्रयोगसिद्ध दृश्य रूप– लोकसाहित्य :–**

लोकसंस्कृती ही सनातन अशी सारणी असते. लोकजीवनाचा हा अप्रतिहत प्रवाह, अनादी अनंत आहे. इंग्रजीत एक म्हण आहे 'World is the stage and every man is an actor' ती बहुतांशी या प्रक्रियेला लागू पडणारी आहे. लोकसंस्कृती ही एकात्म लोकसमूहाची असते. समूहातील प्रत्येक 'घटक लोक' त्या 'अंगस्वरूपलोक' मनानेच (Collective mind) वावरत असतो. एवढेच नव्हे. लोकसंस्कृती ही वैश्विक 'लोक' भावात्मकतेने प्रकटते. याचा अर्थ असा; घटकलोक (individual) केवळ अंगस्वरूपमनाने (Collective mind) वावरत असतो एवढेच नव्हे; तर तो त्याच वेळी समग्र पृथ्वीलोक अथवा विराटपुरुषरुपलोक (Universe) चे प्रतिनिधित्वही भावात्मकतेने करीत असतो. प्रत्येक माणसाची भूमिका; स्वतःचे अस्तित्व प्रकट करणे, ते समूह मनाशी अनुबंधितपणे, अर्थात समूहसारणीशी अनुबंधितपणे प्रकट करणे आणि त्याचवेळी विश्वमानवातील माणूस (human being) म्हणून भावनांसह प्रकट होणे; ही असते. हे माणसाचे अर्थात घटकलोकचे प्रकटणे लोकसंस्कृतीशी बद्ध असते. भाषा, धर्मनीतीतत्त्वज्ञान, विद्या व कला यांच्या उपयोजनपद्धती, आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक, राजकीय आदि सर्व प्रकारचे लोकव्यवहार यांशी, स्थलकालपरिस्थिती सापेक्षतेने, हे घटकलोकचे प्रकट होणे बद्ध असते. म्हणजे उठणे, बसणे, जेवणे, झोपणे, नातेसंबंध जपणे, सौंदर्यविषयक दृष्टिकोन, व्यावहारिकता आदि सर्व गोष्टीमध्ये, त्यास लोकसारणीबद्ध कार्ये करीत प्रकटावे लागते. घटकलोकचे वावरणे, अंगस्वरूपलोकचे वावरणे, आणि वैश्विकपातळीवर विराटपुरुषरुपलोकचे प्रकटणे हा एक अनादिअनंतपणे मानसिक, शारीरिक आणि सामूहिक नाट्यप्रयोगच असतो. हा नाट्यप्रयोग ज्या लोकबंधांच्या सहाय्याने 'लोक' सिद्ध करतो; ती लोकसारणी असते. प्रत्येक क्षणी कोणत्यातरी शास्त्रात असे सूत्र आहे म्हणून आता ही कृती करूया असा विचार सामान्यतः घटकलोक, अंगस्वरूपलोक किंवा विराटपुरुष लोकच्या जाणिवेत नसतो. अनुभवातून लोकधुरिणांनी निर्माण केलेली, लोकसुखावहतेसाठी उपयुक्त अशी शास्त्रे; समूहमनाने लोकसारणी प्रवाहात लोकस्वभाव म्हणून प्रवाहित केलेली असतात. यांनाच आपण परंपरा असे म्हणतो. या परंपरांच्या प्रयोगसिद्धतेतून आपसूक येणाऱ्या अनुभवांनी शास्त्रे विकसित केली जातात व ती पुन्हा सारणीत प्रवाहित होतात. हे



अनादिचक्र सुरू असतांना; जे लोकबंध समूहमान प्रकट होतात; ते पारंपरिक स्वरूपात प्रयोगसिद्धीकरणाचे आधार असतात. ते धारणाबंध असतात. त्या धारणाबंधांनुसारच 'लोक'चा त्रिविध पातळीवरील समग्र व्यवहार सुरू असतो. हेच लोकसंस्कृतीचे प्रयोगसिद्ध दृश्यरूप असते. या दृश्यरूपाला अलिकडील काळात Folk-lore- लोकसाहित्य असे नाव आहे. दृश्यरूपात दिसणारे लोकसांस्कृतिक जीवन हे लोकसाहित्य असते. या लोकसाहित्याचे संकलन करून; पद्धतशीर अभ्यास करू लागलो; की लोकसाहित्यातील, शाब्दपरंपरा, साधनपरंपरा आणि वर्तन तथा विधिपरंपरा आपल्याला अनादिअनंत लोकजीवन प्रवाहाचे दर्शन घडवू लागतात. लोकसाहित्यातील प्राक्कथा, लोकगीतांतील दुर्बोध वाटणारे उल्लेख उदा. 'चावडीत होती निळी घोडी लाथा मारी फडाफडी'[२] यातील 'निळीघोडी', पशू, पक्षी, सरपटणारे प्राणी या आदिम प्रतिमारूप अवशेषांप्रमाणे पुढे येतात आणि प्रागऐतिहासिक लोकसंस्कृतीपर्यंत घेऊन जातात. या प्रतिमांचा स्वतंत्र मानसशास्त्रीय अभास करण्याचा प्रयत्न संघमानसशास्त्रात झालेला दिसतो. यांना Archytype असे म्हटले जातात. मराठीत यांना मूलाकार असे नाव आहे. हे व्यापक अर्थाने 'लोकबंध'च (Folktype) असतात. याचा अर्थ असा; की लोकसाहित्य हे लोकसंस्कृतीचे वर्तमानातील प्रकटरूप म्हणून तर प्रकटतेच; त्याचबरोबर मानवी जीवनाच्या आरंभबिंदूपासून वर्तमानापर्यंतचे सांस्कृतिक चित्र उभे करते. लोकसाहित्य हे नित्य वर्तमान असते असे म्हटले जाते, याचे कारण हेच आहे; की लोकसंस्कृती हा अप्रतिहत प्रवाह असल्यामुळे ती स्थलकालपरिस्थिती प्राप्त संदर्भासह, लोकबंधांची नवी रूपे धारण करीत, अनादिकालाचे भावात्मक संवेदनात्मक आणि समग्रस्वरूप दर्शन घडविणाऱ्या अवशेषांसह, लोकसाहित्य स्वरूपात प्रकट होते. त्या त्या काळात, लोकसाहित्य त्या काळाचे वर्तमानच असते. लोकसंस्कृती ही नेहमी इतिहास व वर्तमानात, वर्तमानाला कवेत घेऊन जगण्याचे सामर्थ्य राखते म्हणूनच लोकसाहित्य हे लोकसंस्कृती अवस्थेचे वर्तमान दृश्यरूप असते. हे रूप नाट्यमयरूपात प्रयोगसिद्धतेने पुढे येते. या रूपाचे शास्त्रीय मांडणीसह व्यवस्थापन करून; त्या आधारे लोकसंस्कृतीच्या आणि शास्त्रीय पायावर उभ्या करावयाच्या ऐतिहासिक संस्कृतीचा शोध घेण्याचे काम लोकसाहित्य चिकित्सेच्या अंतर्गत येते. लोकसाहित्याचा धांडोळा करतांना क्षेत्रीय अभ्यास पद्धतीचा वापर करावा लागतो. तो कोणत्या प्रकारे

करावा याची चर्चा प्रस्तुत लेखकाने 'लोकसाहित्य संशोधन पद्धती'[३] या ग्रंथात स्वतंत्रपणे केली आहे. अभ्यासकांनी त्या ग्रंथाचे अवलोकन करावे. लोकसंस्कृतीचे प्रत्यक्ष दर्शन जसे लोकसाहित्याच्या आविष्कारातून प्रयोगसिद्धतेने घडते; तसेच लोकसंस्कृतीच्या स्थलकालपरिस्थिती सापेक्ष रूपाची चिकित्सा व स्वरूपमांडणी, लोकसाहित्याच्या आधारे, 'लोकबंधात्मक चिकित्सा' करून करता येते. लोकबंधात्मक चिकित्सा कोणत्या प्रकारे करावी; हे प्रस्तुत लेखकाने 'लोकबंधात्मक चिकित्सा'[४] या ग्रंथात, सोदाहरण स्वरूपात केली आहे. लोकसाहित्याच्या एकेका प्रयोगाची चिकित्सा, सूक्ष्म तपशीलासह करू लागले; की त्या प्रयोगाचे सांस्कृतिक आकार रूप स्पष्टपणे उभे राहते. अभ्यासकाला यासाठी समग्रचिकित्सा दृष्टी मात्र हवी. ही चिकित्सा भावबंध, (Feeling type), कल्पनाबंध (Motif) या स्वरूपाच्या 'लोकबंधा' (Folktype) च्या आधारे करता येते. ही चिकित्सा जेवढी रंजक, तेवढीच गंभीरपणे लोकसंस्कृतीच्या अनादिअनंत रूपाचा उलगडा करण्यास सक्षम ठरते. का? कसे? कोणत्या काळात? कोणत्या प्रकारच्या परिस्थितीत हा सांस्कृतिक आकार (Culture type) प्रवाहित झाला याचे उत्तर या चिकित्सेमुळे मिळते. लोकसंस्कृतीविषयक समग्र रूप कल्पना देण्याचे सामर्थ्य, लोकसाहित्यात असल्याने, इतिहास, मानववंशशास्त्र, मानसशास्त्र यासह सर्व मानव्यशास्त्रे आणि भौतिकशास्त्रे. अर्थात निगम आणि आगमशास्त्रे यांच्या विकासावर आणि लोकसांस्कृतिक प्रचलनावर नेमकेपणे प्रकाश पडतो. या सर्व दृष्टीने लोकसंस्कृतीचे प्रयोगसिद्ध दृश्यरूप म्हणून लोकसाहित्याचा अनुभव घ्यावा लागतो. वस्तुतः हा अनुभव प्रत्येक घटकलोक आणि अंगस्वरूपलोक स्वाभाविकपणे, अजाणतेपणे, सवय म्हणून घेतच असतो. तोच अनुभव लोकसाहित्यशास्त्र, जाणीवपूर्वक घेऊन; लोकसंस्कृती व लोकसाहित्य यांची अंतःस्त्रोताचे बहिर्दर्शन या स्वरूपात पुनर्मांडणीने करते.

**३. लोकसंस्कृती आणि लोकसाहित्य अनुबंध चिकित्सा :-**

लोकसंस्कृतीचे प्रयोगसिद्ध दृश्यरूप- लोकसाहित्य; असे जेव्हा आपण म्हणतो; तेव्हा लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती या दोन गोष्टी म्हणून पृथकपणाने विचार करता येत नाही, हे स्पष्ट आहे. संस्कृतीचे प्रकटरूप नेमके कोणत्या प्रकाराने प्रकट होते; हे तपासणे, किंवा त्याचे पद्धतशीर निरीक्षण करणे; म्हणजे लोकसंस्कृती आणि लोकसाहित्य अनुबंध चिकित्सा होय.



काही उदाहरणांच्या चिकित्सेच्या आधारे हे स्पष्ट करणे क्रमप्राप्त आहे. आहार, निद्रा, भय आणि मैथुन या चार प्राणीप्रवृत्तींचा विचार माणसाने संस्कृती साकारतांना कसा केला? अंगस्वरूपलोकमध्ये लोकसमूहाच्या एकात्मतेचा विचार गृहित आहे. ही एकात्मता सिद्ध करण्यासाठी लोकसमूह सतत प्रयत्नशील असतो. याचबरोबर मानव अन्य जीवमात्रांपेक्षा भिन्न आहे का? मी कोण आहे? का आहे? ही जडचेतन सृष्टी; का? कोणी, निर्माण केली? उत्पत्ती, स्थिती आणि लय या सृष्टीत कोण, का, कसा घडविते? असे प्रश्नजंजाळ त्याच्या प्रतिमेभोवती निर्माण झाले. जिज्ञासा, कुतूहल आणि शरण्यभाव त्याच्या मनी निर्माण झाले. या त्याच्या आकलन, ग्रहण आणि प्रतिभाशक्तीने, मानवात दैवतनिर्मितीप्रवृत्ती निर्माण केली. लोकसंस्कृतीचा जन्म झाला. 'पर दुःखाने रडला मानव । देव प्रकटला त्याच क्षणी' ही उक्ती ह्या प्रक्रियेचे द्योतक आहे. समूहवृत्तीने निसर्गतः जगणारा मानवप्राणी स्वतःसाठी अर्थात घटक लोकसाठी आणि स्वसापेक्ष समूहासाठी अर्थात अंगस्वरूप 'लोक'साठी मूलभूत विकारांच्या अर्थात गरजांच्या, सहज, सुखरूप पूर्ततेसाठी अन्य सृष्टीचा आणि अन्य लोकसमूहांचा विचार करू लागला. तेथेच त्याच्यातील संचय आणि स्वामित्व प्रवृत्ती निर्माण झाली. त्याचबरोबर या दोन प्रवृत्तींच्या पूर्ततेसाठी जशी प्रयत्नप्रवृत्ती निर्माण झाली; तशीच पाशवी स्वामित्वप्रवृत्ती अर्थात राक्षसी प्रवृत्ती आणि विकृतीही निर्माण झाल्या. या सर्व प्रवृत्तींतून निर्माण होणाऱ्या वैयक्तिक आणि सांघिक स्वरूपातील संघर्षाने लोकजीवनाला सामाजिक आणि राजव्यवस्थेचे रूप दिले. हे सर्व विवेचन तात्त्विक संगती लावणारे वाटले; तरी लोकसंस्कृतीतील मूळ भावबंध आणि कल्पनाबंध (Feelingtype and Motif) अर्थात लोकबंध (Folktype) यांतून निर्माण झाले. या सर्व बंधांना भाषिक किंवा शाब्द प्रतिमांच्या स्वरूपात लोकबंधात सामावून; समूहमनाने प्रकट करण्याचा सनातन उद्योग 'लोक'मध्ये निर्माण झाला. साधने, क्रियाप्रतिक्रियात्मक वर्तन आणि विधी यांनाही शाब्दबंधात्मक आकार मिळाले. विधिविधानांची निर्मिती अशी झाली. त्यांच्या सतत परिवर्तनशील परंपरा, बदलते संदर्भ, बदलती रूपे, मूळ भावबंध आणि त्यांच्याशी निगडित मूलभूत प्रवृत्तींसह प्रकट होऊ लागली. हे सर्व घडत असतांना प्रत्येक वर्तन प्रयोगामध्ये समग्रलोकजीवनघटक, अंतस्त्रोताप्रमाणे शाब्द आणि अन्य सर्वसाधनांच्यासह, प्रकट होऊ लागले. लोकसंस्कृतीचे

दृश्यरूप अर्थात लोकसाहित्य असे व्यामिश्रतेने प्रकट होत असते. लोकसंस्कृती आणि लोकसाहित्य अनुबंधांची सोदाहरण चिकित्सा करतांना ही समग्र तात्त्विक आणि सारणीतील प्रक्रिया, सतत ध्यानात ठेवावी लागते. तरच लोकसाहित्य रूपातून समग्र सनातनासह वर्तमानात लोकसंस्कृती कशी अनुभवता येते हे स्पष्ट होऊ शकेल. प्रस्तुत प्रकरणात काही मोजक्या उदाहरणांची या दृष्टीने चिकित्सा करण्याचा प्रयत्न आपण करणार आहोत.

**३.१ विवाहप्रथा :-**

वधूवर संशोधनापासून विवाहप्रथेला सुरुवात होते. ती गर्भाधानानंतर संपन्न होते. यात शिशुविवाह, बालविवाह, कुमारविवाह, प्रौढविवाह असे वयोगटानुसार विवाहप्रकार संभवतात. विधवाविवाह, पुनर्विवाह, अनेकभार्याविवाह, अनेकपतिविवाह (अपवादात्मक) असे अवस्था किंवा अपेक्षा विवाह प्रकार संभवतात. भारतीय संस्कृतीमध्ये अष्टप्रकारच्या विवाहांची मान्यताप्राप्त परंपरा दिसते. 'धर्मसिंधू'मध्ये ब्राह्म, दैव, आर्ष, प्राजापत्य, गांधर्व, राक्षस आणि पैशाच असे विवाहाचे आठ भेद आहेत.[५] (१) ब्राह्म- वराला आमंत्रण देऊन कन्यादानाचे विधीने कन्या देणे. (२) दैव- यज्ञामध्ये ऋत्विजाचें काम करणाराला अलंकारयुक्त कन्या अर्पण करणे. (३) आर्ष- वराकडून एक अथवा दोन गोमिथुने घेऊन; त्याला कन्या अर्पण करणे. (४) प्राजापत्य- गृहस्थाश्रम स्वीकारून; पत्नी जिवंत असेतो दुसराविवाह अथवा संन्यास ग्रहण न करण्याच्या अटीवर कन्यादान करणे. (५) आसूर- ज्ञातीला यथेच्छ धन देऊन; विवाह करणे. (६) गांधर्व- वधूवर परस्पर इच्छेने परस्पर संबंध ठेवतात /होतात. (७) राक्षस- युद्धादिकांत बलानें कन्येचे हरण करून विवाह करणे. (८) पैशाच- चोरी करून कन्येचे हरण करणे. पहिल्या चार प्रकारात प्राजापत्यापेक्षा आर्षश्रेष्ठ, आर्षाहून दैव श्रेष्ठ व दैवाहून ब्राह्म श्रेष्ठ होत. पुढील चार प्रकारात आसूराहून गांधर्व निंद्य, गांधर्वाहून राक्षस निंद्य, राक्षसाहून पैशाच निंद्य होत. या आठ प्रकारात वर्णांप्रमाणे ब्राह्मणाला ब्राह्म व दैव प्रशस्त, क्षत्रियाला गांधर्व, राक्षस प्रशस्त, वैश्याला आसुर प्रशस्त आणि विशेष बाब म्हणजे आर्ष; प्राजापत्य व पैशाच हे सर्वांना प्रशस्त; अशी परंपरा असल्याचे म्हटले आहे. संकट असेल तर ब्राह्मणाने राक्षस सोडून उर्वरित कोणत्याही प्रकारे विवाह करावा. क्षत्रियाने ब्राह्म व दैव सोडून अन्य कोणत्याही प्रकारे विवाह करावा. वैश्य व शूद्र यानें ब्राह्म, दैव व राक्षस सोडून इतर पाचपैकी



कोणत्याही प्रकाराने विवाह करावा. काही परंपरा याप्रमाणे सप्तपदी होईपर्यंत विवाह संपन्न होत नाही. अर्थात त्यापूर्वी काही दोष, संकट, अपघात, याविषयी लक्षात आल्यास, कन्येने दुसऱ्या वराशी विवाह करावा. विवाहाप्रकारानुसार पुत्रास पूर्वज पिढ्या उद्धरण्याचे सामर्थ्य प्राप्त होते. उदा. ब्राह्म- पूर्वीच्या दहा व पुढील दहा वीस पिढ्या उद्धरतो. दैव- सात पिढ्या, प्राजापत्य- सहा पिढ्या इ. विवाह विधींमध्ये काही दोष घडले असेल तर त्याचे प्रायश्चित्तही सांगितले आहे.

भारतीय परंपरेतील अष्टविवाह प्रकार पाहिले तर जगभरातील सर्व लोकसमूहातील विवाहपरंपरांचा समावेश थोड्याफार तपशीलात्मक बदलाने यातील विवाहात होतो. दुसरे महत्त्वाचे म्हणजे निर्माण होणाऱ्या प्रत्येक समस्येवर, दोषांवर तोडगा किंवा उपाय आहेच. याचा स्पष्ट अर्थ असा विवाह हे सांस्कृतिक बंधन कुटुंब आणि समूह यांच्या स्थैर्याच्या दृष्टीने अनिवार्य आहे. म्हणूनच ते स्थलकालपरिस्थिती सापेक्षतेने समावेशक आहे.

लोकसंस्कृती आणि लोकसाहित्य यांचा अनुबंध तपासतांना समूहमनातील भावबंध आणि कल्पनाबंध (Feelingtype and Motif-Folktype) अर्थात 'लोकबंध' लक्षात घ्यावे लागतात. विवाहविधीमध्ये रजोदर्शन कालापासूनचा विचार होतो. विवाह होईपर्यंत अनेक घटकविधींचा समावेश होतो.

(१) विवाहासंबंधी भावबंध आणि कल्पनाबंध- लोकसंस्कृतीमध्ये कुटुंब, ग्राम, समाज आणि व्यापक लोक या घटकांचा विचार केला तर- मानवीमूल विकार, मैथुन, संभोग किंवा प्रजननविषयक भावबंध असा- 'लोक' मधील प्रत्येक घटकलोकची भयमुक्त, स्वाभाविक आणि सन्मान्य प्रजनन संभोग किंवा मैथुनविषयक सुव्यवस्था झाली पाहिजे. हा भावबंध अर्थात मूलभूत समूहमनस्क, एकात्मभावविषयक 'लोकबंध' होय. यांसाठी विवाह करणे हा मुख्य कल्पनाबंध होय. या कल्पनाबंधामागे, कौटुंबिक व सामाजिक स्थैर्य, कर्तव्यपालन, असे भावबंध असतात. या अंतर्गत तपशीलात्मक अनेक लोकबंध निर्माण होतात. जसे- (१) शुभाशुभविवेक- विवाहयोग्य वय, लोकमानसाचा कौल, विवाह करण्याचा निर्णय, वर व वधू यांचे ग्रहबल अथवा लग्नयोग निर्णय, नक्षत्र निर्णय, चंद्रबल, गोत्र, देवक नातेसंबंध वा सामाजिक संबंध विचार, याविषयी लोकपरंपरेमध्ये अनेक कल्पनाबंध असतात.

त्यातील काही कल्पनाबंधांचा विचार पारंपरिक शास्त्रे आणि रूढी यांतून पुढे आलेला असतो. या सर्व गोष्टी मातापिता, वडीलधारे, सगेसोयरे, मित्रपरिवार, गावपंचायत यांच्या लोकपारंपरिक रीती किंवा रूढींप्रमाणे केला जातो. या प्रक्रियेतून वर व वधू संशोधनाच्या अनेक परंपरा पुढे आलेल्या दिसतात, मागणी घालणे, सुचविणे, मध्यस्थी करणे, येथपासून वर्तमानातील मॅरेजब्यूरोपर्यंत, किंवा वधूवर संशोधन जातीनिहाय, जातीभेदरहित, जाती, पंथ, धर्म ओलांडून अशा स्वरूपात मेळावे, जाहिराती इ. प्रकार आज दिसतात. उलट्या क्रमाने गेल्यास वरवधू संशोधनविषयक प्राचीन कल्पनाबंधापर्यंत जाता येते. जगभरात याविषयी अनेक तपशीलात्मक भेद दिसले तरी; त्यामागील मुख्य भावबंध आणि कल्पनाबंध लोकसांस्कृतिक मूलाकारस्वरूपात स्थिर असतो. सहमतीने नाते मान्य करून एकत्र राहणे ही अवस्थाही या भावबंध आणि कल्पनाबंधाचेच द्योतक असते. (२) वाग्दान किंवा सुपारी फोडणे. भावबंध-लोकमान्यतेसह विवाहनिश्चिती करणे, वाक्‌निश्चय करणे, विधी-मुला-मुलींच्या पालकांनी मुला-मुलींचा विवाह जुळल्याबद्दल बोलून दाखवून लोकमान्यता मिळविणे. **विधीविषयक कल्पनाबंध-** गणपतीपूजन, वरुणपूजन, शचीपूजन व सौभाग्य वाण, वधूपूजन, वरपूजन, वधूवर पक्षाचे पूजन, साक्षगंध, हळदीकुंकू करून वाग्दान विधी संपन्न होतो. **अ) वर्तनपरंपरा-** कल्पनाबंधानुसार पूजनविधी पुरोहिताच्या किंवा पंचायतप्रमुख किंवा मध्यस्थाच्या सांगण्यानुसार लोकपरंपरेप्रमाणे करणे. **ब) साधनपरंपरा-** विविध भूमिकातील लोक व त्यांच्या शारीर हालचाली, गंध, अक्षता, सुपाऱ्या, विड्याची पाने, पाट, वस्त्रे, हळदीकुंकू आदि लोकपरंपरेनुसार देहरूप व वस्तुरूप साधने, यांत स्थलकालपरिस्थिती आणि जात, संप्रदाय, धर्म यानुसार तपशील बदलतात. **क) शाब्द परंपरा-** प्रत्येक विधीविषय, मंत्र, तंत्र, भूमिका आणि उद्‌घोषणा यांविषयी भाषिक, गेय अथवा संवादात्मक परंपरा असतात. त्यांचे आविष्करण त्या त्या प्रसंगी होते.

**वाग्दान समयीची उद्‌घोषणाः-** कन्यापित्याने किंवा मामाने इ. करावी- अमुक प्रवर असलेला अमुक गोत्रांमध्ये (कुळात) उत्पन्न झालेला, अमक्याचा पणतू, अमक्याचा नातू, अमक्याचा मुलगा, अमुक पूर्ण नावाचा हा वर यास अमुक प्रवर असलेली, अमुक गोत्रामध्ये (कुळात) उत्पन्न झालेली, अमक्याची पणती, अमक्याची नात, अमक्याची- माझी अमुक नावाची, ही कन्या, ज्योतिषाने नेमून दिलेल्या सुमुहूर्तावर देईन; उद्‌घोषणेनंतर पुरोहितासह सर्वांनी 'आपले म्हणणे कायम ठेवा' असे म्हणता मान्यता द्यावयाची. याच प्रकारे वरपित्याने/मामाने इ.- तुम्ही आपली कन्या आमच्या मुलास राजीखुषीने दिली; ती आम्ही आमच्या मुलाकरिता स्वीकारली. याकरिता आता वरावलोकन म्हणजे सूक्ष्म रीतीने वराची परीक्षा अर्थात ज्या दोषांमुळे त्याला कन्या देणे योग्य होणार नाही असे दोष त्याचे ठिकाणी नाहीत, अशी खात्री करून घेण्याचा निश्चय करा आणि सुखी व्हा. उद्‌घोषणेला पुरोहितासह जमलेल्यांनी मान्यता द्यावी.

संपूर्ण विधिविषयक कल्पनाबंध, आविष्कृत होताना; वर्तनपरंपरा, साधनपरंपरा आणि शाब्दपरंपरा प्रकटणे म्हणजे लोकसाहित्याचा प्रयोगसिद्ध होणे होय. यांत वर्तनविषयक, साधन मांडणी आणि उपयोजनविषयक आणि शाब्द स्वरूपात अनेक सूक्ष्म लोकबंध अर्थात भावबंध व कल्पनाबंध असतात. त्यांना शुभाशुभ भावात्मक लोकधारणा असते. वैदिक व पुराणपरंपरेनुसार प्रत्येक कल्पनाबंध आविष्कृत करण्यासाठी मंत्र आहे. उदा. वाग्दान संकल्प- ''ममास्याः कन्यायाः करिष्यमाण विवाहांगभूतं वाग्दानमहं करिष्ये ।'' असा मंत्र 'स्वयंपुरोहित' ग्रंथात दिला आहे.[६] संस्कृत मंत्रांप्रमाणे स्थलकालपरिस्थिती सापेक्ष बोलीभाषेतही शाब्दपरंपरांवरील उद्‌घोषणांप्रमाणे पाहावयास मिळतात.

मूळ भावबंध प्रकट करण्यासाठी निर्माण झालेले विविध कल्पनाबंध त्या 'लोक'चे धारणाबंध असतात, अर्थात लोकबंध असतात. या लोकबंधांचे प्रकटीकरण म्हणजे लोकसाहित्य; तर भावबंध व कल्पनाबंधांची पारंपरिक दृढता म्हणजे लोकसंस्कृती. अशाप्रकारे लोकसंस्कृतीचे प्रयोगसिद्ध दृष्यरूप म्हणजे लोकसाहित्य होय. हे दृश्यरूप लोकसाहित्याच्या रूपात; म्हणजे प्रामुख्याने शाब्दपरंपरांच्या आश्रयाने वर्तनपरंपरा आणि साधनपरंपरांसह प्रकट होते. या त्रिविधपरंपरा एकात्मतेने लोकसाहित्याचा अर्थात लोकसंस्कृतीचा प्रयोग घडवितात.

विवाह संस्कारातील प्रमुख सर्व विधींची वरील प्रकारे लोकसाहित्यशास्त्रीय चिकित्सा करता येईल. विवाहसंस्कारांतर्गत भारतीय परंपरेप्रमाणे (१) वाग्दान (२) सीमांतपूजन (३) तैलहरिद्रारोपण (४) विवाहपूर्वदिन कृत्य- (मंडपप्रतिष्ठा, देवकस्थापना अर्थात मुहूर्तमेढ व देवप्रतिष्ठा) (५) वराचे वधूगृही गमन- जानोसवाड्यात येणे (६) मधुपर्क (मध, दही यांचे मिश्रण अथवा दूध, मध

किंवा गूळ एकत्र करतात. त्याचा वराचे मानकऱ्यांचे पाय धुण्यासाठी वापर करतात) (७) गौरीहारपूजा (८) अंतःपटधारण (९) लग्न लावण्याचे वेळी म्हणण्याचे सत्येनाक्तभित सूक्त (शुभमंत्रोच्चार) (१०) मंगलाष्टके (११) परस्पर निरीक्षण (१२) लग्न लागल्यानंतर म्हणावयाचे, ऋक्चवेवाक्यानी ब्राह्मण खंड (शुभवचने) (१३) कन्यादानप्रयोग (सुवर्णाभिषेक, सूत्रवेष्टन, कंकणबंधन अक्षतारोपण, तिलक व पुष्पमाला अर्पण, मंगलसूत्र बंधन, वस्त्रग्रंथीबंधन (१४) विवाहहोम (लाजा होम, सप्तपदी) (१५) गृहप्रवेशनीय होम (१६) वधूवरव्रत वधुवरांनी पाळावयाचे नियम निश्चय अर्थात व्रतस्थता स्वीकारणे (१७) विवाह चतुर्थदिनकृत्य ऐरिणीदान अर्थात बांबूचे (वेळूचे) परडे अर्थात झाल होय. झाल विधी करण्याच्या अनेक प्रथा आहेत. (१८) वधूसह गृहप्रवेश (लक्ष्मीपूजन) (१९) देवकोत्थापन व मंडपोद्वासन (देवक उठविण्याचा विधी) अशा मुख्य विधींची परंपरा सनातन आहे. यात काही विधी पुराणॉपरंपरेने तर काही स्थानिक लोकपरंपरेने करण्यात येतात. वैदिक पद्धती आणि पौराणिक पद्धती या सनातनशास्त्र प्रमाणित पद्धती मानल्या जातात. त्यात स्थलकालपरिस्थिती सापेक्षतेने काही लोकरूढी स्वरूपता येते. त्यांनाही लोकमान्यता असते. यात केवळ तपशील बदलतो.

विवाह विधीचे वेळी जसे संस्कृत मंत्र आहेत तसेच सामगायन व लोकगायन स्वरूपात, धवलेरी म्हणण्याची प्रथा आहे. त्यात मुहूर्तापासून ते बोळवणीपर्यंत आणि गृहप्रवेशांपर्यंत, तसेच सन्मानकारक, विहिणीसाठी ही गाणी आढळतात. विवाहप्रसंगीच्या मौखिक परंपरागत लोकगीतांना मंत्रसामर्थ्य असते. पंथ, संप्रदाय, जाती, जमाती, धर्म यानुसार विवाहविधी संपन्न करण्यासाठी गेय तथा गद्यस्वरूपातील उद्घोषणास्वरूपात पारंपरिक विधाने आढळतात.

पुनर्विवाह, विधवाविवाह, मोहीतर इ. प्रकारचे विवाह करण्यासाठीही काही विशेष विधी केले जात. त्यात दोष निवारणाला महत्त्व असते. विवाहप्रसंगीची पारंपरिक अशी परिभाषा निर्माण झाली आहे. विहिणी, वरमाय, वधुमाय, वऱ्हाड, जानोसवाडा, बोहले, मांडव परतणे, उखाणे घेणे, वरात, मुहूर्त करणे, विडा देणे, अक्षत देणे, शेवंती, बोळवण असे कितीतरी शब्द सांगता येतील. लोकसांस्कृतिक विधी किंवा संस्कार संपन्न करतांना या व अशा पारिभाषिक शब्दांचीच पेरणी केली जाते. मागणं, गाठ, बांधणे, कुळधर्म, देवदेव, मूळ धाडणे, मुऱ्हाळी. विवाहाची बोलणी सुरू झाल्यापासून



मुलगी माहेरी येऊन परत जाईपर्यंत, अशा पारंपरिक लोकभाषेतूनच लोकसंस्कृती प्रयोगसिद्ध होत; लोकसाहित्य रूपात प्रकटते. विवाहप्रथेचे जसे महत्त्व तेवढेच महत्त्व मर्तिकप्रथा व जन्मप्रथेचे असते, या दृष्टीने त्यांची चिकित्सा या पद्धतीने करणे आवश्यक वाटते.

**३.२ मर्तिकप्रथा :–**

लोकसंस्कृतीतील ही अतिसंवेदनशील संस्कार प्रथा होय. सकृतदर्शनी मृतास पुरणे, समाधी देणे, थडगे करणे (तुरबत) किंवा जाळणे अशा प्रथा दिसतात. पारशी लोक अग्यारीत मृतास ठेवतात. मृताचे अशौच पालन प्रथा सर्व जगभर पाहावयास मिळते. मृत घोषित करण्यापासून प्रेतसंस्कारास सुरुवात होते. शौच प्राप्त होईपर्यंत तीन, दहा, तेरा, वीस, चाळीस व साठ दिवस अशा विविधतेने अशौच पालनाच्या प्रथा जगभरात दिसतात. वार्षिक स्मृतीदिन अथवा श्राद्धविधीही विविधप्रकारे केला जातो. मृतांची खूण, स्मरण म्हणून विशिष्टस्थळी त्यांच्या मूर्ती करून बसविण्याची प्रथाही पाहावयास मिळते. जगभरात ही प्रथा ग्रामसंस्कृतीत आणि कृषीसंस्कृतीत पाहावयास मिळते. मर्तिक प्रथेला उत्तरक्रिया असे म्हणतात. उत्तरक्रिया करण्यासाठी स्मशानभूमी, समाधीभूमी निर्धारित केलेली असते. त्यात मृताच्या प्रेताची वरीलप्रमाणे व्यवस्था लावल्यानंतर; उत्तरक्रिया सुरू होते. या क्रियेलाही, मरणोत्तर सत्यगती मिळण्यासाठीची क्रिया असे म्हटले जाते. संपूर्ण मर्तिकप्रथेत पुरोहिताचे महत्त्व अधिक असते. उत्तरक्रियासंबंधी संस्कार, क्षेत्रांच्या ठिकाणी जाऊन करण्याची प्रथाही आहे. मृत व्यक्तीविषयक अनेक लोकसमजुती आढळतात. त्यात आत्मा अशांत अथवा अधांतरी राहाणे, आत्मा पिशाच्चयोनीत जाणे, आत्म्याचा संचार विशिष्ट वेळी (स्वारीच्या स्वरूपात भ्रमंती) घडतो. पिशाच्च झपाटणे हेही प्रकार आढळतात. व्यक्तीच्या ठिकाणी संचार झाल्यावर, त्याचा साधन म्हणून उपयोग करीत मृत आपल्या अतृप्त इच्छा पूर्ण करून घेतात. या इच्छा मृताचे प्रियजन मर्तिकप्रथा किंवा प्रेतसंस्कार म्हणून व आत्म्यास सत्यगती, व शांती मिळावी म्हणून करतांना जगभर आढळते. पृथ्वीवरील सर्व जातीजमाती, पंथ, धर्म संप्रदाय, समूह यात आढळतात. मृत व्यक्तीवरील प्रेम आणि कृतज्ञता व्यक्त करणे आणि दुःख व्यक्त करणे, तसेच त्यांचे उत्तराधिकारी म्हणून कौटुंबिक, सामाजिक, स्वरूपाच्या तसेच प्रजननविषयक सर्व जबाबदाऱ्या घेणे अशा भावबंध (Feelingtype) जगभरात आढळतो. प्रेतसंस्काराविषयीचे

अनेक कल्पनाबंध उपरोक्त सर्व समजुतींनुसार लोकजीवनात आढळतात. यात मृत घोषित करणे, शोक व्यक्त करण्यांसाठी, आठवणीं उजळण्यासाठी आकांत मांडणे, समूह व व्यक्ती पातळीवर रुदन करणे, मृताची व्यवस्था जेथे करावयाची असेल, ती जागा शुद्ध करणे, तेथपर्यंत नेण्यासाठीची यात्रा किंवा मिरवणूक काढणे, या मिरवणुकीत प्रियजनांची स्थाने निश्चित असणे, प्रेतसंस्कारासाठी पुरोहिताची नियुक्ती करणे, प्रेतसंस्कारातील उत्तरक्रियेत मृताच्या प्रियजन, आप्त अर्थात सगेसोयरे यांचे दुःखनिवारण करण्यासाठी व दुःखात सहभागी होण्यासाठी उत्तरक्रियेत सहभागी होणे, समाचारास जाणे, मृताच्या प्रियजनांचा अन्न वस्त्रे देऊन कडू घास काढणे, कृतज्ञता व्यक्त करणारी भाषणे संवाद करणे, तात्त्विक संवाद करणे, मृताच्या अतृप्त इच्छांविषयींचे संकेत पाळणे, त्या संबंधित अनेक क्रिया करणे व करवून घेणे अशा प्रकारचे अनेक कल्पनाबंध (Motif) असतात. भावबंध आणि कल्पनाबंध स्वरूपातील हे 'लोकबंध' दृश्य स्वरूपात आणण्यासाठी वर्तनपरंपरा (शारीरिक हालचाली, विधी संपन्न करण्यासाठीचे वर्तन करणे), साधनपरंपरा (शारीर आणि वस्तुरूप, साधनाचे उपयोजन करणे) आणि शाब्दपरंपरा (सर्व प्रकारचे 'लोकबंध' हे शाब्दपरंपरेत बंदिस्त असतात.) अर्थातच वर्तनपरंपरा आणि साधनपरंपरा विशिष्ट शाब्दपरंपरेतूनच व्यक्त होत असतात. शाब्दपरंपरांच्या आधाराने वर्तन, साधनपरंपरांचे विधिविधानात्मक स्वरूप अर्थात लोकसाहित्यात्मक स्वरूप प्रकट होते. उदा. विशिष्ट प्रकारची वाजंत्री अथवा जप घोषणा (श्रीराम जयराम जयजयराम / लाह लाह इलईलाह इ.) करीत मिरवणूक आली तर त्याला प्रेतयात्राच म्हणतात. प्रेतयात्रा या लोकबंधात वर्तन साधनपरंपरांसह विधी संपन्न होतो. प्रेतसंस्कारातील सर्व संस्कारांच्या संदर्भात अशा शाब्द साधन आणि वर्तनपरंपरा प्रचलित असतात. या परंपरांना धर्मशास्त्राचा आधार असल्याचे सांगितले जाते. असे असले तरी; लोकपरंपरेत अनेक तपशील स्थलकाल परिस्थिती सापेक्षतेने बदलतात. उदा. तिरडी, विमान, पेटी बांधण्याची उचलण्याची, वाहण्याची प्रथा सर्वत्र साधारण समान वाटली; तरी त्याविषयीच्या संकेतात; अनेक प्रकारे भिन्नता आढळते. लोकसाहित्य प्रयोगातून ते स्पष्ट होते.

भारतीय सांस्कृतिक परंपरेप्रमाणे, लोकसंस्कृतीत मर्तिकप्रथेत अर्थात अंत्येष्टीमध्ये, अर्थात शेवटचा होम, असे ज्याला म्हणता येईल, अशा संस्कारात;



१) प्रायश्चित्त २) दहन/भूमी-गत करणे-समाधी ३) श्राद्धे व ४) दाने, असे चार भाग किंवा घटक येतात. यानुसार 'स्वयंपुरोहित' ग्रंथात, प्राचीन वाङ्मयातून दिलेले पारंपरिक घटक अथवा कल्पनाबंध पुढीलप्रमाणे दिले आहेत - प्रेताची व्याख्या अर्थात प्रेतस्वरूपविधी, गृहाग्निलोप प्रायश्चित्त - गृहस्थधर्मातील चूकभुलीसाठी दानादी गोष्टी निभावण्याचा संकल्प करणे, और्ध्वदेहिक क्रिया - और्ध्वदेहिक क्रिया संकल्पासह भूमीप्रार्थना, स्थलशुद्धी, चीतास्थान शुद्धी, स्थंडीला (मातीचा ओटा) करून गुह्याग्नी सिद्ध करणे, प्रेतोपासना, आहुती मंत्रासह अग्नीप्रज्वलन, पायाकडून अग्नी देणे, घट फोडणे, तिलांजली दान, एक ते तेरा दिवसांच्या प्रेतक्रिया, वृषोत्सर्ग (प्राणीदान), नवश्राद्धे - अस्थिसंचयन श्राद्ध, दहाव्या दिवसाची क्रिया काकबली, एकोद्दिष्ट श्राद्ध (एकपिंडाने श्राद्ध), रुद्रगणश्राद्ध, वसुगणश्राद्ध, सोळा मासिक श्राद्धे, विविध दाने, उपदाने, पंचगोदाने, पददाने, अर्ध्यसंयोजन, पिंडसंयोजन, पाथेयश्राद्ध (मृत्यूलोकांतून पितृलोकी जाण्यासाठी), मासिक श्राद्ध (महायज्ञ श्राद्ध), तीर्थश्राद्ध आदि पारंपरिक कल्पनाबंध दिले आहेत. संस्कारातील या सर्व विधींसाठी पारंपरिक वर्तनसारणी, वस्तु व साधनसारणी आणि शब्दसारणी ग्रंथनिविष्ट व मौखिकपरंपरा गत स्वरूपात आढळते. लोकसंस्कृतीमध्ये अंत्येष्टीचे सर्व घटकविधी एक दिवसात, तीन दिवसात, पंधरा दिवसात करण्याची परंपरा दिसते.

**और्ध्वदेहिक क्रिया :-** अंत्येष्टीमधील सर्वात महत्त्वाचा विधी म्हणजे और्ध्वदेहिक क्रिया होय. यातील मूळ लोकबंध (भावबंध) मृतदेहास सत्यगती अर्थात परलोकवासासाठी पाठविणे हा आहे. हा परलोक म्हणजे स्वर्ग, नरक, कैलास, नित्यानंद इ. कल्पनाबंधात्मक असतो.

**अ) वर्तनपरंपरा :-** और्ध्वदेहिक क्रिया करण्यासाठीचे वर्तन यात चितेसाठी जागा तयार करणे, देहविसर्जनाचा किंवा निरोपाचा संकल्प करणे, चितास्थान शुद्ध करणे, अग्नी सिद्ध करणे, चितास्थान सिद्ध करणे, सरण रचणे, त्यावर दर्भ किंवा चर्मशय्या तयार करावी, प्रेतशय्येवर यम दिशेस मस्तक करून स्थापन करणे, त्यावर पिंड, सुवर्ण, सुगंधीद्रव्ये आदि स्थापन करणे, तिलांजली मुखी देणे (पाणी देणे), देवतांचे व अग्नीचे स्मरण करून आहुती देतो असा संकल्प करून, पुरुषप्रेतास मुखाकडून व स्त्रीप्रेतास पायाकडून अग्नी देणे, घरासह तीन उलट्या प्रदक्षिणा करून अश्म्याने घट फोडून पथ प्रदक्षिणा करणे, प्रेताचे शिरोभागी येऊन मागे न पाहता खांद्यावरील घडा मागच्यामागे फोडणे,

अश्म्यावर तिलांजली देणे, अशी वर्तनपरंपरा आहे. या वर्तनपरंपरेत जात, धर्म, पंथ, संप्रदाय, स्थल काल परिस्थितीनुसार अनेक बदल झालेले दिसतात. त्यातील मूळ लोकबंध मात्र कायम असतो.

**ब) वस्तु किंवा साधनपरंपरा :–** लोक, अंत्येष्टी क्रिया करणारा न्हावी व पुरोहित, स्मशानभूमी, चितेची जागा, शमीची डहाळी, दर्भ, उदक, माती व मातीचे त्रिकोणी स्थंडील, सुवर्ण, पैसे, तीळ, कणिक-पिंड, अपूप लाकडे, गोवऱ्या, वैरण, तूप, समिधा, घट, पाणी, अश्मा (टोकदार दगड), अग्नीसाठी मडके, व वाहण्यासाठी त्रिकोणी स्थंडील, उत्तरीय आदि वस्त्रे इ. स्थल काल परिस्थिती, जात, जमात, पंथ, मार्ग, संप्रदाय, धर्म यांच्या परंपरानुसार साधनांच्या तपशिलात बदल होतो. या साधनांसह वर्तन किंवा क्रियाकर्म करावयाचे असते.

**क) शाब्दपरंपरा :–** अंत्येष्टीतील सर्व घटक विधींची विशिष्ट लोकबंध प्रदर्शित करणारी नावे तसेच साधनांची विशिष्ट पारिभाषिक नामे, प्रत्येक विधीप्रसंगी म्हणावयाचे मंत्र अथवा उद्घोषणा मोक्षदायक प्रार्थना, उदा. उर्ध्वदेहिक कर्मसंकल्प- अमूक गोत्राच्या अमूक नावाच्या प्रेताची प्रेतत्वापासून मुक्तता होण्याकरिता मी उर्ध्वदेहिक करतो. अग्नी दिल्यानंतर प्रार्थना – पाप नाहीसे करणारा हा अग्नी यमराजाच्या लोकाप्रत तसेच जातवेद अग्नी देवाकडे नेवो किंवा तिलांजली देतांना पुरोहित किंवा नेता सांगतो – क्रिया करणारांसह सर्वांनी स्नाने करावीत व दर्भावरील अश्म्यावर अपसव्य (उलट पद्धतीने) अर्थात अंगठ्याने उलट हात करून पितृतीर्थ स्वरूपात तिलांजली द्यावी इ. प्रकारे शाब्दपरंपरा प्रकट करीत विधी आणि विधाने स्वरूपात कार्य संपन्न होते. उर्ध्वदेहिकाचे विधिनाट्य अशाप्रकारे संपन्न होते. धर्म, भाषापरत्वे तपशीलात्मक बदल झाला किंवा स्थल काल परिस्थितीनुसार वस्तूपरंपरांना पर्याय निर्माण झाले तरी एकूण विधिनाट्यातील भावबंध दृढ असतो. शाब्दपरंपरांतील अनेक पारिभाषिक शब्द वाक्प्रचार, म्हणी स्वरूपात नित्याच्या बोलण्यातही प्रतिमा, रूपके बनून येतात. 'तिलांजली देणे', 'सतिगती देणे', 'मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही', 'मुंडन करणे' अशी उदाहरणे देता येतील. परंपरेतील प्रवासात मृतत्वाच्या पारिभाषिक शब्दालाही पर्यायी शब्द तयार होतात. उदा. प्रेतास, मढं, तिरडीला विमान इ. साधनपरंपरेलाही स्थलकालपरिस्थिती सापेक्ष पर्याय होतात. उदा. सरण याला विद्युतदाहिनी याप्रमाणे.



**३.३ जन्मप्रथा :–**

जन्मप्रथेमध्ये भारतीय परंपरेनुसार सोळा संस्कारांचा समावेश होतो. प्रजनन ते प्रजननपरंपरा यात समाविष्ट आहे. स्वयंपुरोहित यामध्ये सोळा संस्कारांची यादी श्लोकबद्ध दिली आहे ती पुढीलप्रमाणे –

> **''गर्भाधानमतश्च, पुंसवनकं, सीमन्तजाताभिधे ।**
> **नामाख्यं सह निष्क्रमेण च तथाऽन्न प्राशनं कर्म च ।।**
> **चूडाख्यं व्रतबंधकोप्यथ चतुर्वेदव्रतानां पुरः ।**
> **केशान्तः साविसर्गकः परिणयः स्याद् षोडशी कर्मणाम् ।।१।।''**[७]

अर्थात १. गर्भादान. २. पुंसवन (पुत्रप्राप्तीसाठी विधी). ३. सीमांतान्नयन. पतीपत्नीने मिलनासाठी करावयाचा विधी. ४. जातकर्म – गर्भासंबंधी दोषहरण. ५. नामकरण. ६. निष्क्रमण – सूर्य व देवदर्शन – आयुष्यवृद्धीसाठी. ७. अन्नप्राशन- अर्भकास अन्न देण्यास सुरुवात – उष्टावण विधी. ८. चूडाकर्म – शेंडी राखण्यास सुरुवात – जावळ – जीवधारणेपासून आलेले दोष निवारण. ९. उपनयन – मौंज. १०, ११, १२, १३. चतुर्वेदव्रत – शिक्षण घेणे व अखेर गृहस्थाश्रमास सिद्ध होणे. १४. केशांत – ब्रह्मचर्यव्रत पालन विधी. १५. समावर्तन (सोडमुंज). १६. विवाह. भारतीय परंपरेप्रमाणे हे जन्मप्रथेतील सोळा संस्कार थोड्याफार फरकाने पुरुष आणि स्त्रियांना असत. स्थलकाल परिस्थितीसापेक्ष परिवर्तन घडले. परंपरेने यातील जन्मप्रथा म्हणून गरोदरपणातील संस्कार, डोहाळेजेवण, ओटीभरण, प्रसुती, पाचवीपूजन, देवदर्शन, जावळ आणि बारसे एवढेच विधी किंवा संस्कार सर्वत्र आढळतात. शाळाप्रवेश आणि शिक्षापूर्ती, ब्रह्मचर्य पालन, गृहस्थाश्रमस्वीकार ह्या गोष्टी जन्मप्रथा म्हणून केल्या जात नाहीत. प्रजनन प्रक्रिया ही आरोग्य आणि वैद्यकीय सुविधा यांशी निगडित असल्याने मोजक्याच परंपरा आज दिसतात. आगताचे स्वागत किंवा प्रजनन साफल्य अथवा संभोग अर्थात मैथुन साफल्य आणि कृतार्थता हा (भावबंध) 'लोकबंध' मूलभूत स्वरूपात जन्मप्रथेमध्ये असल्याचे दिसते. लोकपरंपरेमध्ये प्रजनन साफल्यासाठी अर्थात सुफलीकरणासाठी देवकृपा, गुरुकृपा, पूर्वजकृपा यांकरिता प्रार्थना व लोकपरंपरेतील तोडगेही पाहावयास मिळतात. पाचवीपूजन अर्थात सटवाईपूजन अर्थात जातकाचे विधिलिखित, बारसे अर्थात नामकरणविधी, वर्धापनदिन वाढदिवस समारंभ, जावळ या परंपरा धर्म, पंथ, मार्ग, जात, जमात आदि सर्व प्रकारच्या लोकसमूहात जगभरात पाहावयास

मिळतात. मौखिक परंपरेत सटवायांच्या प्रार्थना गीते, बारशाची पाळणादि गीते, डोहाळजेवणाची - डोहाळे गीते, वाढदिवसाची गाणी, जावळविधीची गाणी आहेत. उदा. नामकरण संस्कार किंवा बारसे - यातील भावबंध (लोकबंध) आयुष्याची वृद्धी, स्थैर्य, सुखवैभव सुरळीतपणे प्राप्त व्हावे हा आहे. तसेच लोकमध्ये नवजाताचा परिचय व्हावा हा आहे. हा लोकबंध विधी नामकरण समारंभ नाट्याने होतो. म्हणूनच नामकरणविधी हे विधिनाट्य आहे. भारतीय सनातन परंपरेमध्ये नामकरणविधी दोन प्रकारे एकाच दिवशी साजरा होतो. (१) वैदिकपरंपरेनुसार बालकावर नामसंस्कार करणे. (२) पौराणिक परंपरेनुसार बालकाला पाळण्यात घालून सार्वजनिक स्वरूपात आगताचे स्वागत करणे. या दोन्हीही कल्पनाबंधांत स्वतंत्र कल्पनाबंध तपशीलात्मक विधी करण्यासाठी पारंपरिक झालेले दिसतात. पहिल्या कल्पनाबंधात देवतांपूजन आणि वृद्धीसाठी नांदीश्राद्ध (सुरुवात किंवा प्रारंभ शुभचिंतन) करणे, नामकरणाचा संकल्प करणे, नामकरण यज्ञ करणे, नामनिश्चिती त्रिवार उच्चार करून देवता, पुरोहित यांची मान्यता घेणे, बारा महिने वृद्धी व्हावी यासाठी पारंपरिक समजुतीप्रमाणे मासिक नामे घ्यावीत. त्यात चैत्र म्हणजे कृष्ण याप्रमाणे कृष्ण, अनंत, अच्युत, चक्री, वैकुंठ, जनार्दन, उपेंद्र, यज्ञपुरुष, वासुदेव, योगीश आणि पुंडरिक अशी नावे घेऊन मासिक स्मरण करणे. (आता ही प्रथा जवळपास बंद झाली आहे. तरी पुरोहितास बोलावून नामनिश्चिती करण्याचा कल्पनाबंध अस्तित्वात आहे. हे सर्व कल्पनाबंध, विधी बालकाच्या पित्याने करावेत अशी परंपरा आहे. ही परंपरा लुप्त होऊन पाळण्यात घालणे किंवा बारसे हा विधी महिलांची परंपरा झाली आहे.) ज्ञातीबांधव सगेसोयरे यांना परंपरेनुसार भोजन देणे, दुसऱ्या कल्पनाबंधात ज्ञातीबांधवांना सगेसोयरे यांना निमंत्रित करणे (त्यात महिलांना विशेष प्राधान्य असते) बालकाला सुशोभित पाळण्यात घालणे, अशुभ टाळण्यासाठी आधी श्रीकृष्णाला अर्थात वरवंट्याचा किंवा नारळाचा गोप करून, पाळण्याखालून वर पुन्हा खाली पुन्हा वर असे पाळणाबंधन करून त्यात गोप ठेवणे. नंतर तो गोप काढून बालकालाही त्याचप्रकारे पाळण्यात घालणे. पाळणागीते म्हणणे, आळीपाळीने झोके देणे, नेमस्त केलेले नाव विशेषतः आत्याने बालकाच्या कानात सांगून, मग घोषित करणे, बालकाच्या मातेची आयाबायांनी परंपरेनुसार ओटी भरणे, ज्ञातीभोजन घालणे आदि कल्पनाबंध आहेत. बारसे किंवा नामकरण संस्कार करतांना



**अ) वर्तनसारणीत–** नामकरण यज्ञ पुरोहिताच्या सांगण्यानुसार पित्याने करणे, सगेसोयरे, ज्ञातीबांधव यांना बोलावणे, ज्ञातीभोजन घालणे, मंत्रोच्चार करणे, गाणी म्हणणे, ओटी भरणे, हळदीकुंकू घडविणे, पाळणा सजविणे, बालकाला व बालकाच्या मातेला सजविणे, वर्तनपरंपरेत बालक माता पिता, आत्या, आजी, आजोबा यांना विशेष महत्त्वाची कामे करावी लागतात. पूजन, नामघोषण, पाळण्यात घालणे, ज्ञातीभोजन, अशी स्थलकाल परिस्थितीसापेक्ष व जात, धर्म, पंथ, संप्रदाय यानुसार वर्तनसारणी दिसते.

**ब) साधनपरंपरेत –** बालक, बालकाची माता, पिता व अन्य माणसे साधनरूप असतातच. त्यांच्याद्वारे वर्तनसारणी अवलंबिली जाते. त्याचबरोबर परंपरेनुसार पूजासाहित्य, वस्त्रेअलंकार, पाळणा आदि साधने ठरीव स्वरूपाची घेतली जातात. तर

**क) शाब्दपरंपरा–** वर्तन आणि साधनपरंपरांना, पारंपरिक पारिभाषिक स्वरूपाची शाब्दपरंपरा असते. वर्तन वर्णने, साधननामे याबरोबरच विशिष्ट विधी नामे उदा. गोप ठेवतांना ''कुणी गोविंद घ्या, कुणी गोपाळ घ्या'' म्हणत गोप व बालक पाळण्याभोवती खालून वर फिरविणे. पाळणागीते, उखाणे यांची उजळणी होते. या सर्व परंपरा मौखिक परंपरेत येतात. पाळणागीतांमध्ये राम आणि कृष्ण यांना उद्देशून असलेले पाळणे अधिक असतात. महाराष्ट्रात शिवरायांचा पाळणा अनेक वर्षांपासून म्हटला जातो. 'बारसं जेवणे' हा वाक्‌प्रचार या मौखिक परंपरेतूनच आला. पाळणा वर्षाचा, पाळणा लांबवणे, बेंबीला कुंकू हा पाळण्यातील विवाहाविषयीचा वाक्‌प्रचार यातून आला आहे.

### ३.४ कुळधर्म, कुळाचार :–

कुटुंब, ज्ञाती, गोत्र, गाव व समाज यादृष्टीने कुळधर्म, कुळाचार यासंबंधीची विधिनाट्ये व व्रते येतात. महाराष्ट्रात शक्तीपीठांची व खंडोबा ज्योतिबाची नवरात्रे, तळी भरणे, देवीचे बोडण, ओटी भरणे अशी व्रते येतात. मातृपितृदैवतांचा जागर हा सर्वात महत्त्वाचा कुळधर्म मानला जातो. देवीचा गोंधळ आणि खंडोबाचे किंवा ज्योतिबाचे जागरण, तसेच शक्तीपीठांचे बोहाडे, लळीत असा सामाजिक कुळाचार पाहावयास मिळतो. भारतभर थोड्याफार फरकाने असे कुळधर्म कुळाचार पाहावयास मिळतात. अन्य धर्मातही अशा काही परंपरा निर्माण झाल्या आहेत. कुळधर्म कुळाचारात गोंधळ, जागरण

यांसारख्या विधिनाट्यांची परंपरा महत्त्वाची असते. अशा काही संस्था ही पारंपरिक ज्ञाती म्हणून उदयाला आलेल्या दिसतात. अशा सर्व कुळधर्म कुळाचारांमागे मूळ (लोकबंध) भावबंध कुळदैवतांना प्रसन्न करून त्यांची सुखी जीवनासाठी कृपा संपादन करणे हा असतो. आयुष्यातील अतिमहत्त्वाच्या संस्कारांना संपन्न करतांना कुळधर्म कुळाचार स्वरूप अशी विधिनाट्ये आवर्जून साजरी केली जातात. कुळदैवतांच्या यात्रा आणि जत्राही करण्याचा तसेच वारी करण्याचा प्रघात दिसतो. याहीमागे सुखसमृद्धी प्राप्तीसाठी देवकृपा हाच लोकबंध असतो. हा लोकबंध जगभरात सर्वत्र तत्त्वतः आढळतो. माणसाच्या दैवतप्रवृत्तीचे ते द्योतक आहे.

कुळधर्म कुळाचारातील कल्पनाबंध पुढीलप्रमाणे सांगता येतात. (१) वंशपरंपरा पालन करणे. (२) संस्कार उदा. लग्न, बारसे, वास्तुशांती इ. संपन्न करणे. (३) आहार, निद्रा, भय आणि मैथुन या प्राणी प्रवृत्तींचे समाजजीवनात सुव्यवस्थित, समाधान होणे. (४) आत्मिक आणि धार्मिक समाधान प्राप्त करणे. त्या-त्या कुळ, जात, धर्म, पंथ, मार्ग, समाज यांच्या सारणीचा अनुसार करून गृहस्थधर्माचे पालन करणे.

**अ) कुळधर्मातील वर्तनपरंपरा** दोन स्तरांवर दिसतात. (१) यजमान म्हणून गृहस्थांनी कुळधर्म कुळाचाराचे आयोजन करून सहभागी होणे. (२) कुळधर्म संपन्न करण्यासाठी पुरोहितवर्गाने पौरोहित्य करणे व कुळधर्म कुळाचार संपन्न झाल्याची उद्घोषणा करणे. दोन्ही स्तरावर सादरीकरण, प्रयोग होत असतो.

**ब) कुळधर्म कुळाचारातील साधनपरंपरेत** मानवी संसाधनात यजमान कुटुंबीय आणि पौरोहित्य करणारा संस्थाचमू, याशिवाय पारंपरिक विधीसाठीची पूजामांडणी व पूजाविधीची साधने उदा. हळद, कुंकू, विड्याची पाने, नैवेद्य, दीप इ.इ. दैवत व संस्थांनुसार ही यादी वाढते.

**क) कुळधर्मातील शाब्दपरंपरा :–** प्रत्येक कुळधर्म कुळाचाराची शाब्दपरंपरा ठरीव असते. मानवी साधनांनाही पारिभाषिक नावे असतात. वस्तूंना कुळधर्मानुसार नावे असतात. मांडणी, उभारणी, रेखणी यांना पारिभाषिक नावे असतात. पूजाविधीत, संकल्प, देवतापूजन, विधीसंबंधी उद्घोषण, त्यासंबंधी आरत्या, गाणी, कथा, संवाद, नृत्ये यांसह पारंपरिक वाङ्मय असते. या वाङ्मयाला मंत्रसामर्थ्य प्राप्त झालेले असते. पुराणकालापासूनच्या ह्या शाब्दपरंपरा



पुराणकथा घेऊन उपयोजन करीत असतात.

**ड) कुळधर्म कुळाचारातील कला परंपरा :–** कुळधर्म कुळाचारात नर्तन, वादन आणि गायनाला महत्त्व असते. मूळ भावबंधाचे सामगायनात्मक आविष्कार यात घडतात. हीच परंपरा भारतभरातील पारंपरिक नृत्यांना अभिजात नृत्याचे रूप देणारी ठरली आहे. महाराष्ट्रात वाघ्यामुरळी, गोंधळी, लावणी नृत्य, तसेच ज्ञातीज्ञातींची वैशिष्टपूर्ण नृत्ये व त्यावरील गाणी प्रसिद्ध आहेत. कथाकली, भरतनाट्यम, कुचीपुडी आदि अभिजात नृत्यप्रकार यांतूनच उद्भवले आहेत. ज्ञातीनुसारच्या कुळधर्म कुळाचारात, धनगरांचे नृत्य, आदिवासी नृत्ये, मंगळागौर आदींची नृत्ये यांचा समावेश होईल.

**३.५ गावपंचायत :–**

गावगाडा अर्थात राज्यव्यवस्था चालविण्याची ग्रामवस्ती, तांडा, जमात यांपासून व्यापक लोकसमूहापर्यंत अर्थात राज्य यांपर्यंत सनातन परंपरा आहे. ‘लोक’ न्यायव्यवस्था असे या व्यवस्थेचे वर्णन करता येईल. ‘पांचा मुखी परमेश्वर’ लोकबंध त्यातूनच निर्माण झाला आहे. भारताच्या महाराष्ट्र प्रांतातील नगर जिल्ह्यांतर्गत, पाथर्डी तालुक्यातील, ‘मढी’ या गावी कानिफनाथ देवस्थानी, होळी पौर्णिमेपासून भटक्या जमातींची यात्रा, पंधरा दिवस चालते. त्यात या गावपंचायतीचे पारंपरिक रूप आजही अनुभवता येते. गावपंचायत ही गावगाड्याच्या धर्म, अर्थ, समाजव्यवस्था, कौटुंबिक व सामूहिक समस्या आदि सर्व गोष्टींविषयी न्यायनिवाडा करते. गावातील अर्थात समूहामधील धुरिण पाच माणसे आपसुकच गावपंचायतीचे सदस्य असतात. गावपंचायतीतील मुख्य **भावबंध** (लोकबंध) गावाची एकात्मता, सुखरुपता व पारंपरिक धारणा नेटकी आणि स्थिर असावी असा आहे. त्यांतील **कल्पनाबंध** गावांतील अर्थात समूहातील सर्वप्रकारच्या समस्या, सणोत्सव, जमीनजुमला, घरदार यांविषयी समस्या, गावरान, गावपाणीव्यवस्था, जत्रायात्रा यांशी संबंधित असतात. समूहातील तंटे सामोपचाराने, न्याय पद्धतीने सोडविणे; हा त्यातील मुख्य कल्पनाबंध असतो. समूहातील समाजकंटक, गुन्हेगार, रूढीभ्रष्ट यांच्यासाठी शिक्षा करणे, हीही गोष्ट त्यात समाविष्ट होते.

**अ) गावपंचायतीतील वर्तनपरंपरा :–** सामान्यतः समूहाचे श्रद्धास्थान असलेल्या ठिकाणी बहुधा मारुती मंदिर, चावडी इ. ठिकाणी पंचांनी आपल्या पदानुसार प्रतिष्ठित होणे, समोर ग्रामसभा आयोजित करणे, न्यायनिवाडा करणे,

समस्या सोडविणे, लोकसभेने निवाड्याचे सन्मानपूर्वक पालन करणे आदि प्रकार असतात. यात न्याय उद्घोषणा मुखिया किंवा सर्वात सन्मान्य वृद्ध करतो.

**ब) वस्तु किंवा साधनपरंपरा :–** मानवी स्वरूपात पंच, आरोपी, तक्रार करणारे, न्याय मागणारे, समस्या सांगणारे व साक्ष असणारे असतात. शपत देणारे घेणारे देव, देवता, विशिष्ट प्रकारच्या वस्तु उदा. उदक, विड्याची पाने, अन्न इ. स्थलकाल परिस्थितीसापेक्ष तपशील बदलतात.

**क) शाब्दपरंपरा :–** गावपंचायतीतील सर्व संवाद लोकबंध स्वरूपातील पारिभाषिक असतात. उदा. गुन्हा कबूल, काडीमोड, सत्यतेची साक्ष उदा. उकळत्या पाण्यातील नाणे उचलणे, मुलाच्या डोक्यावर हात ठेवणे इ. सर्व गोष्टी मौखिक परंपरेने सुरू असतात. समस्या मांडणारा किंवा सांगणारा विशिष्ट भाषेत समस्या सांगून; व्यक्तींचा निर्देश करतो व अखेर मुखिया न्यायनिवाड्याची उद्घोषणा करतो. गावपंचायतीची संपूर्ण परंपरा प्रामुख्याने शाब्द स्वरूपात असते.

**४. समारोप :–**

लोकसंस्कृती आणि लोकसाहित्य यांचा अन्योन्य संबंध लक्षात घेतांना लोकसांस्कृतिक लोकबंध (Folktype) अर्थात मूळ भावबंध (Feelingtype) कोणता आहे? तो आविष्कृत करण्यासाठी कोणते लोकबंध अर्थात कल्पनाबंध (Motif) स्वीकारले आहेत. ते कल्पनाबंध आविष्कृत करतांना लोकसांस्कृतिक स्वरूपातील विधिविधाने 'लोक'ने स्वीकारली आहेत. त्या विधिविधानातील वर्तनपरंपरा (Behaviour) वस्तु किंवा साधनपरंपरा (Objective, Instrument and Agencies) स्वीकारल्या आहेत. ह्या दोन्ही परंपरांच्या शाब्द आविष्कारासह अन्य विधानात्म (Oral Indications or Oral Suggestions, Stateaments) परंपरा कोणत्या आहेत हे पाहिले की लोकसांस्कृतिक धारणातत्त्वांचा अर्थात लोकबंधांचा उलगडा होतो. समग्र लोकबंधांचे प्रकटीकरण हे लोकसाहित्य असते. म्हणूनच लोकसाहित्य हे लोकसंस्कृती या भावात्मक संकल्पनेचे दृश्य स्वरूप ठरते. 'लोक' संस्कृतीत ते लोकसाहित्यात, लोकसंस्कृतीचे दर्शन लोकसाहित्यातून घेता येते. लोकसाहित्यातील तपशीलात्मक लोकबंध लोकसंस्कृतीचे स्थलकाल परिस्थितीसापेक्ष दर्शन घडवितात. त्यामुळे सर्व लोकबंध हे लोकसंस्कृतीदर्शक मौखिक परंपरागत अवशेष असतात. शाब्दपरंपरांच्या साहाय्याने भूत आणि वर्तमानकालीन संस्कृतीचे दर्शनही घडू शकते. लोकसंस्कृती ही जाणीवदर्शक भावात्मक संकल्पना म्हटले (The concept of total consciousness of colective mind and behaviour with moulding the total univers for delightful life prosses.) तर लोकसाहित्य हे त्या लोकसंस्कृतीचे प्रयोगसिद्ध वाङ्मयकलात्मक रूप होय. (Folklore is the traditional dramatic performence of the folk-culture)



**५. संदर्भ व टीपा :–**


१) लोकबंध : सहस्रबुद्धे अनिल, नितीन प्रकाशन, पुणे, नवीन सुधारित आवृत्ती जुलै २०१२.

२) चाळीसगाव डांगाणी (खंड १) लोकवाङ्मय : सहस्रबुद्धे (डॉ) अनिल, आनंदोत्सव प्रकाशन मंच, अहमदनगर, प्र.आ. १ डिसेंबर २०१३, 'सण-उत्सवाची गाणी'.

३) लोकसाहित्य संशोधन पद्धती : सहस्रबुद्धे अनिल, नितीन प्रकाशन, सुधारित आवृत्ती जुलै २०१२.

४) लोकबंधात्मक चिकित्सा : सहस्रबुद्धे अनिल, नितीन प्रकाशन, प्र.आ. जुलै २०१२.

५) धर्मसिंधु : उपाध्याय काशीनाथशास्त्री, राजेश प्रकाशन, पुणे ३८, १९७९.

६) स्वयंपुरोहित : बापटशास्त्री कृ. म., राजेश प्रकाशन, पुणे ३८, सुधारून वाढवलेली आवृत्ती २०१५.

७) तत्रैव, सोळा संस्कार.


●●●

## प्रकरण सहावे

# वेदातील ‘लोक’ संकल्पना : पुरुषसुक्त

**(Concept of Folk in the Vedas : Purushsukta)**

‘लोकसंस्कृती आणि लोकसाहित्य : भारतीय संकल्पना आणि परंपरा’ याविषयी विचार करतांना; भारतीय प्राचीन वाङ्मय, ‘वेद’ यातील संकल्पना समजावून घेणे क्रमप्राप्त आहे. लोकसाहित्य (Folk-lore) या ज्ञानशाखेचा विकास गेल्या दोनशे वर्षात होत गेला आहे; असे आपण म्हणतो आहोत. याचा अर्थ लोकसंस्कृती आणि लोकसाहित्य यांचा विचार पूर्वी केला नव्हता, असे नाही. किंबहुना भारतीय परंपरेत; ‘लोक’चा विचार अति प्राचीन काळापासून केलेला दिसतो. भारतीय परंपरेत ‘लोक’ची संकल्पना स्पष्ट आणि पद्धतशीरपणे मांडली गेलेली आहे. ‘लोकबंध’ या ग्रंथात ‘लोक’ या स्वतंत्र प्रकरणात प्रस्तुत लेखकाने; ‘लोक’चे विविध अर्थ, गीतेतील ‘वैदिक’ आणि ‘लोक’, भारतीय आणि पाश्चात्य ‘लोक’ कल्पना, या व इतर मथळ्यांखाली ‘लोक’ संकल्पना स्पष्ट केली असून; ‘लोक’ची त्रिविधता; घटकलोक (Ghataklok - A person in social group of men), अंगस्वरूपलोक (Angswarooplok - A part of 'lok' with same social or cultural aspect or aspects) आणि विराटपुरुषलोक (Viratpurushlok - The whole mankind in the Universe) या स्वरूपात स्पष्ट केली आहे.[१] भारतीय परंपरेत अवघ्या मानवजातीच्या व्यवस्थापनाचा विचार केलेला आहे. अखिल मानवजात हाच समाजपुरुष; अशी संकल्पना मांडून; एकूण पृथ्वीवरील, समस्त मानवजातीचा एकात्म स्वरूपात विचार करणारी, ही परंपरा आहे. ‘लोक’ अर्थात Folk चा विचार भारतीय परंपरेत, तात्त्विक स्वरूपात आणि प्रत्यक्ष व्यावहारिक स्वरूपात; प्रत्येक घटकलोकमध्ये रुजलेला आहे. खरेतर



संपूर्ण पृथ्वीवरील मानवजातीत याचप्रकारे ‘लोक’ विचार अनुभवास येतो. या अनुभवाचा व्यवस्थित विचार, अतिप्राचीन काळापासून, भारतीय परंपरेने केला आहे. या प्रकरणात हा विचार ऋग्वेदाच्या दशम मंडळातील नव्वदाव्या सुक्तातून समजून घ्यायचा आहे.

**१. सार्थ पुरुषसुक्त :–**

नारायण ऋषींनी, पुरुष देवतेसाठी, सोळा श्लोकात, अनुष्टुप (१–१५) व त्रिष्टुप (१६) छंदात रचलेले हे सुक्त, पुढीलप्रमाणे आहे– (श्लोकांचा अर्थ येथे विचारात घ्यावयाचा असल्याने स्वर आणि आघातांच्या खुणा – अर्थात मौखिक संहिता – येथे दिलेली नाही.) श्लोक आणि अन्वयासह अर्थ–

**सहस्रशीर्षाः पुरुषः सहस्राक्षाः सहस्रपात् ।**
**सः भूमिं विश्वतः वृत्वा अति अतिष्ठत् दश अंगुलं ।।१।।**

(ऐषः पुरुषः) हा विराट / समाज पुरुष (सहस्रशीर्षाः) हजारो मस्तके असलेला, (सहस्राक्षाः) हजारो डोळे असलेला व (सहस्रपात्) हजारो पाय असलेला (अस्ति) आहे. (विश्वतः भूमिं) सर्वविश्व व भूमी (सर्व चराचर सृष्टी) (वृत्वा) व्यापूनही (सः दशांगुलं अति अतिष्ठत्) हा विराट पुरुष दहा बोटे शिल्लक राहिला आहे.

हा सृष्टीरूपी अतिव्यापक, अर्थात विराट असा, पुरुष; म्हणजे सृष्टीतील अगणित डोकी, डोळे, पाय असलेले; खेचर (उडणारे जीव), भूचर (जमिनीवरील जीव) आणि जलचर (पाण्यात राहणारे जीव) अशा ज्ञात अज्ञात अगणित जीवांचा समूह अर्थात समाज होय. म्हणजेच एकात्म जीव समूह होय. या विराटपुरुषाचे व्यापकपण ज्ञात सृष्टीबाहेरही जाणवते आहे. (असे हे भूलोकाचे वर्णन आहे.)

**पुरुषः एव इदं सर्वं यत् भूतं यत च भव्यं ।**
**उत अमृतत्वस्य ईशानः तत् अन्नेन अति रोहति ।।२।।**

(यत् भूतं) जी जी चराचर सृष्टी भूतकालांत होऊन गेली, (इदं) जी चराचर सृष्टी आता वर्तमानकाळात अस्तित्वात आहे, आणि (यत् भव्यं) जी विशाल सृष्टी भविष्यकाली निर्माण होणार आहे अशी ही (इति सर्वं जगत्) सर्वच चराचर सृष्टी (यत् पुरुषः एव) ही सर्व या विराट पुरुषाचेच स्वरूप होय. (उत) त्याप्रमाणे, (अस्य जगतस्य तथा अमृतत्वस्य ईशानः अयं पुरुषः एव) या अखिल ब्रह्मांडाचा व अमृतत्त्वाचा ईशान/स्वामी हा विराट/समाज पुरुषच

होय. (सः तत्) हा विराट पुरुष कधीकधी दृश्य स्वरूपात प्रकट होत असतो. (यत् अन्नेन अति रोहति) अन्न भक्षणाने जे जे वाढते ते ते सर्व हा विराट पुरुषच होय व त्याच्याच इच्छेने हे सर्व घडत असते.

भूतकाळात होऊन गेलेली, वर्तमानकाळात अस्तित्वात आहे अशी व भविष्यकाळात निर्माण होणार आहे अशी; सर्व सृष्टी या विराट पुरुषाचेच स्वरूप होय. या अखिल ब्रह्मांडाचा अमृतत्त्वाचा (अविनाशित्वाचा) स्वामीही हा विराट पुरुषच होय. हा विराट पुरुष कधी दृश्य स्वरूपात तर कधी अदृश्य स्वरूपात वास करतो. अन्नभक्षणाने जे जे या सृष्टीवर (सृष्टीत/भूलोकात) वाढते (ते सर्व जीव) ते ते सर्व हा विराट पुरुषच होय व त्याच्याच इच्छेने हे सर्व (चलन-उत्पत्ती, स्थिती, लय, पुनरुत्पत्ती, चे चक्र) घडत असते. ('लोक'च्या समूहजीवनाचे पारंपरिक अविनाशी नित्य चलनाचे हे वर्णन आहे.)

**एतावान् अस्य महिमा अतःज्यायान् च पुरुषः ।**
**पादः अस्य विश्वानि भूतानि त्रिपात् अस्य अमृतं दिवि ।।३।।**

(अस्य पुरुषस्य महिमा अतः एतावान्) या विराट पुरुषाचा महिमा/कर्तृत्व एवढे मोठे आहे की (ज्यायान् च) या सृष्टीतील सर्व दृश्य स्वरूपातील सृष्ट प्राणीमात्र तसेच (विश्वानि भूतानि) इतर सर्व अदृश्य सृष्टी हे सर्व (अस्य पुरुषस्य तुरीयः पाद) या विराट पुरुषाचा केवळ चौथा (१/४) भाग होय. (अस्य त्रिपात्) याचे उर्वरित तीन भाग (३/४) (अमृतं) अविनाशी असून मानवाच्या दृष्टीच्या अतीत अशा स्वरूपात (दिवि सन्ति) द्यू लोकात आहेत. 'अतः ज्यायान् च पुरुषः' याचा अर्थ दृष्ट पुरुषापेक्षाही व्यापक व अधिक श्रेष्ठ असा पुरुष अस्तित्वात असून तो या सृष्टीचे नियंत्रण करतो- असे पं. सातवळेकर यांचे मत आहे.

या विराट पुरुषाचा केवळ एकचतुर्थांश भाग मानवाला ज्ञात असून; तीन चतुर्थांश असा अविनाशी परंतु अज्ञात भाग आहे. तो द्यू लोकात अर्थात अवकाशात असून; तोच दृष्ट भागाचे नियंत्रण करतो. दृष्ट आणि अदृष्ट असा एकूण परिपूर्ण विराट पुरुष असून; दृष्ट भागातील व्यवहाराची संगती अदृष्ट भाग विचारात घेतल्याशिवाय लागत नाही.

**त्रिपात् ऊर्ध्वः उदैत् पुरुषः पादः अस्य इह अभवत् पुनः ।**
**ततः विष्वङ् वि अक्रामत् स-अशन-अनशने अभिः ।।४।।**



(अस्य पुरुषस्य त्रिपात्) या पुरुषाच्या चार भागांपैकी तीन भाग (ऊर्ध्वः उदैत्) या पृथ्वीच्या वर असलेल्या द्यू लोकात वाढत गेले आहेत ([त्रिपात् पुरुषः ऊर्ध्वः उदैत) तीन भागांचा विराट पुरुष वर द्यू लोकात वाढत गेला आहे]) (अस्य तुरीयः पादः) या पृथ्वीवर असणारा या विराट पुरुषाचा चौथा भाग (त्रि-सकारा-अभि) सृष्टी [जन्म] स्थिती [पोषण] व संहार किंवा लय [मृत्यू] व पुनः जन्म अशा क्रमाने, (पुनः पुनः इह अभवत्) या पृथ्वीवर पुनः पुनः/ वारंवार प्रकट होत असतो. अशा प्रकारे (एषः पुरुषः) या विराट पुरुषाने (स-अशन) अन्नमय/सजीव, (अनशने) अन्नाशिवाय/निर्जीव अशीही (अखिलं विश्वं) सर्वचराचर सृष्टी (अभिविष्वङ अक्रामत्) चहूबाजूंनी व्यापून टाकली आहे.

या विराट पुरुषाचा, दृष्ट असा, पृथ्वीवरील चौथा भाग, जन्म स्थिती, विलय आणि पुनः जन्म या चक्रात फिरत असतो. असे चराचर अशा दृष्टीने चहूबाजूंनी विश्व व्यापले आहे.

**तस्मात् विराट अजायत विराजः अधि पुरुषः ।**
**सः जातः अंत्यरिच्यत पश्चात् भूमिं अथः पुरः ।।५।।**

(तस्मात् अधि पुरुषात्) त्यानंतर या आदि/विराट पुरुषापासून (विराजः) शोभायमान/दैदीप्यमान (विराट) ब्रह्मांड [आकाशस्थ ग्रह, तारे, नक्षत्रे, आकाश गंगा, आकाश-पोकळी, नानाविध जीव इत्यादी] (अधि जायत) क्रमाने उत्पन्न झाले. (पश्चात् अथः भूमिं च) त्यानंतर देव, मानव, भूमी, (पुरः जातः) पूर्वी अस्तित्वात असलेले महाकाय जल व भू-चर [महाकाय प्राणी-डायनोसोर सारखे] व विविध रंग, रूप आकार असलेले पशू, पक्षी, कृमी, कीटक, विषाणू इत्यादी द्विपाद, चतुष्पाद व बहुपाद जीव उत्पन्न झाले. (सः जातः अत्यरिच्यत) या सजीवांची अनेकविध शरीरे निर्माण झाली व उत्पन्न झाल्या झाल्या, विभक्त होऊ लागली.

अशाप्रकारे ब्रह्मांडामध्ये सृष्टी निर्माण झाल्याची कल्पना, ऋषी नारायणांनी, पुरुषाच्या कर्तृत्वाविषयी मांडली आहे. महाकाय शरीरानंतर सामान्य लघुकाय जीव निर्माण झाले असावेत; असे ठामपणे सुक्तात मांडले आहे.

**यत् पुरुषेण हविषा देवाः यज्ञं अतन्वत ।**
**वसन्तः अस्य आसीत् आज्यं ग्रीष्मः शरद् हविः ।।६।।**

(यत् देवाः पुरुषेण हविषां यज्ञं अत्न्वत) ज्यावेळी देवांनी, उत्पन्न झालेल्या

पुरुषरुपी/समाजपुरुषरुपी हविर्द्रव्यांनी जीवनयज्ञ करण्यास सुरुवात केली, (तत्) त्यावेळी (अस्य यज्ञस्य) या यज्ञामध्ये (वसंत आज्यं आसीत्) वसंत ऋतू तूप/ घृत आज्य झाला. (ग्रीष्मः इध्मः आसीत) ग्रीष्म ऋतू इंधन झाला तर (शरद् हविः आसीत्) शरद ऋतू हविर्द्रव्य झाला.

सृष्टीतच विराटपुरुष यज्ञ करू लागला. सृष्टी जीवन यज्ञ स्वरूपात प्रचलन करू लागली. वसंत, ग्रीष्म, शरद या ऋतूंचे विभ्रम म्हणजे पुरुषाने मांडलेला यज्ञ होय.

**तं यज्ञं बर्हिषि प्रौक्षन् पुरुषं जातं अग्रतः ।**
**तेन देवाः अयजन्त साध्याः ऋषयः च ये ।।७।।**

(अग्रतः जातं) सृष्टीच्या प्रारंभी उत्पन्न झालेल्या (तं यज्ञं पुरुषं) त्या यज्ञ साधनरूप पुरुषाला/जीवाला/हविर्द्रव्याला (बर्हिषि) दर्भासनावर ठेवून (प्रौक्षण्) त्यावर पाणी शिंपडण्यात आले. (तेन देवाः अजयन्त, साध्याः ऋषयः अयजन्त) जे नवीन जीव [धान्यरूपी] निर्माण झाले त्या धान्यांनीच देव, साधक, ऋषी यांनी नंतर अनेक यज्ञ केले.

सृष्टीच्या प्रारंभी उत्पन्न झालेल्या पुरुषाला अर्थात बीजांनाच पुनर्उत्पादनासाठीच्या यज्ञाचे हविर्द्रव्य म्हणून शुद्ध व आरोग्यवान करून वापरण्यात आले. त्यातूनच पुन्हा असंख्य बीजे निर्माण झाली. प्रत्येक बीज पुनरुत्पादनासाठी होणाऱ्या यज्ञात समर्पित होऊन; असंख्य होऊन प्रकटला असे देव, साधक अशा ऋषींनी अनेक यज्ञ केले. एकूणच कृषीजीवन प्रारंभाचे हे वर्णन आहे. ‘ऋषी’ या नामाभिधानाला, पर्यायी शब्द ‘कृषी’ होय. [देव म्हणजेच, दिव्य कृषी शास्त्रज्ञ, साध्य म्हणजे प्रयोगशील विद्वान, ज्याच्यामुळे बियाणांचा दर्जा, गुणवत्ता व क्षमता सुधारते व ऋषी म्हणजेच संपादन केलेले ज्ञान जतन करून; पुढच्या पिढीला प्रदान करणारे ज्ञानी अध्यापक. या लोकांनी नवजीवन प्रकाराची शेती फुलविली व नवजीवन प्रकाराची बियाणे प्राप्त केली. ही सर्व शेतीची प्रारंभिक अवस्था होती.]

**तस्मात् यज्ञात् सर्वहुतः सम्भृतं पृषत् आज्यं ।**
**पशून् तान् चक्रे वायव्यान् आरण्यान् ग्राम्याः च ये ।।८।।**

(तस्मात् सर्वहुतः यज्ञात्) त्यानंतर त्या सर्वहुत म्हणजेच मिळेल त्या उत्कृष्ट जीवांची/ हविर्द्रव्यांची/ बी-बियाण्यांची आहुती दिल्यावर त्या यज्ञापासून (उत्तम बी-बियाणे पेरलेल्या नवीन पिकापासून) (आज्यं पृषत् सम्भृतं) पक्व



धान्ये व तदनुषंगाने दूध, दही, लोणी, तूप आदि पोषण द्रव्ये उत्पन्न झाली. (तस्मात् सः अधिपुरुषः) त्यानंतर त्या विराट समाज पुरुषाने (पशून्) पशू (वायव्यान्) वायूवर म्हणजेच श्वासोच्छ्वासावर उपजीविका करणारे सजीव [मानव, पशु, पक्षी इ.] (आरण्यान्) रानटी मांसभक्षक प्राणी व (ग्राम्याःच) पाळीव जनावरे [गाई, म्हशी, शेळ्या, मेंढ्या, घोडे इ.] (तान् चक्रे) या सर्वांना उत्पन्न केले.

पिकाची, बी-बियाणांची पेरणी, केल्यावर, नवीन निर्माण झालेल्या धान्यापासून नंतर शास्त्रज्ञांनी उत्तम पौष्टिक पक्व धनधान्ये व तदनुषंगाने दूध व दुग्धोत्पन्न पदार्थ यांची निर्मिती केली. त्यानंतर या विराट समाज पुरुषाने पशू, श्वासोच्छवास करणारे सजीव, रानटी मांसभक्षक प्राणी व पाळीवप्राणी जोपासले. याचाच अर्थ शास्त्रज्ञ अर्थात ऋषी/कृषी यांचा सर्व जनजाती धर्माच्या लोकांचा हातभार लागला.

**तस्मात् यज्ञात् सर्वहुतः सामानि जज्ञिरे ।**
**छन्दांसि जज्ञिरे तस्मात् यजुः तस्मात् अजायत ।।९।।**

(तस्मात् सर्वहुतः यज्ञात्) त्यानंतर सर्वहुत म्हणजेच उत्कृष्ट अशा जीवांची/ हविर्द्रव्यांची आहुती दिल्यावर त्या यज्ञापासून [उत्तम बियाणे पेरलेल्या नवीन पिकापासून] धान्य संपत्ती प्राप्त झाल्यावर मानवांच्या/ शेतकऱ्यांच्या/ कृषी तज्ज्ञांच्या मनात त्या विराट पुरुषाबद्दल आपोआपच प्रेम-भक्ती निर्माण झाली व त्यातून त्यांना जीवनकाव्य व संगीत स्फुरले व मानवाने त्यानंतर या विराट पुरुषाची पूजा करावयास सुरुवात केली. त्यातूनच ऋग्वेद [ऋचा=प्रार्थना व स्तुती मंत्राचा पद्यमय संग्रह], (सामानि) यज्ञीय गान मंत्र [सा-म-सा या ७ सुरांनी बद्ध झालेला तो साम-बृहत् आणि रथन्तर साम म्हणजेच] सामवेद [गायन संग्रह] (यजुः) हवन व तंत्र मंत्रांचा संग्रह [गद्यमय यजुर्वेद व (छंदांसि)] प्रमुख ७ छंद असलेल्या अनेक पद्यरचना [त्रिष्टुप, अनुष्टुप, गायत्री, जगती, बृहती, प्रगाथ आणि पंक्ती] यांची (जज्ञिरे) निर्मिती झाली. (अजायत) नवीन छन्द रचना उदयास आल्या.

शेतीतील, पीक उत्पन्न चक्राचा, शोध लागल्यावरच- ऋषी/कृषी यांच्या मनात, त्या विराटपुरुषाविषयी (संपूर्ण सृष्टीनिर्मात्या विषयी) प्रेम निर्माण झाले. त्यातून त्याला वेद, हवनतंत्र, गायन आदि गोष्टी स्फुरल्या.

**तस्मात् अश्वाः अजायन्त ये के च उभयादतः ।**
**गावः ह जशिरे तस्मात् तस्मात् जाताः अजावयः ।।१०।।**

(तस्मात् अश्वाः अजायन्त) त्यानंतर या जीवन यज्ञातून अश्व निर्माण झाले. (अश्वाच्या निमित्ताने जीवनयज्ञासाठी विविध पशू वाहने मिळाली. त्यात अश्वाच्या गुणांमुळे त्यास प्रमुख स्थान मिळाले) (उभयादतः ये के) वरच्या व खालच्या जबड्यात, दात असलेले प्राणी (हिंस्र व पाळीव) निर्माण झाले. (मानवाच्या संपर्कात आले) (तस्मात् गावः ह जज्ञिरे तस्मात् अजावयः जज्ञिरे-जाताः) दैनंदिन पोषणमूल्यांच्या गरजेतून गोधन निर्माण झाले व त्याला देवांचीही मान्यता मिळाली (तस्मात् अजावयः जाताः) त्याप्रमाणे शेळ्या मेंढ्या आदि प्राण्यांची निर्मिती पालन सुरू झाले) झाली. त्यातून व्यवसाय सुरू झाले. कृषीकर्माचे कृषीवृत्तीमध्ये परिवर्तन झाले. गोधनाच्या साहाय्याने व्यवहार, वस्त्या, भ्रमंती आदि सर्व समूहजीवन सुरू झाले.

**यत् पुरुषं व्यदधुः कतिधा वि अकल्पयन् ।**
**मुखं किं अस्य? कौ बाहू? का उरु पादा उच्यते ।।११।।**

(यत अधि पुरुषः पुरुषं वि अदधुः) ज्यावेळी त्या विराट समाज पुरुषाने उत्कृष्ट जीवांची / बियाण्यांची आहुती देऊन / पेरणी करून यज्ञ केला / उत्कृष्ट पीक निर्मिती केली, (तत्) त्यावेळी (सः कतिधा वि अकल्पयन्) या विराट पुरुषाने कोणत्या प्रकारे मानसिक कल्पना केल्या [शेतीविषयक कोणते विचार निश्चित केले?] (अस्य मुखं किं) याचे मुख कोणते? [या विराट पुरुषाने आपल्या मुखाच्या ठिकाणी कोणाची कल्पना केली?] कौ बाहू? का उरू? का पादा उच्येते?) याच्या हाताच्या ठिकाणी, जांघांच्या ठिकाणी व पायाच्या ठिकाणी कोणाची व कोणती कल्पना केली?

विराटपुरुषाने कृषीसंस्कृती सुफलित करतांना त्याच्या मनात कोणते संकल्प केले व त्यानुसार त्याच्या शरीराने कोणती कर्मे केली? कोणाचा विचार केला?

**ब्राह्मणः अस्य मुखं आसीत् बाहू राजन्यः कृतः ।**
**उरु तत् अस्य यत् वैश्यः पद्भ्यां शूद्रः अजायत ।।१२।।**

(ब्राह्मणः अस्य मुखं आसीत्) ब्राह्मण-ब्रह्मज्ञानी (ऋषी/कृषी/कवी) हे या विराट पुरुषाचे मुख होय. म्हणजेच या विराट पुरुषाच्या मुखापासून ज्ञानार्जन, ज्ञानोपासना व ज्ञानाध्यापन होऊ लागले. व त्या मुखापासून ''उत्तम शेती कशी करावी'' या विषयासंबंधी उत्तमोत्तम विचार प्रकट होऊ लागले. (अस्य बाहू राजन्यः कृतः) याच्या दोन्ही हातांपासून क्षत्रिय निर्माण झाले म्हणजे याच्या हाताद्वारा क्षत्रिय धर्म जोपासला गेला. (अर्थात क्षेत्र व्यवस्थापन व क्षेत्ररक्षण कसे करावे) (अस्य ऊरु यत् वैश्यः) याच्या जांघा म्हणजेच वैश्य, म्हणजेच या विराट पुरुषाच्या मांड्यापासून वैश्यवृत्ती, समाजजीवन देवघेव, व्यवहार, अर्थकारण व राज्य शासन कसे करावे याचे विचार सुरू होऊन; त्यांची अंमलबजावणी सुरू झाली. (अस्य पद्भ्यां शूद्रः अजायत) शेती करीत असतांना या विराटपुरुषाचे पाय मलिन होऊ लागले. ते कसे स्वच्छ करावे; हे तो ठरवू लागला. अर्थात, पाय जमिनीत रोवून उभे राहावे लागले, पाय अथक श्रमाने म्लान झाले, शिणले, त्यावर ते पुन्हा सतेज करण्यासाठी शूद्र व निषाद समाज निर्माण झाला, म्हणजेच समाजसेवा स्वच्छता, आरोग्य, झाडलोट (तण काढणे इ. उत्सर्जित व त्याज्य पदार्थांपासून उपयुक्त पदार्थ निर्मिती, उदा. खते इ.) तसेच परिवहन व्यवस्था करणारा समाज निर्माण झाला. (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र व निषाद या पंचजनजाती म्हणजे विराट पुरुषाची अविभाज्य अंगे होत. विराट पुरुषातील प्रत्येक घटक पुरुषात अर्थात व्यक्तीतही ही पाच अंगे शारीर आणि आत्मा/मन स्तरावर कर्मशील असतात म्हणजे ह्या पाचही अवस्था एका व्यक्तीतही सापडतात, तशाच त्या कुटुंब व समूह यांतही अर्थात, समूहजीवनातही अनुभवता येतात. याचाच अर्थ ही पाच अंगे वेगवेगळी, कमी अधिक महत्त्वाची, असे नाही तर ती अविभाज्य एकात्म अंगे आहेत. [आज अस्तित्वात असलेली वर्णव्यवस्था वेदांना मान्य नाही])

**चंद्रमाः मनसः जातः चक्षोः सूर्यः अजायत ।**
**मुखात् इन्द्रः च अग्निः च प्राणात् वायुः अजायत ।।१३।।**

(अस्य अधि पुरुषस्य मनसः चन्द्रमाः अजायत) या विराट पुरुषाच्या मनापासून चंद्र उत्पन्न झाला (म्हणजेच समाजातील व्यक्ती-व्यक्तीवर प्रेम कसे करावे, संघटित कसे राहावे? इ. प्रेम, वात्सल्य विषय विचार प्रकट झाले) (चक्षोः सूर्यः अजायत) पुरुषाच्या, नेत्रद्वयांपासून, सूर्य निर्माण झाला. (म्हणजेच निरीक्षण, विवेक, मार्गदर्शन आणि नीतीनियम यासंबंधी विचार प्रकट झाले.) (तस्य मुखात् इन्द्रः च अग्निः च अजायेतां/अजायत) त्याच्या मुखापासून इन्द्र आणि अग्नि निर्माण झाले (अर्थात सामर्थ्य निर्माण झाले) (अस्य प्राणात् वायुः अजायत) त्याच्या प्राणापासून वायू निर्माण झाला (जिवंतपणासह

आरोग्य विचार निर्माण झाला)

**नाभ्याः आसीत् अन्तरिक्षं शीर्ष्णः द्यौः समवर्तत ।**

**पद्भ्यां भूमिः दिशः श्रोत्रात् तथा लोकान् (अवयवेषु) अकल्पयन् ।।१४।।**

(नाभ्याः आसीत् अन्तरिक्षं) या विराट पुरुषांच्या नाभीपासून/केन्द्र स्थानापासून अन्तरिक्ष, (शीर्ष्णः द्यौः समवर्तत) मस्तकापासून द्यू लोक, (पदभ्यां भूमिः) चरणापासून भूमी, (श्रोत्रात् दिशः) कानापासून दिशा तर (सप्त लोकान् अवयवेषु अकल्पयन्) सात भूवनांची निरनिराळ्या ठिकाणी कल्पना केली. (आकाश/ अन्तरिक्ष/ नभ नभापासून नाभी- ही नाभी अन्तरिक्ष, सर्व ग्रह तारे व गर्भाशयातील, गर्भाचे पोषण त्याच्या बेंबीला संलग्न अशा नाळेद्वाराच होत असे. द्यू लोकाचा अंश मस्तकात असतो. पृथ्वीचा अंश चरणात असतो. दिशांचा अंश कानात असतो. पाय भू लोक, हृदय हा भुवर्लोक, तर मस्तक हा स्वर्गलोक, मन म्हणजे महलोक, बुद्धांची वृत्ती म्हणजे जनलोक, बुद्धीची एकाग्रता म्हणजे तपलोक, तर शरीरातील चैतन्य म्हणजे सत्य लोक. हे सात लोक शरीराच्या निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळ्या अवयवांत स्थापित झाले आहेत.)

**सप्तः अस्य आसन् परिधयः त्रिः सप्त समिधः कृतः ।**

**देवाः यत् यज्ञं तन्वानाः अवघ्नन् पुरुषं पशुं ।।१५।।**

(यत् देवाः यज्ञं तन्वानाः) ज्यावेळी देवांनी / दिव्य (पुरुषांनी) शास्त्रज्ञांनी/ ऋषींनी जीवन यज्ञ केला, (अस्य) त्या यज्ञामध्ये (सप्तः परिधयः आसन्) सात सीमा, तट होते. [पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश, मन आणि बुद्धी ते सात तट होत] या यज्ञात (त्रिः सप्त समिधः कृतः) ३x७=२१ वस्तुसमिधा म्हणजे इंधन मानण्यात आल्या [या वस्तू म्हणजे १२ महिने + ५ ऋतू यात हेमंत व शिशिर एकत्र म्हणून सहा ऐवजी पाच) + ३ प्रमुख लोक (भू, अंतरिक्ष, स्वर्ग) + सूर्य या २१ समिधा] [मानवासाठी व त्याच्या कल्याणासाठी या २१ वस्तू सतत जळत असतात म्हणजेच त्या वस्तू इंधन होत] (देवाः पुरुषं पशुं अबध्नन्) या विराट पुरुषाची, होमात आहुती देण्यात येणाऱ्या पशूसारखी, संभावना करण्यात आली. [हा सृष्टी-संसाररूपी यज्ञ अनादि काळापासून चालत आलेला आहे. वारा, वातावरण व उन्हाळा, पावसाळा, हिवाळा या ३ ऋतूंच्या अनुसार सृष्टीक्रम सतत बदलता राहतो. पण तो सतत क्रमवार वारंवार पुनःपुनः येतच राहतो. तीनही लोकात, हा बदल, फेरफार व प्रगती चालूच राहते. सूर्य या सर्व घटनांचा साक्षीदार असून तो समीधेप्रमाणे सारखा जळत असतो. म्हणून तर त्यापासून मानवाला प्रकाश, तेज, ऊर्जा, उष्णता, ज्ञान सतत मिळत राहते. जुन्या सृष्टीरूपी विराटपुरुषाची पशूप्रमाणे आहुती देऊन; नवीन विराट पुरुष = नवी सृष्टी सतत जन्म घेत असते.]

**यज्ञेन यज्ञं अयजन्त देवाः तानि धर्माणि प्रथमानि आसन् ।**

**ते ह नाकं महिमानः सचन्त यत्र पूर्वे साध्याः सन्ति देवाः ।।१६।।**

(देवाः यज्ञेन यज्ञं अयजन्त) देवांनी / दिव्य शास्त्रज्ञांनी (ऋषींनी) विराट पुरुषाचे म्हणजेच विष्णूचे यज्ञद्वारा मानसिक पूजन केले. (तानि स्तवनानि/ ऋचः प्रथमानि धर्माणि आसन्) या यज्ञात विष्णूचे स्तवन करीत असता, गायिलेल्या ऋचा हेच देवांचे प्राथमिक धर्म होते. याचाच अर्थ असा की ''तो यज्ञच'' देवांचा प्रथम धर्म झाला. (यत्र पूर्वे साध्याः देवाःसन्ति) स्वर्गात, या सृष्टीच्या पूर्वी साध्य वगैरे देवता, सृष्टीबरोबरच उत्पन्न झालेले सूर्य, चन्द्र, ग्रह, तारे, नक्षत्रे, इन्द्र, अग्नी, वायू इत्यादी देवता याठिकाणी वास करतात (तत्र ते ह महिमानः) त्याठिकाणी त्या धर्माचे पालन करणारे व महिमा जाणणारे महात्मे (नाकं सचन्त), जेथे कधीच दुःख अनुभवास येत नाही अशा स्थानी पोहोचले (त्यांना मुक्ती मिळाली)

ऋग्वेदाच्या दशममंडळातील नारायण ऋषींनी रचलेले हे पुरुषसूक्त नव्वद क्रमांकाचे आहे. 'ऋग्वेदाचा मराठी शास्त्रीय अनुवाद (वेदमहर्षी पं. श्रीपाद दामोदर सातवळेकर यांच्या 'ऋग्वेदका सुबोध भाष्य' या ग्रंथावर आधारित मराठी अनुवाद) अनुवादक डॉ. श्री. भीमराव सदाशिव कुलकर्णी, यांच्या अनुवादित ग्रंथाला प्रमाण मानून; त्यांच्या सौजन्याने येथे त्यांनी केलेले, अन्वयासह भाषांतरित पुरुषसुक्त येथे उद्धृत केले आहे. असे करतांना, त्यांनी मांडलेल्या ऋचा व अन्वय जसाच्या तसा येथे घेतला आहे. मात्र त्यांनी केलेले भाष्य संपादित करून स्वीकारले आहे.[२] डॉ. श्री. भीमराव सदाशिव कुलकर्णी हे शास्त्र ज्ञान शाखेचे विद्यार्थी होत. वेदांचा अनुवाद करतांना त्यांनी स्वीकारलेला दृष्टिकोन महत्त्वाचा वाटला. ते म्हणतात ''वेदांचा अनुवाद करतांना मी एक प्रमुख हेतू मनात ठरविला होता. नुसता पारंपरिक अनुवाद न करता त्यातील विज्ञान जेवढे म्हणून असेल ते साध्या, सरळ व सोप्या भाषेत मराठीत आणावे.''[३] पुरुषसुक्त मांडतांना डॉ. भीमराव लिहितात, ''या सुक्तात

वर्णन केलेले समाजपुरुषाचे वर्णन व सृष्टीची उत्क्रांती ही इतकी महत्त्वाची ठरली आहे की ते सुक्त थोड्याफार फरकाने चारी वेद, पुराणे, श्रीमद्‌भागवत व गीता यातही घेतले गेले आहे.''४

**२. पुरुषसुक्तातील 'लोक'कल्पना :-**

पुरुष सुक्तामध्ये नारायणऋषींनी 'लोक' कल्पना अतिशय व्यापक स्वरूपात मांडली आहे. ही कल्पना कल्पनातीत सृष्टीलाही व्यापून; पलीकडे असलेल्या अस्तित्वाला, कल्पनेने व्यापून टाकते. विराटपुरुष हाच सर्वव्यापक असा 'लोक' होय. अर्थात भारतीय दैवतकथा शास्त्राप्रमाणे सर्व धारण करणारे तत्त्व म्हणजेच 'विष्णू' होय. या सर्वव्यापक 'लोक'ची संकल्पना दोन स्तरावर द्विवीद्ध रूपात नारायणऋषी स्पष्ट करतात.

अ) या सुक्तातील दुसऱ्या ऋचेत पहिली कल्पना आली आहे ती अशी-

**पुरुषः एव इदं सर्व यत् भूतं यत् च भव्यं ।**
**उत अमृतत्वस्य ईशानः तत् अन्नेन अति रोहति ।।२।।**

जी जी चराचर सृष्टी भूतकाळांत होऊन गेली; जी चराचर सृष्टी आता वर्तमानकाळात अस्तित्वात आहे, आणि जी विशाल सृष्टी भविष्यकाली निर्माण होणार आहे अशी ही सर्वच चराचर सृष्टी ही या विराट पुरुषाचेच स्वरूप होय; नव्हे तो स्वतःच होय. त्याप्रमाणे या अखिल ब्रह्मांचा व अमृतत्त्वाचा (अविनाशित्वाचा) ईशान अर्थात स्वामी हा विराट/समाजपुरुष अर्थात विष्णूच होय. हा विराट पुरुष कधीकधी दृश्य स्वरूपात प्रकट होत असतो. अन्नभक्षणाने जे जे वाढते ते ते सर्व हा विराट पुरुषच होय. त्याच्याच इच्छेने हे सर्व घडते.

या पहिल्या 'लोक' कल्पनेत सृष्टी म्हणजेच 'लोक' अशी कल्पना आलेली असून; त्यात सर्व जड, अजड; चेतन अचेतन; सजीव, निर्जीव; सृष्टी सामावली आहे. ही सर्व सृष्टी म्हणजेच 'लोक', सनातन, अर्थात भूत, वर्तमान. भविष्यात स्वरूपतः, अर्थात तो स्वतःच सृष्टीरूप असतो. दृष्यरूपात अन्नभक्षण करणारे जे जीव दिसतात तेही तो 'लोक' अर्थात विराटरूप लोकच असतो. एवढेच नव्हे तर तोच कर्ता, भोक्ता, शास्ता असतो अर्थात तो स्वतःच स्वतःचा स्वामी असतो. दुसरी कल्पना या सुक्ताच्या तिसऱ्या ऋचेत आली आहे-



**एतावान् अस्य महिमा अतः यायान् च पुरुषः ।**
**पादः अस्य विश्वानि भूतानि त्रिपात् अस्य अमृतं दिवी ।।३।।**

या विराट पुरुषाचा महिमा असा की ज्ञान अशी दृश्य अदृश्य वैश्विक सृष्टी हा या विराटपुरुषाचा केवळ चौथा भाग होय. याचे उर्वरित तीन भाग मानवी दृष्टीच्या अर्थात प्रतिभेच्या अतीत म्हणजे पलिकडे द्यू लोकात आहेत (असे असूनही ते मानवाला अर्थात संवेदन कक्षेला जाणवतात) याचा स्पष्ट अर्थ असा की विराटपुरुष हा समग्र अस्तित्वरूप आहेच; तथापि चराचरसृष्टीरूपात त्याचा अनुभव घडत असतांना त्याच्या अनुभवनाला पराकोटीची व्यापक संवेदना असते. ज्याची मानवाला म्हणजे लोकसाहित्यातील 'लोक'ला त्याची कल्पनाही नसते; तरी त्याही संवेदनेचा तो भोक्ता व स्वामी असतो; कारण तोही विराट पुरुष स्वरूपच असतो.

या दोन्ही कल्पनांमध्ये प्रकट झालेला विराटपुरुष हा केवळ मानवसमूहापुरता मर्यादित नाही. तो सर्वव्यापक आहे असे दिसते. येथे हे लक्षात घेतले पाहिजे की ही सर्वव्यापकता नाकारून केवळ मानवाचा विचार करता येतो का? याचे उत्तर नाही असेच आहे. केवळ मानव वा मानवी समूह, सामान्यतः माणसांचे कळप हे या सर्वव्यापक अस्तित्वाचे, अविभाज्य आणि अपरिहार्य भाग असतात; हे मान्यच करावे लागते. लोकसंस्कृती, ही लोकच्या सर्वव्यापक अस्तित्वाशी नाळ राखूनच अपरिहार्यपणे संवेदित होते. या स्तरावर या प्रकारे, सर्वात्मक, सामूहिकतेचा विचार केला आहे; हे लक्षात घ्यावे लागते.

ब) द्वितीय स्तरावर दुसऱ्या प्रकारे विचार करतांना देखील दोन कल्पना प्रकट झाल्या आहेत. या दोन्ही कल्पना सुक्तातील तेरा व चौदा क्रमांकाच्या ऋचांमध्ये व्यक्त झाल्या आहेत.

तेरा क्रमांकाची ऋचा अशी-

**चन्द्रमाः मनसः जातः चक्षोः सूर्यः अजायत ।**
**मुखात् इन्द्रः च अग्निः च प्राणात् वायुः अजायत ।।१३।।**

मनाची अधिष्ठात्री देवता चंद्र समजली जाते, हे सर्वश्रुत आहे. चंद्राच्या कलांबरोबरच मानसिक अवस्थेत बदल होत असतो. उदा. अमावस्येला मानसिक व्याधी बळावतात; तर पौर्णिमेस, प्रितीला बहर येतो. याप्रमाणे डोळ्यांची देवता सूर्य. डोळ्यात सूर्यतेज असते. कानांची देवता वायू. वायू

ध्वनीवहन करतो. वायू हा प्राणही आहे. वाणीची देवता अग्नी. एकूण सर्व देवदेवतांचा अंश मानवी शरीरात असतो. याच देवतांच्या कल्पना त्यांच्या स्थानानुसार, यज्ञविधीमध्ये केलेल्या आहेत. उदा. योगशास्त्राची बैठक ज्या प्राणायामावर आहे; त्याचे स्वरूप याच तऱ्हेने प्रत्येक मानवी शरीराशी काया, वाचा, मन या संदर्भाने जोडलेले दिसते 'स्वयंपुरोहित'[५], या ग्रंथात कृ. म. बापटशास्त्री लिहितात ''प्राणायाम-व्याख्या-सप्रणव व्याहृतिका गायत्रीं सिरसा / त्रिःपठ दायत प्राणः प्राणायाम् सउच्यते/ (मनुस्मृती). अर्थात 'प्राणायाम करते वेळी-प्रणव ओंकार भूः पासून सात व्याहृती, तस्तवित् पासून प्रचोदयातपर्यंत गायत्री आणि आपोज्योती, हे गायत्री, शिर, असे चार मंत्र म्हटले, म्हणजे प्राणायाम होतो. प्राण म्हणजे श्वासवायू. आयाम म्हणजे निरोध. श्वासवायूच्या निरोधाला प्राणायाम म्हणतात. हरएक मंत्रास ऋषी, देवता आणि छंद असतात.'' सप्त व्याहृती अर्थात स्पप्त लोक एकाच शरीरात आहेत त्यांना मिळून, लोक ही संकल्पना, आली आहे. हे चिंतनीय आहे. घटकलोक (व्यक्ती) अंगस्वरूप लोक (एकात्म मानवी समाज) विराटपुरुषरुप लोक या तीनही मानवी जाणिवांत हे सप्तलोक सामावलेले असतात. त्या सप्त व्याहृती अर्थात लोक म्हणजे भूः, भूवः, स्वः, महः, जन, तप, सत्य हे होत. एवढे स्पष्टीकरण येथे करण्याचे कारण; मानवी मन आणि शारीर संवेदनांचा अपरिहार्य संबंध घटकलोक, अंगस्वरूपलोक आणि विराटपुरुषरुप लोक, असा त्रिविधतेने समजावून घ्यावा लागतो. याचे अधिक स्पष्टीकरण प्रस्तुत लेखकाने 'लोकबंध'[६] पुस्तकात केले आहे. हीच संकल्पना चौदाव्या ऋचेत ऋषी नारायणांनी अगदी स्पष्ट शब्दांत मांडली आहे. ती अशी-

**नाभ्याः आसीत् अन्तरिक्षं शीषर्णः द्यौः समवर्तत ।**
**पद्भ्यां भूमिः दिशः श्रोत्रात तथा लोकान् (अवयवेषु) अकल्पयन ।।१४।।**

नारायण ऋषींनी अवयवांना आणि शरीरधारणेला 'लोक' हा शब्द वापरला आहे. ही संकल्पना जागतिक लोकसाहित्याच्या (Folk-lore) अभ्यासाला किंवा लोकविद्येला, मूलगामी बळकटी देणारी आणि अभ्यासाची व्याप्ती वाढविणारी आहे. डॉ. श्री. भीमराव सदाशिव कुलकर्णी या ऋचेचे स्पष्टीकरण करतांना लिहितात[७]- सात लोकांची कल्पना अर्थात सात भुवनांची कल्पना निरनिराळ्या अवयांच्या ठिकाणी केली आहे. आकाश / अंतरिक्ष / नभ या



नभापासून नाभी- ही नाभी अंतरिक्ष सर्व ग्रह तारे व नक्षत्रांचे केंद्र स्थान होय. नभ ही अधिष्ठात्री देवता-हिचा थोडा अंश नाभीत असतो. गर्भाशयातील गर्भाचे पोषण त्याच्या बेंबीला संलग्न अशा नाळेद्वारेच होत असते. द्यू लोकचा अंश मस्तकात असतो. त्यामुळेच मन कोठेही व कसेही भटकू शकते. पृथ्वीचा अंश चरणात असतो. दिशांचा अंश कानात असतो. पाय हा 'भू' लोक, हृदय हा 'भुवर्लोक', मस्तक हा 'स्वर्गलोक', मन हा 'महलोक', बुद्धीची वृत्ती ही 'जनलोक'; बुद्धीस्थिरता म्हणजे 'तप'लोक, आणि शरीरातील चैतन्य म्हणजेच 'सत्य लोक'. हे सात लोक शरीराच्या निरनिराळ्या ठिकाणी असतात आणि निरनिराळ्या अवयवांत स्थापित झाले आहेत.

'Folk-lore' चा अभ्यास सुरू झाल्यापासून; समूहसापेक्षतेने मौखिक परंपरागत, लोक-विद्येचा अभ्यास; स्थलकाल परिस्थिती सापेक्षतेने केला जात आहे. त्यातून भाषा, मानवी इतिहास, सामाजिकता आणि सांस्कृतिकता, एकूण माणसाचे असणे आणि त्याचे; सुख, समाधान, सानंद मिळविण्यासाठी, संघर्षात्मक जगणे; या सर्व गोष्टींच्या शारीर वर्तनात्मक, शारीर आणि भौतिक साधनात्मक, परंपरांना, शाब्द परंपरांच्या आकारासह, मूलाकार आणि परिवर्तने यांचा वेध घेत; मानवी जीवनाचे, आकलन करण्याचा दीर्घोद्योग सुरू आहे. या सर्व दीर्घोद्योगाच्या मूळाशी Folk- म्हणजे 'People general' असा मानवी समूह लक्षात घेतला; तर त्यातील एक अविभाज्य, घटक लोक म्हणजे Individual व्यक्ती याचा विचार व आकलन महत्त्वाचे ठरते. हे आकलन घटकलोक, अंगस्वरूपलोक आणि विराटपुरुषरुपलोक; या त्रिविध स्वरूपातच करावे लागते. तसे करायचे असेल तर मानवाचे दृश्य जड असे संपूर्ण शरीर आणि अदृश्य असे मन-बुद्धी आणि चैतन्य या दोन्हीसहचे अस्तित्व, विचारात घ्यावेच लागेल. या अस्तित्वाचा संबंध, सुरा, तात्कालिक असा नसतो, हे अलिकडील मानव्य शास्त्रांनी अनेकदा स्पष्ट केले आहे. त्या दृष्टीने ऋषी नारायण यांचा पुरुषसुक्तातील, अर्थात दैवत कथाशास्त्राप्रमाणे, 'विष्णू' स्वरूपातील लोककल्पना; हा, Folk-lore 'लोकविद्या' अर्थात लोकसाहित्य शास्त्रसंकल्पनांचा मूलाधार; म्हणून स्वीकृत करावी लागेल. नारायण ऋषींनी लोकसंकल्पनेच्या व्यापकतेवर केवळ प्रकाश टाकला नाही; तर लोकसंकल्पनेचे वैश्विक, चक्रनेमीक्रमाचे, 'यज्ञ' या संकल्पनेद्वारा स्पष्टीकरण केले आहे. डॉ. भीमराव कुलकर्णी यांनी केलेले या संदर्भातील विवेचन

तेवढेच प्रगल्भ आणि लक्षणीय आहे. ते पंधराव्या ऋचेवर भाष्य करतांना लिहितात 'हा सृष्टी-संसाररूपी यज्ञ अनादि काळापासूनच चालत आलेला आहे. वारा, वातावरण व उन्हाळा, पावसाळा, हिवाळा या ३ ऋतूंच्या अनुसार सृष्टीक्रम सतत बदलत राहतो. पण तो सतत क्रमवार वारंवार पुनःपुनः येतच राहतो. तीनही लोकात हा बदल, फेरफार व प्रगती चालूच राहाते. सूर्य या सर्व घटनांचा साक्षीदार असून; तो समिधेप्रमाणे, सारखा जळत असतो. म्हणून तर त्यापासून; मानवाला प्रकाश, तेज, ऊर्जा, उष्णता, ज्ञान सतत मिळत राहते. जुन्या सृष्टीरूपी विराट पुरुषाची पशुप्रमाणे आहुती देऊन नवीन विराट पुरुष = नवी सृष्टी जन्म घेत असते.'[८] असे स्पष्टीकरण करून ते शेवटच्या सोळाव्या ऋचेचे स्पष्टीकरण करतांना म्हणतात, '(देवाः यज्ञेन यज्ञं अजयन्त) देवांनी / दिव्य शास्त्रज्ञांनी यज्ञरूप विराट पुरुषाचे म्हणजेच विष्णूचे मानसिक यज्ञ द्वारा पूजन केले.'[९] Folk-lore चा अभ्यास हा वर्तमानातील लोकच्या आधारे, सनातनपणे चाललेल्या नित्यपरिवर्तन आणि नित्यवर्तमान लोकअवस्थांचा, अर्थात यज्ञाचा अभ्यास आहे. भारतीय दैवतकथांशास्त्रांच्या आधारे, मानवकेंद्रित, सतत परिवर्तनशील तरी नित्य लोकजीवनांचे, मूलग्रामी, अर्थात लोकसाहित्यशास्त्रीय विवेचन, सर्व ज्ञानशाखांना दिशा, सामग्री आणि बळ देणारे ठरते.

**३. लोकव्यवस्था संकल्पनेचा झालेला विपर्यास :-**

भारतीय ज्ञानसाधना परंपरा ह्या सर्वात प्राचीनतम परंपरा आहेतः ते आता विश्वमान्य झाले आहे. हे ज्ञानधन सर्वजगतात, निरनिराळ्या प्रकारे नेले गेले आहे किंवा पोहोचले आहे. भारतीय ज्ञानसाधनेची मौल्यवानता अधोरेखित करीत असतांनाच अनेक पंडितांनी जाणीवपूर्वक, अजाणता आणि तौलनिक अभ्यासाच्या तथाकथित प्रयत्न प्रपंचात, भारतीय ज्ञानपरंपरेतील, अनेक संकल्पनांवर भाष्य केले आहे. अनेकदा भाष्य; सामाजिक, राजकीय, अभ्यास यांच्या अभिनिवेशने घडते. या व अशा कारणाने बाधित होऊन; संकल्पनांचा विपर्यास झालेला दिसतो. भारतीय वर्णव्यवस्था, ही स्वभावतः लोकव्यवस्थेच्या नैसर्गिक स्थितीगतीचे वर्णन आहे. त्यातून लोकव्यवस्थेची मूलभूत अंगे स्पष्ट झालेली असतात. त्याचा विपर्यास गेल्या दोनअडीचशे वर्षात जमेल त्या सर्व प्रकारे व सर्व पातळ्यांवर, करण्याचा प्रयास, उपरोक्त कारणांनी होतच राहिला आहे. मूळ समजून घेणे तर दूर परंतु मुळातून पाहाणेही न करता श्रुती आणि



स्मृती ग्रंथांना कालबाह्य ठरवून; नाकारण्याचा उद्योग, सातत्याने, हेतुतः किंवा अज्ञानवश होतच आहे.

पुरुष सुक्तात, मूळ वर्ण संकल्पना अकराव्या आणि बाराव्या ऋचांमध्ये आली आहे. त्यातून विष्णूकार्याचे, अर्थात विश्वाच्या समग्र चक्रनेमी क्रमाचे वर्णन, कृषीसांस्कृतिक स्वरूपात आले आहे. अकराव्या ऋचेप्रमाणे- ज्यावेळी विराट समाजपुरुषाने उत्कृष्ट जीवांची / बियाणांची आहुती देऊन / पेरणी करून यज्ञ केला / उत्कृष्ट पीक निर्मिती केली, त्यावेळी या विराटपुरुषाने कोणत्या प्रकारे मानसिक कल्पना केल्या, अर्थात शेतीविषयक कोणते विचार निश्चित केले? याचे मुख कोणते? त्याचे हात आणि उरु अर्थात जांघा कोणत्या, पाय कोणते? इ. कोणती कल्पना केली अर्थात संपूर्ण वैश्विक चक्रनेमीक्रमरूपी यज्ञात- मानवसापेक्ष असे कर्मकेंद्रित गट कसे मानता येतात याचा विचार केला त्यावेळी बाराव्या ऋचेत ही कल्पना स्पष्ट करतांना-

**ब्राह्मणः अस्य मुखं आसीत् बाहू राजन्यः कृतः ।**
**अरु तत् अस्य यत् वैश्यः पदभ्यां शूद्रः अजायत ।।१२।।**

ब्राह्मण ब्रह्मज्ञानी / देव/ दिव्यज्ञानी शास्त्रज्ञ या विराटपुरुषाचे मुख होय म्हणजेच या विराटपुरुषाच्या मुखापासून ज्ञानार्जन, ज्ञानोपासना व ज्ञानाध्यापन होऊ लागले. त्या मुखापासून उत्तमोत्तम शेती कशी करावी यासंबंधी उत्तमोत्तम विचार प्रकट होऊ लागले. याच्या दोन्ही हातापासून क्षत्रीय प्रकट होऊ लागले म्हणजे याच्या हाताद्वारा क्षत्रीय धर्म जोपासला गेला व शेतीचे संरक्षण कसे करावे, कोणते उपाय योजावेत, याविषयी कल्पना मांडून; त्या कशा अमलात आणावयाच्या, याची प्रत्यक्ष आखणी केली गेली. याच्या जांघा म्हणजेच वैश्य. म्हणजेच या विराटपुरुषाच्या मांड्यांपासून वैश्यवृत्ती अर्थात समाजजीवन, देवघेव, व्यवहार, अर्थकारण व रयत शासन कसे करावे याचे विचार सुरू होऊन; त्यांची अंमलबजावणी सुरू झाली. शेती करीत असतांना या विराटपुरुषाचे पाय मलीन होऊ लागले. अर्थात व्यवहारात मलीनता, शीणता आदि गोष्टी निर्माण होऊ लागल्या. ते कसे स्वच्छ करावे हे तो ठरवू लागला व त्यामुळे याच्या पायापासून (स्वच्छता कामे, पर्यटनासह व प्रवासासह देवाणघेवाण करण्याची कामे, सेवा कामे, संदेशवहनादी, धनदौलत वाहनादी कामे, पशुधन ने -आण व्यवस्थादि कामे, अशी करणारा समाज) शूद्र व निषाद समाज निर्माण झाला. सेवा, स्वच्छता, आरोग्य, झाडलोट व व्यवहारांची

निर्मिती झाली. डॉ. भीमराव स्पष्ट करतात, ''ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र व निषाद या पंचजनजाती म्हणजे या विराटपुरुषाची-समाजपुरुषाची अविभाज्य अंगे-अवयव होत. ती वेगवेगळी नाहीत व एकमेकांपासून विभक्तही करता येत नाहीत. त्यांच्यात भेदभाव करण्याची आवश्यकताही नाही. आज अस्तित्वात आहे तशी वर्णव्यवस्था वेदांना मान्य नाही. ज्याने त्याने आपापला आवडीचा व्यवसाय निवडावा व त्यात प्राविण्य मिळवून समाजाचे कार्य करावे; हेच यावरून ध्वनीत होते. नाहीतर वाल्या कोळ्याचा वाल्मिकी ऋषी, ब्रह्मणस्पतीचा बृहस्पती, विश्वामित्र, व्यास हे महर्षी झालेच नसते.''[१०]

Folk-lore लोकविद्या ज्या ज्ञानशाखेला मराठी पारिभाषिक शब्द म्हणून लोकसाहित्य असा शब्द योजला आहे. तसेच भारतात वेगवेगळ्या भाषांमध्ये, वेगवेगळे पारिभाषिक शब्द योजले आहेत. या सर्व शब्दांना अभ्यासकांनी खूपच मर्यादित अर्थाने पाहिले आहे. त्या अर्थछटांचे स्वरूप अडाणी, अंधश्रद्धा, प्रवाहपति मागासलेले जनसमूह; वर्णव्यवस्थेतील शूद्रातिशूद्र, अलिकडील काळातील बहुजन, एवढेच काय वन्य, राक्षस इ.इ. असे ठरविले आहे. त्यातूनच अभिजन आणि लोक अशी भेददर्शी परिभाषा पुढे आली आहे. यातील अर्थछटा मूळात योजलेल्या नाहीत. जर्मनीतील ग्रीम यांनी Volkkunde लोकविद्या असा शब्द वापरला आहे. Popular Antiquitiy अर्थात लौकिक पुराणपरंपरा असे शब्द वापरले गेले. प्रस्तुत ग्रंथाच्या प्रकरण दोनमध्ये, याची चर्चा केली आहेच; त्यातून पुढे Folk-lore असा शब्द लोकविद्या म्हणून वापरला गेला.

सामान्य जनांत प्रचलित ज्ञान किंवा विद्येचा पारंपरिक आणि पौराणिक आविष्कार असा अर्थ घेणे अनुचित असे नाही. मात्र विशिष्ट मानवी समूहाचे वाङ्मय, असा अर्थ त्यातून निष्पन्न होत नाही. तसा अर्थ म्हणजे मूळातील Volk किंवा Folk शब्दाच्या, अर्थाचा विपर्यास होय. Volk किंवा Folk या शब्दाला संस्कृतातील 'लोक' हा पर्यायी शब्द अगदी चपखल आहे. त्याची अर्थछटा सामान्यतः आम मानव, समस्त मानवजात अशी घ्यायला हरकत नाही. मात्र पुरुषसुक्ताने केवळ मानवजात पृथकपणे विचारात घेता येत नाही. मानवी जीवनाचा विचार मानव 'मानवकेंद्रीततेने' करतो; त्यामुळे त्याचे पृथकस्थान विचारात घेतो इतकेच. पुरुषसुक्ताने त्यांचे हे पृथक मानणे ही 'लोक' संकल्पनेच्या दृष्टीने किती संकुचित आहे; तेवढेच हे अनैसर्गिक



आहे; हेच स्पष्ट केले आहे. एक खरे सामान्यांच्या पारंपरिक सारणी अनुसरण्याच्या शहाणपणातून शास्त्रे निर्माण होतात व त्या शास्त्रांचे सामान्य जीवनात Popular Antique च्या स्वरूपात अर्थात पुराणपरंपराच्या स्वरूपात प्रचलन सुरू असते. त्या दृष्टीने त्याला Antiquities of the common people योग्य आहे. त्या दृष्टीने देशविदेशातील Folk-lore च्या अभ्यासकांनी वेदांतील 'लोक' संकल्पना ग्राह्य मानूनच; कारण ती समग्र व नैसर्गिकपणे सिद्ध आहे; folk-lore चा अभ्यास केला पाहिजे. हेच पुरुषसुक्तातील 'लोक' संकल्पनेने स्पष्ट होते.

**४. समारोप :-**

पुरुषसुक्तातील 'लोक' संकल्पना, अर्थात वेदांतील लोक संकल्पना Folk-loreच्या संदर्भात समजावून घेतांना; मुळात विज्ञान शाखेचे अभ्यासक, तसेच वेदवाङ्मयाचे गाढे व्यासंगी, डॉ. भीमराव कुलकर्णी यांनी, केलेल्या 'ऋग्वेदाचा मराठी शास्त्रीय अनुवाद' या ग्रंथाचा थेट आणि स्वैर उपयोग या प्रकरणातील संकल्पना स्पष्ट करण्यासाठी केला. याचे कारण त्यांनी केलेला अनुवाद प्रस्तुत लेखकाला ग्राह्य वाटला हे स्पष्ट आहे. वेदवाङ्मयातील 'लोक' संकल्पना विचारात घेतल्याशिवाय Folk-lore च्या व्यापक अभ्यासाला, सर्व ज्ञानशाखांच्या दृष्टीने, सशास्त्रता येणार नाही. याची, अभ्यासाने खात्री बाळगावी. 'लोकबंध' या प्रस्तुत लेखकाच्या पुस्तकात 'घटकलोक', 'अंगस्वरूप लोक' आणि 'विराटपुरुषरुपलोक' असे 'लोक'चे त्रिविधत्व स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. पुरुषसुक्तातील 'लोक' संकल्पनेने ते अधिक स्पष्ट झाले आहे. लोकसाहित्य अभ्यासक्षेत्रात तसा विचार करण्याची परंपरा दृढ होणे आवश्यक आहे. अन्यथा Folk-lore हे सर्वशास्त्रांना प्राथमिक स्वरूात, उपयुक्त सामग्री पुरविणारे शास्त्र आहे; हे म्हणणे अपनिरीक्षणाचे व अनिरीक्षणाचे ठरेल.

**५. संदर्भ व टीपा :-**

१) लोकबंध : सहस्रबुद्धे अनिल, नितीन प्रकाशन, पुणे, नवीन सुधारित आवृत्ती जुलै २०१२.

२) ऋग्वेदाचा मराठी शास्त्रीय अनुवाद : अनुवादक, कुलकर्णी (डॉ. श्री.) भीमराव सदाशिव, भाग १ ते ५ मधील भाग ५ (ऋग्वेद मंडळ १० मधील ८६ ते १९१ सुक्ते आणि परिशिष्टे), पहिली आवृत्ती-२००८, प्रकाशक : श्री. दत्तात्रय पांडुरंग म्हैसकर, म्हैसकर फाऊण्डेशन

विश्वस्त निधी, महात्मा गांधी मार्ग, विष्णूनगर, डोंबिवली (पश्चिम)

३) तत्रैव, प्रास्ताविक.

४) तत्रैव.

५) स्वयंपुरोहित : बापटशास्त्री (वेदशास्त्रसंपन्न) कृ. म., राजेश प्रकाशन, पुणे ३८, सुधारून वाढविलेली आवृत्ती २०१५ 'प्राणायाम व्याख्या'

६) उनि., लोकबंध.

७) उनि., ऋग्वेदाचा मराठी शास्त्रीय अनुवाद.

८) तत्रैव.

९) तत्रैव.

१०) तत्रैव.

●●●



### प्रकरण सातवे

# भारतीय दैवतकथा शास्त्रांनुसार 'लोक' संकल्पना

**Concept of Folk according to Indian Mythology (Shruti, Smruti, Puranas)**

भारतीय परंपरेतील, वेद वाङ्मयात, 'लोक' ही संकल्पना कोणत्या स्वरूपात प्रकट झाली आहे; हे पाहण्यासाठी प्रमुख उदाहरण म्हणून; पुरुषसुक्तातील 'लोक' संकल्पना आपण समजावून घेतली. भारतीय दैवतकथा शास्त्रानुसार (Indian Mythology) 'लोक' संकल्पना, ही वेदातील 'लोक' संकल्पनेशी, सुसंगतपणे, विस्तारित झाली आहे. भारतीय दैवतकथा शास्त्राचे वैशिष्ट्य म्हणजे सर्व जड-चेतन, चर-अचर, सजीव-निर्जीव, भूतमात्र, प्राणीमात्र, मनुष्यमात्र एव्हढेच नव्हे तर अवकाश, अंतरिक्ष, वायू, सूर्य, पाणी, पृथ्वी या सर्वांना देवत्व, अर्थात दिव्य शक्तीमत्त्व असल्याचे कल्पिले आहे. ही केवळ कल्पना किंवा आभास नाही; तर भारतीयांची ती दृढ संवेदना, जाणीव आहे. भारतीय दैवतकथा शास्त्राने सर्व अस्तित्वांना, देवत्व दिले आहे; तसेच त्या सर्व ठिकाणी देव आहेत आणि ते त्या सर्व अस्तित्वाचे स्वामी, नियंते आहेत; असे मानले आहे. आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे; मृत्यूपूर्व अस्तित्वांना आणि मृत्योत्तर अस्तित्वांना मान्यता देऊन; त्या दोन्ही अवस्थांना देवत्व बहाल केले आहे. दैत्य, राक्षस, समंध, भूत, मुंजा, खविस, सैतान यांनाही देवत्व दिले आहे. ही वैशिष्ट्ये निर्माण होण्याचे कारण द्विविध आहे. परमेश्वरत्व, अनंत, महाशून्य, चिद्, सत्य, आनंद, केवल, असे एक अविनाशी, शाश्वत असे तत्त्व आहे. तेच तत्त्व मानवी संवेदन कक्षेत येणाऱ्या; सर्व अस्तित्व रूपांत

प्रकट झाले आहे. याची जाणीव; भारतीय मनात सनातनपणे दृढावली आहे. नारायण ऋषींनी मांडलेल्या विराट पुरुषांच्या कल्पनेत हेच वर्णन अभिव्यक्त केले आहे. 'देव' या कल्पनेत सर्व सामावले आहे. याचा 'देव' विषयक प्रत्यय नित्य घेता येतो. समोर प्रकटणारी प्रत्येक चैतन्यमयी अवस्था, सर्वव्यापीच आहे; ही जाणीव विलक्षण आहे. या सर्वव्यापी चैतन्याचा अनुभव 'लोक' संकल्पनेतून घेतला आहे. जी स्थाने, जे विभाग, ज्या अवस्था, जे समूह, अनुभवास येतात; ते सर्व 'लोक' संकल्पनेत 'अंगस्वरूप लोक' लोक म्हणून मानले जातात. या सर्व 'लोक'चे सनातन असे, अविनाशी स्वरूपातील प्रचलन करणारी तीन शक्तीतत्त्वे 'देव' स्वरूपात मान्य केली आहेत. पुन्हा प्रकटन, व्यवस्थापन, विलय आणि पुन्हा प्रकटन; अशी शाश्वत, अविनाशी क्रीडा, या सर्वव्यापी चैतन्यतत्त्वाची, त्यातूनच त्रिविध स्वरूपात प्रकटलेल्या, शक्तीतत्त्वांकडून, सर्व अंगस्वरूप लोकांत घडते; असा बुद्धिनिष्ठ, श्रद्धानिष्ठ आणि योगशास्त्रीय विचार भारतीय दैवतकथा शास्त्राच्या मुळाशी आहे. त्यातूनच, त्रिदेव- ब्रह्मा, विष्णू, महेश, त्रिशक्ती महामाया, महालक्ष्मी, महाकाली; यांच्या कल्पना पुढे येऊन; त्यांच्यातून प्रकटलेल्या पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश या पंचतत्त्वांच्या अनेकविध शक्तींना, कलांना देवत्व प्राप्त झाले. यातूनच वर उल्लेखिलेल्याप्रमाणे सर्व अस्तित्वेच देवस्वरूप झाली. या दैवतकथांचा थेट संबंध 'लोक' धारणेशी आहे. यात सनातन प्रातिभ ज्ञानाचा विलास आहे असे वाटले तरी; अनंत अस्तित्वाचे, बुद्धिगम्य व्यवस्थापन करण्याचा प्रयास आहे. 'लोक' ही संकल्पना या दिव्य व्यवस्थापनाचे, सगुण साकार रूप आहे. हे लक्षात घेतले की भारतीय 'लोक' संकल्पना कशी सर्वव्यापी आहे, हे लक्षात आहे. 'लोक' हे धारणातत्त्व आहे. त्यामुळेच 'लोक' हा एकात्म समूह आहे, हे स्पष्ट जाणवत राहते. या धारणातत्त्वाला 'विष्णू' असे नाव, भारतीय दैवतकथा शास्त्रांतर्गत आहे. यालाच पुरुषसुक्तात विराट अर्थात व्यापक आणि दिव्य पुरुष म्हटले आहे. या विराटपुरुषालाच 'लोक' असे म्हटले आहे, हे लक्षात घेऊन; भारतीय परंपरेतील 'लोक' संकल्पना विचारात घ्यावी लागते. स्थान आणि अस्तित्व, यांचा व्यापक संबंध 'लोक' संकल्पनेत प्रकट होतो. म्हणूनच विराटपुरुषरुप लोकचे अगणित अंगस्वरूप लोक निर्माण झाल्याचा अनुभव, व्यावहारिक पातळीवर घेता येतो.



**१. वैदिक वाङ्मयातील समग्र 'लोक' उत्पत्ती संकल्पना (सृष्टी निर्मिती संकल्पना :–**

पुरुष सुक्ताच्या आधारे विराटपुरुषलोक संकल्पना कशी प्रकटली आहे याचा विचार आपण केला आहेच. वैदिक काळात, (विश्वाच्या उत्पत्तीविषयी) 'लोक'च्या उत्पत्तीविषयीचे चिंतन खूपच प्रगल्भ आहे. 'भारतीय इतिहास व संस्कृती – प्रारंभकाळ' या ग्रंथातील लेखन यावर यथोचित प्रकाश टाकते ते असे, ''ऋग्देवात सृष्टीनिर्मितीची (लोकनिर्मितीची) चार वर्णने आढळतात. प्रथम सुप्रसिद्ध पुरुषसुक्त घेऊ (ऋ-१०-९०). त्यात ''अमृत्वास्य ईशानः'' (अमृतत्वाचा प्रभू) अशा विश्वपुरुषाची कल्पना आहे. त्याच्यापासून विराज द्वारा एक अन्य पुरुष उत्पन्न झाला; व त्याला यज्ञात बळी देऊन; देवांनी समग्र विश्व निर्माण केले. पुरुष सुक्तात त्या विश्वपुरुषाला अध्यक्ष व त्या दुसऱ्या पुरुषाला त्याचा प्रतिनिधी म्हटले आहे. तो सर्वप्रथम मानवस्वरूप असून; त्याच्या अवयवांपासून विश्व विकसित झाले. हा यज्ञ वास्तविक नरमेध नसून; सांकेतिक अर्थाचा आहे. त्यात त्या पुरुषाच्या देहाच्या विभिन्न भागांची पुनर्रचना होऊन; सृष्टी निर्माण झाल्याची कल्पना आहे. अशी कल्पना अन्य काही समाजांतही आढळून येते.

सृष्टीनिर्मितीचे (लोक निर्मितीचे) एक अन्यविवरण ऋग्वेदाच्या १०.१२१ मध्ये आले आहे. त्यात प्रजापती (हिरण्यगर्भ) हा देव सृष्टीच्या आरंभी असून, त्याने पृथ्वी व स्वर्ग यांना आधार दिला आहे. यात विशाल जलसागरातून प्रजापतीरूप गर्भ निर्माण झाल्याचे म्हटले आहे.

वरील ऋचा नारदीय सूक्ताशी (ऋग्वे. १०-१२९) जुळणारी आहे. त्या सूक्तात अशी कल्पना व्यक्त आहे की; प्रारंभी केवळ तम (अंधःकार) पसरलेला असून; सर्वत्र जळ भरले होते. मात्र सृष्टीचे 'अभु' नामक बीजतत्त्व सुप्त स्वरूपात विद्यमान होते. 'अभु' ('सृष्टी निर्माण करणारे अभवनशील') सुरुवातीस एका आवरणाने वेढलेले होते. ते आवरण फोडले जाऊन; तेज तत्त्वाच्या प्रभावाने आतील 'अभु' बाहेर आला (जन्म पावला). हे तेज (सर्वप्रथम प्रकाशकिरण), नंतरच्या परंपरेनुसार, जलसागरात पहुडलेल्या विष्णूच्या बेंबीतून बाहेर पडलेले कमल मानण्यात आले. आणि वरुणाच्या स्तुपातील पाताळ व स्वर्लोकाला जोडणाऱ्या (पाया उलटा वर असलेल्या) (ऋ. १-२४-७) स्तंभाची कल्पना पुढे कठोपनिषदात (२-६-१) व

भगवद्गीतेत (१५-१) संसाररूपी अश्वत्थ वृक्षात परिवर्तीत झाली.

ऋग्वेद १०-७२ मध्ये 'असत' पासून सत् झाल्याचे म्हटले आहे; तेथे असत म्हणजे संपूर्ण अस्तित्वशून्यता नसून, सत् मध्ये असणाऱ्या विशिष्ट व्यवच्छेदक गुणांचा अभाव, असा अर्थ आहे. या सूक्तात स्थलकालाची कल्पना व्यक्त झाली आहे. यातील 'उत्तानवाद' (आपले पाय पसरणारा) म्हणजे किरणरूपी पाय असलेला सूर्य दिसतो. सृष्ट्युत्पत्तीविषयी (लोकोत्पती) वरील वैदिक वर्णनात

(१) सुरुवातीस अविच्छिन्न जलसागर या एकाच मूल स्त्रोतातून सृष्टी उत्पन्न झाली.

(२) या मूल (जलरूप) ऊर्जेतून तेजस तत्त्वाचे प्रतीक प्रकाश किरण या रूपाने, उष्णता ऊर्जा उत्पन्न झाली.

(३) प्रकाशाबरोबरच स्थलकालाची जाणीव झाली.''[१]

या ससंदर्भ विवेचनाच्या पुढे जाऊन सृष्ट्युत्पत्तीचे अर्थात लोकोत्पत्तीचे वेदांतील चिंतन स्पष्ट करतांना इतिहास लेखक म्हणतात, ''ऋग्वेदानुसार, विश्वाची उत्पत्ती, अनेक देवांनी मिळून केली. हे देव आद्य सत् तत्त्वांचे प्रतिनिधी होत. सृष्टी निर्माणकर्त्या देवात त्वष्टा व विश्वकर्मा विशेष होते. नंतर त्वष्ट्याचे स्थान इंद्राने घेतले. इंद्राला वैदिक आर्याचा नेता मानले आहे. सृष्टीनिर्माणात यमाचा कार्यभाग महत्त्वाचा दाखविला आहे. क्र. १०-१३-४ मध्ये म्हटले आहे; की देवहितार्थ त्याने मरण स्वीकारले. संतती-सातत्यासाठी अमृतत्त्व त्यागले, देवांनी स्वतः बृहस्पती मुनीला यज्ञात बळी करण्याचे ठरविले असता यमाने (स्वखुशीने) स्वतःचा प्रिय देह अर्पण केला. हे उघडच देवांनी सृष्टी व मानव जाती उत्पन्न करण्यासाठी केलेल्या यज्ञाचे वर्णन असून, त्यात यम प्रमुख उपाध्याय व शिवाय यज्ञबळी देखील झाला. यम-यमी (१०-१०), अदिति-दक्ष (१०-७२-४) व द्यौ-पृथ्वी (६-७०-३) या संयुक्त संकल्पनात विश्वारंभी स्त्री-पुरुष युतीची कल्पना प्रतिबिंबित झाली आहे.''[२]

लोकसाहित्य शास्त्राच्या अभ्यासाची व्यापकता लक्षात घेतांना, 'विराटपुरुष' स्वरूप लोकची जाणीव सातत्याने लक्षात ठेवावी लागते. लोकचे अस्तित्वात येणे याविषयीचे तर्क अनादिअनंतपणे सुरूच आहेत. वैदिक वाङ्मयातील उपरोक्त सृष्टी उत्पत्ती संकल्पना 'लोक'च्या प्राकट्याच्या, मूळाशी घेऊन जाण्याचा प्रयत्न करते. कारणपरंपरांचा वेध घेते आणि प्रामुख्याने



उत्पत्ती, स्थिती आणि लय हे यज्ञस्वरूप चक्र सनातनपणे सुरू असले तरी; त्याचा आरंभबिंदू आणि सुरुवात एकदाच झाल्याची स्पष्ट जाणीवही करून देते. उत्पत्तीविषयक बुद्धिजन्य तर्क प्रस्तुत करतांना, उत्पत्तीत सहयोगी घटक, स्थल आणि अनंत अपरिमेय काल यांची जाणीव करून देते. 'लोक' मधील चैतन्य, मौखिक परंपरांचे उगमस्थान या सृष्टीउत्पत्तीच्या तर्कांतून सिद्ध झाले आहे. Folk-lore चा अभ्यास करतांना, मौखिक परंपरांचे संकलन महत्त्वाचे असते. वेदवाङ्मयातील या उत्पत्तीविषयक तर्कांची छाप, जागतिक क्षेत्रात अनेक दैवतकथांतून, लोककथांतून, पडलेली पाहावयास मिळते. डॉ. दुर्गा भागवत यांनी जागतिक आणि भारतीय परंपरा स्पष्ट करतांना या संदर्भात अनेक उदाहरणे दिली आहेत.[३]

**२. 'लोक' उत्पत्ती आणि विस्तार विषयक पौराणिक विवेचन :-**

पुराणांमध्ये सर्वशक्तीमान भगवान विष्णूंच्या नाभिकमलापासून; लोकोत्पत्तीचे, अर्थात ज्ञात ब्रह्मांडाच्या उत्पत्तीचे मूळ कारण, अर्थात, सृष्टीकर्त्या ब्रह्म्याबद्दल, म्हणजेच स्वायंभूव मनू किंवा स्वयंभू बद्दल अनेक उल्लेख येतात. 'लोक'चा हा आरंभबिंदू होय असे मानले जाते. इतिहास लेखकांनी हे स्पष्ट केले आहे, की स्वायंभूव मनू मानव असून या वाराहकल्पाच्या प्रारंभी जन्मलेल्या मनुष्यांचा, अर्थात मानवलोकचा, पहिला धुरिण, नेता किंवा राजा होता.[४] इतिहासकारांनी नोंदविलेली; आज अद्भूत वाटणारी गोष्ट म्हणजे, ''वाराहकल्पाच्या किंवा देवयुगाच्या पूर्वी वातायने (विमाने) वापरीत असत आणि पृथ्वी या निवासस्थानी उष्णतेचा वर्षाव होऊ लागल्याने तिचा त्याग करून ते विमानांतून दुसऱ्या विश्वात निघून गेले'' (परग्रहावर / चंद्रावर इ.) वराहमेघ किंवा अविरत व संथ जलवृष्टीने पृथ्वी थंड व राहण्यालायक झाल्यावर स्वायंभूव मनू प्रकट झाला, कदाचित अवकाशयानातून तो पृथ्वीवर उतरला असेल. संतती निर्माण करून; त्याला पृथ्वीवर मनुष्यवस्ती वाढवावयाची होती. त्यासाठी त्याला पत्नीची गरज होती. हरिवंश (३-१४-२२) सांगतो- ''शरीरार्धात भार्याम् समुपादितवान शुभाम्- आपल्या अर्ध्या शरीरापासून त्याने सुंदर व यशस्कर अशी पत्नी निर्माण केली''[५] येथे भारतीय पुराणांतील दैवतकथांमधील अर्धनारीनटेश्वर अर्थात शिवपार्वती युग्म, आणि अर्धनारी विष्णू अर्थात मोहिनी युग्म, यांची नोंद उल्लेखित करणे योग्य होईल. याचा अर्थ असा की मानवलोकची उत्पत्ती आणि विस्तार; असा त्रिविध देवतारूपातून

अर्थात तीन युग्मांतून संभोगातून उत्पत्ती स्वरूपात होत गेला. त्यापूर्वी कदाचित शिवांतून विष्णू, विष्णूतून ब्रह्म, अशी उत्पत्ती होऊन; एका बीजाचे द्विविध बीजात रूपांतर अथवा विकसन झाले असावे का? असा प्रश्न आहे. कारण ज्याला आपण सृष्टी/लोक म्हणतो त्या विराटपुरुषाच्या अस्तित्वात येण्याचा इतिहास उत्पत्ती व विस्तार परंपरा, दोन प्रवाहांनी स्वायंभूवापासूनच पुढे आलेल्या दिसतात. त्यातील एक परंपरा म्हणजे मनू परंपरा असे चौदा मनू अस्तित्वात येण्याचे भाकित पुराणांत आढळते. इतिहासकारांनी चौदा मनूंची सूची पुढीलप्रमाणे दिली आहे- (१) स्वायंभूव (२) स्वारोचिष (३) उत्तम (४) तामस (५) दैवत (६) चाक्षुष (७) वैवस्वत- रौच्य (८) भौत्य (सावर्णी) (९) मेरु सावर्णी (मेरुस्तवर्णी) (१०) दक्षसावर्णी-प्राचेतस (दशसावर्णी) (११) ब्रह्मसावर्णी-कश्यप प्रजापती- परमेष्टी किंवा ब्रह्मा (१२) धर्मसावर्णी (१३) (रुद्रसावर्णी) वैवस्वत (१४) इंद्रसावर्णी. यम हा श्राद्धदेव मनू होय. या परंपरेच्या पिढ्यांचे उल्लेख, काल उल्लेख, अर्थात अभ्यास, प्रकल्पाने दिले आहेत.[६] (कंसातील नावे खंड १ मधील आहेत). दुसरी परंपरा या मनूच्या आधी ब्रह्मदेवांनी निर्माण केली होती. पण ते ब्रह्ममानपुत्र पृथ्वीवरील मानवांविषयी उदासीन होते. म्हणून पुन्हा स्वायंभूव मनूकडे वळावे लागले. त्या विषयीची नोंद लक्षणीय आहे. ''स्वायंभूव मनूला विराट- या जगाचा महत्तम व सर्वव्यापी शास्ता असेही म्हणतात. शतरूपा या त्याच्या पत्नीपासून त्याला प्रियव्रत व उत्तानपाद हे दोन पुत्र व आकुती, देवहुती व प्रसूती या तीन कन्या झाल्या. या तीन मुलींचे विवाह अनुक्रमे रुची, कर्दम व दक्ष या राजांशी (लोकधुरिणांशी) झाले. या तीन राजांना 'प्रजापती'- प्रजेचे रक्षणकर्ते किंवा मानवजातीचे पूर्वज असे म्हणतात.''[७]

दक्ष प्रजापतींना प्रसूती अथवा धारणीपासून साठ कन्या झाल्या. 'त्यापैकी आठजणींचे धर्मशी (यम), अकरा जणींचे रुद्राशी (शिव) व सती नावाच्या एकीचा शिवाशी, आणखी १३ जणींचे विवाह कश्यपाशी आणि २७ जणींचे चंद्राशी विवाह झाले.'[८]

सृष्टी अथवा 'लोक' यामध्ये जी जीवसृष्टी दिसते ती कश्यपांपासून अर्थात दक्षप्रजापतींच्या प्रसूतीच्या कन्यापासून झाली असे मानले जाते. 'प्रसूती' हे नाव म्हणूनच प्रसिद्ध आहे. ''कश्यपाला देवांची माता अदिती व दैत्यांची माता दिती अशा दोन बायका होत्या. त्याशिवाय पक्षांची माता कद्रु



व गायींची माता सूरभी अशा आणखी बायका होत्या. या साऱ्यांव्यतिरिक्त श्वान व अन्य चतुष्पाद प्राण्यांची माता सरमा व दानव नावाच्या तिसऱ्या प्रकारच्या मानव प्राण्यांची माता दनु या प्रजापती कश्यपाच्या इतरही बायका होत्या.''[९] कश्यपांच्या तेरा पत्न्यांची नाव अशी होती- दिती, अदिती, दनु, अरिष्ठा, सुरसा, खशा, सुरभि, ताम्रा, क्रोधवशा, इला किंवा इरा, कद्रु, मुनी आणि विनता. दितीपासून झालेल्या मुलांना दैत्य (राक्षस) व दनुपासून झालेल्या मुलांना दानव (असूर) म्हणत. ''दैत्य व दानवांना पूर्वदेव किंवा पहिले देव अथवा मोठे देव असे म्हणत. अदितीच्या मुलांना देव किंवा आदित्य म्हणत.''[१०] देव विरुद्ध दैत्य व दानव संग्रामाचा इतिहास रामायणकालापर्यंत सुरू असलेला पाहावयास मिळतो मात्र या सर्वांची लोकसंस्कृती, धर्म, नीती, तत्त्वज्ञान एकच होते; हे लक्षात घेतले पाहिजे. तसेच ते भिन्नवंशीय नव्हते; हेही लक्षात घेतले पाहिजे.

कश्यपांपासून त्यांच्या १३ पत्न्यांच्या ठिकाणी जीवसृष्टी अर्थात जीवलोक निर्माण झाला. या जीवलोकात 'मानव लोक' म्हणून ज्याचा उल्लेख केला जातो तो अस्तित्वात आला. त्याविषयी इतिहास लेखकांनी दिलेली माहिती अशी- ''नाग-कद्रू या स्त्रीपासून कश्यपाला नाग नावाची मुले झाली. हरिवंशात काश्यपांना आणखी एक पत्नी आहे. तिचे नाव सुरसा, तिला कद्रू असे म्हणतात. नामसादृश्यामुळे पुराणांत दुसऱ्या कुणा दांपत्याची मुले काश्यपाची मुले व मुली म्हणून गोंधळ उडवून दिला आहे.

नाग पंच-जन म्हणजे पाच समूहांचे लोक आहेत. ही काश्यपांची मुले आहेत. पंचजन असे आहेत -

(१) असुर (दैत्य-दानव) ही दितीची मुले होत.

(२) देव, ह्यांत मानवजातसुद्धा येते ती अदितीची मुले होत.

(३) गंधर्व, त्यांच्यातील स्त्रियांना अप्सरा म्हणतात. ती मुनी नावाच्या पत्नीपासून काश्यपाला झालेली संतती.

(४) सुपर्ण, विनता नावाच्या बायकोपासून काश्यपाला झालेली मुले.

(५) नाग, ह्या पाच समुदायांची मिळून सर्व मानवजात होते. सर्पांना कसे सांभाळायचे हे नागांना माहीत होते. सुपर्ण नावाच्या लोकांना पक्ष्यांप्रमाणे उडता येत असे.''[११] यातील सुपर्णसारख्या काही जाती नाहीशा झाल्या आहेत. ''आदित्य किंवा देवः आदित्य[१२] आहेत. ते म्हणजे धाता, अर्थमा,

मित्र, वरुण, अंश, भग, विवस्वान, इंद्र, पुष्य, पर्जन्य, त्वष्टा आणि विष्णू. दैत्य व दानव पूर्वदेव होते किंवा पुढे देव झाले हे पूर्व किंवा पश्चात देव पृथ्वीवर नामांकित राजे (लोकधुरिण) झाले.''[१२]

पुराणांतरीच्या 'ऋषीलोक' चा विचारही तेवढाच महत्त्वाचा आहे. त्या संदर्भात यथार्थ अभ्यासातील नोंद अशी, ''ब्रह्मदेवाने स्वतः ज्या ऋषींना निर्माण केले त्यांची नावे अशी- मरीचि, नारद, प्रचेतस, क्रतु, अंगिरस, भृगु, आरुणी, हंसी (योगींद्र), वसिष्ठ, यती, पुलहा, पुलस्त्य, अत्रि, पंचशिख, अपांतरातमा, वधू, रुची, सनक, सनंदन, सनातन आणि सनत्कुमार. हे सारे थेट ब्रह्मदेवाचे वंशज होते. ते सारे स्वायंभुव मनूबरोबरच आधीच्या कल्पामध्ये, त्यांच्या ब्रह्मवातायनांमधून पृथ्वीवर उतरलेले देवसदृश्य मानव अरावेत.''[१३] वेद, ब्राह्मणे, अरण्यके आणि प्राचीन उपनिषदे पाहिली तर 'लोक' मधील ऋषींचे कार्य लक्षात येते. अन्न, वस्त्र, निवारा, राजव्यवस्था, संरक्षण, आयुर्व्यवस्थापन, कृषी, जल, पर्यावरण संरक्षण व व्यवस्थापन, पशुसंवर्धन व पशुसंरक्षण; या व अशा सर्व गोष्टींसह, कृषी, ग्राम-नागर जीवन, धर्मनीतीतत्त्वज्ञान आणि यां सर्वांना सुव्यवस्थापित, आकर्षक, आनंददायक आकार देण्यासाठीचे सर्वतोपरी संगीत, नाट्य, शिल्प, स्थापत्य आणि वाङ्मय, या सर्वांचा उद्गम आणि विकास ऋषीकुलांत झालेला दिसतो. ऋषीकुलांचे लोककेंद्री व्यवस्थापन हा एक स्वतंत्र समाजशास्त्रीय अभ्यासाचा विषय आहे. मात्र ऋषीकुलांना मान्यता, त्यांचा प्रभाव, त्यांचे सर्वथा मार्गदर्शन घेण्याचा प्रघात उपरोक्त सर्व मानवी जीवनप्रणालींमध्ये समान दिसतो. धर्म, न्याय, नीती, संस्कारित वर्तन पद्धतींचा उद्गम ऋषीकुलांतून झालेला दिसतो. स्मृतीग्रंथांचा, ज्योर्तिवैज्ञानिक ग्रंथांचा, परंपरांचा एवढेच काय तत्त्वज्ञान म्हणून दर्शनांचा उद्गम आणि विकास 'ऋषीलोक' मधूनच झाला होता. याचा अर्थ असा मात्र नाही की, 'ऋषीलोक' हा स्वतंत्र अंगस्वरूप लोक होता. तो समग्रलोकचे धुरिणत्व करणारा 'लोक' म्हणून अस्तित्वात आलेला होता. कोणी जन्मतःच ब्रह्मज्ञ किंवा ऋषी असत नसे. ऋषीकुलात बहुतेक सर्व ऋषी कुटुंबवत्सल असत व त्यांच्या पत्नी सर्वतोपरी, त्यांचा अनुसार व स्वतंत्र वर्तन तथा ज्ञानप्रणाली विकसित करण्याचा दीर्घोद्योग करीत. मात्र वंशपरंपरेने ऋषीकुलाचे कुलगुरु होता येत नसे. कोणीही तेवढा तपस्वी कुलगुरुपदी विराजमान होत असे. ब्रह्ममानसपुत्रांपासून निर्माण झालेल्या ऋषीपरंपरेत अक्षरशः हजारो, लाखो ऋषी समाविष्ट होऊन; त्या ऋषीकुलांचे नाम धारण करीत अथवा स्थलकालपरिस्थिती सापेक्ष स्वतंत्र गुरुकुले स्थापन करीत. ज्ञानात्मक धुरिणत्व हा ऋषीपरंपरेचा व्यवच्छेदक होय.

आज अभिजन आणि लोक असा भेद करतांना ही ऋषीपरंपरा विचारात घ्यावी लागते. निरपेक्ष लोकधुरिणत्व हे ऋषीचे व्यवच्छेदक वैशिष्ट्य असे. तेच अभिजनातील व्यक्तिमत्त्वांकडून अभिप्रेत असे. मात्र 'लोक'च्या समग्रतेचे ते घटक असतात ते कोणी वेगळे नसतात. राज्यशकटासह कोणत्याही व्यावहारिक वा शासकीय धुरिणत्वाची अपेक्षा ते करीत नाहीत. ते केवळ ज्ञानात्मक धुरिणत्व करतात.

ऋषी, मुनी, तपस्वी, राजर्षी, ब्रह्मर्षी, आदि ऋषी पदाची अभिधाने, आज कवी, लेखक, कलावंत, शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, कलासाधक, चिंतक आदि प्रकारची अभिजन स्वरूप व्यक्तिमत्वे; ही वर्तमानातील ऋषीव्यक्तिमत्त्वेच होत. त्यांचा स्वतंत्र अंगस्वरूपलोक म्हणून विचार न करता त्यांच्यामुळे 'अंगस्वरूप लोक' वेगळेपणाने अनुभवास येऊ शकतो.

ऋषीकुलांची सर्वात महत्त्वाची आणि लोकसाहित्य अभ्यासक्षेत्राच्या दृष्टीने, अतिमहत्त्वाची, अभ्यासनीय गोष्ट म्हणजे 'गोत्र' स्थापना आणि त्यांचा प्रवरादी विचार, तसेच 'देवक' (वंशमूळ) स्थापना आणि त्यांच्या शाखांचा विचार. त्या आधारे मानववंशविस्तारात, जागतिक पातळीवर निर्माण झालेली सर्वमान्य अशी विवाह संस्था, 'अंगस्वरूप लोक' निर्मितीचा कणा म्हणून, विवाहसंस्थेकडे पाहावे लागते.

दुसरे अतिमहत्त्वाचे व्यवस्थापन म्हणजे ज्ञाती (जाती) संस्था कौशल्यज्ञान, कौशल्य साधना, कौशल्य व्यवहार यांवर आधारित, ज्ञाती संस्था. 'ज्ञात' मधील 'ज्ञ' म्हणजे जाणणे, यापासून ज्ञान आणि ज्ञानपासून ज्ञात, त्यापासून ज्ञाती. हे ऋषीकुलांचे महान कार्य आज विचारातच घेतले जात नाही. लहानात लहान अपेक्षापूर्तीसाठीही ज्ञान+कौशल्य अपेक्षित असते. त्यातूनच आज असंख्य सूक्ष्मातिसूक्ष्म स्वरूपातील ज्ञाती संस्था विस्तारित झालेल्या दिसतात.

विवाहसंस्था आणि ज्ञातीसंस्था यांचा विचार केला तर; विवाह संस्थेत ज्ञातीनिहाय अगदी सूक्ष्म व तपशीलात्मक भेद सोडला तर; समस्त लोकमध्ये एकात्मता दिसते. याचा स्पष्ट अर्थ ज्ञातीसंस्था ही केवळ एक सामाजिक

व्यवस्थापनात्म अथवा लोकव्यवहार व्यवस्थापनात्मक सोय आहे.

विवाहसंस्था आणि ज्ञातीसंस्थांचा, जन्मानुसार विचार नेमका कोणत्या काळात झाला; हे निश्चित सांगता येत नाही, हे खरे. मात्र तो आपातत हा प्रचलित झाला हे निश्चित आहे. ऋषीकुलांतून चातुवर्ण, वास्तविक मिषांदांसह, पंचवर्ण परंपरा ही अनुसरली जाऊ लागली. त्या अंतर्गत जन्मानुसार वर्ण, जात ही व्यवस्था रूढीग्रस्ततेतून पुढे आली. त्याचा संबंध गोत्र आणि देवक यांच्याशी जोडण्यात आला. हे 'लोक'मधील परिवर्तन एवढे रूढ झाले की; तेच विकृत रूप संस्कृत वाटू लागले. वास्तविक वेदांतास अर्थात ऋषीतत्त्वज्ञानास, हे विकृत रूप अगदीच मान्य नाही. व्यवस्थापनपरंपरा लोकजीवनात कशी परिवर्तित होऊन; वेगळे वळण घेते ते यावरून लक्षात येते.

येथे एक गोष्ट मात्र लक्षात घ्यावी लागते; ही रूढीग्रस्तता जेवढी घट्ट आणि कर्मठपणे रूढ असते; तेवढा तो समग्रलोक प्राचीनतम आहे किंवा तेवढी ती लोकसंस्कृती प्राचीनतम आहे, असे मानता येते.

वेदवाङ्मय आणि पुराणांचा मागोवा घेतला तर असे परिवर्तन दहा-वीस हजार वर्षात घडणे शक्य नाही. अक्षरशः लाखो वर्षांचा कालावधी मन्वतरे अभ्यासावी लागतील. वेद आणि पुराणे यांत गोत्र, देवक, ज्ञाती, या व्यवस्था केवळ तात्कालिक सोय म्हणूनच गृहित आहेत. याचे स्पष्टीकरण उपरोक्त लोकनिर्मितीविषयक नोंदीवरून, सहज करता येईल. एकट्या कश्यप ऋषींपासून संपूर्ण सजीव सृष्टी निर्माण झाली आहे याचा इतिहास पुराणे सांगतात. तो इतिहास ग्राह्य धरला तर ज्ञातीसंस्था आणि वर्णव्यवस्था केवळ तात्कालिक व्यावहारिक व्यवस्था ठरतात. अलिकडील 'मोनोपॉली' किंवा 'मिरासदारी' हा जो शब्द वंशपरंपरेने व्यवसाय सांभाळण्याविषयी वापरला जातो, त्यातच 'जात' निर्माणाचे मर्म दडले आहे; असे प्रस्तुत लेखकाला वाटते. ही वंशपरंपरागत व्यवस्था राजव्यवस्थेतून निर्माण झाली असावी असा तर्क बांधणे चूक होणार नाही. राजसत्तेला ऋषीपरंपरेने कळत नकळत मान्यता देऊन; त्यांचे पौरोहित्य स्वीकारलेले दिसते. ऋषीपरंपरेने पौरोहित्याची जी परंपरा निर्माण केली; ती कितीही वंश, घराणी, समाज यांना धार्मिक आणि अध्यात्मिक कारणांसाठी, कल्याणकारी वाटली तरी; त्यातूनच जातीसंस्थेची आणि वर्णसंस्थेची, वंशपरंपरा निर्माण झाली. आज भारतासारख्या खंडप्राय 'लोक' मध्ये, ही परंपरा विद्वेषाचे मूळ बनली आहे. अपसमज पसरवून मूळ



ज्ञानसाधनात्मक ऋषीसंस्थेला बदनाम करण्याची अहमहमिका लागली आणि ऋषीपरंपरेला आणि संशोधित ज्ञानाला पारखे होण्याचा प्रसंग ओढवला. अतिप्राचीन 'लोक' परंपरेत अशी परिवर्तने होतच असतात. मन्वंतरांचा इतिहास याची साक्ष देते.

यामुळे 'ऋषींलोक'चे 'लोक' मधील स्थान आणि महत्त्व कमी होत नाही. कारण स्थलकालपरिस्थिती सापेक्षतेने ऋषीपरंपरा निर्माण होतच असते व धुरिणत्वही त्याच परंपरेला करावे लागते.

पौराणिक 'लोक' विचारात 'पृथु' राजाचे महत्त्व खूप आहे. 'लोक' म्हटले की राजव्यवस्था, धर्मव्यवस्था, न्यायव्यवस्था, समाजव्यवस्था आणि अर्थव्यवस्था आल्याच. यातील सर्व व्यवस्था राजव्यवस्थेशी निगडित आहेत असे परंपरेने जाणवते. धर्मव्यवस्था व न्यायव्यवस्थेचे स्वातंत्र्य राखण्याचा प्रयत्न परंपरेने केला आहेच. इतिहासकारांनी हरिवंशाच्या आधारे (१-५-२९) व शतपथ ब्राह्मणाच्या आधारे; वेनाचा पुत्र पृथु हा लोकांनी राज्याभिषेक करून; मुकुटासह सिंहासनावर बसविलेला पहिला राजा होता असे म्हटले आहे. 'भू'ला पृथ्वी हे नामाभिधान त्यापासून प्राप्त झाले. तो धनुर्विद्येचा जनक म्हणून त्याचे नाव घेतले जाते. लोकधुरिणाचे किंवा एकात्मलोक समूहाचे 'राजा' म्हणून स्थान, असे परिवर्तन घडले. त्यातील हे पहिले उदाहरण मानले जाते.[१४]

**३. व्यासपद/पीठ आणि व्यासांचे कार्य :-**

''वेदान् विव्यास इति व्यासः ।- वैदिक शिकवणीचे विश्लेषण करून, तिचा अर्थ, स्पष्ट करून सांगतो तो व्यास''. ऋषीमुनींनी स्थापन केलेली, सामान्य माणसांपर्यंत ज्ञान नेणारी संस्था म्हणजे व्यास होय.[१५] इतिहासकारांनी वायुपुराणातील (२३-११४ ते २२६) २८ व्यासांची नावे दिली आहेत. तसेच कुर्म, ब्रह्मांड व वायुपुराणांच्या आधारे २८ व्यासांची यादी अशी- (१) स्वायंभुव मनू (२) कश्यप (३) उशनाकाव्य अथवा शुक्राचार्य (४) बृहस्पती (५) विवस्वान (६) वैवस्वत यम व त्याचा भाऊ वैवस्वत मनू (७) इन्द्र-शतक्रतु (८) वसिष्ठ (९) अपांतरतमा किंवा सारस्वत (१०) त्रिधाम (११) ऋषभ (१२) अत्रि (१३) धर्म किंवा नरनारायण (१४) सुरक्षण अथवा सुचक्षु (१५) त्र्यारुण (१६) धनंजय (१७) कृतंजय (१८) ऋतंजय (१९) भारद्वाज (२०) गौतम (२१) वाचस्पती (२२) शुक्लायन अथवा सोम

शुष्ण (२३) तृणबिंदु (२४) वाल्मिकी (२५) शत्की-न्वसिष्ठ (२६) जातुकर्ण्य (२७) पराशर (२८) भगवान वेदव्यास, कृष्ण द्वैपायन.[१५] व्यासांची अशी नामावली असली; त्या प्रत्येकाचा कालखंड व कार्य स्वतंत्र असले तरी; या सर्वकार्याचे संकलन, संपादनपूर्वक, पुनर्रचना, भगवान कृष्णद्वैपायन व्यासांनी केली. मौखिक परंपरांचे ग्रथन करण्याचे त्यांचे कार्य लोकसाहित्य शास्त्र दृष्ट्या अतिमहत्त्वाचे आहे. पुराणांची लिखित संहिता आणि वेदांची संहिता हे व्यासांचे कार्य अद्वितीय होय. सृष्टीच्या आरंभबिंदूपासून 'लोक'चा अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांना ते टाळता येत नाही. याच ग्रथनांचे अनेक अवशेष वर्तमानातील लोकवाङ्मयात व पर्यायाने ग्रांथिक वाङ्मयात रूपके, प्रतिमा, प्रतिके, संकेत, नैतिकविचार व सौंदर्यकल्पना, दैवतकथा यांच्या स्वरूपात प्रचलित झालेले दिसतात. अनेक वाक्संप्रदाय, म्हणी, आहाणे, कोडी यांच्या मागे अनादि लोकपरंपरेतील कथा, दैवतकथा दडलेल्या असतात. व्यास महर्षींच्या नावावर आज पुराणे व महाभारतासारखे महाकाव्य मोडते. वेदांचे संपादन, पुराणांचे संपूर्ण ग्रथन आणि आर्ष महाकाव्य यांतून वैवस्वत मनूमधील अतिशय प्रगत अशी संस्कृती मौखिक परंपरेतून व्यासांपर्यंत कशी आली; याचा समग्र दस्तऐवज या त्यांच्या लेखनात प्रकट होतो. हे सर्व एकाने लिहिलेले असो की अनेकांनी, परंतु लोकवाङ्मयाच्या पद्धतशीर अभ्यासाचा, हा प्रकांड असा, जगडव्याल प्रयत्न आहे; हे मात्र नक्की. या प्रयत्नाने अक्षरशः लाखो वर्षांचा (कोणी पाचपन्नास हजारात या काळाची संभावना करो) लोकसांस्कृतिक इतिहास, दैवतकथा, लोकधर्म, लोकाचार, विवाहप्रथा, जन्मप्रथा, मर्तिकप्रथा, धनुर्वेद (युद्धशास्त्र), राज्यशास्त्र राजनीती, जोतिर्विज्ञान, कला, क्रीडा, लोककथा, लोकगीते, आहाणे, वाक्संप्रदाय इ.इ. सह मंत्र, तंत्र तोडगे, व्यापारउदीम, स्थापत्य, शिक्षणव्यवस्था अशा सर्व सर्व अंगोपांगांचा; लोकवाङ्मयाच्या स्वरूपात; शास्त्रांसह, दर्शनांसह, प्रकट झालेला, हा इतिहास थक्क करणारा आहे. जागतिक पातळीवर लोकसंस्कृतीचा अभ्यास; तौलनिक पद्धतीने करावयाचा असेल तर या सर्व व्यासवाङ्मयाचा धांडोळा महत्त्वाचा ठरतो.

**४. पुराणांचा परिचय :-**

पुराणांना भारतीय परंपरेने पवित्र इतिहास मानले आहे. मुळात अनेकांनी भर घालीत पुढे आणलेले एकच पुराण होते; असे उल्लेख मान्य केले तरी; १८ महापुराणे व उपपुराणे अशी पृथक पुराण रचना अथवा संकलन संपादन होत राहिले. अठरा पुराणात (१) ब्रह्म (२) पद्म (३) विष्णू (४) वायू अथवा शिव (५) मत्स्य, (६) भागवत (७) नारद (८) मार्कंडेय (९) अग्नि (१०) भविष्य (११) ब्रह्मांड (१२) ब्रह्मवैवर्त (१३) स्कंद (१४) गरुड (१५) लिंग (१६) वराह (१७) वामन आणि (१८) कुर्म अशी पुराणे येतात. पंडितांनी, १८ पुराणांचे दैवतकथा शास्त्रानुसार, पाच विभाग केले आहेत. ते पाच विभाग म्हणजे (१) ब्राह्म : ब्रह्म व पद्म (२) सौर : ब्रह्मवैवर्त (३) आग्नेय : अग्नि (४) शैव : वायू किंवा शिव, स्कंद, लिंग, कुर्म, वामन, वराह, भविष्य, मत्स्य, मार्कंडेय, ब्रह्मांड (५) वैष्णव : नारद, भागवत, गरुड आणि विष्णू असे भाग केलेले आहेत. मुळात पुराणे सांप्रदायिक नाहीत. मात्र सांप्रदायिकांनी पुराणांची सांप्रदायिक स्वरूपात संभावना केलेली दिसते. वास्तविक सर्व पुराणांतून भारतीय दैवतकथा शास्त्र, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक स्थितीगतीचा परिचय होतो. लोकधारणा परंपरांचा मौखिक प्रवास प्रकट होतो. पुराणांची दहा वैशिष्ट्ये सांगितली जातात. यांत (१) विश्वाची उत्पत्ती (पंचमहाभूते, नाद, शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध या तन्मात्रा, दहा विकार, मन, अहंकार व महत् यांची उत्पत्ती) (२) उपनिर्मिती (३) ईश्वराकडून स्थिर स्वरूपाचे पोषण (४) निर्मितीचे स्वास्थ्य रक्षणाचा विचार (५) निर्मिती, पुनर्निर्मिती यांची आकांक्षा (६) राज्य शासन (७) परमात्म तत्त्वाचे अध्यात्मशास्त्र (८) उत्पत्ती, विलय, मोक्ष (निर्मात्याकडे पुनरागमन) (९) जीवनाचा अंतिम हेतू-मुक्ती (१०) मूलाधार सर्वोच्च सत्तेविषयी ज्ञान. पुराणांची पाच अंगभूत लक्षणे सांगितली जातात. त्यात (१) विश्वाची प्राथमिक उत्पत्ती (२) कालगणना- उत्पत्ती, स्थिती, लय (३) राजांच्या वंशावळ्या (४) मनूचा इतिहास- कालचक्रे (५) अन्य महत्त्वाच्या व्यक्तींची, घटनांची इतिवृत्ते. उदा. ऋषी, भक्त, पंडित इ. सर्वच पुराणांमध्ये पुराणांची व्याख्या दिलेली दिसते ती अशी-

> **''सर्गश्च प्रतिसगश्च वंशो मन्वन्तराणिच ।**
> **वंशानुचरिते चैव पुराणं पंचलक्षणम् ।।''**

पुराणांमध्ये अमूक विषयाची चर्चा नाही असे नाही. (१) धर्मशास्त्र (ब्रह्मयज्ञ) वेदाध्ययन, मृतपूर्वजांना पिंड व तिलांजली देणे (पितृयज्ञ), होमहवन करणे (देवयज्ञ), बळी अर्पण करणे (भूतयज्ञ), अतिथींचा सत्कार (नृयज्ञ), सात

पाकयज्ञ, सात हविर्यज्ञ, सात सोमसंस्था, चाळीस संस्कार, द्रव्यशुद्धी, श्राद्धकर्मे, प्रायश्चित्ते, चांद्रायण, व्रते इ. (२) तत्त्वज्ञान- सृष्टीचे तीन प्रकार- प्राकृत, वैकृत, प्राकृत, वैकृत त्यांचे उपप्रकार. त्यांचे दहा प्रकार त्रिगुण, अहंकार, निर्मिती, कर्मेंद्रिये व ज्ञानेंद्रिये यांच्याकडून, देवता, तामस, वृक्षवेली व वनस्पती, पशुपक्षी कीटक जंतू, मानव, कौमार असे दहा प्रकार, द्वैताद्वैत तत्त्वज्ञान. (३) तंत्रविज्ञान- कालगणना, भूमापन इ. (४) आयुर्वेद (५) रत्नांना पैलू पाडण्याची कला (६) स्थापत्यशास्त्र व शिल्पकला (७) चित्रकला (८) संगीत नृत्य नाट्य इ. (९) धनुर्वेद (१०) ज्योतिष (११) सामुद्रिक शास्त्र (१२) भूविभाग, खंड इ. सप्तद्वीप अशा अनेक व असंख्य सूक्ष्म विषयांचा उल्लेख व कथात्मक स्पष्टीकरणे पुराणांमध्ये येतात. एका स्वतंत्र पुस्तकात (खंडात) पुराणांचा परिचय इतिहास व संस्कृतीचा यथार्थ अभ्यास इतिहासकारांनी केला आहे. जिज्ञासूंनी पाहावा.[१६]

**५) स्मृतिग्रंथांचा विचार :-**

मनुष्य जातीच्या मार्गदर्शनार्थ विधिनियम बनवून ठेवणाऱ्या संस्था, वेद आणि पुराणे यांच्या बरोबरीने पुढे आल्या. मात्र या संस्थांचे धर्मशास्त्रीय वर्चस्व वेद व पुराणांएवढे कधीच राहिले नाही. परिवर्तनशील राज्यघटनेसारखे, उपयुक्त असे ते ग्रंथ राहिले. अर्थात स्मृतीग्रंथ तयार करण्याचे कार्य एकाचे की अनेकांचे असा वाद आहेच. मनुस्मृती, नारदस्मृती, याज्ञवल्क्यस्मृती त्याचबरोबर भृगुसंहिता, अगस्त्यसंहिता, नारदसंहिता, नाडीसंहिता इ. गोष्टी पाहिल्या तर स्मृतिग्रंथात भर पडणे, परिवर्तन होणे, कालबाह्य ठरविणे; हे कालौघात सुरूच होते. लोकजीवनाचे कोणतेही अंग स्मृतिग्रंथांनी किंवा संहितांनी किंवा नाडीग्रंथांनी, दुर्लक्षित केले नाही. विधिनियम पुढे येताना, विधिनियमांचा, मौखिक परंपरागत, रूढीयुक्त व्यवहार बारकाईने नोंदविलेला दिसतो. पुराणांत आलेले सर्व विधिनिषेध व तत्त्वज्ञानाचे, लोकसारणीत उपयोजन करण्यासाठीचे विधिनिषेध, या संहितात आढळतात. स्मृतींना किंवा संहितांना लोकजीवनात अंतिम शब्दाचे स्थान मात्र कधीच नव्हते. त्यातूनच सिंधूंची निर्मिती झाली. धर्मसिंधू, न्यायसिंधू इ. ह्या सर्व पारंपरिक संस्था ह्या भारतीय लोकविद्यांचे अर्थात लोकवाङ्मयाचे शास्त्रीय ग्रंथात समावेशन करणाऱ्या संस्था होत्या. भारतीय जीवनाचे वर्तमानाचे लोकपरंपरातील दर्शन पाहाता; पुराणे, वेद आणि स्मृति, या प्राचीन शास्त्र म्हणून, मान्यता असलेल्या मांडणीला, लोकसाहित्याने व्यापून टाकले आहे.



याचे थेट कारण हेच आहे की; लोकजीवनसारणीतील मौखिक परंपरांतून प्रकट होत राहिलेले पारंपरिक ज्ञान, या ग्रंथात आले तेच पुन्हा लोकजीवनात शास्त्र म्हणून उपयोजित झाले. त्यात स्थलकाल परिस्थितीसापेक्ष परिवर्तने लोकजीवनात झाली. त्यातील नको ते कालबाह्य ठरत गेले. हवे त्याच्या परंपरा झाल्या. अर्थात हा विधिनिषेधांचा इतिहास सनातन आहे. त्यात लोकसाहित्याचे संकलन, लोकजीवन शास्त्र म्हणून, करण्याचे काम स्मृतिग्रंथांनी केले आहे.

स्मृतींमध्ये येणारे विषय, वेद आणि पुराणे यांच्याप्रमाणेच, मानवी जीवन व्यापक असतात. उदा. श्री याज्ञवल्क्य स्मृतीमध्ये आलेले विषय पाहूया. स्मृतिकार ऋषींना भगवान उपाधीने गौरविले जाते. येणारे विषय असे- ब्रह्मचर्य, विवाह, वर्णजातिविवेक- सजाति, अनुलोमज, प्रतिलोमज, संकीर्णजाती, वर्णप्राप्ती, हीन वृत्ती कारण, गृहस्थाश्रम, स्नातक धर्म, भक्ष्याभक्ष्य, द्रव्यशुद्धी, दान, श्राद्ध, गणपतिकल्प, ग्रहशांती, राजधर्म, असे विषय आचारधर्माचे येतात. व्यवहारधर्मात साधारण व्यवहार, असाधारण व्यवहार, ऋणादान, उपनिधी, साक्षी, लेख्य, द्विज-धर्माधर्माख्याविधी, दया, सीमा विवाद, स्वामीपालविवाद, अस्वामीविक्रय, दत्ताप्रदानिक, क्रीतानुशय, अभ्युपेत्या शुश्रुषा, संविद्वयतिक्रम, वेदनादान, द्युतसमाह्वय, वाक्पारुष, दंडपारुष्य, साहस, विक्रिया संप्रदान, संभूयसमुत्थान, स्तेय, स्त्रीसंग्रहण, प्रकीर्णक प्रकरण. प्रायश्चित्तानुषंगाने - अशौच, आपद्धर्म, वानप्रस्थधर्म, यतिधर्म, प्रायश्चित्त असे विषय येतात. एकूण उत्पत्ती, स्थिती, लयविषयक जीवनव्यापी विचार, यात केलेला दिसतो.[१७]

वेद, पुराणे व स्मृति यांच्यातील लोकसारणी अलिकडील काळात कालबाह्य झाल्याचे म्हटले जाते. पुनरुज्जीवन योग्य नाही; असे म्हटले जाते. या संबंधातील वादग्रस्तता बाजूला ठेवून; लोकवाङ्मय अभ्यासाच्या दृष्टीने विचार केला तरी काही गोष्टी वर्तमान लोकसारणीत अनादि काळापासून दृढमूलपणे, प्रकट होतांना दिसतात. व्रतवैकल्ये, संस्कारविधी, श्राद्धादिविधी, कुळधर्म, कुळाचारादिविधी, शांतीविधी इ.च्या वेळी संकल्पमंत्र महाराष्ट्रात वा अन्य प्रांतात, संस्कृतमध्ये, पुरोहित करून घेतात. तो मंत्र स्वयंपुरोहित ग्रंथाप्रमाणे पुढीलप्रमाणे : श्रीमद्भगवतो महापुरुषस्य विष्णाराज्ञय प्रवर्तमानस्य-अद्य ब्रह्मणो, द्वितीयो परार्धे, विष्णुपदे, श्रीश्वतवराहकल्पे, वैवस्वतमन्वन्तरे, अष्टाविंशे, युगचतुष्के कलियुगे, प्रथमचरणे, जंबुद्विपे, भरतवर्षे, भरतखंडे, दक्षिणापथे,

दंडकारण्ये देशे, गोदावर्या/कृष्णा... दक्षिणे तीरे (उत्तर, दक्षिण इ.) बौद्धावतारे, रामक्षेत्रे रामरामाश्रमे (इ.) (अस्मित वर्तमाने) शालिवाहन शके, ... संवत्सरे, उ/द अयने, ... ऋतौ, ... मासे, ... पक्षे, ... तिथौ, सोम/मंगळ वासरे, ... नक्षत्रे, ... शुभनामयोगे, शुभकरणे, ... स्थिते, वर्तमानेचंद्रे, ... राशिस्थिते सूर्ये, ... स्थिते दैवगुरौ, शेशेषु ग्रहेषु ... राशिस्थानस्थितेषु सत्सु एवंगुण विशेषण विशिष्टायाम शुभपुण्यतिथौ, मम आत्मनः वेदोक्त (पुराणोक्त/स्मृति - ऋती स्मृति पुराण उक्त) फलप्राप्तर्थ, अस्माकं सकुटुंबाना, सपरिवाराणां, द्विपदचतुष्पदसहितानां क्षेमस्थैर्याभयायुरारोग्यैश्वर्या भिवृद्ध्यर्थ, समस्त मंगलप्राप्तर्थ समस्ताभ्युदयार्थ च श्री ... देवताप्रित्यर्थ यथामिलितोपचारद्रव्यैर्ध्याना ऽऽ वाहनादिषोडशोपचार द्रव्यैः पूजां करिष्ये । तदंग आसनादि कलशाद्यर्चनं च करिष्ये ।।[१८] यात वेद, पुराणे, स्मृति यांतील दैवतकथाशास्त्र काल व ज्योतिष यांविषयी समग्र मौखिक परंपरागत, भारतीय लोकसारणी, एकवटून प्रकटलेली दिसते.

**६. महाकाव्ये :-**

वाल्मिकी ऋषींचे 'रामायण' आणि व्यास विरचित 'महाभारत' ही दोन महाकाव्ये भारतीय परंपरेने महापुराणांप्रमाणेच इतिहासग्रंथ म्हणून स्वीकारली आहेत. यात पुराणांची वैशिष्ट्ये तंतोतंत नाहीत इतकेच. रामायण आणि महाभारतातील कथांचा, ऐतिहासिक कथा म्हणून जो प्रवास बृहद भारतात दिसतो. तो दैवतकथांच्या किंवा पुराणकथांच्या स्वरूपातील आहे.

श्री रामपंचायनातील श्रीराम, श्रीसीता, लक्ष्मण आणि हनुमान ही लोकवाङ्मयात स्वतंत्र दैवते झाली आहेत. दैवते म्हणून लोकवाङ्मयाप्रमाणेच लौकिक वाङ्मयातही त्यांवर विपुल लेखन दिसते. 'रामचरितमानस' सारखा ग्रंथ, ऐतिहासिक प्रमाणग्रंथ मानला जातो. लक्षरामायणे प्रचलित असल्याचे, मौखिक परंपरेत सांगितले आहे. वाल्मिकी रामायणात, समकालीन वाल्मिकींना, श्रीमद् नारदमुनींनी रामायण मौखिक परंपरेतून ऐकविल्याची कथा आली आहे.[१९] वाल्मिकी रामायणातच, श्रीमद् हनुमानांनी हिमालयाच्या शीलाखंडावर रामायण लिहिल्याची कथा येते. त्यांनी श्री वाल्मिकींचा गौरव राखण्यासाठी स्वतः लिहिलेले रामायण पुसून टाकल्याचे सांगितले जाते.[२०] श्रीराम निवासाच्या अनेक दंतकथा आख्यायिका सर्वदूर आढळतात. त्यातील काही आख्यायिका तर; प्रत्यक्ष निवासस्थाने दाखवून दाखविली जातात. अशी स्थाने आणि



आख्यायिकांच्या आवृत्त्या भारताच्या विविध प्रांतात दाखविल्या जातात. श्रीरामांप्रमाणेच, बिभीषण, कुंभकर्ण, इंद्रजित आणि रावण यांच्या कथाही भारतात सर्वदूर अनुभवता येतात. श्रीरामकथा हा तत्त्वज्ञानाचा कथात्मक आविष्कारही मानला जातो. 'राम' हे समग्र भारतीय संस्कृतीचे आदर्श असे मूळ धारणातत्त्व (लोकबंध) मानले जाते. मौखिक परंपरेने, 'राम' तत्त्वाला एवढे सामावून घेतले की; भारतीय लोकसारणी म्हणजेच रामचरित्राचा अनुसार असे मानले जाते.

महाभारताच्या बाबतीत, श्रीकृष्ण आणि पांडवकथांचा, बृहदभारतात असलेला संचार, भारतीय लोकसंस्कृतीचे दर्शन घडविणारा आहे. भारतातील असंख्य गुंफा, 'पांडवलेणी' म्हणून दाखविल्या जातात. 'भीम' कथा या लोकप्रिय पुराणकथा म्हणून प्रचलित झालेल्या दिसतात. श्रीकृष्ण चरित्र हा आणखी स्वतंत्र धारणास्रोत लोकवाङ्मयात दैवतकथांच्या स्वरूपात आढळतो. रामायणाप्रमाणेच, महाभारतावर विपुल लेखन, सर्व भारतीय भाषांत झालेले आढळते. त्यावर बहुतांशी दंतकथा, आख्यायिका, लोकपरंपरांचा पगडा पाहावयास मिळतो. धर्म आणि द्रौपदी यांच्या संदर्भाने नीतीकथाही लोकवाङ्मयात आढळतात.

रामायण आणि श्रीकृष्ण व महाभारत यांना पुराणांमध्ये स्थान मिळाले आहे. पुराणांतील कथांचा, लोकवाङ्मय म्हणून संचार, लोकसंस्कृतीच्या दृष्टीने, केवळ थक्क करणारा आहे. इतिहासकारांनी पुराणांचा इतिहास व संस्कृतीकोष म्हणून केलेला उल्लेख यथार्थ वाटतो.[२१]

**७. डॉ. दुर्गा भागवत यांनी भारतीय परंपरांचा करून दिलेला परिचय :-**

डॉ. दुर्गा भागवत यांनी 'लोकसाहित्याची रुपरेखा' या ग्रंथात 'भारतीय परंपरेची ओळख' या प्रकरणात भारतीय परंपरांचा परिचय करून दिलेला आहे. त्या म्हणतात, 'ग्रंथनिविष्ट कथासाहित्याला लोकसाहित्याच्या अभ्यासात इतके महत्त्व येण्याचे कारण असे की; जगातल्या दुसऱ्या कुठल्याही सुसंस्कृत राष्ट्राच्या पूर्वी, प्राचीन काळापासून भारतीयांनी अद्भूतकथा, कल्पितकथा, प्राणिकथा आणि कहाण्या यांना चिरंतन वाङ्मयाचे स्वरूप देऊन ग्रंथबद्ध करून ठेवले.'[२२] त्यांनी तीनप्रकारे भारतीय परंपरांची विभागणी केली आहे. '(१) पहिला प्रकार धार्मिक ग्रंथात व रामायण-महाभारतासारख्या ग्रंथात, मूळ कथेच्या अनुषंगाने किंवा बोधरूपाने ग्रथित केलेल्या कथांचा, वेदवाङ्मयात,

पाली त्रिपिटकांत, जैन चूर्णीत आणि पुराणात अनेक कथा आढळतात. त्यांचा समावेश याच वर्गात होतो. (२) दुसरा प्रकार स्वतंत्र कथासंग्रहाचा बोधजातकें, जैन कथाकोश, पंचतंत्र, कथासरित्सागर, वेताळपंचविशी, सिंहासनबत्तिशी, शुकबहात्तरी, हितोपदेश वगैरे कथावाङ्मयाचा समावेश होतो.[२३] (३) तिसऱ्या प्रकारात अद्‌भूत कथांना, ललित वाङ्मयाचा घाट देणाऱ्या वाङ्मयाचा समावेश होतो. डॉ. दुर्गा भागवतांनी, श्रौतविभाग- सुक्त, गाथा, आख्यायिका, आख्यान, अन्वाख्यान, अनुव्याख्यान, इतिहासपुराण असा एक भाग केला आहे. निरुक्तिक वर्ग- निदान असा दुसरा वर्ग; तिसरा वर्ग दैवतवादी परंपरेचा केला आहे. चवथा सूतवाङ्मयाचा, पाचवा वैय्याकरणवर्ग, सहावा बौद्ध व जैन वर्ग केला आहे. बौद्ध जातके आणि जैनचूर्णी हे नीतीकथासंग्रह आहेत. सातवा बृहत्कथा, असे कथावाङ्मयाचे वर्ग करून; बौद्ध व जैन परंपरेपर्यंत भारतीय परंपरेची; दैवतकथा व तत्त्वज्ञान या दृष्टीने; लोकसंस्कृती व लोकसाहित्याची परंपरा सांगितली आहे. दैवतकथा असे स्वतंत्र प्रकरण करून; भारतीय परंपरेतील इंद्रकथा, उत्पत्तिकथा, शापउश्यापकथा, जातीउत्पत्तीकथा, प्रलयकथा, ज्योतिषकथा, सूर्यकथा, सूर्यचंद्रसंबंधकथा, चंद्रकथा, नक्षत्रकथा यांची सोदाहरण चर्चा केली आहे. अद्‌भूतकथा किंवा परिकथा या मुळातील दैवतकथाच होत, असे सांगून; त्यांचे ऐतिहासिक वर्णन, अतिमानवी योनी म्हणून, यक्ष, गंधर्व, किन्नर, गुह्यक, राक्षस, विद्याधर, सर्प यांच्या विषयीच्या मौखिक परंपरांचा मागोवा घेतला आहे. दंतकथा, कल्पितकथा, प्रहेलिका, वाक्‌संप्रदाय, म्हणी, लोकव्युत्पत्ती या सर्व मौखिक परंपरांचा मुळात संबंध दैवतकथांशी असतो; हे कल्पनाबंधाच्या वारंवारितेमधून दाखवून दिले आहे. जिज्ञासूंनी 'लोकसाहित्याची रुपरेखा' हा ग्रंथ मुळातून पाहावा.

**८. 'लोकबंध' ग्रंथातील 'लोक' संकल्पना :-**

प्रस्तुत लेखकाने भारतीय परंपरेतील दैवतकथा शास्त्रानुसार 'लोक' संकल्पना लोकबंध ग्रंथात स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. भारतीय परंपरेतील 'लोक'ची नावे सांगतांना 'लोक'ची संकल्पना स्पष्ट करतांना, पं. महादेवशास्त्री जोशी यांची 'लोक' संबंधातील उद्‌धृत केली आहे- 'लोक' म्हणजे धरतीच्या पाठीवर पसरलेला मानवसमाज होय. 'लोक' हा शब्द वर्गभेदरहित व व्यापक अशा प्राचीन परंपरांनी युक्त आहे. भारतात नागर व ग्रामीण अशा दोन संस्कृतींचा निर्देश केला जातो, पण 'लोक' हा शब्द दोन्ही संस्कृतींत विद्यमान आहे. समाजाचे गतिशील अंग म्हणजे 'लोक'च, होय.[२४] 'लोक' नाम यादी, वेगवेगळ्या कल्पनानुषंगाने दिली आहे. (१) 'लोक' म्हणजे विश्वाचा भाग - स्वर्ग, पृथ्वी, पाताळ (नरक). (२) सप्त 'लोक' असे- भूलोक- पृथ्वी, भूर्लोक- अंतराळ प्रदेश (पृथ्वी व सूर्य यांमधील पोकळी), स्वर्लोक- स्वर्ग (ध्रुवतारा व सूर्य यांच्यामधील) महर्लोक- (महर्षी व ब्रह्मा यांचे स्थान/ ऋषीलोक), जनलोक- ब्रह्मपुत्र सनक, सनंदन, सनत्कुमार, सनातन यांचे निवासस्थान, सत्यलोक- परब्रह्माचे स्थान. (३) सांख्य व वेदांतात आठ लोक मानले आहेत- ब्रह्मलोक, पितृलोक, सोमलोक/चंद्रलोक/ग्रहलोक, इंद्रलोक, गंधर्वलोक, राक्षसलोक, यक्षलोक, पिशाच लोक. (४) भारतीय मिथक कोशातील डॉ. उषा पुरी यांनी नोंदविलेली यादी- सूर्यलोक, चंद्रलोक, नक्षत्रलोक, शुक्रलोक, बुद्धलोक, बृहस्पतिलोक, शनिलोक, ध्रुवलोक, महालोक, जनलोक, तपलोक, सत्यलोक याशिवाय पाताळ, तळ, वितळ, रसातळ अशीही लोकनामे दिलेली दिसतात. अशी यादी देऊन; 'लोक' ही संकल्पना केवळ मानवकेंद्रित मानली तर; अनेक (असंख्य) 'अंगस्वरूप लोक' तयार होतील. जसे स्त्रीलोक, पुरुषलोक, मूर्खलोक, शहाणेलोक इ. जातीनिहाय लोक, धर्मनिहाय लोक, पंथनिहाय लोक, भूभागनिहाय लोक जसे कोकणी, खानदेशी इ. गरीब लोक, श्रीमंत लोक, मध्यमवर्गीय लोक, आपले लोक, परके लोक इ. मात्र यांचा संबंध प्रचलित समाजव्यवस्थेशी असतो. दैवतकथाशास्त्राशी नव्हे!

**९. भारतीय परंपरेतील विष्णूतत्त्व आणि 'लोक' संकल्पना :-**

भारतीय दैवतकथा शास्त्राप्रमाणे विष्णू हे दैवत 'लोक' धारणातत्त्व म्हणून मानले गेले आहे. 'विष्णू' म्हणजेच 'लोक', विष्णू म्हणजेच 'लोक'चे भरणपोषण व 'लोक'च्या अस्तित्वाचा कणा म्हणजे, 'लोक होय. विष्णू हा लोकबंध ब्रह्मा, विष्णू, महेश या त्रिविध तरी एकात्म त्रिदेवांच्या लोकबंधातील मुख्य तत्त्व मानले गेले आहे. याचे कारण समूहजीवन, वैयक्तिक जीवन आणि वैश्विक जीवनाची दृश्य, अस्तित्व अवस्था म्हणजे 'विष्णू' असे मानले गेले आहे. शिव म्हणजे उत्पत्ती आणि विलय यांचा महास्पर्शकाल होय. त्यातून उत्पत्ती आणि विलय यांच्यामधली अवस्था दृश्य अस्तित्वाची, सृष्टीच्या धारणेची, ह्या अवस्थेच्या निर्मितीची उर्जा, विष्णूपासूनच मिळते. या उर्जेला

ब्रह्म असे म्हटले आहे. या उर्जेतून निर्माण झाले की; त्या उर्जेला विकसित करणे, त्या उर्जेचा व्यवहार दृश्य जीव आणि जड दोन्ही स्वरूपात राखणे, पुनर्निर्माणाची उर्जा निर्माण करणे आणि नवजीवनासाठी अस्तित्वाला प्रलयप्रवृत्त करणे; असे सर्व कल्पनाबंध या 'विष्णू' देवतेशी जोडलेले आहेत. म्हणूनच 'विष्णू' ही, प्रत्यक्ष परब्रह्माचे, वास्तव अनुभूत होणारे रूप होय. हे दैवत क्रियावान आणि सर्वशक्तिमान असल्याचे; त्या दैवताच्या अवतारमीमांसेने पुराण कथांतून अनेकदा स्पष्ट केलेले आढळते. कोणत्याही संकटप्रसंगी हेच दैवत तारणहार होऊ शकते; अशी धारणा ब्रह्म आणि शिव दैवतांमध्येही, दृढमूल असल्याचे पुराणकथांतून अनेकदा स्पष्ट झाले आहे. उपरोक्त पुरुषसुक्त म्हणूनच विष्णूसुक्तच असल्याचे आपण पाहिले आहे.

श्री 'विष्णूसहस्रनाम' स्तोत्रात या देवतेच्या सहस्रनामांतून अर्थात सहस्रकथांतून या दैवताच्या कर्तृत्वाचा शक्तिमत्त्वाचा गौरव केला आहे.[२५]

महाभारतातील शतसाहस्रहिंतते वैशंपायन, युधिष्ठिर आणि भीष्म यांचा संवाद येतो. त्यातील विष्णू हेच 'लोक' अस्तित्व होय हे स्पष्ट करणारे श्लोक असे-

**युधिष्ठिर-किमेकं दैवतं लोके कि वाप्येकं पराणम् ।**
**स्तुवन्तः कं कमर्चन्तः प्राप्नुयुर्मानवाः शुभम् ।।२।।**
**अनादिनिधनं विष्णु सर्वलोक महेश्वरम् ।**
**लोकाध्यक्षं स्तुवन्नित्यं सर्वदुःखातिगो भवेत ।।६।।**
**ब्रह्मण्यं सर्वधर्माज्ञं लोकानां कीर्तिवर्धनम् ।**
**लोकनाथं महद्भूतं सर्वभूत भवोभ्दवम् ।।७।।**
**तस्य लोकप्रधानस्य जगन्नाथस्य भूपते ।**
**विष्णोर्नामसहस्रं मे श्रृणु पापभयापहम् ।।१२।।**
**लोकाध्यक्षः सुराध्यक्षो धर्माध्यक्षः कृताकृतः ।**
**चतुरात्मा चतुर्व्यूहश्चतुर्दंष्ट्रचतुर्भुजः ।।२८।।**
**कालनेमिनिहा वीरः शौरिः शूरजनेश्वरः ।**
**त्रिलोकात्मा त्रिलोकेशः केशवः केशिहा हरिः ।।८२।।**
**एको नैकः सवः कः किं यत्तत्पदमुत्तमम् ।**
**लोकबन्धुर्लोकनाथो माधवो भक्तवत्सलः ।।९१।।**
**अमानी मानदो मान्यो लोकस्वामी त्रिलोकधृक् ।**
**सुमेधा मेधजो धन्यः सत्यमेधा धराधरः ।।९३।।**
**शुभाङ्गो लोकसारङ्गः सुतन्तस्तन्तुवधनः ।**
**इन्दकर्मा महाकर्मा कृतकर्मा कृतगमः ।।९७।।**
**अनन्तो हुतभुग्भोक्ता सुखदो नैकजोऽ गज्रः ।**
**अनिर्विण्णः सदामर्षी लोकाधिष्ठानमभ्दुतः ।।१०८।।**
**एको विष्णुर्महभ्दुतं पृथग्भूतान्यनेकशः ।**
**त्रीँल्लोकान्वाप्य भूतात्मा भुङ्क्ते विश्वभुगव्ययः ।।१४०।।**

विष्णुसहस्रनामाच्या १४२ श्लोकांत या अकरा श्लोकांत सोळा वेळा 'लोक' या नामाचा थेट विष्णू दैवतस्वरूपाशी गौरवपूर्ण उल्लेख आलेला आहे. या सर्व उल्लेखांत वरील 'विष्णू' दैवताविषयीचे सर्व कल्पनाबंध स्पष्टपणे निर्देशित झालेले दिसतात. विष्णुपुराण, भागवतपुराण, नारदपुराण, अग्निपुराण, ब्रह्मवैवर्तपुराण, वराहपुराण, वामनपुराण, कुर्मपुराण, मत्स्यपुराण, गरुडपुराण, ब्रह्मांडपुराण आदि पुराणांतील कथांनी व महाभारत, रामायण या महाकाव्यांनी 'लोक' या अर्थाने विष्णू दैवताचा गौरव केलेला दिसतो.

**१०. श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील 'लोक' संकल्पना :-**

गीतेत अठरा अध्यायातील ९०० श्लोकांमध्ये तात्त्विक विवेचन करतांना, 'लोक' हा शब्द ४८ वेळा आला आहे. तर 'जन' हा शब्द ८ वेळा आला आहे.[२६] त्यात 'लोक' शब्दाचा वैशिष्ट्यपूर्ण उपयोग केला आहे. (१) लोकत्रय (११.२०,४३) (१५.१७), सुरेन्द्रलोक, स्वर्गलोक, मर्त्यलोक (९.२०,२१), नरलोक (११.२८), मनुष्यलोक (१५.२). त्रैलोक्याची कल्पना आलेली असून भूलोकासाठी- नरलोक, मनुष्यलोक, मर्त्यलोक असे शब्द आले आहे. तर स्वर्गलोकासाठी सुरेन्द्रलोक असा पर्यायी शब्द आला आहे. (२) भूलोकांतील मानवलोकसाठी, सामाजिक आणि एकात्म सामूहिक अवस्थांचे वर्णन करतांना, तसेच मानव समस्त सृष्टी यांचा संबंध स्पष्ट करतांना, 'लोक' अर्थात 'विष्णू तत्त्व', ही दैवतशास्त्रीय संकल्पना उपयोजित केली आहे. त्यात (i) 'अतोऽस्मि लोके वेदे च प्रथितः पुरुषोत्तम' (१५.१८) अशी कल्पना आली आहे. विष्णूतत्त्व अर्थात कृष्णतत्त्व 'लोक' आणि 'वेद' यांच्यात सारखेच प्रतिष्ठित असल्याची जाणीव करून दिली आहे. याचा अर्थ; लोक म्हणजे जनसामान्य आणि वेद म्हणजे मानवलोकमधील ज्ञानी, ब्रह्मज्ञ, धुरिण, दिव्यशास्त्र पारंगत, प्रतिभावंत ह्या दोन्ही लोकअवस्था त्या

एकाच पुरुषोत्तमाच्या म्हणजे एकात्म लोकच्या आहेत, असे स्पष्ट केले आहे. (ii) 'द्वाविमौ पुरुषौ लोके क्षराश्चाक्षर एवच' (१५.१६) यात क्षर अर्थात नाशवंत आणि अक्षर अर्थात अविनाशी असे दोन प्रकारे पुरुष अर्थात 'लोक' म्हणजेच विष्णूतत्त्वच आहे. एकूण सृष्टी हीच 'लोक' असल्याचे स्पष्ट केले आहे. (iii) 'द्वौ भूतसर्गौ लोकेऽस्मिन्दैव आसुर एव च' (१६.६) या जगात अर्थात 'लोक' मध्ये दोन प्रवृत्तीचे 'लोक' (एकाच लोकमध्ये आहेत) म्हणजे देव आणि आसूर आहेत. (iv) लोक- (३.३,९,२२,२४) (४.१२,३१,४०) (५.१४,२९) (६.४१,४२) (७.२५) (८.१६) (९.३३) (११.२३,२९,३०,३२), (१२.१५) (१३.१३,३३), (१४.१४), (१८.१७,७१) या उल्लेखांमध्ये 'लोक' हा एकवचनी आणि अनेकवचनी शब्द आला असून विभक्ती प्रत्ययांसह त्याची विविध रूपे आली आहेत. घटकलोक (व्यक्ती) अंगस्वरूप लोक (एकात्म समूह) आणि विश्वव्याप लोक (विराटपुरुषरूप लोक) या त्रिविधतेने 'लोक'चा विचार आला आहे. (v) लोकसंग्रह (३.२५) हा वैशिष्ट्यपूर्ण शब्द आला आहे. लोकसंग्रह करणे म्हणजे निरपेक्ष बुद्धीने सर्वांच्या कल्याणाचे रक्षण करीत स्नेहपूर्वक सर्वांना सांभाळणे. हे कार्य लोकधुरिण स्थितीतील लोकांनी करावे. (vi) सर्वलोकमहेश्वरम् (५.२९) विष्णूतत्त्व हे दैवतकथा शास्त्राप्रमाणे सर्व 'लोक'चा, यज्ञ व तप यांचा भोक्ता आणि 'सर्वलोक' (स्वर्ग, मृत्यू, नरक)चा स्वामी, स्वार्थरहित दयाळू आणि प्रेमी (माऊली) होय. (vii) जन हा शब्द प्रजा, सामान्यलोक या अर्थाने 'लोक' शब्दाला पर्याय म्हणून, शब्द योजला आहे. (३.२१, ७.२८, ८.१७ व २४, ९.२२, १६.७ इ.)

श्रीमत् भगवद्गीतेमधील 'लोक' या शब्दाचा वापर सर्व अर्थछटांसह, भारतीय मौखिक परंपरेत, वर्तमानातही अनुभवता येतो. जन या शब्दाचा उपयोग केवळ 'लोक' या शब्दाला पर्यायी शब्द म्हणून वापर केला जातो.

**११. समारोप :-**

भारतीय परंपरेतील दैवतकथा शास्त्राप्रमाणे 'लोक'चा अर्थ अतिशय व्यापक असून; तो संपूर्ण विश्वाला व्यापणारा आहे. दृष्ट आणि अदृष्ट गोष्टीही 'लोक' या संकल्पनेत समाविष्ट आहेत. येथे folk-lore या ज्ञानशाखेचा विचार केला तर; मानवी एकात्म समूहाच्या, मौखिक परंपरांचा हा अभ्यास ठरतो. भारतीय परंपरेने देखील भूलोकीच्या देव, दानव, राक्षस, मानव, यक्ष, गंधर्व, किन्नर, विद्याधर, भूत, पिशाच्च आदि मानवी योनींशी केंद्रित, मौखिक परंपरांचाच विचार केला आहे. येथे ही गोष्ट लक्षात ठेवणे आवश्यक आहे की; सर्व सृष्टीतील एक घटक म्हणून, सर्व परस्परसंबंधासहच मानवाचा विचार करावा लागतो. मानवाची अर्थात 'लोक'ची वर्तन, साधन आणि मौखिक परंपरा पाहिली तर; मानवाचा पृथक विचार करता येत नाही. दैवतकथा शास्त्रातून, समग्र सृष्टीच्या एकात्मतेने धारणातत्त्व अर्थात 'लोक'तत्त्व, अर्थात विष्णूतत्त्व प्रकट केले आहे. त्यामुळे 'लोक' म्हणजेच मानव (घटकलोक) लोक म्हणजेच (अंगस्वरूप लोक - एकात्म मानवी समूह) आणि 'लोक' म्हणजेच विराटपुरुष लोक (वैश्विक मानव / संपूर्ण सृष्टी) असे त्रिविधतेनेच 'लोक' हे संकल्पन स्वीकारावे लागते. हे स्वीकारल्याने मौखिक परंपरागत लोकवाङ्मय हे सर्व ज्ञानशाखांना प्राथमिक स्वरूपातील सामग्री पुरविणारी ज्ञानशाखा म्हणून विचारात घेता येते.

**१२. संदर्भ व टीपा :-**


१) भारतीय इतिहास व संस्कृतीचा यथार्थ अभ्यास खंड १ 'भारतीय इतिहास व संस्कृती प्रारंभकाळ', प्रधान संपादक- कुलकर्णी (इतिहासभूषण डॉ) श्रीपाद दत्तात्रय, प्रकाशक- श्री भगवान वेदव्यास इतिहास संशोधन मंदिर - भीष्म - ब ७-८, श्रीपाल अपार्टमेंटस्, पंचपाखाडी, ठाणे, भारत, '८- सृष्टीनिर्मितीची वैदिक संकल्पना', पृ. ४७ ते ४९.

२) तत्रैव, पृ. ४८.

३) लोकसाहित्याची रुपरेखा, भागवत दुर्गा, वरदा बुक्स, सेनापती बापट मार्ग, पुणे, दु.आ. १९७७.

४) उनि., भारतीय इतिहास व संस्कृतीचा यथार्थ अभ्यास, खंड २ पुराणे.

५) तत्रैव, पृ. ६७.

६) तत्रैव, पृ. ७३.

७) तत्रैव, पृ. ६८.

८) तत्रैव.

९) तत्रैव.

१०) उनि., भारतीय इतिहास खंड ४, पृ. ३२.

११) तत्रैव, पृ. ३३.

१२) तत्रैव.
१३) उनि., भारतीय इतिहास खंड २, पृ. ६८
१४) तत्रैव, खंड २, पृ. ७१.
१५) तत्रैव, खंड २, पृ. ७७ ते ८४.
१६) तत्रैव, खंड २.
१७) श्रीयाज्ञवल्क्यस्मृति : भाषांतरकार बापट (वे.शा.सं.रा.रा.) विष्णुशास्त्री, राजेश प्रकाशन, पुणे, नवी आवृत्ती पुनर्मुद्रण २०१९.
१८) स्वयंपुरोहित : बापट (वे.शा.सं.) कृ. म., राजेश प्रकाशन, पुणे, सु.वा.आ. २०१५.
१९) रामायण : वाल्मिकी ऋषी.
२०) तत्रैव.
२१) उनि., भारतीय इतिहास खंड २.
२२) उनि., लोकसाहित्याची रुपरेखा.
२३) तत्रैव.
२४) लोकबंध : सहस्रबुद्धे अनिल, नितीन प्रकाशन, पुणे, नवीन सुधारित आवृत्ती जुलै २०१२.
२५) श्री विष्णु सहस्रनाम स्तोत्रम, महाभारत, शतसाहस्र संहिता- वैशंपायन युधिष्ठिर भीष्म संवाद.
२६) श्रीमद्‌भगवद्‌गीता.

●●●



### प्रकरण आठवे

# भारतीय परंपरेतील लोकसाहित्य आणि लोकसांस्कृतिक ‘लोकबंध’

**(Traditional Indian Folk-Types of Folk-lore and Folk-Culture)**

‘लोकबंध’ ही ‘लोक’ची धारणासूत्रे किंवा धारणातत्त्वे होत. ती सनातनपणे, तात्त्विकदृष्ट्या आणि भावनिकदृष्ट्या, दृढमूल, स्थिर, अशी असतात. मात्र त्यांचे शाब्दपरंपरा, वर्तनपरंपरा आणि साधनपरंपरा या दृष्टीने तपशीलात्मक स्वरूप बदलते. उदा. अनुरूप वधूवरांचे विवाह लोकधारणा परंपरेसाठी आवश्यक होत. हा तात्त्विक लोकबंध अनादिपणाने ‘लोक’मध्ये अनुसरला जातो आहे. मात्र त्या लोकबंधांचे तपशीलात्मक स्वरूप बदलते. जसे विवाहांचे विविध प्रकार व परंपरा आणि विवाहाला लागणारा कालावधी यांची परंपरा. तात्त्विक लोकबंध रूप हे सांस्कृतिक दर्शन घडविणारे असते तर त्यांचे तपशीलात्मक रूप हे मौखिक परंपरेतील लोकाविष्काराचे म्हणजेच लोकसाहित्याचे असते. ‘लोकबंध’चीही तात्त्विक आणि सारणीपरंपरेतील रूपे ही द्विविध स्वरूपात किंवा एकाच नाण्याच्या दोन बाजूंप्रमाणे पुढे येतात.

**१. लोकसंस्कृती आणि लोकसाहित्यातील जन्म, जीवन आणि मरणविषयक लोकबंध :-**

जन्म, जीवन आणि मरण ह्या अवस्था अंतिमतः, निर्णायकपणाने, परमेश्वराच्या आधीन आहेत. मात्र या तीनही अवस्थांना, आनंददायक, आकर्षक, लोकसमावेशक, सुखसमाधानकारक; असा आकार देणे, स्वरूप देणे हे माणसाच्या हाती असल्याची, अनुभवसंपन्न दृढ जाणीव जगभरातील माणसांना

आहे. परमेश्वरविषयक कृतज्ञता आणि मानवी प्रयत्नांविषयी पुरेपूर आत्मविश्वास, ही लोकसांस्कृतिक तत्त्वे, या तीनही अवस्थांच्या बाबतीत सनातनपणे रुजलेली आहेत. ज्ञाताविषयीचा विश्वास आणि अज्ञाताविषयी श्रद्धा या जाणिवांच्या बळावर माणसाने समूहमनाने अंगस्वरूपलोकमध्ये जन्मपरंपरा, विवाहपरंपरा आणि मर्तिकपरंपरा आकारित केल्या आहेत.

**(i) जन्मपरंपरा :–** स्त्रीपुरुष मीलनावर प्रजनन अवलंबून आहे; हे लक्षात घेऊन; विवाह निश्चिती पूर्वीच्या, जातक किंवा भाकितांच्या परंपरा अस्तित्वात आल्या आहेत. यासंबंधात पत्रिकेतील गुणमिलनापासून ते सद्‌गुरूंच्या आशीर्वादांपर्यंतच्या लोकबंधांचे प्रचलन विविध 'अंगस्वरूप लोक'मध्ये आढळते. गरोदरपणात गर्भसंस्कार, गर्भपोषण, गर्भसुरक्षा आणि सुलभप्रसूती या लोकसांस्कृतिक तत्त्वांविषयी लोकबंधात्मक अनेक आविष्कार मौखिक परंपरेत तपशीलात्मकतेने वैविध्य प्रकटवित होतात. अर्थात लोकसाहित्य स्वरूपात, होतात. उदा. गरोदर स्त्रीने ग्रहण पाहू नये, ग्रहणात पायांची अढी मारून बसू नये, झोपू नये, सतत सामान्य स्वरूपाच्या हालचाली कराव्यात. अर्भक जन्मानंतर तिसऱ्या दिवशी किंवा पाचव्या दिवशी सटवाई, विधिलिखित/ब्रह्मलिखित अर्भकाच्या कपाळावर लिहिण्याकरिता येते, हा लोकश्रद्धात्मक, लोकसांस्कृतिक तात्त्विक स्वरूपातील लोकबंध, पाचवीची पूजा मांडणे, घुगऱ्यांचे जेवण देणे, शीतळादेवीची पूजा करणे, त्यातील विधिविधाने अशा लोकसाहित्यात्मक अर्थात मौखिक परंपरांच्या स्वरूपात लोकबंधांच्या आविष्काररूपात घडतात. जातकाचे नामकरण करावे, हा लोकसांस्कृतिक लोकबंध जातक पाहाणे, रास काढणे, आत्याबाईला नाव सुचवायला सांगणे अशा लोकसाहित्यविष्कारांनी प्रकट होतात. नामप्रसिद्धी अर्थात बारसे हा मोठा लोकसंस्कार आविष्कृत होताना, पाळण्यात गोप घालणे, गोप पाळण्यात घालतांना गोपाच्या पाळण्याखालून वरून प्रदक्षिणा घालणे, गोप वरवंट्याचा किंवा नारळाचा करून 'गोविंद घ्या गोपाळ घ्या' हा मौखिक मंत्रजागर करणे, असे अनेक तपशील जन्मोत्सव साजरा करतांनाचे, देशोदेशी, विविध अंगस्वरूप लोकमध्ये आपल्या खास पारंपरिक, मौखिक परंपरेने, उत्सवातील पावित्र्य, उत्सवाची शोभा आणि मनाचे समाधान शतगुणित करण्याचा प्रयत्न करतात. मानवी जीवनातील सामूहिक एकात्मतेचा लोकसांस्कृतिक लोकबंध लोकसाहित्यस्वरूपात, विविध नात्यांचा अर्भकाला परिचय करून देत,



पाळणागीतांतून, ओवीगीतांतून, कानात नाव सांगण्याच्या प्रथेतून, ओल्या बाळंतिणीची ओटी भरण्याच्या प्रथेतून आणि बारसे जेवणाच्या प्रथेतून, मुखरित होतो.

**(ii) विवाहपरंपरा :–** निसर्गचक्रनेमीक्रमानुसार 'विवाहपरंपरा' लोकसांस्कृतिक सारणीचा कणा आहे. एकात्म समूहजीवनाचा आधार आहे. स्त्रीपुरुष अर्थात नरमादी यांचा संभोग व त्यातून प्रजनन हा नैसर्गिक क्रम आहे. मानव हा 'लोक'स्वरूप जगणारा प्राणी होय. अंगस्वरूप लोक आणि विराटपुरुषरूप लोक हे मानवातील घटकलोक (व्यक्ती)चे विस्तारत, विश्वव्यापक होत जाणारे परिघ होत. घटकलोक त्रिविधतेने जगतो. सर्व 'लोक' अवस्था सुनियोजित, स्थैर्यासह, प्रगमनशील व्हावी; या दृष्टीने 'अर्धनारी' हा दैवतकथाशास्त्रीय 'लोकबंध' अनादिकालापासून विश्वातील 'लोक'ने स्वीकारलेला दिसतो. भारतीय 'लोकसंस्कृती'ने निष्ठा आणि श्रद्धापूर्वक, शिवपार्वती, लक्ष्मीनारायण, ब्रह्ममाया अशी युग्मे, मनोमनी, बदलते संदर्भ आणि बदलती रूपे यासह, पावित्र्यपूर्वक जपली आहेत. प्रत्येक पतीपत्नी युग्म या पावित्र्यासह 'लोक'मध्ये जपले जावे; यासाठी लोकसंस्कृतीने, धर्मनीतीतत्त्वज्ञान आणि जातककथा अर्थात दैवतकथांसह विवाह संस्थेची मांडणी, जपणूक केली आहे.

विवाह परंपरेमध्ये नर आणि नारी यांनी प्रजननासाठी आणि 'लोक'स्थैर्यासाठी निश्चयपूर्वक, एकत्र यावे, हा प्रमुख 'लोकबंध' आहे. तर विविध प्रकारे विवाह करणे, विवाहबद्ध होण्यासाठी लोकसांस्कृतिक विधिविधाने, यांच्या मौखिक परंपरा, देव, ब्राह्मण/पुरोहित, सगेसोयरे, पाहुणेरावळे, मानकरी हे सर्व 'अंगस्वरूपलोक' रूपातील साक्षीदार, विवाहातील सोळा संस्कार व त्याचे असंख्य पर्याय; हे सर्व तपशीलात्मक लोकसाहित्य स्वरूपातील लोकबंध अनुसरलेले दिसतात. लोकसांस्कृतिकदृष्ट्या या सर्व संस्कारप्रसंगी, गायन, वादन, नर्तन, रंगावली, मेहंदी, पाककला, मंडपशोभा, कपडालत्ता, या स्वरूपात पारंपरिक लोककलांची उजळणी होते. कुळधर्म कुळाचार साधण्यासाठी यात्रा, विधिविधाने आणि विधिनाट्ये यांचे पर्याय आविष्कृत होतात. हे सर्व लोकसाहित्य म्हणून आविष्कृत झालेले असते. यासाठी, 'असे करण्याचा प्रघात आहे', या स्वरूपात, 'भावबंध' आणि 'कल्पनाबंध' असे 'लोकबंध', लोकसंस्कृतीचा लोकसाहित्य स्वरूपात आविष्कार करतात. यांत सुपारी, अक्षत, लाजाहोम,

सप्तपदी, मांडवपरतणी, परिणय मिरवणूक, वरात, जेवणावळी, मानपान, उखाणे, आहाणे यांतून क्रीडात्मक विनोदन, या व अशा अनेक तपशीलात्मक लोकबंधांचा आविष्कार घडतो. वधू व वर संशोधन, बैठक, आणि मंगलकार्य अशा क्रमाने होणाऱ्या विवाह संस्कारात, श्री गणेश, कुलदेवता, उपास्यदेवता, लोकधुरिण, गुरू, सद्गुरू यांचे विशेष स्मरणपूर्वक पूजन व सन्मान करणे; हे लोकसांस्कृतिक स्थैर्याच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. अलिकडे सामूहिक विवाह पद्धतीमध्येही या सर्व प्रकारच्या लोकसांस्कृतिक लोकबंधांचा लोकसाहित्यात्मक आविष्कार घडतांना दिसतो. न्यायसंस्थेची मान्यता, लोकपरंपरेनेही सनातनपणाने जतन केली आहे. लोकपंचायत, गावपंचायत यांच्या मान्यतेने विवाहसंस्थेचे रक्षण केले आहे. जगभरात या सर्व तपशीलात्मक लोकबंधांचे असंख्य पर्याय पाहावयास मिळतात. त्या त्या अंगस्वरूप 'लोक'चे वेगळेपण त्या पर्यायातून प्रकट होत असले तरी नरनारींचे सुनियोजित लोकसांस्कृतिक बंधन हा 'लोकबंध' केंद्रस्थानी असतो. वधूवर संशोधनाच्या अंगस्वरूप लोकमधील परंपरा, वैशिष्ट्यपूर्ण असतात. अलिकडे वधूवर मेळावे असे एक रूप, पुढे आले आहे. 'स्वयंवर' हा पुराण प्रकार किंवा महाराष्ट्रातील आदिवासींमधील 'गोटूल'सारख्या पारंपरिक प्रकारांची नवी आवृत्ती म्हणजे असे मेळावे किंवा मॅरेज ब्युरो होत. 'स्वयंपुरोहित' ग्रंथात लग्नसंस्कारांची भारतीय, सनातन हिंदू परंपरेतील विधिविधाने सविस्तर शास्त्रीय पद्धती म्हणून दिली आहेत.[१] जिज्ञासूंनी पाहावित.

**(iii) मृत्यूविषयक लोकबंध :–** मर्तिक प्रथेविषयी जगभरात विविध भावबंध (Feeling type) आणि कल्पनाबंध (Motif) आढळतात. 'पृथ्वी हा मर्त्यलोक आहे', या तात्त्विक लोकबंधांविषयी जागतिक मानवांचे, सर्वधर्मांचे, पंथोपपंथांचे, मतांचे एकमत आहे. मृताविषयीची आसक्ती मात्र विविध कल्पनाबंधांनी व भावबंधांनी परंपरेने प्रवाहित झालेली दिसते. मृत व्यक्तीसंबंधीचे कल्पनाबंध उदाहरणादाखल पाहिले तरी हे वैविध्य लक्षात येते. (१) मृत व्यक्तीच्या आवडीच्या गोष्टी त्याच्या भोवती मांडाव्यात. (२) मृत व्यक्तीचे अस्तित्व कल्पांतापर्यंत राहते. (३) मृत व्यक्तीची भूतपिशाच्च स्वरूपातील फेरी; आपल्या वासनापूर्तीसाठी, प्रियजनांना मदत करण्यासाठी आणि जीवनमुक्त होण्यासाठी; घडत असते. (४) परमेश्वर कल्पांती सर्व मृतांचा न्याय करतो. (५) मृत व्यक्तीची मरणोत्तर व्यवस्था दोन प्रकारे करावी. एक म्हणजे मृताचे



शरीर संरक्षित स्वरूपात जमिनीत अथवा त्याच्यासाठी खास तयार केलेल्या खोलीत ठेवावे. दुसरे म्हणजे मृत शरीराची विल्हेवाट पाण्यात टाकून, अग्नी देऊन किंवा पशूपक्ष्यांना खाण्यासाठी देऊन करावी. (६) मरणोत्तर काही तोडगे करून मृतात्म्यास संतुष्ट करून परलोकी, जीवनमुक्तपणे पाठवता येते. (७) मृतात्म्यास तात्काळ किंवा एक, तीन, पाच, सात, बारा दिवस किंवा वर्षांनी पुनर्जन्म प्राप्त होतो. हा चौऱ्यांशी लक्ष योनीपैकी कोणत्यातरी योनीत अथवा, मानवी स्वरूपातच प्राप्त होतो. (८) मृतात्मेही अवतार घेऊ शकतात. अशा कितीतरी कल्पनाबंधांनी मर्तिक प्रथा अवलंबिली जाते.

मर्तिकाची अंत्ययात्रा एक दुःखद उत्सव म्हणून जगभरात मौखिक परंपरेने साजरी केली जाते. 'अंत्ययात्रा आवश्यक आहे'; हा अंगस्वरूप लोकमधील तात्त्विक 'लोकबंध' सर्वदूर आढळतो. मात्र या अंत्ययात्रेचे विधिनाट्य स्वरूपातील आविष्करण अनेक प्रकारच्या तपशीलात्मक विधिविधानांमधून घडत असते. धर्मपरंपरा, संस्कृतीपरंपरा, पंथ, मतपरंपरा यांत, अंत्येष्टीविषयी, शास्त्रीय म्हणविणारी, काही विधिविधाने लोकपरंपरेतून उदित झालेली असतात. ख्रिश्चन, मुस्लिम आणि सनातन हिंदू परंपरेत या अंत्येष्टीची मार्गदर्शक अशी विधिविधाने धर्मशास्त्र स्वरूपात उदित झाली आहेत. उदा. सनातन हिंदू अथवा भारतीय परंपरेतील 'अंत्येष्टी विधी'विषयी विधिविधाने 'स्वयंपुरोहित' या ग्रंथात दिली आहेत.[२] त्यात प्रेताची व्याख्या, गृहाग्निलोप प्रायश्चित्त, और्ध्वदेहिक क्रिया, घट फोडणे, तिलांजलीदान, पहिल्या दिवसाची प्रेतक्रिया, नवश्राद्धे, नग्नप्रच्छादन श्राद्ध, पाथेय श्राद्ध, अस्थिसंचयन श्राद्ध, दुसऱ्या दिवसापासूनची प्रेतक्रिया, दहावे दिवसाची प्रेतक्रिया,ह्वअकरावे दिवसाची प्रेतक्रिया, वृषोत्सर्ग, एकोद्दिष्ट श्राद्ध, रुद्रगण श्राद्ध, वसुगण श्राद्ध, सोळा मासिक श्राद्धे, दाने, दशदाने, अष्टदाने, उपदाने, पंच गोदाने, पददाने, बारावे दिवसाची प्रेतक्रिया (सपिंडीकरण श्राद्ध), दुसरे पाथेय श्राद्ध, तेरावे दिवसाची प्रेतक्रिया, तेरा श्रवणमात्र दाने, उदककुंभ श्राद्धे, मासिक श्राद्धे, प्रतिसांवत्सरिक श्राद्ध, महायज्ञ श्राद्ध, तीर्थश्राद्ध, अक्षयतृतीया अशी विधिविधाने तपशीलाने दिली आहेत. अनादि मौखिक परंपरेतून अर्थात 'श्रुती, स्मृति, पुराणे' या परंपरेने आलेली, ही शास्त्रीय स्वरूपातील विधिविधाने, मोठ्या श्रद्धेने, लोकसाहित्यातील कल्पनाबंध (Motif) अर्थात लोकबंध स्वरूपात; स्थल, काल, परिस्थिती सापेक्षतेने तसेच जातीउपजाती, जनजाती, उपजनजाती

यांच्या लोकजीवनपरंपरेने, पुरोहिताला बोलावून किंवा लोकधुरिणाला बोलावून, किंवा वडीलधाऱ्यांच्या सांगीनुसार वैविध्यपूर्णतेने, अवलंबिली जातात. त्यांच्या अवलोकनाने त्या त्या स्थल काल परिस्थिती व लोकसमूह यांचे वेगळेपण व भारतीय पारंपरिक समावेशन अनुभवता येते.

भारतीय परंपरेत आणि ख्रिश्चन व मुस्लिम परंपरेत स्वर्ग, नरक यांची कल्पना काही फरकांनी आढळते. भारतीय सनातन हिंद परंपरेत मरणोत्तर जीवन आणि पुनर्जन्म या तात्त्विक लोकबंधांची परंपरा आहे. 'ब्रह्मन' या खंडात[३], आत्मा म्हणजे काय? जीवात्म्याचे स्वरूप, पुनर्जन्माची संकल्पना, पुनर्जन्माचा नियम, मृत्यूनंतरची स्थिती इ. विषय ऐतिहासिक तात्त्विक लोकबंधांचा मागोवा घेऊन चर्चा केली आहे. जिज्ञासूंनी मुळातून पाहावे.

भारतीय परंपरेत, लोकसंस्कृतीने, मोक्ष, मृत्यूनंतर मोक्ष, समाधी कल्पना हे 'लोकबंध' जपले आहेत. त्याचा मृत्यूशी आणि अमरत्वाशी संबंध जोडला आहे. संजीवन समाधी, समाधी या लोकबंधांना भारतीय लोकसंस्कृतीमध्ये मान्यता आहे. उदा. श्री संत ज्ञानेश्वरांनी आणि श्री संत शेख महंमद महाराज यांनी संजीवन समाधी घेतल्याच्या ऐतिहासिक आख्यायिका प्रसिद्ध आहेत. आपले जीवन समाधीमग्न करण्याचा निश्चय, समाधीमग्न होण्यासाठी जागेची निवड आणि बांधणी, उत्सवपूर्वक समाधीसाधना आणि समाधीस्थ होणे. समाधीमग्न अवस्थेनंतर अन्य साक्षीदारांनी, समाधीस्थलाची अंतिम शीला बसविणे, असे लोकबंध सर्वमान्यतेने अनुसरलेले दिसतात. काही साधक, सिद्ध, योगी, महानिर्वाण समय घोषित करून; आपली समाधी कोठे बांधावी, याचे निर्देश देऊन, समाधी बांधून घेतात. उदा. श्री साईनाथ, श्री गजानन महाराज इ. जलसमाधी, प्रकाशसमाधी, वायुसमाधी, भूसमाधी अशा लोकबंधांनाही भारतीय परंपरेत मान्यता आहे. उदा. रामायणात प्रभु रामचंद्रांनी जलसमाधी घेतली तर सीतामाईंनी भूसमाधी स्वीकारली. मुक्ताई, स्वामी विज्ञानानंद यांनी प्रकाशसमाधी घेतली तर नाथ संप्रदायात यासंबंधात वायू, तेज आणि भूसमाधीची उदाहरणे दिसतात.

समाधीसाधन म्हणजे मृत्यू नव्हे तर चिरंतनाचा प्रवास असा लोकबंध लोकसंस्कृतीत दिसतो. ऋषी, मुनी, तपस्वी, योगी, अवलिया हे समाधीमग्न अवस्थेत असतात आणि भक्तांना, चाहत्यांना प्रत्यक्ष दर्शन देतात. उदा. श्री संत गुलाबराव महाराजांना श्री संत ज्ञानेश्वरांनी प्रत्यक्ष भेट दिली. प्रस्तुत ग्रंथलेखकाला श्री अगस्त्य ऋषींनी प्रत्यक्ष भेट दिली अशी उदाहरणे आहेत. लोकसंस्कृतीत या लोकबंधांविषयी पूज्य भाव आहे.

'मोक्ष' ह्या कल्पनेत चौऱ्यांशी लक्ष योनीतील जन्ममरण चक्रातून सुटका होणे हा 'लोकबंध' आहे. पुनर्जन्म नको; तर परमात्मतत्त्वात, चिरंतन स्वरूप अवस्था प्राप्त होणे; म्हणजे मोक्ष होय. मृत्यूनंतर मोक्ष हा कल्पनाबंधही लोकसंस्कृतीत दृढमूल आहे. वास्तविक मृत्यूनंतर मोक्ष, अशी कल्पना सनातन भारतीय तत्त्वज्ञान परंपरेत नाही. मोक्ष म्हणजे सच्चिदानंदमय अस्तित्व प्राप्त करण्यासारखे असंदिग्ध, ठोस, निश्चित स्वरूपाचे ते साध्य आहे. थोडक्यात सृष्टीव्यवहारातून सुटून पलिकडील अनंत चैतन्यस्वरूपात अद्वैत होणे म्हणजे मोक्ष. परंतु लोकसंस्कृतीतील अंत्येष्टीमध्ये, 'कवटी फुटणे' म्हणजे मोक्ष होणे असा लोकबंध दिसतो. त्याचबरोबर उत्तरक्रिया किंवा श्राद्धविधीद्वारा मृतास त्याचे वंशज मोक्ष देऊ शकतात असा लोकबंध आहे. उदा. बद्रिकाश्रमात पिंडदान केले किंवा प्रयागक्षेत्री पिंडदान केले तर मोक्ष लाभ होतो असा लोकबंध आहे. मोक्ष संकल्पनेविषयी भारतीय वैदिक परंपरा या दृष्टीने तात्त्विक लोकबंधाचे स्वरूप 'बंधन आणि मुक्ती'[४] या प्रकरणात ब्रह्मन खंडामध्ये, यथार्थ अभ्यास प्रकल्पांतर्गत चर्चा केली आहे. जिज्ञासूंनी ती पाहावी.

मर्तिकांची 'रडगाणी' हा मर्तिकप्रथेतील, लोकसाहित्याचा तपशीलात्मक 'लोकबंध' होत. मृत व्यक्तीभोवती दुर्मुखलेपणाने बसून, त्याच्या आठवणी रुदनस्वरांनी आळवणे, अशी ही परंपरा आहे. काही समाजामध्ये ही गाणी गाण्यासाठीचा स्त्रियांचा पारंपरिक जथ्था तयार झालेला असतो त्यांना रुदाली असे म्हणतात. मर्तिकांची गाणी पारंपरिक असतात, असे म्हणतांना, त्यातील आशय, सुरावट, हेल पारंपरिक असतो. मात्र त्यात तपशील मर्तिकाविषयी भरलेला असतो.

**२. कृषीसंस्कृती अर्थात लोकसंस्कृती आणि लोकसाहित्यातील लोकबंधः–**

जगभरातील कृषीसंस्कृती लोकजीवनाचा आस किंवा कणा आहे, असे लोकजीवन परंपरा पाहता लक्षात येते. कृषी हा राजा किंवा ब्राह्मण असल्याचे तत्त्वतः लोकमान्य झालेले दिसते. लोकसंस्कृत 'एक होता राजा' ही कथेची सुरुवात कृषीजीवनातील व्यक्तीशी निगडित असते. काही लोककथांत (उदा. महानुभावीय दृष्टांतकथांत) 'एका गावात एक दरिद्री ब्राह्मण राहात होता' असे म्हटले जाते. प्रस्तुत ग्रंथात 'कृषीसंस्कृती हीच लोकसंस्कृती' असे

विश्लेषण यापूर्वी केले आहेच. कृषीलोकचा थेट संबंध ब्रह्मप्रक्रियेशी असतो म्हणजे उत्पत्ती, स्थिती आणि लय या निसर्गचक्राशी असतो. सृष्टीच्या या चक्राशी अनुबंधित असे जीवन व्यवस्थापन कृषीलोक करतांना आढळते. पंचभौत्तिक भूत तत्त्वांशी, थेट नित्य संबंधित राहून; कृषी अन्नब्रह्माचे व्यवस्थापन करतो. स्वाभाविकपणे गावगाड्यापासून प्रत्यक्ष कृषीकर्मापर्यंतच्या, तात्त्विक भावनिक आणि सारणी किंवा जीवनपद्धतीविषयक, लोकबंधांचे प्रचलन वैयक्तिक आणि सामूहिक लोकसांस्कृतिक प्रणालीत, अनुभवता येते. पशू, पक्षी, जीव, जंतु, कीडा, मुंगी अशी जीवसृष्टी, झाडे, झुडपे, गवत, पीकपाणी अशी वनस्पतीसृष्टी, यांच्यासह ऊन, पाऊस, वारा यांचा थेट मातीशी संबंध, सृष्टी रचयिते, सृष्टीपालक दैवते - यात पूर्वज दैवते आणि ब्रह्ममाया, शिवपार्वती, विष्णूलक्ष्मी अशी युग्मे यांच्याविषयी कृषीकर्म, (नांगरणी, पेरणी, पेरणी, खुरपणी, लावणी, वेटाळणी, सोंगणी, खळे, वाहाणी इ.इ.) करतांना; भाकिते, संकेत, पारंपरिक पद्धती, तोडगे, जत्रा, यात्रा, पूजा, मुहूर्त, मोढा अशा स्वरूपात; स्थलकालपरिस्थिती सापेक्षतेने अनेकानेक लोकबंध प्रकटतात. गावपंचायत, आलुते बलुते पद्धती, सर्व प्रकारचे सुफलीकरण संबंधीचा सणोत्सव; एवढेच नव्हे तर देवक, लग्नमंडप, विवाहपरंपरा, जन्मप्रथा या सर्व बाबतीत पारंपरिक गाणी (लोकगीते), लोककथा, आहाणे, उखाणे, संगीत, पेहेराव, कुळधर्म, कुळाचार यासह सर्व बाबतीत होणारे आविष्करण अर्थात लोकसाहित्य, कृषीसंस्कृतीचे अर्थात लोकसंस्कृतीचे दर्शन घडविते. 'स्वयंपूर्ण कृषीकेंद्रित ग्रामरचना' हा व्यापक तात्त्विक लोकबंध या सर्व तपशीलात्मक गोष्टींच्या संबंधाने; वर्तन, साधन आणि शाब्द स्वरूपातील लोकबंध प्रकटवितो. पशुपक्षी पालन, हा कृषीजीवनाशी निगडित पूरक व्यवसाय आणि खळ्याखळ्यावरील विनिमय, ह्या गोष्टी लोकसंस्कृतीच्या केंद्रस्थानी असतात. या अतिप्राचीन काळापासूनच्या परंपरांचे अवशेष, लोकदैवते, बांधाबांधावरील रानावनातील, वीरगळ आणि पारंपरिक लोकगीते यांत सापडतात. लोकसंगीत, लोकक्रीडा, विधिनाट्ये, जत्रायात्रा, न्यायसंकेत व गावपंचायत या स्वरूपातील लोकबंधात्मक अवशेष, थेट प्राचीनतम लोकसंस्कृतीची संस्कृती आणि पुन्हा लोकसंस्कृती, या चक्रनेमीक्रमाची साक्ष देतात. लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीमधील मौखिक परंपरांचे संकलन प्रामुख्याने या कृषीसंस्कृतीशी निगडित झालेले पाहावयास मिळते. या कृषीकेंद्रित लोकसंस्कृतीत तत्त्वतः



पंचवर्णात्मक जीवनसारणी, ज्ञातीनिष्ठ आणि राज्यपद्धतीनिष्ठ लोकसारणी परंपरांचा अनुभवा घेता येतो. लोककला, लोकक्रीडा, लोकसंगीत, लोकशास्त्रे आणि लोकधर्मजीवन परंपरांचा धांडोळा केला तर, लोकजीवन लोकबंधात्मक प्रवास कृषीसंस्कृतीत अनुभवता येतो.

**३. कला, क्रीडा, संगीत, शास्त्रे, धर्मजीवनविषयक लोकबंधात्मक लोकसांस्कृतिक स्वरूपातील लोकसाहित्याविष्कार :-**

**(i) कला :-** कला आणि लोकसंस्कृतीचा अन्योन्य संबंध दोन प्रकारे दिसून येतो.

(१) धर्म, नीती, तत्त्वज्ञान या सांस्कृतिक घटकाच्या संदर्भात उदा. पूजा, अर्चा, सणउत्सव, कुळधर्म कुळाचार, विविध संस्कार जसे बारसे, विवाह इ. या व अशा प्रसंगी सर्व कलांचे उपयोजन लोकसाहित्याविष्कार स्वरूपात झालेले पाहावयास मिळते. रांगोळी चित्रे, रंगकाम, गोंदणकला, केशरचना, विशिष्ट पेहेराव, विशिष्ट गाणी, विशिष्ट विधिनाट्ये, विशिष्ट संगीत, विशिष्ट पाकसारणी इ. सर्व प्रकाराने हे आविष्करण घडते. कलाविष्कारणाच्या मुळाशी, देवश्रद्धा, संस्कारित करणे आणि तात्त्विकतः, लोकजीवनाशी सुसंगत, पारंपरिक सारणीबद्ध वर्तन करणे असे तात्त्विक लोकबंध असतात.

एखाद्या सणोत्सव प्रसंगी कला सादर करतांनाचे तपशील त्याच विशिष्ट कलेच्या संदर्भात दुसऱ्या प्रसंगी भिन्न असतील. उदा. होलीका देवीची सजावट करतांना रेखलेली रांगोळी, बोहले सजवितांनाची रांगोळी आणि नित्य वा नैमित्तिक अंगण सजविण्याची रांगोळी भिन्न तपशीलाने प्रकटते. कलाविष्कार व धर्म, नीती, तत्त्वज्ञान यांतील अनुबंधावर, तपशील भिन्नतेसंदर्भात, स्थलकाल परिस्थितीसापेक्ष बदल होतो हेही लक्षात येते.

(२) सौंदर्यभावना आणि आनंदानुभव या तऱ्हेनेही लोकसंस्कृतीत कलाविष्कार होत असतात. उदा. गोंधळ आणि जागरण हे विधिनाट्य धार्मिक कुळधर्माची परिपूर्ती करण्यासाठी जसे सादर होते तसेच सादरकर्ते उपासक किंवा पुरोहित हेही मानवी सौंदर्यभावना असणारे आणि कलेत अधिकाधिक नाविन्यपूर्णता, आकर्षकता आणि रंजकप्रधानता आणून स्वतः आणि श्रोते व प्रेक्षक यांना अधिक आस्वाद देण्याचा प्रयत्न करतात. उदा. प्रस्तुत लेखकाने नगर जिल्ह्यातील अकोले तालुक्याच्या गर्दनी गावात वज्रेश्वरीची जत्रा/यात्रा अनुभवली. त्यात गावोगावीच्या आणि जनजातींच्या हौशी परंतु

पारंपरिक तमाशा (गंमत) मंडळ्या, देवीपुढे विधिनाट्य स्वरूपात गंमत सादर करण्यासाठी आल्या होत्या. (ठाकर जनजाती मंडळी) ह्या मंडळ्या गंमत सादर करतांना उपरोक्त दोन्ही गोष्टी मोठ्या आत्मियतेने आविष्कृत करीत होत्या. याचा अर्थ कला सादरीकरणात, दोन्ही प्रकारचे तात्त्विक 'लोकबंध' कार्यान्वित असतात, ते तपशीलात्मक लोकबंधांच्या पारंपरिक आवृत्तीनुसार आविष्कृत होऊन धर्मश्रद्धा आणि कलानंद दोन्ही वैशिष्ट्यांची अनुभूती देत असतात.

भारतीय परंपरेत चौसष्ट कलांचा उल्लेख आढळतो. काहींच्या मते यांची संख्या आणखी कितीतरी वाढलेली दिसते. लोकसंस्कृतीतील लोककला, तपशीलात्मकतेने कलाकुसर, कलाकौशल्य यासंदर्भात प्रतिभाजन्य नाविन्यपूर्ण आविष्कार घडवितात. अंगस्वरूप लोकमध्ये असे स्वप्रतिभेने, पारंपरिक लोककलामध्ये, नाविन्य आणणारे कलावंत; स्वाभाविकपणे, त्या त्या कला सादर करणाऱ्या घटकलोकांचे धुरिणत्व करतात. असे कलावंत आपल्या प्रतिभेने, कलांना अभिजात कलांचा आकार देऊन; कलाशास्त्रे उदित व व्यवस्थापित होण्यास मदत करतात. जसे भरताच्या नाट्यशास्त्र रचनेपूर्वी लोकपरंपरेत विविध विधिनाट्यांच्या स्वरूपात, कथापरंपरांच्या स्वरूपात, संगीतपरांपरांच्या स्वरूपात, लोकसंस्कृतीचे लोकसाहित्यात्मक आविष्कार घडतच होते. हे लक्षात घेतले तर लोकसाहित्य-लोकसंस्कृती आणि संस्कृती यांचा क्रम व संबंध लक्षात येऊ शकेल

**(ii) क्रीडा :-** लोकसंस्कृतीत 'क्रीडा' अनेक स्वरूपात स्वीकारली आहे. ती मौखिक परंपरेने जाणवते. 'क्रीडा' आणि खेळ यात भावनिक आणि आशयदृष्ट्याही भेद करता येईल. रतिक्रीडा, रंगक्रीडा, जलक्रीडा, द्यूतक्रीडा, वनविहार, अवकाशविहार या परंपरांचा विचार केला तर त्यात भावना आणि आशयाचे जीवनसारणीसंबंधाने भेद करता येतील, आहार आणि मैथुन, शृंगभोग, आनंदोपभोग (आसक्तीपूर्ण) असा विचार करता; उपरोक्त शाब्दपरंपरांचाच संबंध लोकबंधात्मक स्वरूपात मानवी सुफलीकरणाशी जोडता येईल. यात क्रीडेतील निखळ निरपेक्ष आनंदात्मकता आहे; असे केवळ दुरान्वयानेच म्हणणे शक्य आहे.

मैदानी खेळ आणि जलक्रीडा यांचा संबंध थेट शरीरबलसाधना आणि भयमुक्ती यांशी जोडता येईल. तर युद्धक्रीडेचा संबंध थेट संरक्षण आणि



शारीरबलाशी जोडता येईल. मैदानी क्रीडांचा संबंध बलोपासनेशी असल्याने लोकसांस्कृतिकदृष्ट्या बलोवर्धक देवतांशी, उदा. वीर, भैरव आणि हनुमान यांशी जोडता येतो. युद्धक्रीडाचा गावगन्ना लोकसाहित्यात्मक आविष्कार म्हणजे कुस्ती, दाणपट्टा, लाठीकाठी इ.च्या स्पर्धा.

क्रीडा आणि खेळ या शब्दांतील सूक्ष्म भेदही लोकसंस्कृतीत विरून गेलेला दिसतो. मात्र 'खेळ' म्हटले की केवळ आनंद, असा सांस्कृतिक भावही प्रकट झालेला दिसतो. याचा अर्थ क्रीडा आणि खेळ हे दोन्ही शब्द लोकसंस्कृतीत अभेदत्वाने विविध भावछटाही निर्माण करतात आणि निरपेक्ष आनंदोपभोग घेण्याचे सहज साधनही बनतात. रंगक्रीडा/खेळ, पतंगखेळ, नृत्यगीतांसह सणोत्सव प्रसंगी मांडलेले खेळ उदा. झिम्मा, फुगडी इ. भातुकलीचा खेळ, यांत भावसापेक्षतेबरोबरच, नृत्य, नाट्य यांच्या आविष्कारात्मक आनंदभोगात्मकतादेखील अनुभवता येते.

खेळ आणि लोकसांस्कृतिक प्रबोधन, नीतीबोध यांचाही अनुबंध पाहावयास मिळतो. सापशिडी, व्यापार, बुद्धिबळ, सारीपाट, द्यूत, पत्त्यांचा डाव अशा खेळात प्रबोधनाचा सुप्त धागा विणलेला असतो.

क्रीडा अथवा खेळ यांचे बैठेखेळ आणि मैदानी खेळ असे भेद करता येतात. मैदानी खेळात आट्यापाट्या, हुतूतू/कबड्डी, सूरपारंब्या, विटीदांडू, चेंडूफळी, लिंगोर्चा, कांदाफोड, उंचउडी, लांबउडी असे अनेक प्रकार सर्वदूर आढळतात. तर बैठ्या खेळांमध्ये चल्लसपट, सापशिडी, बुद्धिबळ असे खेळ येतात. स्त्रियांचे खेळ आणि पुरुषांचे खेळ अशीही वर्गवारी करता येणे शक्य आहे. ही वर्गवारी प्रामुख्याने मैदानी खेळात करता येते असे असले तरी सागरगोटे खेळणे, यासारखे बैठे खेळ, केवळ स्त्रियांचे खेळ म्हणता येतील. शाब्दपरंपरांचे उखाणे, आहाणे, कोडी, भेंड्या असे खेळ स्त्री-पुरुष स्वतंत्र किंवा एकत्र खेळतांना पाहावयास मिळतात.

सणोत्सव व सुफलीकरण प्रसंगीची सामूहिक नृत्यक्रीडा परंपरा पाहावयास मिळते. अनेक जनजाती, जाती, गावे यांची अशा खेळांची परंपरा असते. लेझीम, टिपऱ्या किंवा दांडिया, ताराफा, कोंबडनाच किंवा कांबडवणा, गौराईचे नृत्य, भोंडल्याची फेरगाणी या होळी, दिवाळी, नवरात्र या सणोत्सवांची गाणी व नृत्ये यांचा समावेश असतो.

लोकसंस्कृतीत खेळकऱ्यांच्या जनजाती पाहावयास मिळतात. यातील

काही खेळकरी केवळ रंजनात्मक खेळ मांडतात. काही इतिहास पुराणे यांतील संदर्भकथांसह खेळ मांडतात. काही उपासनात्मक खेळही पाहावयास मिळतात. हे सर्व खेळ त्यातील वर्तन किंवा अंगविक्षेप, साधने आणि मौखिक किंवा शाब्दपरंपरा जपत वैशिष्ट्यपूर्ण आविष्कार करतात. या सर्वांना अलिकडे लोककलावंत असेही म्हटले जाते.

कसरतीचे खेळ करणारे कोल्हाटी, डोंबारी, उंटवाले, नंदीबैलवाले, अस्वलवाले, वाघवाले, बसपेरे किंवा गारुडी यांचे खेळ केवळ रंजनात्मक असतात. त्यांच्या संस्था फिरस्त्या स्वरूपात प्रवास करीत असल्या तरी त्यांचे गावे, वस्त्या ठरलेल्या असतात. एव्हढेच नव्हे तर गावपंचायतीही असतात.

पोतराज, वासुदेव, पांगुळ, जोशी, गोंधळी, वाघ्ये, चित्रकथी अशी मंडळी लोककलावंत म्हणून आज ओळखली जातात. तरी आपल्या विधिनाट्यात्मक विधिविधानात्मक आविष्करणासह खेळ मांडून ही मंडळी लोकसंस्कृतीमधील धर्मश्रद्धा जागविताना अनुभवास येतात. यांना डॉ. रा. चिं. ढेरे यांनी लोकसंस्कृतीचे उपासक असे म्हटले आहे.

लोकसंस्कृतीतील समूहमनातील निखळ आनंदमयता, क्रीडाप्रवृत्ती आणि सणोत्सवातील धर्मश्रद्धा, नीतीमत्तांची भावात्मकता, तत्त्वता सांभाळत या क्रीडा आणि खेळांचे पारंपरिक आविष्करण होत असते. 'अंगस्वरूप लोक' मधील धारणातत्त्व अधिक बळकट करणे, गाव, समूह, राष्ट्र अधिक एकात्म व अस्मितापूर्णतेने उभे करणे हा लोकसांस्कृतिक 'लोकबंध' पारंपरिक खेळ स्वरूपातील तपशीलात्मक लोकबंधांच्या आधारे विशिष्ट आकारांसह हे पारंपरिक खेळ सादर होतात.

क्रीडा किंवा खेळ हे प्रयोगात्म किंवा प्रयोगसिद्ध आविष्करण किंवा सादरीकरण असले; तरी त्यात खेळकरी आणि प्रेक्षक, श्रोते किंवा बघे असे भेद असत नाही. आबालवृद्ध सर्वांना मुक्तपणे सहभागी होता येते. तसे ते शरीराने किंवा मनाने खेळांत सहभागी होऊनच मुक्त स्वरूपाचा आनंद लुटत असतात.

क्रीडा किंवा खेळ क्षेत्रातील स्पर्धांना लोकसंस्कृतीत प्राचीन काळापासूनची मोठी परंपरा आहे. जत्रा यात्रा, सणोत्सव साजरा करण्याचा एक सेवाभक्ती घटक म्हणूनही अशा स्पर्धा भरविल्या जातात. कुस्त्यांचा हगामा, गौराईची लढाई, गोफणगुंड्याची लढाई ही यांची ठळक उदाहरणे होत. राजदरबाराकडूनही



अशाप्रकारे कुस्ती, साठमारी, बैल, रेडे इ. पशूंची झुंज, योद्ध्यांच्या गदा, तलवार, दाणपट्टे, भाले यांच्या स्पर्धा भरविण्याची प्रथा आहे. शौर्य, पौरुष, जागृती, राष्ट्राभिमान, जमात, गाव, राज्य यांविषयीचा अभिमान जागवणे हे लोकसांस्कृतिक लोकबंध असतात, तर सादरीकरणाच्या वैशिष्ट्यपूर्ण पद्धती हे मौखिक पारंपरिक प्रयोगनिष्ठ लोकबंध प्रयोग आविष्कार घडवितात.

क्रीडा किंवा खेळ यातील नैसर्गिक वृत्ती म्हणजे क्रीडाप्रवृत्ती अथवा खेळकरपणा होय. या प्रवृत्तीला लोकसांस्कृतिक आकार मौखिक परंपरेने, लोकधारणेच्या हेतूने देत, विविध प्रकारच्या क्रीडा अथवा खेळाच्या परंपरा निर्माण झाल्या. केवलानंदाची अनुभूती आणि अंगस्वरूप लोकची दृढ धारणा करणे ही आशयसूत्रे या परंपरेत ओतप्रोत आहेत. ती जपतांना घटकलोक, अंगस्वरूपलोक यांच्या समाजव्यवस्था, ग्रामव्यवस्था आणि राजव्यवस्था, सांस्कृतिक एकात्मतेच्या भावनेने धर्मश्रद्धांसह, या क्रीडा अथवा खेळपरंपरेचे जतन करतांना दिसतात.

खेळ म्हटले की निरपेक्ष आनंदाची लयलूट हा तात्त्विक लोकबंध असतो. उदा. नाटक, तमाशा, कठपुतळी, रामलीला, नौटंकी, ललित या व अशा कलाप्रकारांच्या प्रयोगाला खेळ मांडणे असेच म्हटले जाते. आजच्या सिनेमा प्रकारालाही खेळ अशी संज्ञा प्राप्त झाली आहे. स्वतःचे ऐहिक व्यक्तिमत्त्व विसरून केवळ, निखळ आनंद घेण्यादेण्यासाठी प्रयोगसिद्धता ही परंपरा यात दृढमूल झालेली दिसते.

**(iii) संगीत** :– लोकसंस्कृतीत, संगीत परंपरा अतिप्राचीन काळापासून चालत आली आहे. धर्मश्रद्धा, युद्धक्रीडा, जीवनसंस्कार आणि सणोत्सव यांच्या आविष्कार प्राकट्याशी, संगीताचा संबंध सनातनपणे जोडला आहे. नर्तन, वादन आणि गायन या तीन कलांचा संबंध सूर, ताल, ठेका आणि भावना यांशी एकत्रितपणे अनुबंधित दिसतो. सप्तसूर आणि ताल यांचा गायनाशी संवाद कोणत्या प्रकारे असावा याविषयी प्राचीन काळापासून चिंतन सुरू आहे. ऋषीकुलांनी संगीत साधनेस ईशसाधना आणि तंत्रशास्त्र व सिद्धीसाधनेशी जोडलेले दिसते. संगीताचा परिणाम समग्र पर्यावरण आणि चित्तवृत्तीवर होतो हे या धुरिणांनी ओळखले होते. ऋषीकुळांच्या माध्यमांतून संगीत साधना अभिजात आकारांसह प्रकट होत होती. वैदिक ऋचा संगीतबद्धतेने सादर करून मंत्रसामर्थ्य प्रकट करण्याचा प्रघात होता. सूरासूरांच्या अनेक

कथा या संदर्भात प्रचलित आहेत. विविध तंत्रदेवता, संगीत साधनाविष्काराने प्रकट होऊन कार्यान्वित होतात; असा सनातन 'लोकबंध' आहे. संगीतसाधनेसह विधिनाट्ये सादर होतांना दिसतात. त्याचे कारणदेखील संगीतात शक्तीप्राकट्याचे सामर्थ्य आहे, हे जाणले होते. जीवसृष्टीतील समग्र हालचाली, ध्वनीस्वरोच्चार आणि निसर्गविभ्रमातील वीजवादळपर्जन्यादी लक्षवेधक ध्वनीलहरींच्या अनुकरणातून, शंख, वेणू, पोकळ घुमटाकार भांडी यांच्यामधून प्रकटणाऱ्या ध्वनीलहरींना माणसाने भावनानुबंधित आकार देऊन, लोकसंगीत प्रकट होत गेले असावे; असा तर्क उचित वाटतो. जीवनाविभ्रमांना अनुकरण, अनुसरण प्रयोगांनी बद्ध करीत; त्यांचे नाट्यपूर्ण पुनराविष्कार, ही साधना माणसाचे महत्त्वपूर्ण अर्जन आहे. लाखो वर्षांच्या परंपरेने संगीत साधनेला उत्स्फूर्त आणि शास्त्रीय बंदिस्त, अशा दोन्ही परंपरा निर्माण झाल्या असाव्यात. लोकसंस्कृतीतील वाद्ये, वादक आणि गायक यांच्या धर्मश्रद्धांशी जोडलेल्या परंपरा पाहिल्या की जीवनाच्या लयीने संगीत आविष्काराचे स्वरूप कसे घेतले असावे याची कल्पना येते. शंख, वेळूनाद, पानांची सळसळ, गुराख्यांची गाणी, भलरी, श्रमगीते, सणोत्सवातील व मौखिक परंपरागत संगीत यांना लोकसंस्कृतीत महत्त्वाचे स्थान आहे. दैनंदिन पूजापाठातील घंटानाद, प्रार्थना, आरत्या गायन या गोष्टी संगीत साधनेचे लोकसंस्कृतीतील अवशेष होत. संगीतशास्त्रांची साधना विधिवत न करताही, सणोत्सव आणि संस्कारप्रसंगी, मौखिक परंपरांनी प्रकट होणारे, छंद, पदन्यास, मुद्रा आणि वाद्यपरंपरा हे सारेकाही लोकसंस्कृतीतील लोकमानसाच्या लोकबंधात्मक परंपरांची जाणीव करून देते. अभिजात संगीतातील नृत्य, वादन आणि गायनातील विशिष्ट आकार किंवा राग यांच्या नावांचा, शब्दांचा, तालठेक्यांचा धांडोळा केला तर; त्यांची मुले सनातन लोकसंगीतकारात सापडतात. पशू, पक्षी, वनस्पती, वीजवादळे, पर्जन्यधारा, वायुलहरी यांचा मानवलोकशी येणारा सनातन संबंध, लोकसंगीताचे आकार प्रकट करून पारंपरिक करतो. आज आपण लोकसागरासमक्ष, सहज, उत्स्फूर्त आणि भावनिकता आणि लोकसहभागासह प्रकट होणाऱ्या नर्तन, वादन आणि गायन कलेला संगीत म्हणतो. ओवी, अभंग, लावणी, पोवाडा, गोंधळी व वाघ्ये अशा उपासकांची गाणी, मांत्रिकाची गाणी, गाऱ्हाणी यांना त्यांच्यासमवेत येणाऱ्या पारंपरिक वाद्य आणि नृत्याविष्कार यांना लोकसंगीत म्हणण्याची प्रथा महाराष्ट्रात दिसते.



लोकसंगीताच्या आविष्कारांसह संस्कार, धर्मजागरण, कुळधर्मकुळाचार, जत्रायात्रा आदींची सिद्धता होते. लोकसंगीताला लोकसंस्कृतीत मंत्रसामर्थ्य प्राप्त झालेले असते.

**(iv) शास्त्रे :–** लोकसंस्कृतीमध्ये शास्त्रीय ज्ञानाला कमालीचे महत्त्व असते. असे असले तरी लोकसंस्कृतीतील नित्यसारणी, सतत शास्त्रीय ज्ञानाच्या सूत्रांचे तंतोतंत पालन करीत आचरत नसते. जसे वैद्यकशास्त्रानुसार उषःपानाचे महत्त्व आणि उषःपानाचे शारीरवैज्ञानिक परिणाम यांचे स्मरण करून कोणी उषःपान करीत नाही. मौखिक परंपरेने वडिलांकडून लहानांकडे 'उषःपान करणे चांगले' एवढेच सांगितले जाते. हीच गोष्ट भौतिकशास्त्रे, रसायन, ज्योतिर्विज्ञान, वैद्यकशास्त्र, वाणिज्यशास्त्र, विनिमय परिमाणशास्त्र, वास्तुशास्त्र, कृषीविज्ञान, व्यवस्थापनशास्त्र, युद्धशास्त्र, पाकशास्त्र, जलव्यवस्थापनशास्त्र एवढेच काय योगशास्त्र, धर्मशास्त्र, नाट्यशास्त्र अशी म्हणून जेव्हढी शास्त्रे मानता येतील किंवा ज्यांचे शास्त्रग्रंथ ऋषी, मुनी, शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ यांनी साधना व संशोधनपूर्वक मांडले आहेत; त्या सर्व शास्त्रांच्या मौखिक परंपरा अर्थात 'लोकबंध' लोकसंस्कृतीत, वर्तनपरंपरा, साधनपरंपरा आणि शाब्दपरंपरांच्या स्वरूपात प्रयोगसिद्धतेने आविष्कृत होतच असतात. उदा. दक्षिण दिशा यमाची आहे, लवकर निजे लवकर उठे त्यास ज्ञान आरोग्य मिळे, देवालयाचे द्वार पूर्व किंवा पश्चिमेस असावे, पांढऱ्या रुईचे झाड असेल तेथे भूगर्भात पाणी आहेच, पांचामुखी परमेश्वर, घराची शोभा अंगण दाखवतं, व्यापारिका बच्चा कभी न बोले सच्चा, जो बोलेगा सच्चा उसका गुरु कच्चा, भाकरी फिरवली नाही तर जळते, आवसेपुनवेला संचार होतो, रोगाला जोर असतो. शाब्दपरंपरेतील वाक्संप्रदाय, म्हणी, बोधकथा, नीतीकथा, भयकथा, शिवपार्वती संवादगीते, अशा कितीतरी गोष्टी शास्त्रांचे अर्थात विद्यांचे लोकसंस्कृतीतील लोकसाहित्य स्वरूपातील प्रयोगसिद्ध आविष्करण असते. जीवनाचे असे एकही अंग नाही; अगदी बालसंगोपनापासून ते मर्तिकापर्यंत किंवा बीज संशोधनापासून व्यापारउदिमापर्यंत, कुटुंबव्यवस्थापनापासून राज्यव्यवस्थापनेपर्यंत, भाषिक दैनंदिन प्रयोगापासून शिष्ट भाषेपर्यंत; एव्हढेच काय गुणदोष, फायदेतोटे, शुद्धाशुद्ध विवेक, सामाजिक शिष्टाचार अशा सर्व अंगोपांगांमध्ये प्रयोगसिद्ध लोककलेच्या स्वरूपात, शास्त्रीय संशोधन अनुसरले जाते. लोकसंस्कृतीतील शास्त्र किंवा विद्या यांचे प्रचलनही चक्रनेमीक्रमाप्रमाणे लोकसंस्कृतीत सतत, प्रत्यक्ष

प्रयोगातून, पुनर्संशोधित होत असते. दागदागिने, धातू यांपासून ते खाद्यपदार्थांपर्यंत, कपडच्यालत्त्यापासून, महालमाडच्या बांधण्यापर्यंत, रहाटगाडग्यापासून ते नळयोजनेपर्यंत, बैलगाडीपासून अवकाशयानापर्यंत, हुंदडण्या ओरडण्यापासून अभिजात संगीतापर्यंत; सर्व शास्त्रे लोकसंस्कृतीच्या लोकसाहित्यात्मक प्रयोगसिद्धतेतून संशोधित होऊन; शास्त्रीय संशोधन स्वरूपात लोकधुरिण अशा ऋषीमुनी, तपस्वी, शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, चिंतक यांनी, शास्त्रीय मांडणीसह, पुन्हा सारणीसाठी, लोकसंस्कृतीला बहाल केलेली असतात. मानवी ज्ञानार्जनाचा प्रवास असा लोकसंस्कृतीतून अभिज्ञानाकडे आणि अभिज्ञानाकडून लोकसंस्कृतीकडे चक्रनेमीक्रमाने, स्थलकालपरिस्थिती सापेक्षतेने घडत असतो. हे लोकवैज्ञानिक सत्य स्वीकारावे लागते. भारतीय परंपरेने चवदा विद्या सांगितल्या असल्या; तरी त्यात असंख्य अंगभूत, उप, अनुषंगिक विद्यांची भर पडतच जाते. या सर्व विद्याही लोकसंस्कृतीत, लोकसाहित्य स्वरूपात लोकबंधांचे अर्थात लोकधारणासूत्रांचे प्रकटीकरण करतांना, कलाकुसर, कौशल्यस्वरूपात, प्रयोगसिद्धतेने अवतरतात. चूल कशी पेटवावी, बी कसे पेरावे, नाक कसे शिंकरावे याचे सुद्धा शास्त्र आहे किंवा ही सुद्धा कला आहे; असे आपण म्हणतो. तेव्हा लोकसंस्कृतीत लोककला आणि लोकशास्त्रे यांचे एकात्मस्वरूपच प्रकट करावयाचे असते. Folk-lore म्हणजे लोकविद्या, असा जो अर्थ लोकसाहित्य क्षेत्रात प्रचलित आहे त्याचे कारणही हेच आहे. शास्त्र म्हणजे, अनुभवांचे जास्तीत जास्त त्रिकालाबाधित व्यवस्थापन किंवा सुसूत्र मंडन असे मानले; तर शास्त्रीय संशोधन हे लोकसंस्कृतीत, लोकसाहित्य स्वरूपातील, प्रयोगसिद्धतेने सतत सुरू असते, हे मान्य करावे लागते. आजपर्यंत मानवाने अर्जित केलेले ज्ञानभांडार पाहिले आणि त्याने व्यवस्थापित केलेली आणि पुनःशक्ती प्रकट करण्याचे सामर्थ्य राखणारी, सर्व शास्त्रे ही लोकसंस्कृतीतून उदित झालेली आहेत; हे सहज ध्यानात येते. लोकसाहित्यातून सर्व शास्त्रांना प्राथमिक स्वरूपातील सामग्री मिळते असे यामुळेच म्हटले जाते.

लोकसंस्कृतीतील हे अनुभवसंचित एकट्या मानवलोकचे मात्र नाही. मानवलोकने, सर्व सृष्टीचे उपयोजन; स्वतःच्या समूहजीवनाच्या सुस्थिरतेसाठी करण्याचा जो अनादि खटाटोप केला; त्या उपयोजनातून हे अनुभवसंचित, लोकसंस्कृतीत प्रकट होत राहिले. मुंग्यांचे वारुळ, मधाचे पोळे, गायीचे सवत्सपण, वानरांचे फळशोधन, अस्वलांचे अन्न व्यवस्थापन, पाण्याचे प्रवाह, सूर्याची आयने, वायूचे विविध प्रकारे संचार, पक्ष्यांचे प्रजननासह कुटुंबव्यवस्थापन, हिंस्त्रश्वापदांचे अन्नशोधन, एव्हढेच काय जीवसृष्टीच्या विष्ठांचे, उच्छवासांचे, दंशांचे परिणाम अशा असंख्य अनुभवांचा 'लोक' मांडणीसाठी, स्थैर्यासाठी, अर्थात लोकसंस्कृती उभारण्यासाठी मानवाने केलेल्या, अनुकरणात्मक उपयोजनातून हे संचित घडले आहे. भारतीय परंपरेने 'लोक'ची कल्पना मांडतांना, समग्रसृष्टीचा एकात्म विचार केला आहे. म्हणूनच Folk-lore चा अभ्यास करताना भारतीय संकल्पनेचा, अर्थात सर्वव्यापक अस्तित्वाचा विचार अपरिहार्य ठरतो. शास्त्रांच्या बाबतीत लोकसांस्कृतिक आणि लोकसाहित्य स्वरूपातील आविष्कारांच्या अभ्यासाचा विचार करतांना तर हे निश्चितच लक्षात ठेवावे लागेल.

**(v) धर्मजीवन :–** लोकसंस्कृतीमध्ये धर्मजीवनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. प्रचलित हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन अशी धर्मसंकल्पना लोकसंस्कृतीत अस्मितापूर्णतेने जपली जाते; असे दिसत असले तरी; लोकव्यवहार अर्थात लोकसाहित्य स्वरूपात प्रकटतांना धर्मसंस्था अधिक व्यापक आणि समावेशक झालेली दिसते. व्यापकतेचे स्वरूप मानव लोकधर्म असे झालेले असते. जागतिक पातळीवरील धर्मजीवनाचा विचार केला तर ख्रिश्चन आणि मुस्लिम धर्मीय म्हणविणारांची संख्या प्रचंड आहे. धर्माची कल्पना राज्य व राष्ट्र कल्पनेशी जोडलेली दिसते. हिंदू धर्म अशी धर्मसंकल्पना गेल्या अडीच हजार वर्षात म्हणजे ख्रिश्चन आणि मुस्लिम संकल्पनांच्या साधारण समकालीन स्वरूपात पुढे आली आहे. हिंदू संकल्पनेबरोबरच बौद्ध व जैन मते, धर्मसंकल्पना म्हणून पुढे आलेले दिसतात. मात्र या दोन्ही मतांचा स्वभाव, प्रकृती हिंदू धर्मांतर्गत भिन्न मते असाच आहे. या धर्मकल्पनांव्यतिरिक्त अनेक धर्म म्हणून प्रसिद्ध झालेली मतेही प्रचलित आहेत. उदा. सिख, पारशी इ. परंतु त्यांचीही स्थिती व्यापक धर्मसंकल्पनेमध्ये, एक मतप्रवाह यासारखीच आहे. लोकसंस्कृतीत ही सर्व मते अभिनिवेश राजकीय किंवा सामूहिक बंदिस्त जीवनासाठी प्रखर दिसत असली तरी; आरोग्य, पर्यावरण, आर्थिक व्यवहार, राजकीय व्यवस्था, दळणवळणाची साधने, वास्तु उभारणी, कृषीजीवन या व अशा बाबतीत हा अभिनिवेश गळून पडतो आणि मानवलोक किंवा विराटपुरुषलोक स्वरूपात, लोकसांस्कृतिक जीवन प्रकट झालेले दिसते.

स्वाभाविकपणे धर्मजीवन आणि लोकसांस्कृतिक जीवन यांचा उद्गम

आणि विकासाचा क्रम पाहू गेले तर; लोकसंस्कृती ही सनातन लोकअवस्था आहे, हे लोकबंधाच्या आधारे स्पष्ट करता येते. तर्कदृष्ट्यादेखील लोकसंस्कृती ही धर्मजीवनाच्या अगोदर अस्तित्वात येणे हे नैसर्गिक आहे. माणूस हा कळप करून राहणारा प्राणी आहे. कळप म्हटले की सामूहिक धारणातत्त्वे आलीच. ही धारणांविषयक तत्त्वे म्हणजेच लोकबंध होत. हे लोकबंध मानवाच्या आरंभबिंदूपासून अस्तित्वात येत राहिले आहेत. ते स्थलकाल परिस्थिती सापेक्षतेने परिवर्तनशीलतेने स्वीकृत व परंपरागत होत राहिले आहेत. या परंपरांचे प्रयोगसिद्ध आविष्कार म्हणजेच तपशीलात्मक लोकबंधात्मक आविष्कार अर्थात लोकसाहित्य होय.

मानव हा प्राणी असल्याने आहार, निद्रा, भय आणि मैथुन अथवा प्रजनन हे मूलभूत नैसर्गिक विकार माणसालाही आहेत. परंतु माणसाला मन, वाणी, प्रतिभा किंवा अंतःप्रेरणा या सकृतदर्शनी तरी अन्य जीवसृष्टीपेक्षा अधिकच्या गोष्टी प्राप्त आहेत. या अधिकच्या गोष्टींच्या योगाने माणसाने आपल्या 'लोक' स्वरूपातील जीवनाला अधिकाधिक एकात्म, सुलभ, आनंदमय, स्थिर जीवनसारणीसाठीचे 'लोकबंध' प्रदान केले. त्यातून लोकसंस्कृती ही अवस्था निर्माण झाली. 'लोकबंध' ही धारणा करणारी सूत्रे अथवा तत्त्वे होत. त्यांच्या प्रकट अवस्था; म्हणजेच प्रयोगसिद्ध जीवनसारणी; अर्थात वर्तन, साधन आणि शाब्दपरंपरांचा विशिष्ट रचनाबद्ध, प्रगमनशील, परिवर्तनशील आविष्कार होय. यालाच लोकसंस्कृती असे आपण म्हणत आहोत. लोकसंस्कृती हेच माणसाचे खरे धर्मजीवन आहे. हे लक्षात घ्यावयास हवे. तरीदेखील या लोकसांस्कृतिक समग्र जीवनाला, अधिक दृढ स्वरूप देतांना, दैवते, नीती, तत्त्वज्ञान आणि सारणी व्यवहाराची अर्थात धारणासूत्रांची बंदिस्त अशी चौकट लोकधुरिणांनी आपल्या अंगस्वरूपलोकला देण्याचा प्रयत्न केला. यातूनच, आज आपण धर्म म्हणून ज्यांचा विचार करतो आहोत, त्यांची निर्मिती झाली. लोकधुरिणांनी ही निर्मिती केली आहे; असे सकृतदर्शनी दिसत असले; तरी ती निर्मिती ही स्थलकालपरिस्थिती सापेक्ष अशी समूहमनाची निर्मिती आहे. म्हणजेच लोकसंस्कृतीतूनच ती उदित झाली आहे. लोकसंस्कृती ही लोकअर्जित अशी अवस्था आहे. तशीच धर्म हीदेखील लोकअर्जित अवस्था आहे. यामुळेच लोकसंस्कृतीप्रमाणेच धर्म ही अवस्थाही स्थलकालपरिस्थिती सापेक्ष परिवर्तनशील आहे. धर्मजीवन हे लोकसंस्कृती



अवस्थेच्या दृष्टीने तात्कालिक ठरते. वैश्विक लोक किंवा विराटपुरुषलोक या संकल्पनेत, प्रत्येक धर्मसारणीप्रणित लोक हा 'अंगस्वरूप लोक'च ठरतो. तेच त्या लोकचे खरे अस्तित्व असते. त्यामुळेच उपरोक्त पर्यावरण इ. गोष्टींच्या बाबतीत, धर्मधारणात्मक अंगस्वरूप लोकचे, अस्तित्व क्षीण होते. Folk-lore या ज्ञानशाखेला सनातन परिवर्तनशील जीवनसारणीचा, शैलीचा किंवा विद्येचा विचार अभिप्रेत आहे.

Folk-lore चा विचार करतांना, प्रस्तुत लेखकाने 'लोकबंध' या ग्रंथात नोंदविलेली लोकसांस्कृतिक प्रक्रिया गृहितक म्हणून स्वीकारावी लागते. Folk-lore च्या अभ्यासकांनी Folk-lore (लोकविद्या) सर्वप्रकारच्या शास्त्रग्रंथांना प्राथमिक सामग्री पुरविते असे म्हटले आहे. त्याचबरोबर प्राचीनतम अवशेष लोकसंस्कृतीची प्रगमनशील अवस्था स्पष्ट करतात; हे स्पष्ट केले आहे; हे विचारात घेऊन, 'वैश्विक लोक' अर्थात विराटपुरुषलोकचे, सनातन प्रचलन, लोकबंधात्मकतेने होते आहे, हे समजून घ्यावे लागते. प्रस्तुत लेखकाने 'लोकबंध'चे व्याख्यात्मक स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे केले आहे– ''अनुभूतीतून तयार होत गेलेला, 'लोक'धारणेसाठी कार्यान्वित झालेला, परंपरेत लवचिकतेने परंतु मूलभूततेने वाहत राहणारा, सनातनातून आलेला, वर्तमानात जाणवणारा, भविष्यकाळात प्रगटण्याची क्षमता असणारा, लोकमानसातील जाणिवेचा, आनंद किंवा सौंदर्यभावनाप्राप्त कल्पनाप्रवाह म्हणजे 'लोकबंध' होय. 'लोकबंध' वर्तनपद्धतीतून, विधिस्वरूपातून, चिन्हे, प्रतीके, प्रतिमा यांमधून आणि या सर्वांच्या भाषिक रूपातून प्रकट होतो. याप्रकारे 'लोकबंध' प्रकट करण्याची 'लोक'ची धडपड असते. कारण लोकबंधातून लोकधारणा घडत असते.''[५]

लोकसांस्कृतिक प्रक्रियेचा विचार करता; भारतीय परंपरेने मांडलेली सनातन धर्मसंकल्पना आणि 'वसुधैवकुटुंबकम्' ही जाणीव, हे Folk-lore च्या अभ्यासाचे पायाभूत गृहितक आहे, असे म्हणावे लागेल. एवढ्या व्यापक पातळीवर 'लोक', लोकसंस्कृती आणि लोकधर्म यांचा विचार लोकसाहित्याच्या अर्थात लोकविद्येच्या अंतर्गत घडणे अपेक्षित ठरते.

असा व्यापक विचार करूनही वैश्विक पातळीवर विविध 'अंगस्वरूपलोक' स्वरूपात विविध धर्मांचे अस्तित्व मान्य करावे लागते. या धर्मांचे पालनही लोकपरंपरेने नीती तत्त्वज्ञान यानुसार आचारधर्मासह शेकडो वर्षे सुरू असल्याचे

लक्षात येते. लोकसंस्कृतीत लोकसाहित्याविष्कारांच्या स्वरूपात, धर्मांचे हे अस्तित्व प्रयोगसिद्धतेने जाणवते. या प्रयोगसिद्ध लोकसाहित्यात्मक आकारांचा Folk-type अर्थात लोकबंधांचा धांडोळा केला तर; धर्माधर्मांचे वेगळेपणही प्रकट होते. लोकसंस्कृतीत ढोबळ मानाने धर्मधारणेचे काही महत्त्वाचे घटक विचारात घेता येतात. त्यात (१) दैवते (२) धर्मग्रंथ (३) प्रधान नीती तत्त्वज्ञान व आचारसूत्रे (४) उपासना पद्धती (५) जन्मप्रथा, विवाहप्रथा आणि मर्तिकप्रथा (६) सणोत्सव (७) राज्य व राष्ट्र कल्पना यांचा अनुषंगिक इतिहास असे घटक विचारात घेता येतात. आज प्रचलित धर्मांचा विचार करता, या घटकांच्या आधारे, धर्माचे वेगळेपण लक्षात येते. या घटकांसह अंगस्वरूपलोकमध्ये आणखी एक महत्त्वाचा घटक लक्षात घ्यावा लागतो तो म्हणजे पृथकपणाचा व तत्त्वज्ञानविषयक आदर्शत्वाचा अभिमान. या अभिमानाचे रूपांतर अहंकार, विद्वेष, आक्रमकता आणि राज्य व राष्ट्र स्वामित्व यांत झालेले दिसते. इतिहासाचा धांडोळा केला तर; या अभिनिवेशाने सर्वंकश संघर्षही झालेला दिसतो.

भारतीय परंपरेचे धर्मजीवनाच्या बाबतीत वेगळेपण जाणवते; ते 'सर्वात्मक परमेश्वरा'ची कल्पना आणि 'वसुधैवकुटुंबकम्' या संकल्पनेमुळे हीच कल्पना भारतीयांच्या प्राचीनतम अशा मौखिक परंपरेतून; संकलन, संपादन व संग्रहण प्रक्रियेतून; उदित झालेल्या श्रुती, स्मृती आणि पुराण ग्रंथांमधून पुढे पुढे येते. भारतीय सनातन धर्मसारणीला, सुमारे अडीच हजार वर्षांपासून, हिंदूधर्मसारणी असे अभिदान, प्रामुख्याने भारतेतर लोकांनी दिले आणि मौखिकपरंपरेने ते प्रचलित झाले. Folk-lore लोकविद्या या दृष्टीने लोकधर्माला हे मिळालेले नाव वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यामुळेच 'हिंदू धर्म' असे ज्या सनातन सारणीला मिळाले, ती सनातन धर्मसारणी हीच हिंदू धर्माचे खरे स्वरूप आहे, हे लक्षात घेता, ख्रिश्चन किंवा मुस्लिम या धर्मांशी साम्यभेदात्मक स्वरूपात हिंदू धर्म ही संकल्पना समजावून घेता येत नाही. किंबहुना ख्रिश्चन किंवा मुस्लिम यांना ज्या आकारस्वरूपामुळे धर्म असे संबोधिले जाते ते सूत्र अर्थात तो लोकबंध, हिंदू या संकल्पनेला अभिभूत होत नाही. या दृष्टीने इतिहासभूषण श्री. श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी यांनी 'हिंदू कोणास म्हणावे?' या ग्रंथात 'हिंदू हे नाव कसे पडले?' या मथळ्याखाली दिलेली माहिती येथे घेणे आवश्यक वाटते. ते लिहितात, ''शंकराचार्यांच्या वाङ्मयात 'हिंदू' हा शब्द येत नाही. मात्र तो



ग्रीक इतिहासकार (इ.सन पूर्व ४०० च्या आधीची) हिरोडोटस याच्या इतिहासात Indis इंडीस या नावाने येतो.

भारत हा सुंदर चंद्रप्रकाशाचा, देश म्हणून, चिनी प्रवाशी या देशास 'इंदू देश' म्हणत. हिरोडोटसने याचाच अनुवाद केलेला दिसतो. परकियात या देशाचे नाव 'इंदू' असे होते, असे यावरून दिसते. सिंधू नदीवरून या देशास 'हिंदू' हे नाव पडले, असे तुर्की इतिहासकारांचा आधार घेऊन म्हटले जाते. पारशांच्या अवेस्ता ग्रंथात 'सरस्वती'ला हरहत्की व सिंधूला 'हिंदू' असे म्हटले आहे. पण येथे हे लक्षात घेतले पाहिजे की हिरोडोटस सनपूर्व ४०० च्या आधीचा. तो जेव्हा भारतात Indis असे संबोधतो, तेव्हा भारताची सीमा सिंधू नदी ही नव्हती. त्यावेळी सर्व अफगाणिस्तान व इराणचा खोरासान हा प्रांत भारतीय संस्कृतीचाच अनुयायी होता. तेव्हा 'इंदू' या स्वयंप्रकाशवाचक शब्दावरून, परकिय प्रवासी या देशाला 'इंदुस्तान' म्हणू लागले, असे स्पष्ट दिसते. पुढे अरब, इराणी, तुर्की लोकांचा या देशाशी जसजसा जास्त संबंध येऊ लागला, तसतसा 'इंदू'च्या ऐवजी 'हिंदू' या शब्दाचा जास्त वापर होऊ लागला.''[६] ते पुढे लिहितात, ''एवढे मात्र खरे की, 'हिंदू' हा शब्द भारतवर्षाच्या व भारतीयांच्या धर्माचा वाचक शब्द म्हणून त्याकाळी मानला जात नव्हता. तरीही हा शब्द भारतास पर्यायी 'हिंदुस्तान' व आपल्या 'सनातन वैदिक धर्माचा पर्यायी 'हिंदूधर्म' म्हणून शकारी विक्रमादित्याच्या म्हणजे सनपूर्व ८२ या सालापासून चालू आहे.''[७]

हे अवतरण येथे देणे यासाठी आवश्यक आहे की देशाच्या किंवा स्थानाच्या नावावरून जसे भाषेला नाव लोकपरंपरेने मिळते; बरोबर तशीच लोकसांस्कृतिक परंपरा 'हिंदूधर्म' या नावाच्या बाबतीत घडली. म्हणजे भारतीय लोकचे लोकसांस्कृतिक धर्मजीवन हे विशिष्ट धर्मग्रंथ व विशिष्ट देवता यांच्याशी निगडित, धर्मसंस्थापकाने मांडलेले नाही; तर ते सनातन लोकसांस्कृतिक प्रक्रियेतून निष्पन्न झाले आहे. यामुळेच 'सनातन धर्म' या धर्मसंकल्पनेने 'वसुधैवकुटुंबकम्' आणि विराटपुरुषरूप लोकची संकल्पना मांडली आहे. भारतीय धर्मजीवन हे सनातनपणे, परिवर्तनशीलतेने तरी सर्व समावेशकतेने वैश्विक लोकजीवनासाठीचे धर्मजीवन आहे. त्यामुळे भारतीय धर्मजीवनपरंपरा ही वैश्विक लोकधर्मजीवनपरंपरा आहे; हे लोकसाहित्य शास्त्रीयदृष्ट्या स्पष्टपणे जाणवते हे लक्षात घेऊन; अभ्यास करणे क्रमप्राप्त

आहे.

अन्य धर्मांचा लोकसांस्कृतिक अभ्यास करतांना लक्षात येते की, धर्मग्रंथानुसार अपेक्षित दैवत, अपेक्षित नीतीतत्त्वज्ञान व जीवनविषयक अन्य कल्पना यांना, अनुयायांच्या अनुसरणांतून स्थलकालपरिस्थिती सापेक्ष लोकबंधांचे स्वरूप प्राप्त झाले व लोकजीवनपरंपरा त्या लोकबंधांच्या आविष्कार स्वरूपात, तपशीलात्मकतेने दिसू लागली आहे. आज ख्रिस्ती लोकसाहित्य, मुस्लिम लोकसाहित्य असे; जेव्हा शब्दप्रयोग केले जातात तेव्हा त्या लोकबंधांना जरी लोकजीवनपरंपरांचे धारणात्मक महत्त्व प्राप्त झालेले असले तरी; त्यांचे मूळ, सनातनात नव्हे; तर त्यांच्या धर्मग्रंथात आढळते. नैसर्गिक जीवनप्रणालीनुसार, धर्मजीवनप्रणाली अनुभवतांना मात्र, धर्मग्रंथांतील मूळ बंदिस्तता परिवर्तनात्मकतेने प्रकटते. अर्थातच सनातन लोकधर्मप्रणालीचे रूप घेऊनच आचारधर्म प्रकटतो हे लक्षात घ्यावे लागते. प्रस्तुत लेखकाने 'लोकधर्म'[८] या पुस्तिकेत याविषयी अधिक स्पष्टीकरण केले आहे. ते जिज्ञासूंनी वाचावे.

**४. समारोप :–**

भारतीय परंपरेतील लोकसाहित्य आणि लोकसांस्कृतिक 'लोकबंध' यांचा विचार करतांना; वैश्विक पातळीवरील लोकसाहित्य आणि लोकसांस्कृतिक 'लोकबंध' यांच्या स्वरूप आणि अनुबंधांचे दर्शन स्वाभाविकपणे घडले. लोकसंस्कृतीचा उद्‌गम, लोकजीवनाच्या प्रत्यक्ष जगण्याच्या प्रक्रियेतून होत असतो. लोकसंस्कृतीचे प्रत्यक्ष अनुभवन, मौखिक परंपरागत जगण्याच्या प्रयोगातून घडत असते. लोकसंस्कृती म्हणून ज्या अवस्थेचा विचार केला जातो; तो प्रामुख्याने समूहमनाने, अनुभवसंचितातून, स्वीकृत आणि धुरिणांच्या प्रमाणाने, पारंपरिक केलेल्या, तात्त्विक लोकबंधांच्या स्वरूपात असतो. सर्वात्मक परमेश्वर, सर्वांभूतीप्रेम, अंगस्वरूपलोकच्या स्थैर्य, सुखसमृद्धी, प्रजनन, स्वामीभाव, राजव्यवस्था या व अशा स्वरूपातील तत्त्वे जीवन सूत्रे म्हणून स्वीकारलेली असतात. या तात्त्विक लोकबंधांचे प्रत्यक्ष प्रकटन सारणी किंवा जीवनशैली स्वरूपात तपशीलाने घडते. प्रकटनातील वर्तनात्मक, साधनात्मक आणि भाषिक किंवा शाब्द आकार किंवा तपशीलदेखील, मौखिक परंपरेने अंगस्वरूपलोक मध्ये प्रचलित असतात. स्थलकालपरिस्थिती सापेक्षतेने, ते तपशील परिवर्तनात्मकतेने प्रकटले तरी; तात्त्विक लोकबंध कायम असतात. उदा. विवाहप्रथेचा विचार केला तरी; ही लोकसांस्कृतिक आणि लोकसाहित्य



स्वरूपातील प्रक्रिया लक्षात येऊ शकेल.

भारतीय लोकसंस्कृती ही वैश्विक पातळीवर अतिप्राचीन काळापासून सनातनपणे प्रकट होते आहे; हे आता जगन्मान्य झाले आहे. भारतीय परंपरेत निर्माण झालेले श्रुती, स्मृती, पुराणे, रामायण आणि महाभारत असे वाङ्मय हे अतिप्राचीन मौखिक परंपरेचे, सांस्कृतिक इतिहास प्रदर्शित करणारे वाङ्मय आहे. लोकसंस्कृती आणि लोकसाहित्य यांच्या परंपरा मानवाच्या आरंभबिंदूपासून कशा सुरू झाल्या आहेत; तात्त्विक आणि सारणी तपशीलात्मक लोकबंधांचा प्रवास, परिवर्तनशीलतेने कसा घडत गेला आहे; याचे दर्शन भारतीय परंपरेतील या वाङ्मयामुळे घडते. जागतिक पातळीवर पाश्चात्य विश्वात 'Folk-lore' चा स्वतंत्रपणे अभ्यास करण्याचा विचार पुढे येऊन सुमारे दोनतीनशे वर्षे झाली असली तरी; प्रत्यक्ष या अभ्यासाची परंपरा मानवी जीवनाच्या आरंभबिंदूपासूनच सुरू करावी लागते हे भारतीय परंपरा पाहिली की ध्यानात येते. लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीपरंपरा ही लोकजीवनाच्या प्राथमिक स्तरावर कार्यान्वित असते; असे म्हणणे अर्धसत्य आहे. ही परंपराच अभिजात म्हणविणाऱ्या साहित्य आणि संस्कृतीला जन्म देत असते. त्याचवेळी अभिजात म्हणविणाऱ्या साहित्य आणि संस्कृतीला, परंपरेत परिवर्तनशीलतेने, सामावून घेण्याची क्षमताही, लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीत असते. लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीची अवस्था, सतत वर्तमान स्वरूपात प्रकट होत असते. भारतीय लोकसाहित्य आणि लोकसांस्कृतिक लोकबंधांचा अभ्यास केला तर; लोकबंध उद्‌गम आणि परंपरा, परंपरा आणि परिवर्तन, यांची प्रक्रिया लक्षात येण्यास मदत होते. भारतीय लोकसाहित्य आणि लोकसांस्कृतिक 'लोकबंध' समजावून घेतले की Folk-lore मधील Folk ही संकल्पना आणि lore संकल्पना विश्वव्यापकतेने विचारात घ्याव्या लागतील, याची जाणीव होते. त्यातून लोकसाहित्याच्या अभ्यासाला, सर्व सर्वशास्त्रे, कला, जीवनपद्धती, मानवाचे सृष्टीशी संबंध यासंदर्भात सामग्री पुरवून, अधिक सशास्त्रता देण्याचे परिमाण गवसते, हे लक्षात येते. भारतीय परंपरेचा विचार केल्याने, जागतिक पातळीवरील लोकसाहित्याच्या अभ्यासाला प्रगमनशीलता प्राप्त होईल.

**५. संदर्भ व टीपा :–**

१) स्वयंपुरोहित : बापट (शास्त्री/वेदशास्त्रसंपन्न) कृ. म., राजेश प्रकाशन, पुणे, सुधारून वाढवलेली आवृत्ती २०१५.

२) तत्रैव, अंत्येष्टी विधी.
३) भारतीय इतिहास व संस्कृती यांचा यथार्थ अभ्यास खंड १२ : 'ब्रह्मन', भीष्म-श्री भगवान वेदव्यास इतिहास संशोधन मंदिर, पाचपाखाडी ठाणे, महाराष्ट्र, प्र.आ. १९९४.
४) तत्रैव, 'बंधन आणि मुक्ती', पृ. १०.
५) लोकबंध : सहस्रबुद्धे अनिल, नितीन प्रकाशन, पुणे, नवीन सुधारित आवृत्ती जुलै २०१२.
६) हिंदू कोणास म्हणावे : कुलकर्णी श्रीपाद दत्तात्रय, श्री भगवान वेदव्यास इतिहास संशोधन मंदिर (भीष्म), मुंबई, प्र.आ. १९८९, पृ. ७.
७) तत्रैव, पृ. ८.
८) 'लोकधर्म' : सहस्रबुद्धे अनिल, आनंदोत्सव प्रकाशन मंच, नगर, प्र.आ. ऑगस्ट २४- २०१६.

●●●



### प्रकरण नववे

# लोकसंस्कृती व लोकसाहित्य आविष्कारातील विकृती

**(Disorder, Perversity, Disguest and Loathing [Total Bad, uncultured traditions] in Folk culture and Folk-lore)**

मानवी समूहजीवनाला, स्थलकालपरिस्थिती सापेक्ष, आकार देत मानवी लोकसंस्कृती, सनातनपणे, लोकबंधात्मक आविष्कारातून, प्रयोगसिद्धतेने प्रकट होत; अनंतकाळ सुरू असणार आहे, असे आपण म्हणत आहोत. लोकचे लोकसांस्कृतिक अस्तित्व 'लोक'च्या आरंभबिंदूपासून, अनादिअनंतपणे पुढे जात आहे. या लोकसांस्कृतिक जीवनात, अलोकसांस्कृतिकतेला थारा नसावा; ही आदर्शभूत अपेक्षा, लोकसांस्कृतिक मनामध्ये सतत असते. मात्र लोकसांस्कृतिक जीवनात अलोकसांस्कृतिक मौखिक परंपरा ह्या तेव्हढ्याच घट्टपणे, लोकसाहित्याच्या स्वरूपात, मौखिक परंपरागततेने प्रकट होत असतातच. अशी अलोकसांस्कृतिक अवस्था, परंपरा म्हणजे विकृती होत. अन्य प्राण्यांतदेखील, त्यांच्या त्यांच्या परीने कळपाला, थव्याला, समंजसपणे सांभाळण्याच्या परंपरा दिसतात, तशाच त्याच कळपाला, स्वामीभावाने स्वतःच्या आक्रमकतेने कह्यात ठेवून; हव्या त्या प्रकारे, वापर करण्याच्या परंपराही आढळतात. टोळी, कळप, थवा यांचे मालकपण स्वतःकडे घेण्यासाठीचा संघर्ष प्राण्यात दिसतो. माणूस हा प्राणी असल्यामुळे त्याच्याकडूनही हे घडणे अपरिहार्य आहे. माणूस प्राण्यात, अन्य प्राण्यांपेक्षा अधिकची सहानूभूती, समूहजीवनाची आसक्ती, प्रतिभा, सौंदर्यभावना, नाविन्याची ओढ, व्यवस्थापनशक्ती, अशा अनेक प्रकारची शक्तीमत्ता, अंतःप्रेरणेच्या स्वरूपात

आहे, असे माणसाला जाणवते. ते त्याने संस्कृती साधनेच्या स्वरूपात सिद्धही केले आहे. चराचराचे व्यवस्थापन, आपल्या प्रतिभेने, मानवी जीवनासाठी साधन स्वरूप उपयोजून; मानवी संस्कृतीला, विद्या आणि कला यांचे समृद्ध आधार देत; संस्कृतीची उभारणी सर्वकल्याणात्मकतेने करण्याचा खटाटोप अनादिपणे माणसाने केला आहे. माणसाने त्याला लाभलेल्या अधिकच्या शक्तीमत्तेने केले, असे आपण म्हणतो. प्राणीप्रवृत्तीपासून, परब्रह्मसापेक्ष, सर्वात्मक प्रेमभावाने, संवेदनशीलतेने प्रकटण्याची दैवी प्रवृत्तीपर्यंत, माणसाने, प्रकृतीला आकारित केले आहे. या अवस्थेला संस्कृती असे नाव त्यानेच दिले. प्रकृतीवर, सर्वात्मक प्रेमभावाने प्रकटण्याचे संस्कार करून; संस्कृती निर्माण करतांनाच, माणसाला आपल्या प्रकृतीमधील नैसर्गिक पाशवीपणाला निवारता येणे शक्यच नव्हते. या पाशवी वृत्तीने, परमेश्वरी वृत्तीवर मात करण्याचा प्रयत्नही, सनातनपणे सुरू आहे. प्रकृतीला स्वार्थपरतेने आकार देण्याचा प्रयत्न करून; प्राणी पातळीवरील भोग प्रवृत्ती स्वीकारून; व्यवहार करण्याचा प्रयत्न करणे म्हणजेच विकृती जोपासणे होय. मानवी लोकसारणीमध्ये मानवी प्रकृतीच्या संस्कृती आणि विकृती या दोन अवस्थांचा सतत संघर्ष सुरू असतो. लोकसंस्कृतीमध्ये हा संघर्षही तेव्हढ्याच परंपरागततेने सुरू असतो. विकृतींच्या या परंपराही लोकसाहित्यच असते. विकृत लोकबंधांचे ते आविष्करण असते. यामुळे लोकसंस्कृती आणि लोकसाहित्याच्या अभ्यासात, विकृती या अवस्थेचाही अभ्यास आवश्यकच ठरतो. विकृती हीदेखील संस्कृतीप्रमाणे मानवनिर्मितच आहे. भारतीय परंपरेचा संस्कृतीसाधनेचा इतिहास जसा अतिप्राचीन आहे; त्याचबरोबर 'लोक'मधील विकृतींचा इतिहासही तेव्हढाच अतिप्राचीन आहे. देवासूर संघर्ष, मानवराक्षस संघर्ष, गावगुंडी, तस्करकथांची परंपरा, जारणमारणात्मक विद्या, भाऊबंदकी, सासूरवास, बाईलवेडेपणाच्या कथा, सावत्राच्या छळकथा, जातीपंथ संघर्षकथा अशा अनेक परंपरा विकृतीच्या निदर्शक आहेत असे लक्षात येते. डॉ. दुर्गा भागवत यांनी लोकसाहित्याच्या अभ्यासकांना दिलेला इशारा महत्त्वाचा वाटतो. त्या लिहितात, ''लोकसाहित्याचा खूप मोठा भाग अत्यंत हिडीस, कंटाळवाणा व जनतेच्या बुद्धीस मागे खेचून धरणारा आहे.''[१] त्या आणखी लिहितात, ''कै. झवेरचंद मेवाणी, श्री. रामनरेश त्रिपाठी, श्री. काका कालेलकर, कै. सानेगुरुजी, श्री. देवेंद्र सत्यार्थी वगैरेंसारख्या लोकसाहित्याच्या पुरस्कर्त्यांनी, लोकसाहित्याची



उजळलेली भावनोत्कट बाजूच तेवढी लोकांसमोर मांडून; लोकसाहित्य केवळ मंगलमय, भारतीय संस्कृतीचे सर्वांत मोठे निदर्शक, अशी लोकांची समजूत करून दिलेली आढळते.''[२]

**१. विकृती प्रतिबंधक, लोकपारंपरिक संस्था :–**

गावपंचायत किंवा न्यायसंस्था या विकृती प्रतिबंधक लोकसंस्था होत. 'पाचामुखी परमेश्वर' या लोकबंधाच्या आधारे न्यायासनासमोर, कौटुंबिक, सामाजिक, राजकीय विकृतीतून पुढे आलेले खटले मांडले जातात. या खटल्याच्या सुनावणीच्या माध्यमातून 'लोक' मध्ये स्थैर्य हवे असेल तर; या ना त्या कारणाने निर्माण झालेल्या विकृतींना आवर घातलाच पाहिजे, अशी सक्ती आणि शासन केले जाते. मुख्य न्यायाधीश, पंचायतीचा मुखिया, अथवा राजा स्वतः असे शासन करतो. अशा परंपरांची नोंद इतिहासात झालेली पाहावयास मिळते. यात भाऊबंदकीमुळे अन्यायकारकतेने, स्थावर आणि जंगम मालमत्ता बळकावणे, स्त्रियांवरील अत्याचार, चोरी, परंपरेविरुद्ध केलेले कृत्य, बायकोला नांदविण्याविषयी किंवा नवऱ्यापासून काडीमोड घेण्यासाठीचे खटले, वृद्धांना दिलेला त्रास, ज्ञातीपरंपरेविरुद्ध केलेली आगळिक, सूडबुद्धीने केलेले अत्याचार किंवा खूनासारखी कृत्ये, अशा सर्व प्रकारचे खटले न्यायासनासमोर येतात. त्या संदर्भाने न्याय करून विकृतींवर मात करण्याचा प्रयत्न होतो.

**२. विकृतीप्रतिबंधक, लोकपरंपरेतील प्रबोधक प्रयत्न :–**

कीर्तन, प्रवचन, कुळधर्म, कुळाचार, जत्रायात्रांतील संदेशन, कौलपरंपरा, गावपंचायतीने केलेले, व्यसनाधिनता, चोरी, अत्याचार, भांडणतंटे याविषयीचे नियम, आजीआजोबांनी सांगितलेल्या शहाणपणाच्या कथा, नीतीकथांच्या परंपरा, भयकथांच्या परंपरा; असे प्रयत्न हे विकृती प्रतिबंधासाठीचे समुपदेशनात्मक प्रयत्न म्हणावे लागतील. देवाधर्माची व पापपुण्याची काल्पनिक भीतीविषयक रूढीपरंपरा यांचाही समावेश याच प्रयत्नांचा भाग असतो. पंचतंत्र, वेताळपंचवीशी, सिंहासनबत्तिशी, बिरबल बाहशहाच्या कथा, प्राण्यांच्या आधारे आलेल्या रूपककथा हा या प्रयत्नांचाच भाग असतो. कीर्तन प्रवचनातून प्रबोधनात्मक विचार प्रकट करून; स्वार्थ, अंधविश्वास, राग, लोभ, मोह, मद, मत्सर, सूड यांवर मात करण्यासाठी केलेले प्रबोधन; लोकजीवनात विकृतीप्रतिबंधक परंपरा निर्माण करते. सोवळेओवळे, पापपुण्य, स्वार्थ व

आसक्तीपूर्ण व्यवहार, स्त्रीपुरुष संबंध; यांविषयी पावित्र्य व व्यभिचारविषयक गोष्टी या संबंधात पुराणकथांचे, इतिहासातले दाखले देत देत प्रबोधन साधले जाते. यांतून विकृतींना पायबंद घालण्याचा प्रयत्न होतो. उदा. शनिशिंगणापूर येथे घरांना दारे नाहीत. जो चोरी करेल त्याचे डोळे जातील हे याचे उत्तम उदाहरण आहे.

'घटकलोक' जसजसा स्वार्थपर विचार करू लागतो तसतसे त्याच्यातील स्वार्थपर प्रवृत्ती, राग, लोभ, मोह, मद, मत्सर, द्वेष, सूड असे संस्कृतीचे शत्रू; ज्यांना भारतीय परंपरेने षड्‌रिपू असे नाव दिले आहे, ते शत्रू घटकलोकचे ठिकाणी (व्यक्ती) बळावतात आणि घटकलोक, अंगस्वरूपलोकच्या लोकसांस्कृतिक परंपरांविरुद्ध उद्दामपणे वागू लागतो. त्यामुळे 'अंगस्वरूपलोक'च्या सांस्कृतिक परंपरेला तडे जातात. घटकलोककडून जसे हे विकृत वर्तन घडते त्याचप्रमाणे अंगस्वरूपलोकमध्येही वैश्विक लोकच्या संदर्भाने (विराटपुरुषरूप लोक) असेच षड्‌रिपूवात्मक वर्तन घडते. धर्मांधता, आक्रमकता, विस्तारवाद, जातीधर्म, विद्वेष, अंगस्वरूपलोक विषयीचा दुराभिमान, अंगस्वरूपलोकसाठीची स्वार्थपरता (यात सामाजिक, राजकीय, आर्थिक इ. विषयी) बळावते आणि त्यातून अंगस्वरूपलोकचा अन्य अंगस्वरूपलोकचा संघर्ष सुरू होतो. जातीसंघर्ष, धर्मसंघर्ष, राष्ट्रसंघर्ष, व्यवसायसंघर्ष ही या विकृतींची उदाहरणे होत. याचाच इतिहास, इतिहास म्हणून मांडण्याची परंपराही आपल्याला दिसते. यासंदर्भातही प्रबोधनात्मक परंपरा निर्माण झालेल्या दिसतात. उदा. हिंदूंचे आणि मुस्लिमांचे सणउत्सव यांत एकत्रित सहभागी होण्याचे प्रयत्न. अशी अनेक उदाहरणे देता येतील.

**३. लोकविकृतींवर पोट भरणाऱ्या मंडळ्या :–**

लोकसंस्कृतीचे सर्वेक्षण करतांना लोकविकृतींवर पोट भरणाऱ्या मंडळ्यांच्या परंपरंपरा 'अंगस्वरूपलोक'मध्ये राजरोसपणे, आपले पोट भरण्यासाठी, विकृती जोपासण्याचा प्रयत्न करतात. त्यांची काही ठळक उदाहरणे या ठिकाणी घेता येतील.

**(i) लैंगिक विकृतींवर** पोट भरणाऱ्या पारंपरिक मंडळ्या, अनादिकाळापासून अस्तित्वात असल्याचे लक्षात येते. त्यात अग्रक्रमाने वेश्याव्यवसायाचा विचार करता येतो. भारतीय परंपरेमध्ये इंद्रदेवांनी आपल्या अप्सरांचा उपयोग लैंगिक विकृती जागृत करून, तपोभंग करण्यासाठी केल्याची शेकडो उदाहरणे पुराण



वाङ्‌मयात आहेत. उदा. विश्वामित्रऋषी आणि मेनका संबंध, हे त्यातील सर्वश्रुत असलेले उदाहरण होय. वारांगना, वेश्या आणि लालबत्ती असा ज्यांचा उल्लेख केला जातो; त्यांच्या मंडळ्या विस्तारित करण्यासाठी, कलावंत मंडळ्यांचा उपयोग केला जातो. तमाशा व्यवसायातील दौलतजादा, माडीवरील बैठका यांच्या परंपरांवर, असे प्रयोग करण्याची परंपरा दिसते. कोल्हाटी कसरत प्रयोग आणि नृत व नृत्य करणाऱ्या परंपरादेखील यात भरडल्या जातात. समाजातील लैंगिक विकृतींना कुरवाळण्यासाठी उत्तान शृंगारिक प्रदर्शन करून; धनिकांनाच नव्हे; तर मिळेल त्यांना राजरोस लुबाडण्याचा व्यवसाय परंपरेने चालत आले आहे. चोरूनलपून असे उद्योग करण्याच्या परंपरा लोकसंस्कृतीत आढळतात. तालेवार व प्रतिष्ठित लोकांमध्ये अंगवस्त्र ठेवण्याची परंपरा आणि आपल्याकडे आश्रयाने पोटपाणी मिळविण्याचा व्यवसाय करणाऱ्या लोकांना गुलाम म्हणून वापरण्याची परंपरा, याचाच भाग म्हणता येईल. शरीरविक्रय करणाऱ्या महिलांचा उपयोग शत्रू उद्ध्वस्त करण्यासाठी करण्याची परंपराही अतिप्राचीन आहे. लोकजीवनात अनैतिक लैंगिक संबंधांची परंपराही अतिप्राचीन काळापासून पाहावयास मिळते. स्त्रीपुरुषांच्या कामवासनांचा उद्रेक हे अनैतिक संबंधांना जन्म देणारे आहे. केवळ स्त्रियांच्या संबंधातच नव्हे; तर पुरुषांच्या संदर्भानेही अशा लैंगिक विकृतीच्या परंपरा लोकसंस्कृतीत अनुभवास येतात. 'समलिंगी संभोग' ही वैयक्तिक बाब वाटली तरी लोकजीवन परंपरेतूनच ही प्रवृत्ती पुढे परंपरेने आली आहे. लैंगिक जीवनात स्वाभाविकपणे किमान दोन व्यक्तींची गरज असते, हे नैसर्गिक सत्य या जीवनात विकृती निर्माण करीत असते.

तंत्रयंत्र शास्त्रांतर्गत या विकृतींना गूढ, दैवी, अद्‌भूत आकारही दिलेले आढळतात. स्त्री वशीकरण मंत्राचे एकवीस प्रकार 'गुप्त, दुर्मिळ अद्‌भूत शाबरी मंत्राचे मोठे बाड'[३] या पुस्तकात पाहावयास मिळाले. त्याचबरोबर, पती वशीकरण, स्त्री मोहिनी मंत्र, पत्नी वशीकरण मंत्र पाहावयास मिळाले. उदा. स्त्री वशीकरण मंत्र– ''ॐ नमो कटविकट घोर रुपिणी अमुकं (सीता, गीता इ.) मे वशमानाय स्वाहा ।'' सिद्धी–विधी – सूर्य किंवा चंद्रग्रहणाचे वेळी, या मंत्राचा १०,००० वेळा जप करावा, म्हणजे मंत्रसिद्ध होईल. प्रयोगविधी– मंत्र सिद्ध झाल्यावर एखाद्या रविवारी जेवायला बसल्यावर आधी जेवणातील पदार्थ १०८ वेळा अभिमंत्रित करून घ्या. नंतर ज्या स्त्रीला वश करायचे त्या स्त्रीचे

नाव घेऊन जेवायला सुरुवात करा. जेवतांना त्या स्त्रीचे नाव सारखे घेत राहा. यामुळे इच्छित स्त्री साधकाला वश होते.[४]

**(ii) अर्जित मंत्रतंत्रशक्तींचा विकृती कुरवाळण्यासाठी किंवा समाधान करण्यासाठी उपयोग :–** अंगात संचार घेणारी भगत किंवा देवलसी मंडळी, लोकसंस्कृतीचे उपासक म्हणविणारी मंडळी, धर्मकार्य करणारी मंडळी, नाथसंप्रदायातील साधक सिद्ध मंडळी, पीरफकीर मंडळी; या आणि अशा मंडळींना लोकसांस्कृतिक जीवनात; संत, धर्मधुरिण, लोकधुरिण यांच्याएवढेच किंबहुना, देवाएवढे सन्मानाचे स्थान असते. या मंडळ्या लोकसंस्कृतीमध्ये कुळधर्म कुळाचारापासून, ऐहिक जीवनातील सर्वप्रकारचे प्रश्न सोडविण्यासाठी; उपासना, साधना, विधिविधाने, मंत्रतंत्र, जादुटोणे सिद्ध करतात असा समजच नव्हे तर श्रद्धा असते. या मंडळ्यांचा उपयोग स्वतःला हवे ते करून घेण्यासाठी, लोकसंस्कृतीतील घटकलोक, अंध व अज्ञानमूलकतेने, मोठ्या श्रद्धेने करीत असतात. या त्यांच्या वर्तनाला कळतनकळत अंगस्वरूपलोक आणि उपरोक्त मंडळ्याही एकप्रकारे पाठिंबा देतात किंवा त्यांच्या मानसिक समाधानासाठी प्रोत्साहन देतात. यामुळे उपरोक्त अधिकारी मंडळींपैकी काही लोक आपल्या अर्जित, मंत्रतंत्रयंत्र शक्तींचा किंवा साधनेचा; लोकमधील, हवे ते करून घेणाऱ्या, अर्थात स्वकेंद्रित व स्वार्थी घटकलोकच्या, अंध व अज्ञानमूलकतेने निर्माण झालेल्या, मनोगंडांचा अर्थात विकृतींचा, स्वतःचा देव्हारा माजविण्यासाठी किंवा संपत्ती साधनेसाठी पोटभरूपणाने, अर्थात विकृत स्वरूपात धंदा मांडतात.

जीवघेणे, विचित्र, विक्षिप्त स्वरूपातील नवससायास करणे; करावयास लावणे उदा. नग्नावस्थेत पिंपळ किंवा मारुती देवतेपुढे, अवसे-पुनवेला किंवा मध्यरात्रीच्या अंधारात, दिवे लावण्यास सांगणे किंवा प्रदक्षिणा घालण्यास सांगणे, मौल्यवान वस्तू किंवा भरभक्कम रक्कम नवसापोटी वाहावयास सांगणे, बळी देण्यास सांगणे अशा स्वरूपातील कृत्ये घडतात, घडवून घेतली जातात. त्यांच्या विधिविधानाच्या परंपरा सांगितल्या जातात. या परंपरांवर, लोकसंस्कृतीत दृढ विश्वास असतो.

विशिष्ट प्रकारचे तांत्रिक विधी करणे, करवून घेणे व त्याद्वारे आपल्याला हवे ते प्राप्त करण्याचा प्रयत्न करणे यासाठी अंगस्वरूपलोकला प्रसंगी, अंधारात ठेवून अर्थात कळू न देता, गुप्त स्वरूपात अशा गोष्टी करणे. यांत जारणमारण विधींचा, वशीकरण विधींचा, गुप्तधन प्राप्तीच्या विधींचा,



संततीप्राप्तीसाठीच्या तीव्र इच्छेचा; अशा अनेक गोष्टींचा समावेश असतो. असे केल्याने घटकलोकला इप्सित प्राप्तीत यश मिळते असा मनोगंड असतो. किंबहुना अशी विकृती जोपासली जाते. राजकीय यशस्वीतेसाठी, धनप्राप्तीसाठी किंवा सूड उगवण्यासाठीही अशा प्रकारचे तांत्रिक विधी, मंत्र, तंत्र यांचे उपयोग केले जातात.

जारण मारण विद्या, काळी जादू अशा विद्यांचा उपयोग अंगस्वरूपलोकच्या सुविहित चलनासाठीही करता येतो. वस्तुतः त्यासाठीच अशा विद्या लोकपरंपरेत, साधकमंडळींनी, ऋषीमुनींनी अनादि काळापासून संशोधित केल्या आहेत, असे म्हटले जाते. या विद्यांच्या आधारे आरोग्य, धन, आसक्तीपूर्ण स्वार्थी वृत्ती निवारण, राजकीय, सामाजिक इ. स्थैर्य साधता येते. या गोष्टींसाठी किंवा सत्कार्यासाठीच या विद्या, यातुविद्या, मायाविद्या, साधनापूर्वक सिद्ध केलेल्या आहेत.

या विद्यांचा विनियोग मात्र अंगस्वरूपलोकमधील, घटकलोक (व्यक्ती) मध्ये निर्माण होणाऱ्या आसक्तीपूर्ण मनोव्यापारांना विकृत अवस्थेकडे घेऊन जाण्यासाठी होतो. त्यामुळेच लोकसंस्कृतीत या प्रकारच्या विद्यांना, विकृतीपूर्ण विद्या असे मानले जाते. या विद्यांचा आणखी विकृत परिणाम म्हणजे; लोकसंस्कृतीत अंधविश्वास जोपासला जाणे, विकृत मनोरुग्ण निर्माण होणे, शीघ्र व स्वल्प श्रमात हवे ते मिळविण्याचा प्रयत्न करणे, इ. प्रकारे लोकसंस्कृतीत विकृत लोकघटकांची व अशा मंडळ्यांची बहुसंख्येने निर्मिती अंगस्वरूपलोकमध्ये होते व त्याच्या परंपरा निर्माण होतात.

गंडेदोरे, ताईत, यंत्र, संरक्षक गुप्त वस्तू जवळ बाळगल्याने आपले सर्वतोपरी संरक्षण होते असे मानणाऱ्यांचा, अंगस्वरूपलोकमध्ये एक वर्ग तयार होणे, अशा स्वरूपात लोकपरंपरा निर्माण होतात.

महाराष्ट्रातच नव्हे तर भारतात नाथसंप्रदायाला अनन्यसाधारण असे, लोकसांस्कृतिक महत्त्व आहे. त्यांच्या शक्तीमत्तेने लोकसांस्कृतिक जीवन सुखी व समृद्ध होते; असा दृढ विश्वास लोकमानसात परंपरेने आहे. या परंपरेची गुरुपरंपरा त्रिदेवांपर्यंत जाऊन पोचते (ब्रह्मा, विष्णू, महेश) (दत्त, शिव) या परंपरेतील नाथसिद्धांना, कुळदैवत म्हणून स्वीकारल्याचे आमच्या पाहाण्यात आहे. उदा. आमचे एक स्नेही ह.भ.प. अशोकानंदमहाराज कर्डिले, आपले कुळदैवत कानिफनाथ असल्याचे सांगतात.[५] या नाथ संप्रदायाशी संबंधित असे

शाबरी मंत्राचे मोठे बाड पंडित सुंदरलाल त्रिपाठी यांनी संपादित केले आहे.[६] त्यातील मंत्रतंत्रांची नुसती यादी पाहिली तरी सत्प्रवृत्ती व विकृती या दोन्ही मार्गांना पुष्ट करण्यासाठी उपयोगी पडेल, अशी ही विद्या आहे असे सहज लक्षात येईल. ही यादी अशी- नजरबंदीचा मंत्र १ व २, नजरबंदीची गोळी १ व २, इंद्रजाल मंत्र, रसायन मंत्र, मूठ परत पाठवायचा मंत्र, हाजरातचा मंत्र, स्मशान जागवण्याचा मंत्र, अदृश्य कारण मंत्र, लहरी जागवण्याचा मंत्र १ व २, आकर्षण आणि मोहिनी प्रयोगविषयी आकर्षण मंत्र, एकूण ५ मंत्र. स्त्री आकर्षण मंत्र, सर्व मोहिनी मंत्र, सर्वग्राम मोहिनी मंत्र, मोहिनी मंत्र, स्त्री मोहिनी मंत्र १ व २, लालकण्हेरीच्या फुलांचा मोहिनी मंत्र, सुपारी मोहिनी मंत्र, ड्र वस्तू मोहिनी मंत्र, वशीकरण मंत्र व वशीकरण प्रयोग, भूत वशीकरण, सर्व वशीकरण मंत्र १ ते १४, पती वशीकरण मंत्र, १ व २ सर्वजण वशीकरण मंत्र, स्त्री वशीकरण मंत्र १ ते २१ प्रकार, राजा वशीकरण मंत्र १ ते ३, राजकर्मचारी वशीकरण मंत्र, वेश्या वशीकरण मंत्र; लवंग, वेलदोडा, विडा, फुल इ. वस्तू वशीकरण मंत्र, वशीकरणाची सैतानी हुकुमत, सर्व वशीकरण बाहुली मंत्र; उच्चाटन, तिरस्कार आणि मारण प्रयोगात एकूण १५ प्रकारचे मंत्र, शत्रूला हैराण करणारे प्रयोग- शत्रूनाशम यंत्र मंत्र, शत्रूला नष्ट करण्याचा मंत्र, शत्रूला सैतानाकडून त्रस्त करण्याचा मंत्र, शत्रूला पराजित करण्याचे मंत्र; शत्रूला वेदना, ज्वर, त्रास देणारे मंत्र; शत्रू मुखस्तंभन मंत्र, शत्रू मारण मंत्र; स्थानबद्धता मुक्तिप्रयोग मंत्र; गर्भ, प्रसूती आणि मासिक रक्तस्त्रावासंबंधीचे प्रयोग- नियोग-विधीने गर्भधारणा मंत्र, वियोगविधीने गर्भधारणा मंत्र, गर्भरक्षामंत्र १ ते ६ प्रयोग, सुलभ प्रसूती मंत्र इ.; भूत प्रेतासंबंधीचे प्रयोग- भूत-प्रेतादी नाशक बाबा आदम मंत्र, भूत-हडळ उतारा मंत्र, राक्षसनाशक मंत्र इ. भूत आणि इतर पिशाच्चांना बोलते करणारा मंत्र, भूत उतरविण्याचा मंत्र, डाकीण उच्चाटन मंत्र; उतारा देण्याचे विविध मंत्र, वेदना, फोड, विष, कीडे झडणे, रोगनाशक, रातांधलेपण निवारक इ. जादूटोणा उतारा मंत्र; विविध रोगनाशक मंत्र १ ते ४; विविध कार्यसिद्धी मंत्र- शत्रूशक्तीनाश, वाजंत्री बंधन, पशूंना पळवून लावणे इ.विषयक मंत्र; चोरीविषयक प्रयोग १ ते ११; अद्भूत मंत्रप्रयोग- उपजीविका, धन, ज्वालामुखी, शारदा, बुद्धिवर्धन, कर्णपिशाच्च, ग्रहपीडानाशन यांसाठीचे अनेक मंत्र; शाबर मंत्र प्रयोग- अन्नपूर्णा, महालक्ष्मीसिद्धी, दिग्बंधन, आत्मरक्षा, शरीररक्षा; यंत्र, मंत्र, तंत्राची करणी दूर



करण्याचा मंत्र, पुंसत्वनाशक मंत्र इ. यंत्रप्रयोग- मूळव्याध, स्मशानबाधा, देवीरोग, स्त्रीवशीकरण, दृष्ट लागू नये म्हणून यंत्र, राज-सन्मानपद यंत्र इ. प्रकारच्या मंत्र, यंत्रांचे अनेक नमुने पुस्तकात आहेत.[७]

उदा. (१) मारण **मंत्र-** ''ॐ ऱ्हीं अमुकस्य (रामा, शिवा इ.) हन् हन् स्वाहा ।'' सिद्धी विधी- हा मंत्र ग्रहणाच्या दिवशी किंवा दीपावलीच्या रात्री १०,००० जपल्याने सिद्ध होतो. प्रयोगविधी- कण्हेरीची १००० फुले घ्या. मोहरीच्या तेलात एकेक फूल बुडवून, वैऱ्यास नावासह मंत्र म्हणत त्या फुलांची अग्नीत आहुती द्या. त्यामुळे शत्रूचा मृत्यू होतो.[८]

(२) शत्रूला पराजित करण्याचे **यंत्र-**

खाली दाखविल्याप्रमाणे भोजपत्रावर हरताळाने यंत्र काढावे. त्यासाठी कोणत्याही बोरूचा उपयोग करावा. यंत्राची पूजा करावी. एखाद्या कुमारिकेने कातलेलं सूत घ्यावे. त्या सूतात लपेटून यंत्र जमिनीत पुरावे. नियमित प्रातःकाळी यंत्र पुरलेल्या जागेवर बसूनच दात घासून तोंड धुवावे. त्या जागेवर सातवेळा लाथ मारावी. शत्रू पराजित होईपर्यंत ही क्रिया करावी.

**यंत्र असे-** [९]




(iii) भूत, प्रेत, पिशाच्च, अधरआत्मे, पूर्वजदैवते, शुद्र म्हणून परंपरेने मानलेल्या गावगन्ना देवता, यांचा, तंत्र, मंत्र, यंत्र, विधिविधाने, करणीकवटाळ आदींचा उपयोग करून; लोकजीवनात, गूढ, मायाजालात्मक, यातुक्रियात्मकतेने,

घटकलोकच्या मानसिक, शारीरिक, सामाजिक, आर्थिक व्यवहारातील विकृतींना; वाममार्गी लावणाऱ्या मंडळ्या. जगभरात अशा तांत्रिक विभूतिमत्त्वांची रेलचेल आहे. या करणीकवटाळ व भूतप्रेत विद्येमुळे लोकसंस्कृतीला बाधित आणि भयग्रस्त करण्याचे काम या मंडळ्या करीत असतात. महाराष्ट्रात 'कोकणीविद्या' म्हणून ओळखली जाणारी विद्या या प्रकारची आहे असे मौखिक परंपरेने बोलले जाते. या विद्यांचा संबंध नाथसंप्रदाय तंत्र, शाक्त तंत्र, शैव तंत्र आदि तंत्रांशी आहे असे मौखिक परंपरेवरून लक्षात येते. भैरवनाथ, वीर हनुमान, महिषासूर (म्हसोबा) अशा काही सुरासूर दैवतांशी यांचा संबंध असतो; एवढेच नव्हे तर प्रेतात्म्यांबरोबरच या दैवतांकडूनही काम करून घेण्याची शक्ती, या मांत्रिकात असते. मांगगारुडी, गारुडी, भगत, बाबा, पीरबाबा असे लोक ही कामे करतात. सर्प आणि भोलेनाथबाबा यांचा उपयोगही ही मंडळी परंपरेने करतात.

मृतात्म्यांविषयी अनेक समजुती व अनभूती लोकसंस्कृतीत मौखिक परंपरेने चालत आलेल्या दिसतात. यांचा संबंध प्रमुखतः मनोधारणांवर असतो. मनोरुग्णांना बरे करण्यासाठी या शक्तींचा वापर करण्याची, लोकसंस्कृतीत प्रथा असावी; मात्र घटकलोक आणि अंगस्वरूपलोक मधील मनोरुग्णावस्था, भयग्रस्तता यांचा, पोटभरूपणाने, दांभिकतेने उपयोग करणाऱ्या या मंडळ्या असतात.

करणीकवटाळ, काळीजादू, तंत्रमंत्र, जादुटोणे यांसाठी लागणाऱ्या सर्व वस्तू, वनस्पती इ. मिळण्याची एक बाजारपेठ महाराष्ट्रातील, आदिवासीबहुल अशा नाशिक जिल्ह्यातील, 'सप्तशृंगी' देवस्थान वणी येथे, जत्रेयात्रेप्रसंगी भरते, याचा अनुभव सर्वेक्षणात प्रस्तुत लेखकानेही घेतला आहे. ठाणे जिल्ह्यातील जव्हार, मोखाडा, नाशिक जिल्ह्यातील पेठ, हर्सूल या आदिवासीबहुल तालुक्यांमध्ये अशी तांत्रिक मंडळी; अशाप्रकारे जादुटोणा, करणीकवटाळ करण्याची मोठी परंपरा राखून आहे; असे परंपरेने बोलले जाते. 'माणसाचे प्राण्यात रुपांतर करून; हवे तेव्हां त्याला माणूस म्हणून प्रकट करून त्याच्याकडून हवी ती कामे करून घेणे' अशा प्रकारचे प्रयोग ही मंडळी करू शकते, यांच्या कथा मौखिकपरंपरेने सांगितल्या जातात. हडळ, समंध, चेहेडा, खवीस, मुंजा या व अशा प्रकारची भूते वश करून घेऊन; त्यांच्या सहाय्याने शत्रूनाश, वासनातृप्ती, सूड उगवणे, व्यवहारातील अनेक प्रकारचे



स्वार्थ साधणे उदा. हवी ती जमीन मिळवणे इ. अशा प्रकारची कामे, ह्या मंडळ्या स्वतःसाठी व यजमानांसाठी करून देण्याच्या सुपाऱ्या घेतात. गावगुंडीसाठी या मंडळ्यांचा उपयोग केला जातो. नांदतेघर, गौळीवाडे, पिके उद्ध्वस्त करून; त्यांचा नायनाट करण्याचे काम ह्या मंडळ्या करतात.

'भानामती' नामक काळीजादू व अनेक गूढ पारंपरिक तंत्रे वापरून; दहशत निर्माण करतात. उदा. वाळत टाकलेल्या कपड्यांना पेटवणे, घातल्या कपड्यांच्या चिंध्याचिंध्या होणे, कपड्यांवर बिबव्याच्या फुल्या येणे, वारंवार गर्भपात करविणे, अन्नात किडे, आळ्या, कोळसे दिसू लागणे; असे अनेक प्रयोग या विद्येच्या माध्यमातून करून; माणसांना त्रस्त करून सोडले जाते. भारलेले लिंबू पाठवणे, मूठ मारणे, भारलेला नारळ पाठविणे, घरात, त्यायोगे भयंकर आजार, भांडणे यांचा प्रादुर्भाव करवणे, अशा प्रकारचे खेळ केले जातात. लोकसंस्कृतीत या सर्व गोष्टींवर अंधविश्वास असतो; ही लोकसंस्कृतीतील विकृती होय. या विद्येच्या प्रयोगाने, वेड लागणे, समाजात, घरात तेढ निर्माण होणे. पिढ्यान्‌पिढ्या परस्परांचे वैर सांभाळणे अशा गोष्टी घडतात असे मानले जाते.

अशा प्रकारची तंत्र मंत्र विद्या अर्जित करण्यासाठी; अर्थातच गुरुपरंपरा असते. अघोरी साधनेअंतर्गत, नवजात बालकाचे मांस भक्षण, रजस्वलेशी संभोग, नरबळी देणे, विष्ठा खाणे अशा अनेक अघोरी साधना कराव्या लागतात; असे मौखिक परंपरेने सांगितले जाते, हे प्रस्तुत लेखकाने क्षेत्रिय सर्वेक्षणात अनुभवले आहे. याची पत्त्यामुद्यासह ठोस उदाहरणे देणे योग्य नव्हे. या तंत्रविद्येत कावळा, कावळ्याची विष्ठा, घुबड, घुबडाने घासलेला दगड, अंडी, टिटवीसारखा पक्षी, वाघ, मांजर यांच्या मिशा अशा अनेक गोष्टींचा वापर रासायनिक तंत्रासाठी केला जातो; असे मौखिक परंपरेत सांगितले जाते.

या विद्येविषयीची भीती आणि गूढ लोकसंस्कृतीत अनादिकाळापासून, परंपरेने असल्याचे जाणवते. ही गोष्ट लोकसांस्कृतिक परंपरेतील लोकवैकृतिक परंपरा म्हणून गणता येईल असे वाटते.

**४. विकृत मनोवृत्तीच्या शाब्दपरंपरा :–**

लोकसंस्कृतीत मांगल्याच्या शाब्दपरंपरा, लोकसाहित्याच्या प्रयोगसिद्ध वाङ्मयकलेच्या स्वरूपात मांगल्यपूर्ण लोकबंधाच्या आविष्कारातून अनुभूत होतात; तशाच लोकसंस्कृतीतील विकृत मनोवृत्तीचे दर्शनही प्रयोगसिद्धतेने

अनुभूत होते. या मनोवृत्तींच्या शाब्दस्वरूपातील परंपरा हीदेखील समूहमनाची निर्मिती असते. लोकसाहित्यात ओव्या असतात तशा शिव्याही असतात, असे यामुळेच म्हटले जाते.

**(i) लोकसंस्कृतीने सणोत्सवांतून विकृतींना करून दिलेली वाट :–** शाब्दपरंपरांचा उपयोग करून लोकसंस्कृतीने विकृतींना वाट करून देण्याची परंपरा जगभरात पाहावयास मिळते. त्यासाठी सणोत्सवांची योजना लोकसंस्कृतीत पाहावयास मिळते. याचे ठळक उदाहरण म्हणजे 'होलिकोत्सव' होय. फाल्गुन शु. पौर्णिमेपासून रंगपंचमीपर्यंत तब्बल पाच दिवस चाललेल्या उत्सवात विकृतींचे विरेचन करण्याची परंपरा दिसते. लोकसंस्कृतीतील अंगस्वरूपलोकची दडपलेली रागद्वेषाची, सूडाची, स्पर्धेची भावना मनोविकृतीत रुपांतरित झालेली दिसते. ज्या गोष्टी शक्तीने, बळाने आणि सत्तेमुळे साध्य होत नाही, त्यांचा विरूप स्वरूपातील शाब्द आविष्कार 'अग्नी' या प्रतिकरूपाला साक्ष ठेवून करण्याची ही प्रथा विलक्षण आहे. उदा. इंग्रज सत्तेविरुद्धचा राग मनात धुमसत होता. लोकसांस्कृतिक व्यवहारात तो उघड करता येत नव्हता. होळीच्या भोवती बोंबांचा आरड करीत; जणू सत्तेवर विजय मिळवून; आपण मिष्टान्न भोजन करीत आहोत; अशा आशयाचे बडबडगीत, आरडा करून म्हटले जाई ''होळी रे होळी पुरणाची पोळी 'साहेब' मेला संध्याकाळी त्याचा दिवस अमुकवारी (मंगळ, बुध इ.)'' याच बडबडगीतात समाजात नकोशा लोकांचा निषेध करण्याची प्रथाही दिसून आली. उदा. 'साहेब' या शब्दाच्या जागी बामण, सावकार, पाटील, उंडगा असेही पर्याय वापरलेले पाहावयास मिळाले. होलिकोत्सवात कोणाच्याही अंगावर राडा (रबडी चिखल) फेकून, दांभिक प्रतिष्ठेचा निषेध किंवा 'कशी जोखली?' अशी सूड उगवल्याची भावनाही दिसते. त्याचबरोबर एरवी सांस्कृतिक जीवनात, चिखलात लोळणे, वाटेल ते रंग उधळणे, कोणालाही रंग फासून विरूप करणे अर्थात प्राणीप्रवृत्तीने मनस्वीपणाने वावरणे शक्य नसते, दडलेली प्राणीप्रवृत्ती (गाढवलोळी) ही एकप्रकारे विकृती मानली जाते. सोवळेओवळे, शुद्धाशुद्धविवेक, मानमर्यादा इ. सर्व गोष्टी झुगारण्याची उर्मी मनात दडपलेली असते. दडपलेल्या भावना विकृती स्वरूपात प्रकट होण्याची वाट पाहात असतात. होलिकोत्सवात हे 'मोकाट वागणे' शक्य होते. एकप्रकारे लोकसंस्कृतीने विकृतींचे विरेचन करण्यासाठी मोकळी केलेली वाट असे या परंपरेचे स्वरूप असते. 'गोफणगुंड्याच्या लढाई'च्या



जत्रा, गौराईच्या महिलांच्या ओढाओढीची जत्रा, नवऱ्याच्या किंवा पुरुषांच्या पाठीवर डोक्यात महिलांनी मारण्याची जत्रा, जावयाची सन्मानपूर्वक गाढवावरून मिरवणूक (धिंड नव्हे) काढणे या व अशा अनेक प्रथा भारतीय परंपरेत पाहावयास मिळतात. या सर्व सणोत्सव जत्रायात्रांचा शाब्द अर्थात विधिविधानात्मक आविष्कार याच स्वरूपाचा असतो.

विवाहप्रसंगी विहिणींसाठी 'हीण' काढणारी गाणी हाही प्रकार याच स्वरूपाचा म्हणता येईल.

जावयाच्या पाहुणचाराच्या हास्यकथा याच स्वरूपात प्रकट होत असतात.

माकडवाले, सपेरे, नंदीबैलवाले आदि खेळकऱ्यांचे संवाद व खेळातील मर्मभेदकता याच परंपरेने आलेली दिसते. विशेषतः बहुरुप्याची सोंगे, मौखिक वेधक अशा शाब्द आविष्कारांनी, लोकसंस्कृतीतील विकृतींचे प्रदर्शन घडवीत प्रबोधन करतो. सर्कस किंवा कसरतीच्या प्रयोगातील विदूषक, तमाशातील सोंगाडे यांचा उपयोग विकृतीचा स्फोट करण्यासाठी होतो.

भारूड परंपरेतील अनेक भारूडे, विकृतीचे रूपकात्मक प्रदर्शन करीत प्रबोधन व भक्तिसाधना करीत असतात. उदा. ''बाई साब आल्या । आता बाई साब आल्या ।। गाडग्यात बघा तुम्ही लोटक्यात बघा'' हे भारूड बाईसाहेबांना अपेक्षित विकृत पाहुणचाराचे प्रदर्शन करीत दंभस्फोट करते.

**(ii) लोकसाहित्यातील शिव्यांची परंपरा** ही विकृत मनोभूमिकेचे प्रदर्शन, लोकसंस्कृतीतील ग्राम्यता व शिव्यांच्या रूपाने मुखरित करते. शिव्यांचेदेखील प्रकार करता येतील.

(१) प्राणी आणि माणूस यांत माणसाने माणसाला श्रेष्ठ ठरविले आहे. प्राणीस्वभाव किंवा प्राणीप्रवृत्ती, पाशवीपणा किंवा स्वतःसाठी, इतरांचा विचार न करता, अन्न ओरबडणे, अशा गोष्टी माणसात दिसल्या की ते विकृतीचे चिन्ह मानले जाते. घोडा, बैल, रेडा, म्हैस, गाढव, कुत्रा, मांजर, कोल्हा, लांडगा, माकड असे प्राणी, डास, ढेकूण, पिसू, जळू, भुंगा इ. कीटक, गांडूळ, साप असे सरपटणारे प्राणी, पाल, सरडा, वटवाघूळ, उंदीर, घूस, घोरपड असे प्राणी आणि घुबड, घार, ससाणा, कावळा असे पक्षी यांचा शिव्या देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर उपयोग झालेला दिसतो.

(२) मानवी शरीरातील व्यंग, मानवाचे गुप्तांग, माणसाचे लैंगिक

जीवन यावरून दिल्या जाणाऱ्या शिव्याही मोठ्या प्रमाणात आढळतात. आंधळा/आंधळी, चकणा/चकणी, हेकणा/हेकणी, बहिरा/बहिरी, नकटा/नकटी, नाकाडा/नाकाडी, बसक्या नाकाचा, घोळणा फुटला, फाटक्या तोंडाचा/तोंडाची, वाचाळ, तोंडाळ इ. खुडम्या, आपऱ्या, बुट्ट्या, लंबुटांग, पोक्या, वाकडमान्या, नाकखुपश्या, तोंडघाल्या इ. योनी आणि आणि लिंग यांच्यावरून तर शिव्यांची लाखोली प्रसिद्ध आहे. काहीवेळा प्राणी आणि गुप्तांग यांचा एकत्रित उपयोग करून शिव्या दिल्या जातात. घोडा लावला इ. मुतरा, हगरा, गांडफाट्या, गांडाळ, वांझ, झवाडी, येडझवा अशा शिव्या या प्रकारात मोडतात. लैंगिक जीवनासंबंधीच्या शिव्यांमध्ये बाजारबसवी, वेसवा, शिंदळीच्या, रांड, बाहेरख्याला, जायेल, अक्करमाशा, कडुजातीचा, उरबशा, जान्या, वळू, लफडेबाज, भाड्या, साल्या, तुझ्यायचा नवरा, रखेल अशा कितीतरी शिव्या सांगता येतील.

(३) खुंटा, मुसळ, नांगर, मोट, सांगळ अशा वस्तूपासून सीतेच्या पदरापर्यंतच्या पौराणिक संदर्भांचा योनीशी संबंध जोडून शिव्या दिल्या जातात.

(४) वृक्ष, झाडे, झुडपे, वेली यांचाही उपयोग शिव्यांसाठी केला जातो. कडूकारलं, ताडमाड, बिबा, खाजकुयली, शेराचीताटी, डांगराचा वेल, भोपळा, पडवळ, बोऱ्हाटी, धोतरा इ.

(५) विष्ठेचा उल्लेखही शिव्यांसाठी केला जातो. शेण आणि गू यांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला.

(६) मानवी स्वभावावरून शिव्या दिल्या जातात. जसे चोरटा, भामटा, वखवख्या, खादाड इ.

(७) मृत्यूशी संबंधित शिव्या- मुडदा, मढं, म्हसणवट्यात, नरक, भूत, हडळ, खवीस, समंध, वाटोळ, खड्ड्यात जाणे इ.

(८) शिव्या देण्यासाठी माय/आई, बाप/म्हातारा आणि काका यांचा उपयोगही मोठ्या प्रमाणात केलेला आढळतो. शिव्याचा स्वतंत्र कोश व्हावा एवढा भरणा, लोकवाङ्मयात शिव्यांचा आहे.

**(iii) लोकसाहित्यातील विनोद :-** लोकसंस्कृतीत जी विनोदांची परंपरा ग्राम्यतेला जवळची आहे असे म्हणण्यास वाव आहे. 'लोकसाहित्याची रुपरेखा'[१०] या ग्रंथात डॉ. दुर्गा भागवत यांनी 'लोकसाहित्यातील विनोद' या प्रकरणात दिलेली उदाहरणे पाहता 'विनोदन' या स्तरापर्यंत या विनोदांची उन्नत



अवस्था नसते हे स्पष्ट जाणवते. त्यांनी दिलेली उदाहरणे वानगीदाखल घेतली तरी हे लक्षात येईल.

(१) शारीरिक व्यंग- उदा. लंगडधीन पैसे तीन
पैसे पडले वाटेवर
लंगडा पडला खाटेवर किंवा
अत्याबाई फत्याबाई कणकेचा गोळा । हिरवा पापड तिरवा डोळा ।।[११]

(२) मानसिक व्यंग मूर्ख धन्याच्या कथा- उदा. 'मालक नोकराला- अललल अबबब अगाई- असा पदार्थ आणायला पाठवतो. पण असा पदार्थ नोकराला कुठेच मिळत नाही. अखेर भांड्यात विंचू घालून भांडे झाकून तो घरी आणतो आणि मालकाला आंत हात घालून पदार्थ काढून घ्यायला सांगतो.' किंवा आळस- उदा- पुरुषाचा स्वभाव- 'खायला आधीं, निजायला मधीं, कामाला कधीं मधीं'[१२]

(३) सामाजिक व्यंगे- उदा- 'सोनार शिंपी कुलकर्णी अप्पा, यांची संगत नको रे बाप्पा.' किंवा 'भटाला दिली ओसरी, भट हात पाय पसरी' किंवा चिक्कुमारवाडी, इ. सावकार, न्हावी सोनार यांच्या कथा.[१३]

(४) स्त्रियांबद्दलच्या कथा- स्त्रीबुद्धि प्रलयंगता (असा लोकबंध) उदा- बायबलमधली ईव्ह, गोंडांची पतीची अवज्ञा करणारी पार्वती, यांनी फाजील चौकश्यांनी प्रलय ओढवून घेतला. स्त्री स्वभाव विषयक विकृती निदर्शक लोकगीत- बाई मी भोळी । आपण खाते पुरणाची पोळी । नवऱ्याला देते आंबिल शिळी, इ.[१४]

(५) लग्नातला विनोद- 'झाडामाडांच्या, पशुपक्ष्यांच्या लग्नाचीं, रुसक्या नवरानवरींची गाणीं ही भारतभरच्या विनोदगीतांची खाण आहे' उदा- 'बयानें नवरा पाहिलान् गो । बामणान् लगीन लावलान् गो । बयाचा नवरा रुसला गो । गुळाच्या गाडग्यांत लपला गो. ।।', 'उंदीर घुशीचं लगीन लागलं चिचुंद्री चूं चूं करी' (विकृतीदर्शक रुपक)[१५]

(६) अविस्मरणीय उंदीर- धूर्त, महत्त्वाकांक्षी, उर्मट स्वभावाचे प्रतीक 'उंदराची टोपी- राजाभिकारी' ही कथा प्रसिद्ध आहे.[१६]

(७) आचरट व बीभत्स कथा- ग्राम्यता लैंगिकता यांच्या विकृतीपूर्ण उल्लेखाच्या कथा- 'विधवा ब्राह्मण कन्येचे कथासरित्सागरात सापडते' ते उदाहरण विधवा ब्राह्मणकन्येने भूताला आपले व्रण बुजवायचे काम दिले. भूत

थकले व्रण (योनी) बुजला नाही.[१७]

(८) धूर्तकथा– दुसरी कथा द्रुग जिल्ह्यांतल्या महाराकडून मला मिळाली. ती अशी. एक चोर दुलरिन नावाच्या राणीच्या दासीला म्हणाला ''राणी तुला महिन्याला देते तेवढा पगार मी एका दिवसाचा तुला देतो. फक्त एक दिवस मला तुझ्या खोलीत निजायला दे''[१८] दुहेरी कार्य साध्य करण्यासाठी केलेली युक्ती. या कथेत अंततः दासीला शिक्षा होते.

(९) मालाकथा– चिमणाचिमणीची जागतिक कथा अशी– ''चिमणी पडली खिरी । चिमणा चिंता करी । वडाचे पान झडो । गाईचें शिंग मोडो । नदीचे पाणी आटो । मोर लांडा । तिळाला नाही दांडा । पाटील भुंडा । राणी नाचरी । दासी पादरी ।।इ.।।'' मोठे नुकसान झाले की जगाचे वाटोळे होवो अशी मनोवृत्ती निर्माण होते.[१९]

(१०) प्रासंगिका– उदा. 'पंचतंत्रातली पाचर काढल्यामुळें लाकडाच्या फटींत शेंपूट सांपडून प्राणास मुकलेल्या वानराची कथा'[२०]

(११) बडबडगीते– उदा. 'गोविंद गोपाळ हे दोघे बंधू' हे बडबडगीत पुढे कीळस प्रकट करते.[२१]

डॉ. दुर्गा भागवत यांनी 'लोकसाहित्यातील विनोद' या प्रकरणात वरील अकरा प्रकारात विनोदाची उदाहरणे दिली आहेत त्यांचा परामर्श घेतला तर लोकसाहित्यातील विनोदी म्हणून प्रकटलेल्या वाङ्मय परंपरेत विकृतींचे दर्शनच अधिक घडते; असे लक्षात येईल. वाक्प्रचार, म्हणी, उखाणे इ. प्रकारच्या शाब्दवाङ्मयात विकृत मनोवृत्तीतून ग्राम्य स्वरूपात किंवा शिवराळ स्वरूपात विकृती आविष्कृत झालेल्या दिसतात. वाक्प्रचार–गांड मारणे, घालून पाडून बोलणे, इ. म्हणी– गांडित नाही गू आन कावळ्याला निमंत्रण, आंधळी पुसती पांडाळीला आन हागाया चलतीका खंगळीला, आधाशी मेला आन गांडीन जीव गेला इ.

उखाणे– ''अगंबाई मांडवाच्या दारी आत्याबाई बसली मुताया, तिच्या मुताचा हा ओघळ गेला नीकून आले येही त्यांनी ओघळ पाह्यला, साप म्हणून बिहाला पर दारू म्हणून पियाला त्याचा सहा महिन्याचा डांग्या खोकला गेला''

अशा प्रकारचा शाब्द परंपरा सर्वदूर विपुल प्रमाणात सापडतात.



**५. व्यसनाधीन घडविणाऱ्या मंडळ्या :–**

योगाभ्यास साधनेपासून ते सुखदुःख साजरे करण्यापर्यंत; व्यसन अथवा मादक, उत्तेजक तथा नशा चढविणाऱ्या किंवा धुंदी आणणाऱ्या पदार्थांचे सेवन करण्याची परंपरा अनादिकालापासून चालत आली आहे. ऋषीपरंपरेत सोमरस प्राशन, परंपरेबरोबर, सुरुपानाची परंपराही पाहावयास मिळते. देवासूरसंग्राम प्रसंगीही, ही परंपरा पाहावयास मिळते. अफु, गांजा, चरस, भांग, मद्य यांचा वापर, तसेच तंबाखू सेवन यांची परंपरा ही तेवढीच जुनी आहे. तंत्र विज्ञानामध्ये पंचमकारात मुद्रा, मांस, मदिरा, मैथुन, मच्छ अशा वस्तूमध्ये मद्य किंवा मदिरेला स्थान मिळाले आहे. ही परंपरा लोकसंस्कृतीत विकृती जोपासणारी आहे; यावर सर्व विवेकी लोकघटकांचे लोकधुरिणांचे एकमत असले; तरी योगमार्गात व लोकसंस्कृतीत भांग, अफू, गांजा, धतुरा, मद्य यांना शिवांचा प्रसाद म्हणूनही मान्यता मिळाली आहे.

घटकलोकला, या अमली पदार्थांचे व्यसन लावण्यात, विविध साधना मार्गातील लोक, अमली पदार्थांचा व्यापारधंदा करणारे लोक, नशापाणी करणारी मित्रमंडळी, पाहुणचार म्हणून नशापाणी करावयास लावणारी प्रतिष्ठित नातेमंडळी, आपले इप्सित साध्य करण्यासाठी वापरावयाची युक्ती म्हणून वापरणारे कुटनैतिक लोक असे सर्व लोक सामील असतात. अलिकडील मानवी बॉम्बप्रमाणे ज्यांचा वापर करता येईल; अशा विषकन्या, विषपुरुष तयार करण्याचीही परंपरा होती. तसेच कष्टाची, किळस आणणारी तसेच क्रौर्यपूर्ण कामे करणाऱ्यांना, तसेच घरापासून वंचित एकाकी व सतत मृत्यूशी झुंज देणाऱ्या सैनिक लोकांनाही; भावनांचा विसर पडावा व चित्ताची एकाग्रता व्हावी यासाठी व्यसन करण्यास भोवतालची मित्रमंडळी व बुजुर्ग मंडळी भाग पाडतात.

हळूहळू व्यसन जडत जाऊन; अमली पदार्थ मानवी शरीर आपल्या ताब्यात घेतो व पाणी, अन्न, श्वास या गोष्टींएव्हढीच, नशा करण्याची गरज शरीराला जडते. अशी व्यसनाधिन झालेली माणसे, इतरांना आपल्या विकृत लोकमध्ये सामील करून घेण्यात धन्यता मानतात. जगातील अमूक एका अंगस्वरूप लोकमध्ये व्यसनाधिन माणसे नाहीत; असे आढळत नाही. याचाच अर्थ व्यसनाधिनांचा वर्ग, त्यांच्या हालचाली, त्यांचे तऱ्हेवाईक व छांदिष्ट, असंस्कृत वर्तन; हे लोकसंस्कृतीचे अविभाज्य अंग होऊन बसते.

लोकसांस्कृतिक जीवनात व्यसनाधिन लोकच्या अनेक कथा परंपरेने दंतकथांसारख्या सांगितल्या जात असतात. सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, संघर्ष पेटविण्यासाठीही व्यसनाधिनतेचा उपयोग परंपरेने केलेला दिसतो. याची उदाहरणे सर्वदूर, सर्वश्रुत व सर्वानुभूत आहेत.

लोकसंस्कृतीत जुगार हेदेखील एक व्यसनच मानले गेले आहे. द्युतक्रीडा ही परंपरेत सुप्रतिष्ठित झाली आहे. लग्नकार्ये, सणउत्सवप्रसंगी, द्युतसदृश्य जुगार, पत्ते खेळणे (पैसे लावून), घोड्यांची रेस खेळणे, मटका लावणे इ. प्रकार पाहावयास मिळतात. अशाप्रकारचा जुगाराचा छांदिष्टपणा, हा लोकसंस्कृतीचा अविभाज्य घटक झाला आहे. पैज लावणे हा या जुगार प्रकारातीलच छांदिष्टपणा होय.

**६. मनोविकृती :–**

मनोविकृती ही जशी घटकलोकची वैयक्तिक बाब आहे तशीच अंधविश्वास, रूढीग्रस्तता हे प्रकार समूहमनाची निर्मिती असते. मनोविकृतींचा संबंध प्रामुख्याने, मैथुन आणि भय यांशी तसेच भूक अथवा आसक्ती या मूलभूत मानवी विकारांशी निगडित असतो. विविध प्रकारचे मनोरुग्ण लोकसंस्कृतीला हादरे देत असतात. त्यांचे स्वरूप उन्मादांसारखे असते. वैयक्तिक उन्मादाबरोबरच सांघिक उन्माद, हीही विकृतीच होच. मनोविकृतींचे वैयक्तिक पातळीवरील स्वरूप, हे गुप्त रोगांसारखेच असते. व्यसनाधिनतेतूनही हे रोग बळावलेले दिसतात. मनोरुग्णांच्या व्यक्तिगत पातळीवरील तसेच सांघिक पातळीवरील अनेक कथा लोकपरंपरेत ऐकायला मिळतात. अंगस्वरूप लोकमध्ये समाविष्ट असलेले हे लोक, लोकसंस्कृतीत बलात्कार, खून यांसारख्या गोष्टीदेखील सहजगत्या करून लोकसांस्कृतिक जीवनाला विस्कळित करीत असतात. लोककथा, लोकगीते यांच्या अशा मनोविकृतीसंदर्भातील परंपराही क्षेत्रिय अभ्यासात पाहावयास व ऐकावयास मिळतात.

**७. समारोप :–**

लोकसंस्कृतीत सारेच मंगलमय आणि गहिवरून प्रेम करणारे नसते. तसे असावे अशी लोकसंस्कृतीची अपेक्षा असते. मात्र लोकसंस्कृतीत विकृती हा घटक जीवनसंघर्ष उभा करतो; म्हणूनच कदाचित लोकसंस्कृतीत नैतिकतेने, जिद्दीने, सर्वात्मक प्रेमभावाने जगतांना संघर्ष करण्यात पौरुषाचा अनुभव होतो. माणसाने आपल्या नैसर्गिक प्रकृतीला, आपल्या प्रतिभेने संस्कृतीस्वरूप देण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याची मूलभूत प्राणीप्रवृत्ती त्याला 'मन वढाय वढाय जसं पिकातलं ढोरं'; अशा स्वरूपात विकृतीपूर्ण संघर्षमयतेकडे ओढते. यातूनच लोकसांस्कृतिक जीवनात, प्रत्येक घटकलोकच्या, अंगस्वरूप आणि विराटपुरुषलोक स्वरूपातील, नात्याला पौरुषाचा, धीरोदात्ततेचा आणि खरे म्हणजे 'लोक'पणाच्या अस्तित्वाचा रंग चढतो. संस्कृती विकारांवर मात करून; माणसाने अर्जित केलेली अवस्था असते तर विकृती विकाराच्या आधीन जाण्याच्या प्राकृतिक वृत्तीतून उद्‌भवते; म्हणूनच ती त्याज्य असते. लोकसंस्कृतीत विकृतींशी अखंड संघर्ष करीत; लोकसांस्कृतिक परंपरा विवेकाने सांभाळाव्या लागतात. विकृतींचा विनाश म्हणजेच संस्कृतीचे संरक्षण; असे जीवन संघर्षाचे स्वरूप असते. श्री संत ज्ञानेश्वरांनी विश्वात्मक परमेश्वराकडे पसायदान मागतांना, खळांतील खळत्वाचा विनाश करण्याची विनंती केली आहे, हाच अंगस्वरूप लोकमधील एकात्मभाव प्रकटविण्याचा एकमेव मार्ग आहे. त्यासाठी लोकधुरिण आणि लोकन्यायालय तसेच दैवतनिष्ठेची आवश्यकता असते. विकृतींचा विनाश हे लोकसंस्कृतीचेही उच्चतम ध्येय असते. विकृतींशी खेळकरपणाने संघर्ष करतांना कलात्मकता आणि विनोद यांच्या परंपरा; लोकसंस्कृतीला बळ देतात. लोकसंस्कृतीतील विकृती नष्ट करण्यासाठीचा तो पारंपरिक असा समूहमनाचा प्रयास असतो. लोकसाहित्याच्या अभ्यासात विकृतींच्या परंपरेकडे म्हणूनच दुर्लक्ष करता येत नाही.

**८. संदर्भ व टीपा :–**


१) लोकसाहित्याची रुपरेखा : भागवत दुर्गा, वरदा बुक्स, पुणे १६, सुधारून वाढविलेली आवृत्ती ऑक्टोबर १९७७, 'पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना- लोकसाहित्याच्या अभ्यासकांना इशारा.'

२) तत्रैव.

३) 'गुप्त, दुर्मिळ अद्‌भूत शाबरी मंत्राचे मोठे बाड', त्रिपाठी (पंडित) सुंदरलाल, राजेश प्रकाशन, कोथरुड, पुणे ३८ (आवृत्तीचे साल दिलेले नाही) मिळण्याचे ठिकाण- जोशी ब्रदर्स, अप्पा बळवंत चौक, पुणे २, गजानन बुक डेपो, पुणे ३० व कबुतरखाना, दादर, मुंबई २८.

४) तत्रैव, स्त्री वशीकरण मंत्र, पृ. १०७.

५) ह.भ.प. अशोकानंद महाराज कर्डिले, रा. बुऱ्हाणनगर, अहमदनगर यांनी सांगितलेली माहिती.

६) उनि., शाबरी मंत्राचे मोठे बाड, अनुक्रमणिका.
७) तत्रैव.
८) तत्रैव, मारणमंत्र, पृ. १२४.
९) तत्रैव, शत्रूला पराजित करण्याचे यंत्र, पृ. १२९.
१०) उनि., 'लोकसाहित्याची रुपरेखा'- लोकसाहित्यातील विनोद प्रकरण ११.
११) तत्रैव, शारीरिक व्यंग.
१२) तत्रैव, मूर्खधन्याच्या कथा.
१३) तत्रैव, सामाजिक व्यंग.
१४) तत्रैव, स्त्रियांबद्दलच्या कथा.
१५) तत्रैव, लग्नातला विनोद.
१६) तत्रैव, अविस्मरणीय उंदीर.
१७) तत्रैव, आचरट बिबत्स कथा.
१८) तत्रैव, धूर्तकथा.
१९) तत्रैव, मालाकथा.
२०) तत्रैव, प्रासंगिका.
२१) तत्रैव, बडबड गीते.

●●●



## प्रकरण दहावे

# प्राचीनतम लोकबंधांचे लोकसंस्कृती व लोकसाहित्यातील स्वरूप

**(Folktypal Antiqs in folk cultural and Folk-lore)**

'लोक' अस्तित्वाच्या आरंभबिंदूपासून, लोकधारणा करणाऱ्या सूत्रांच्या अर्थात लोकबंधांच्या आधाराने, लोकसंस्कृती व लोकसाहित्य यांची परंपरा सुरू आहे; हे उघड सत्य आहे. लोकबंध निर्मिती प्रक्रिया, 'लोक' अस्तित्वात येण्यासाठी, आरंभापासूनच सुरू असणार, हेही उघड आहे. 'लोक' ही अवस्था सनातनातून सतत प्रकट किंवा आविष्कृत होत; सतत वर्तमानपणे जाणवते; असा अनुभव आपणा सर्व लोकघटकांचा असतो. लोकसंस्कृती आणि तिचे आविष्काररूप म्हणून लोकसाहित्य, ह्या दोन्ही जाणिवा सनातन व नित्य वर्तमान आहेत; असे आपण म्हणतो, ते 'लोक'च्या नित्य वर्तमानपणे जाणवण्याच्या अनुभूतीमुळे. प्राचीन लोकबंध, प्राचीन लोकसंस्कृती आणि प्राचीन लोकसाहित्य असे शब्दप्रयोग केवळ ऐतिहासिक अवस्थांच्या संकलित माहितीसाठी, उपयोजावयाचे असतात; हेही लक्षात घेतले पाहिजे. लोकसांस्कृतिक इतिहासाची मांडणी; उत्खननात सापडलेल्या साधनस्वरूप वस्तू व साधनांच्या, मांडणीच्या अवशेषांच्या आधारे, करता येणे शक्य आहे. तेच अपरिहार्यही आहे. ही मांडणी करण्याचे दुसरे आणि सेंद्रिय साधन म्हणजे प्रचलित शाब्द लोकबंधांचा अभ्यास होय. 'लोकबंध' हे 'लोक' अस्तित्वाच्या तात्त्विक धारणांच्या स्वरूपात आणि वर्तमानातील लोकसारणीच्या तपशीलाच्या आकार स्वरूपातही असतात. या दोन्ही स्वरूपातील 'लोकबंध' हे 'शाब्द' स्वरूपात अर्थात भाषा माध्यमातून प्रकटतात. भाषा म्हणजे, मानव नावाच्या,

नावे ठेवणाऱ्या प्राण्याने, मानसिक व शारीरिक, जड आणि चेतन अशा सर्व प्रकारच्या अनुभवांना 'नावे' ठेवण्याचा केलेला, प्रतिभाजन्य, समूहमन मान्य दीर्घोद्योग होय.

**१. लोकबंध आणि भाषा :–**

लोकबंध शाब्द स्वरूपात प्रकटतात असे आपण म्हणतो आहोत. लोकबंध आणि भाषा यांचा संबंध समजावून घेणे आवश्यक ठरते. 'लोकबंध' या ग्रंथात, प्रस्तुत लेखकाने याचे विवेचन केले आहे. पुनरुक्तीचा दोष पत्करून हे विवेचन लक्षात घेणे क्रमप्राप्त आहे. ''भाषा हे 'लोकबंध' प्रकट करण्याचे माध्यम आहे हे खरेच. त्याचबरोबर लोकबंधातूनच भाषेची घडण होत असते. लोकबंधांमुळेच भाषेतील अनेक पदांची रूपे बदलतात, अनेक पदांची अर्थव्याप्ती किंवा अर्थसंकोच होतो. व्याकरणबद्ध भाषा ही या अर्थाने, व्याकरणनिर्मितीपूर्व काळातील ऐतिहासिक स्वरूपच ठरते. लोकबंधाच्या प्रकटीकरणाने भाषेला अतिशय लवचिकपणा आलेला असतो. लोकबंधाच्या स्थितीगतीप्रमाणे भाषेला गतिरुपता प्राप्त होते. गतिमानतेतून प्राप्त झालेले प्रत्येक रूप खरे असते. याचा अर्थ भाषेला लोकबंधात्मक जीवनप्रवाहाची गती आणि चैतन्य प्राप्त होत असते. प्रतिकांचे संदर्भ बदलत जाणे, नवी प्रतिके तयार होणे; हे त्या भाषेच्या जिवंतपणाचेच स्वरूप म्हणता येईल. लोकबंधातील परिवर्तने 'लोक' मध्येच घडत असली, तरी त्या परिवर्तनाचे फार मोठे श्रेय 'लोक' मधील 'वेद' लोकांना म्हणजे ज्ञानी लोकांना म्हणजेच धुरिणांना द्यावे लागेल. भाषोभ्दव भाषापरिवर्तने, भाषासंकर हा 'लोक' च्या लोकबंधात्मक वर्तमानाचा आणि भाषेच्या जिवंतपणाचा आणि आदिमकाळापासूनचा इतिहास वर्तमानात जगण्याचाच अनुभव असतो. या वर्तमानाचा एक वर्तुळकंस किती कालावधीचा असतो, वा ठरविता येईल; हे सांगणे कठीण असले; तरी वर्णनात्मक व्याकरण तयार करून, त्याचा अनुभव घेण्याइतका तो असतो. तसेच एकदा तयार झालेली प्रगल्भ भाषा, लिखितरूपाची भाषा किंवा धुरीणमान्य भाषा म्हणून काही काळ अनुसरणीय राहते असे दिसत असले; तरी ते लोकव्यवहारात फारच फसवे असते. म्हणूनच 'लोक' च्या वर्तमानातील, प्रत्येक भाषिक घटना हे सत्य असे नवे रूप असते. या करिताच लोकबंधाचा विचार हा त्या भाषिकरूपापलीकडील भावविश्वात व त्या अनुसरून आलेल्या कल्पनाविश्वात पाहावा लागतो. म्हणूनच 'लोकबंध' समजले तर; लोकजीवनाच्या सनातन जाणिवेपर्यंत पोहोचणे शक्य होते. मात्र भाषा घटना हेच त्या लोकबंधाच्या प्रकटीकरणाचे वर्तमानातील साधन असल्याने त्याच्या आधारानेच पलीकडे डोकवावे लागते हे खरे. म्हणूनच लोकजीवनाच्या भाषिकरूपाला महत्त्वाचे स्थान आहे. भाषाघटना ज्या स्थलकालपरिस्थितीत प्रकट होते; त्या संदर्भामधून म्हणजे प्रकटीकरण प्रयोगामधूनच त्या लोकबंधाची जाणीव होते. लोकधारणेची कल्पना त्या 'लोकबंधा'मुळे होते. म्हणूनच बोलीरूप म्हणजे मुखररूप हेच त्या भाषेचे सत्यरूप असते. अर्थातच ते भाषाउत्पत्तीच्या आरंभबिंदूपासूनचे संचित घेऊन येते. म्हणूनच अशा भाषेत, त्या भाषेत निर्माण झालेल्या आदिमप्रतिमा, प्रतिमांमागील जाणिवांसह प्रवाहात पूर्वसंचित घेऊन वर्तमानात प्रकट होऊ शकतात.''[१]

**२. प्राचीनतम लोकबंध :–**

प्राचीनतम 'लोकबंध' म्हणजे 'लोक'च्या अस्तित्वात येण्याच्या आरंभबिंदू जवळील लोकबंध होय. माणूस हा 'लोक' स्वरूपात जगणारा प्राणी आहे हे लक्षात घेतले आणि त्याचे अन्य प्राणी जीवनापासूनचे वेगळेपण समजावून घेतले तर 'लोक' अस्तित्वाचे, घटकलोक (व्यक्ती), अंगस्वरूपलोक (एकात्म मानवी समूह) आणि विराटपुरुषरूपलोक असे त्याचे त्रिविध अस्तित्व; माणसाला प्रारंभापासून संवेदित होत असावे; असा कयास, माणसाच्या अर्थात 'लोक'च्या वर्तमान धारणेवरून बांधता येतो. 'लोकबंध' हे 'लोक'चे धारणातत्त्व आहे असे लक्षात घेतले; तर 'लोक'च्या अस्तित्व आरंभबिंदूपासूनच, हे धारणातत्त्व, विविध प्रकारे प्रकट होऊ लागले असणार हे सहज लक्षात येते. लोकबंध, 'लोक' संपर्क, संवाद आणि संवेदन माध्यम बनून संघमनस्कतेने दृढमूल होऊन 'लोक' धारणा करतो. 'लोक'ला तात्त्विक स्वरूपात त्रिविधतेने धारण करणे आणि तत्त्वप्रदर्शनार्थ, तपशीलात्मक असे; म्हणजे हावभाव, हालचाल आणि वर्तन, यांसाठीची शारीर आणि सृष्टीतील सहज आणि स्वअर्जित साधने किंवा वस्तु, त्याचबरोबर या दोन्ही गोष्टी मुखर करण्यासाठी शाब्द असे सारणीस्वरूप, प्रदान करण्याचे कार्य लोकबंध करीत असतात. तत्त्व आणि तपशील या समग्रसारणी स्वरूप लोकबंधांना, शाब्द स्वरूप देऊन; समग्र लोकसंस्कृतीचा, लोकसाहित्यात्मक आविष्कार घडत असतो. त्यामुळे भाषेतील प्रत्येक शब्दाला 'लोकबंध' असे स्वरूप प्राप्त होते. वर्तमानातील भाषेमध्ये, प्राचीनतम लोकबंध प्रतिमा, प्रतिके, चिन्हे अशा स्वरूपात सूचकतेने

आविष्कृत होत असतात. लोकसारणीमध्ये मौखिक परंपरेने आणि लोकसाहित्य व लिखित वाङ्मयात चित्रे, चिन्हव्यवस्था व शब्दरूपे या स्वरूपात; वर्तन, वस्तु व शाब्द या त्रिविधतेने प्रकट होत असतात. संवेदना, भावनातत्त्व या संदर्भातील लोकबंध मोठ्या प्रमाणात शाब्द स्वरूपातील सूचक आकारात प्रकट होतात. उदा. प्रेम, माया, परमेश्वर, मातृत्व, पितृत्व, मित्रत्व, गुरुत्व इ.

प्राचीनतम 'लोकबंध' हे नक्कीच 'लोक' अस्तित्वातही; मूलभूत अशा, आहार, निद्रा, भय आणि मैथुन; या विकारांशी आणि लोकचा अन्यसृष्टीशी येणाऱ्या संबंधाविषयी किंवा त्यांशी उपयोजन संदर्भाने मुखरित झाले असतील. म्हणजे पृथ्वी (भूमी, जमीन. डोंगर, दऱ्या, गुंफा, मैदाने इ.) आप (पाऊस, समुद्र, नद्या, जलप्रवाह, तलाव, सरोवरे, डबकी इ.) तेज (अग्नी, सूर्य, चंद्र, तारे, नक्षत्रे इ.) वायू (श्वास, उच्छवास, वारा, झुळूक, वावधान, वावटळ, वादळ, चक्रीवादळ इ.) आकाश (पोकळी, अवकाश, गुंफेतील, डोळीतील, सर्वदुर ज्यात वाऱ्याची व्याप्ती व हालचाल आणि प्रकाशाचा पसारा जाणवतो) अशी पंचमहाभूते, यांशी 'लोक'चा येणारा संबंध. तसेच उद्‌भिज, स्वेदज, अंडज आणि जारज अशी चौखाणी सृष्टी यांशी येणारे संबंध (म्हणजे– सर्वप्रकारच्या वनस्पती, कीटाणू, कीटक, पक्षी, प्राणी इ. यांशी येणारे संबंध) या सर्व सृष्टीचा 'लोक' अस्तित्वासाठी स्वप्रतिभेने आणि लोकमनाने करून घ्यावयाचा उपयोग या संदर्भाने 'लोकबंध' निर्माण झाले असतील. अर्थातच या सर्वलोकबंधांना समूहमनाने, अनुभवांच्या आकारांनुसार, शाब्दरूपे दिली असतील असा कयास बांधता येतो. उपरोक्त लोकबंध आणि भाषा यांचा संबंध लक्षात घेतला तर; या प्रकारे 'लोक'मानसातील, लोकधारणा करणाऱ्या लोकबंधांचा शाब्द स्वरूपातील प्रवासही अनादि अनंत असावा. आज ज्या ज्या लोकसंस्कृतीत ज्या ज्या भाषांच्या माध्यमातून लोकसाहित्यात्मक आविष्कार घडतो आहे, त्या सर्व भाषांमध्ये हे प्राचीनतम लोकबंध अवशेष स्वरूपात वा वर्तमान आकारस्वरूपात लोकधारणा करीतच असणार; हेही उघड आहे. विश्वातील सर्व भाषांचे मूळ भावात्मकतेने एकाच, निसर्गदत्त लोकप्रवृत्तीत दडले आहे हे नक्की. भाषाकुळे एक की अनेक, प्राचीनतमभाषा कोणती, प्राचीनतम लिपी कोणती, लिपीचे आजचे स्वरूप का व कसे प्राप्त झाले, यांविषयी संशोधन सुरूच राहील.

प्रस्तुत ग्रंथात भारतीय परंपरेचा विचार आपण मराठी भाषेच्या माध्यमातून



करीत आहोत; हे निश्चित केल्यानंतर, प्राचीनतम लोकबंधांची उदाहरणे आणि प्राचीतनम लोकबंध विचार या मर्यादेतच विचार घडणार, हे उघड आहे. मात्र तत्त्वतः प्राचीनम लोकबंध विचार, संकल्पना स्पष्ट करण्याच्या दृष्टीने या विवेचनाचा उपयोग निश्चितच होईल हे तितकेच खरे.

**३. भारतीय परंपरेतील प्राचीनतम 'लोकबंध'** :–

३.१ भारतीय परंपरेतील प्राचीनतम परंपरेतील लोकबंधांचा मागोवा वर्तमानकाळात घेऊ लागलो; की स्वाभाविकपणे आपण श्रुति, स्मृति, पुराणे व महाकाव्ये यातील लोकबंधाकडे येतो. हे वाङ्मय भारतीय प्राचीन संस्कृतीचे, पर्यायाने लोकसंस्कृतीचे लोकवाङ्मय ठरते. या वाङ्मयाला ऐतिहासिक, मानववंशशास्त्रीय, भाषावैज्ञानिक, राज्यशास्त्रीय, न्याय, धर्म, तत्त्वज्ञान, कला, क्रीडा या सह, सर्व समाजशास्त्रीय मूल्य आहे. जन्मप्रथेपासून, अंत्येष्टीपर्यंत जीवनातील सर्व संस्कारांचे व उपरोक्त सर्व अंगांचे पारंपरिक दर्शन या वाङ्मयातून घडते. भारतीय लोकसांस्कृतिक जीवनात, लोकबंधांचे परिमाण या वाङ्मयाला आहे. कोणताही धार्मिक विधी करतांना; म्हणजे वास्तुशांत, ग्रहशांती, उद्‌घाटने, पूजाविधी, व्रतवैकल्ये (सत्यनारायण), याग, होमहवन इ. करतांना, श्रुति, स्मृति, पुराणात सांगितलेले फल प्राप्त होवो; असे म्हटले की ते फल खरोखरीच प्राप्त झाल्याची भावना पूर्णत्वास जाते. श्रुति, स्मृति, पुराणे, यांबरोबरच पंचतंत्र, कथासरित्सागर, वेताळपंचविशी यासारखे नीतीबोध करणाऱ्या कथांचा कल्पनाबंध (Motif) घेऊन अवतरलेल्या लोककथा, तसेच निरुक्त, सूतवाङ्मय; गेल्या दोन अडीच वर्षात परंपरागत झालेले बौद्ध व जैन वाङ्मयांतर्गत कथा व गीत वाङ्मय, बौद्ध जातके आणि जैन चूर्णी या स्वरूपात आलेल्या व प्राकृत म्हणविणाऱ्या पाली, अर्धमागधीसारख्या भाषांचे माध्यम असलेल्या, या वाङ्मयातून; बौद्ध आणि जैन मतप्रणित तात्त्विक आणि तपशीलात्मक लोकबंध पारंपरिक झालेले आहेत. 'भारतीय परंपरेची ओळख' या प्रकरणात डॉ. दुर्गा भागवत यांनी भारतीय प्राचीन वाङ्मय परंपरेची ओळख करून दिली आहे.[२] या वाङ्मयातून प्रकटलेले लोकबंध भारतीय प्राचीनतम लोकबंध म्हणून; वर्तमानात भारताच्या कानाकोपऱ्यात लोकधारणेसाठी, लोकसांस्कृतिक स्वरूपात आविष्कृत होताना सर्वेक्षणात जाणवते. आधुनिक भाषासारणीमध्ये हे लोकबंध प्रतिके, प्रतिमा, रूपके, अलंकार स्वरूपात तर येतातच त्याचबरोबर हे लोकबंध धर्म नीती तत्त्वज्ञान यांचे या संदर्भात उद्‌बोधन करणाऱ्या कथांच्या

स्वरूपातही आलेले दिसतात. उदा. समग्र भारतीय परंपरांचा मूलाधार ॐ या शब्द मूलांकारातून आविष्कृत झाला आहे. भारतीय आधुनिक भाषासारणीची परंपरा सुमारे दोन अडीच वर्षांची मान्य केली; तर संस्कृत आणि प्राकृत भाषासारणीमधील हे प्राचीनतम वाङ्मय आधुनिक भाषासारणीमध्ये बेमालून भाषांतर, रूपांतर भाष्य या स्वरूपात तर प्रकटलेच आहे. तथापि भारतीय परंपरेतील उपरोक्त वाङ्मयातील समग्र लोकजीवनाचे दर्शन प्रतिके, प्रतिमा, रूपके, वैशिष्ट्यपूर्ण शब्द, पारंपरिक कथांचे नवे अवतार या स्वरूपात या आधुनिक भाषिक 'लोक' मध्ये, लोकभाषेच्या माध्यमातून आणि ग्रंथनिविष्ट भाषेतही, प्रकट झालेले दिसतात. एवढेच नव्हे तर; हे भारतीय प्राचीन परंपरेतून आलेले समग्र लोकजीवनसारणीचे लोकबंध नवे संदर्भ व नवी रूपे घेऊन; तेवढ्याच प्राचीनतम परंपराशी नाळ जोडून लोकसंस्कृती म्हणून लोकसाहित्य स्वरूपात प्रकट झालेले दिसतात. लोकभाषेला ग्रंथभाषेचा दर्जा देत असतांनाही हे 'लोकबंध' वर्तमान लोकसंस्कृतीचे दर्शन घडवीत प्रकट होत असतात. याचे सर्वमान्य उदाहरण म्हणून महाराष्ट्रातील 'ज्ञानेश्वरी'चे देता येईल. मध्ययुगीन मराठी वाङ्मय रचयिते संत, पंत आणि तंत या सर्वांनी प्राचीनतम लोकबंध, वर्तमान लोकसारणीत पुन्हा प्रकटविले आणि हे लोकबंध वर्तमान लोकसंस्कृतीत लोकभाषेत आणि नित्य लोकसाहित्यात्मक आविष्कारात जगतांना, 'लोक'मध्ये समग्रतेने; जीवनाच्या सर्व अंगांत पाहावयास मिळतात. डॉ. दुर्गा भागवत 'भारतीय परंपरांची ओळख' करून देतांना समारोपांत पारंपरिक कथांच्या संदर्भात म्हणतात, ''आधुनिक प्रांतभाषांच्या वाढीबरोबर काही मूळचे शब्द व प्रकार विशिष्ट स्थलींच बद्ध होऊन पडले. पण त्यांच्याबरोबरचा मराठी 'कथा' या शब्दांचा, पारंपरिक कथेच्या अनुषंगाने आलेला अर्थही लक्षांत घेणे जरुरीचे आहे. कानडींत, तामिळ व तेलगु वगैरे दाक्षिणात्य भाषांत कथा हा शब्द कोणत्याही कथेला वापरतात. पण मराठींत गोष्टीने ते स्थान घेतल्याने कहाणीप्रमाणे 'कथा' शब्द पुराण, पूज्यकथा म्हणून रूढ आहे. मुंडा लोकांतही साध्या गोष्टीला कोणी कहाणी म्हणतात आणि गद्यपद्यमिश्रित कथेला दुरंग कहाणी म्हणतात. या दुरंग कहाणींत गोष्ट एकानेच सांगायची पण पद्यमय कोरस मात्र सर्वांनी एकत्र म्हणावयाचे असे तंत्र आहे.''[३] लोकबंधांचा प्रवास शब्द स्वरूपात घडतांना असे बदल स्वाभाविकपणे घडत असले तरी ते बदल तपशीलात्मक असतात, भावात्मकतेने प्राचीनतम लोकबंध त्यांत



अंतस्त्रोताप्रमाणे प्रवाहित असतो.

**३.२ भारतीय परंपरेतील प्राचीनतम लोकबंधांची उदाहरणे पुढील वर्गवारी करून पाहता येतील :–**

**(i) वैदिक दैवतकथांतून आलेले लोकबंध :–** सूर्य, चंद्र, वायू, रुद्र, मरुत, विष्णू, इंद्र, पर्जन्य, द्यावा, पृथ्वी अशा देवतांविषयी धारणात्मक कथा, कल्पना, तत्त्वे इ. विषयी दिव्यकथात्मक लोकबंध. या लोकबंधांनी समग्रजीवनाला मूलभूत तात्त्विक आधार दिला आहे. विश्वोत्पत्ती, विश्वसंचालन व व्यवस्थापन यांविषयी पूज्यभाव प्रकटविणाऱ्या लोकबंधांची परंपरा भारतीय सनातनपणे दृढमूल असलेली दिसते, 'ॐ' हा शब्द लोकबंध विश्वोत्पत्तीच्या, मूलाकाराविषयीचा तात्त्विक लोकबंध, समग्र भारतीय सांस्कृतिक जीवनाचा केंद्रवर्ती लोकबंध म्हणून अनादिपणे लोकमानसात दृढावला आहे.

(ii) पौराणिक कथांमधून अवतारकथा, सूरासूर कथा, विविध शक्तीमत्ता धारक कथांचा, प्राग ऐतिहासिक काळांपासूनचा भरणा 'लोकबंध' स्वरूपात पाहावयास मिळतो. भारतीय लोकसंस्कृतीला, या दैवतकथांनी अगदी गाववस्तीपर्यंत व्यापले आहे. सर्वकल्याणात्मक मंगलमूर्ती गणपतीविषयक, दिव्य लोकबंध भारतीय लोकसंस्कृतीत सर्वदूर आहे. ब्रह्माविष्णूमहेश या त्रिदेवांचा संबंध उत्पत्ती स्थिती आणि लय यांशी लावलेला आहे. महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती या शक्तीमत्तांचे अवतार, कोट्यावधी स्वरूपात, शक्तीविषयक 'लोकबंध' आविष्कृत करतात. जारण, तारण, मारण यांविषयी, या शक्तींचे, लोकबंध, प्राचीन काळांपासून आहेत. दैत्य, राक्षस, भूत, प्रेत, पिशाच्च, समंध यांविषयीचे 'लोकबंध'ही पुराणातून पुढे आलेले आहेत. नद्या, वृक्ष, वनस्पती, सर्व प्रकारची सृष्टी यांच्या उत्पत्तीविषयीचे लोकबंध, भावात्मकतेने लोकसंस्कृतीत आविष्कृत असतात. अन्न, वस्त्र आणि निवारा यांविषयीचे धारणात्मक अतिप्राचीन लोकबंध दिव्यकथांच्या स्वरूपात पुराणांमधून प्रकट झालेले दिसतात. गुहा, गाय, नदी, कावळा, चिमणी, गुरू, माता, शस्त्र, अस्त्र परंपरा, अन्नधान्य उत्पत्तीकथा असे कितीतरी लोकबंध यांविषयी सांगता येतील. विमान, पंख, वाहने यांविषयीचे लोकबंध पुराणकथांतून, प्रकट झालेले दिसतात. पुराणकथांच्या रूपांतरातून अद्‌भूत दिव्यकथा, लोककथांच्या स्वरूपात लोकसंस्कृतीत कला, क्रीडा, लोकजीवन यांना लोकबंधस्वरूपात पुष्ट करीत असतात. गरुड, सिंह, वाघ, मोर, उंदीर आदि वाहनांचे लोकबंध,

विशिष्ट देवतांच्या प्राकट्याची चिन्हे म्हणून प्रकट झालेली दिसतात.

गोत्रनिर्मिती, देवकनिर्मिती, त्यांच्या परंपरा, त्यांचा जातक, विवाह आणि मृत्यू यांशी असलेला संबंध; भारतीय लोकपरंपरेत अतिदिव्य म्हणता येईल. प्रजापती आणि ऋषी यांचा संबंध लोकधारणेच्या दृष्टीने महत्त्वाचा मानता येईल. पुराणकथांची ही परंपरा भारतीय लोकसांस्कृतिक इतिहास सांगते.

पुराणांत अंतर्भूत असलेल्या व्रतकथा, बोधकथा, नीतीकथा, संघर्षकथा यांचे आविष्करण लोकसंस्कृतीत मोठ्या प्रमाणावर होतांना दिसते.

(iii) स्मृतिग्रंथातील 'लोकबंध', भारतीय लोकसांस्कृतिक परंपरेत, जन्मप्रथा, विवाहप्रथा, मर्तिकप्रथा, न्याय, धर्माधर्म, नीतीअनीती, सोवळेओवळे, वर्णाश्रमव्यवस्था यांविषयी अतिदृढतेने बदलते संदर्भ बदलती रूपे यांसह आलेले दिसतात. यांतील लोकबंधांचा उद्गम हा वैदिकपरंपरेतील शास्त्रांतून, अर्थात ब्राह्मणग्रंथ, अरण्यके, निरुक्त, उपनिषदे, दर्शने यांतून झाला असावा; असे म्हणण्यास वाव आहे. स्मृतिग्रंथाचे स्वरूप स्थलकाल परिस्थितीनुसार योग्य 'लोकबंध' प्रस्तृत करणारे आहे, असे त्यांतील विधिनिषेध यांवरून लक्षात येते. लोकसंस्कृतीतील न्याय, समाजव्यवस्था, राजव्यवस्था, कृषीजीवन, कौशल्याधिष्ठित व्यवसाय करणारांचा वर्ग, पुरोहित मंडळी या व अशा सर्वांच्या संदर्भात, लोकबंधविषयक प्रसृती करणारे आहे, असे लक्षात येते.

(iv) रामायण आणि महाभारत या आर्ष महाकाव्यांना भारतीय इतिहास म्हणून लोकसंस्कृतीत मान्यता आहे. या काव्यांतील विभूतिमत्त्वांना दिव्यत्व प्राप्त झालेले असून; त्यांचा दिव्य प्रतिमा म्हणून लोकसांस्कृतिक, मौखिक परंपरेमध्ये मोठ्या प्रमाणावर आढळ होतो. लोकसांस्कृतिक सारणीचे आदर्श लोकबंध म्हणून राम, कृष्ण, धर्म, भीम, अर्जुन, हनुमान, रावण, सीता, कुंती, द्रौपदी, या व अशा जवळपास सर्वच विभूतिमत्त्वांना गेल्या हजारो वर्षांच्या परंपरेत अतिप्राचीन लोकबंधांचे स्वरूप प्राप्त झाले. वैदिक देवता, पौराणिक देवता आणि स्मृतिग्रंथातील नैतिक आदर्श यांच्या अवतार रूपातील दिव्य विभूतिमत्त्वे, अशा स्वरूपात, लोकसंस्कृतीत या विभूतिमत्त्वांना स्थान आहे. वर्तमान लोकसंस्कृतीचा प्राचीनतम लोकबंध म्हणून या सर्व विभूतिमत्त्वांना स्वीकारले असून; वाङ्मयीन परंपरेत, लोककथा, लोकगीते, वाक्प्रचार, म्हणी या स्वरूपातील 'लोकबंध' म्हणून हे संदर्भ मोठ्या प्रमाणावर येतात.



**(v)** भारतीय परंपरेतील उपरोक्त प्राचीन वाङ्मयातूनच दिक्पाल, पूर्वज, लोकाधार म्हणून अष्टभैरव, पूर्वजदेवता, वृक्ष (आधारवड) अश्वथ (कल्पवृक्ष) इ. नागदेवा यांच्या लोकबंधांना, लोकसंस्कृतीत विशेष स्थान आहे. ही परंपराही प्राचीन काळापासून कृषीसंस्कृतीत घट्टपणाने जाणवते. पूर्वज देवतांचे बीरगळ खांब किंवा वृक्ष, सर्पयोनी, स्थान यांची परंपरा दिसते.

(vi) भारतीय परंपरेतील चौदा विद्या आणि चौसष्ट कला (या दोन्ही संदर्भात अधिक मोठे आकडेही लोकपरंपरेत आढळतात) या सर्वांविषयी उत्पत्तीकथा, दैवतकथा, गुरुपरंपरा यांविषयी लोकबंध वर्तमानात मोठ्या श्रद्धेने विद्या आणि कलांची परंपरा, बदलते संदर्भ बदलती रूपे यांसह पुढे नेत आहे.

(vii) गुरुपरंपरेविषयी आणि पूर्वज किंवा वंशपरंपरेविषयीचा लोकबंध असाच अतिप्राचीन लोकसंस्कृतीपर्यंत घेऊन जाणारा आहे. सांप्रदायिक गुरुपरंपरा विष्णू, शिव, शक्ती यांच्या मूळ रूपांपर्यंत नेऊन भिडविलेली असते. त्रिदेवांचे एकत्रित रूप आणि राम, कृष्ण, परशुराम यांच्यापर्यंत नेणाऱ्या परंपराही आढळतात. वंशपरंपराही अशी इक्ष्वाकू वंशापर्यंत किंवा कुरुकुलापर्यंत, सूर्य, चंद्र, शेष वंशापर्यंत नेऊन भिडविलेली दिसते. वंशाभिमान व कुलाभिमान यांविषयीचा भावनाबंध स्वरूपातील लोकबंध लोकसंस्कृतीत पाहावयास मिळतो.

(viii) संस्कृत भाषाकुलातील वेदपूर्वकालीन संस्कृत बोलीपरंपरेपर्यंत (कदाचित त्याकाळी असलेल्या गोंड, तमीळ, मल्याळम बोलीसदृश्य बोलीपर्यंत) शाब्द स्वरूपातील 'लोकबंध' वर्तमानात अवशेषात्मकतेने, प्रतिमा, प्रतिके, रूपके किंवा नामे व क्रियावाचक शब्दांच्या स्वरूपात, रेंगाळत असतात. दान, तर्पण, सत्य, धर्म, मातृ, पितृ, गुरू असे शब्द, ही त्यांची उदाहरणे देता येतील.

(ix) सप्तचिरंजीवांच्या कथा आणि त्यांचे लोकसांस्कृतिक स्थान स्वतंत्रपणे भारतीय परंपरेतील, प्राचीन लोकबंध स्वरूपात दिसून येते. हनुमान हे यांचे सर्वाधिक लोकप्रिय उदाहरण होय.

(x) नाडीसंहिता ज्योतिर्विज्ञान, आयुर्वेद आणि धनुर्वेद यासंबंधातील पारंपरिक लोकबंध लोकसंस्कृतीत अवशेषात्मकतेने रेंगाळत असतात. रामबाण, ध्रुवतारा, सप्तर्षी, नक्षत्रे या व शस्त्रास्त्रांविषयीच्या कथा यांशी निगडित असतात. जातकाच्या अनुषंगाने – पशुपक्षी संदर्भात प्राचीन काळापासून, परंपरेने आलेले लोकबंध, लोकसंस्कृतीत आजही घट्ट आहेत. कावळा, टिटवी, घुबड, मुंगूस, गाय, नाग यांचे लोकबंध हे या संदर्भातील उदाहरणे होत.

भारतीय प्राचीन लोकबंधांचा स्वतंत्र कोष निर्माण करणे या अभ्यासाच्या दृष्टीने सोयीचे होईल. लोकसंस्कृतीचा प्रवास वर्तमानापर्यंत प्राचीन लोकबंधाच्या संदर्भासह कसा सुरू असतो याची कल्पना या सर्व प्रकारांवरून येऊ शकेल.

**४. आधुनिक भाषासारणीतील प्राचीन लोकबंधांचा प्रवास :-**

प्रादेशिक भाषांमधून लोकसंस्कृती व लोकसाहित्याचा अभ्यास करताना, भारतीय प्राचीन लोकबंधांचा प्रवास प्रादेशिक लोकसंस्कृतीत कोणत्या प्रकारे झाला; हे पाहाणे मनोरंजक होऊन बसते. भारतीय म्हणून जी अंगस्वरूपलोक, विराटपुरुषरूप लोकमध्ये मानता येतो; त्यात भारतातील प्रादेशिक (अर्थात या भाषेच्या आणखी शाखा करता येतील जसे मराठीच्या - कोकणी, वैदर्भी, खानदेशी, मराठवाडी इ.) भाषांतील लोकसंस्कृतीत, उपरोक्त सर्व प्राचीन लोकबंध प्रकार पुन्हा बदलते संदर्भ आणि बदलत्या रूपांसह, लोकसाहित्यात आणि ग्रंथनिविष्ट साहित्यात तसेच ग्रंथांना लोकसाहित्याचे परिमाण लाभलेल्या ग्रंथांतून आलेले दिसतात. उदा. मराठी संतसाहित्य, हिंदी कबीर, रामचरितमानस-तुलसी. प्रस्तुत ग्रंथ मराठीत लिहित असल्याने मराठी लोकसंस्कृती व मराठी लोकसाहित्याचा विचार करू लागले तर, प्राचीनतम भारतीय लोकबंधाचा मराठी अवतार कसा झाला आहे हे सहज लक्षात येईल.

(i) मराठी लोकवाङ्मयात ऋषीकथा, पुराणकथा, रामायण आणि महाभारत यांच्या कथा ऐतिहासिक कथांच्या स्वरूपात, पत्त्यामुद्यास स्थानिक परिसरात दाखविल्या जातात. ऋषींचे आश्रम, सीतापावले, पांडवलेणी अशी यांची अनेक उदाहरणे देता येतील. ओवीगीताप्रमाणेच खेळगीते, बडबडगीते, कथागीते या स्वरूपात, या प्राचीन कथा ओवलेल्या दिसतात. अगदी विवाहप्रसंगी, नवरानवरीला 'लक्ष्मीनारायण' असा लोकबंधात्मक साज देणे सहज घडते. 'चाळीसगाव डांगाणी खंड १ आणि खंड २' या प्रबंधावरील ग्रंथात प्रस्तुत लेखकाने, यासंबंधात विपुल उदाहरणे दिली आहेत.[४] डॉ. सरोजिनी बाबर यांनी 'रानजाई' या टी.व्ही.वरील कार्यक्रम सादरीकरणात अशा लोकवाङ्मयाचे विविध नमुने सादर केले होते.[५] प्रस्तुत लेखकाने 'लोकसाहित्याचा अन्वयार्थ' या पुस्तकात ओवीगीते सादर करतांना दिलेल्या ओव्यात 'सीताला सासूरवार । केलाई बहु बहु । वाटून काई दिला सगळ्याली गहू गहू ।।' हा दिलेला संदर्भ बोलका आहे.[६] अशी असंख्य उदाहरणे मराठीच्या प्रादेशिक लोकवाङ्मयात आढळतात. उदा. 'जनी जाते वो शेनाला । उभा पाठीमागे कन्हा । जने येऊं दे ग मला । श्यान येचु लागन तुला ।।' यासारखा संदर्भ याच प्रकारचा आहे. वाघ्यामुरळी आणि गोंधळी, बहुरुपे आणि वासुदेव यांच्या गाण्यांतून अशा कथा श्रवत असतात. राम, कृष्ण, भीम, धर्म, सीता अशी विभूतिमत्त्वे स्वभावदर्शनासाठी, प्रतिमा म्हणूनही लोकवाङ्मयात आलेल्या दिसतात. प्राचीन भारतीय वाङ्मयातील अनेक कथा लोककथांच्या स्वरूपात गोष्टीवेल्हाळ माणसे सांगत असतात. कीर्तनकारांनीही या कथा आख्याने म्हणून लावलेल्या पाहावयास मिळतात.

(ii) मराठी मध्ययुगीन वाङ्मय तर पुराणे आणि रामायण-महाभारत यांच्या कथांनीच भरलेले आहे. भागवत संतांचे भक्तीपर वाङ्मय हे विठ्ठल किंवा पांडुरगभक्तीच्यामिशाने अनेक पुराणकथांचे 'लोकबंध' स्वरूपात उपयोजन करतांना दिसतो. बालक्रीडेचे अभंग, गौळणी ही कृष्णकथेशी जोडलेली दिसतात. तर भक्तिबोध, समाजबोध यानिमित्ताने पुराण आणि महाकाव्यांचे विपुल संदर्भ येतात. याबरोबरच महानुभाव, शाक्त, शैव, गाणपत्य, रामदासी संप्रदायातील संत आणि कीर्तनकार भागवत, शिवादी पुराणे, देवीभागवत, रामायण महाभारत यातील कथांचे निरुपण करीत असतात. महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीत याच कथांचे आवर्तन लोकसाहित्य स्वरूपात घडते.

(iii) आख्यानकवी किंवा पंडितकवी म्हणून प्रसिद्ध असलेल्या पुराणिकांच्या वर्गाने, प्राचीन, पुराण आणि महाकाव्य वाङ्मयाची मराठी अवतार स्वरूपात, पुराणकथा आणि महाकाव्य कथा पवित्र दिव्यकथा या स्वरूपात आख्यान कविता मांडली. त्यामुळे पुराणकथांना लोकसंस्कृतीत विधिनाट्यात्मक कथा, व्रतकथा असे 'लोकबंध' परिमाण लाभले. या वाङ्मयाचे रूपांतर पुराणिकांनी सांगावयाचे पुराण किंवा कीर्तनात उत्तररंगात लावावयाचे अशा स्वरूपात घडले. त्यातील कथा लोकसंस्कृतीत पुराणकथा स्वरूपात लोकवाङ्मयात रंजन, उद्‌बोधन आणि भक्तिभावना व्यक्त करण्यासाठी होऊ लागला. विविध जातीजमातींची पुराणे आढळतात. या पुराणांचा संबंध प्राचीनतम भारतीय वाङ्मयाशी थेट जाऊन भिडलेला असतो.

(iv) शाहिरी वाङ्मय हे तर मराठी लोकवाङ्मय म्हणूनच ओळखले जाते. वगनाट्यातील पौराणिक वगनाट्ये, पवाडे आणि वगनाट्यातील गणगौळण, या संपूर्ण नाट्यरूपाला प्राचीनतम लोकवाङ्मय व लोकसंस्कृती यांचा लोकबंधात्मक आधार मिळालेला दिसतो. भारतीय प्राचीनतम लोकबंधाचे

'लोक'मधील हे प्रस्तुतीकरण लोकभाषा आणि लोकसंस्कृती यांना अधिक घट्ट स्वरूपात 'लोकबंध' प्रदान करणारे ठरले आहे.

(v) प्रादेशिक भाषा आणि प्रादेशिक इतिहास यांनी प्राचीन भारतीय लोकबंध परंपरांना पूरक असे, नवे लोकबंध दिले. महाराष्ट्रात संतविभूतिमत्त्वे आणि छत्रपती शिवराय, अहिल्यादेवी होळकर अशी काही विभूतिमत्त्वे लोकसंस्कृतीला भावात्मक प्रतिमा, प्रतिके, रूपके या स्वरूपात लोकबंध प्रदान करणारी ठरली आहेत. महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीत संत आणि छत्रपती यांच्या कथांना दिव्यकथांचे आणि लोकसंस्कृतीच्या धारणातत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. महाराष्ट्राची मराठी लोकसंस्कृती व लोकसाहित्य यांचे आविष्करण जिजाऊ, अहिल्यादेवी, सर्व संतमहंत, छत्रपती यांच्या दिव्यकथांनी लोकसारणीच्या सर्व अंगोपांगात, प्राचीनतम लोकबंधांमधून व्यापले आहे.

**५. आदिबंध आणि भारतीय परंपरेतील प्राचीनतम लोकबंध :–**

भारतीय परंपरेतील उपरोक्त प्राचीनतम लोकबंधांना लाक्षणिक अर्थाने भारतीय लोकसंस्कृतीचे व लोकसाहित्याचे आदिबंध असे म्हणता येईल. तथापि आदिबंध (Arqitype) ही संकल्पना मानसशास्त्रातून आलेली आहे. त्यांचे ढोबळमानाने स्वरूप स्त्री आणि पुरुषांच्या मनात लैंगिक भेदमूलकतेने आदिम अवस्थेत संपूर्ण सृष्टीशी आलेल्या संबंधाच्या अनुभवांचे मूलाकार या स्वरूपातील प्रतिमा असे स्वरूप असते. आदिबंधांना लोकबंधांचे स्थान लोकसंस्कृतीत आविष्कृत होतांना मिळते इतकेच. लोकबंध हे थेट लोकसंस्कृती व त्या लोकसंस्कृतीचे आविष्कार ज्या लोकसाहित्याच्या स्वरूपात घडते, त्यांची धारणासूत्रे असतात. भारतीय परंपरेतील प्राचीनतम लोकबंध हे लोकसंस्कृती साकारणारी प्राचीनतम धारणासूत्रे म्हणून विचारात घ्यावी लागतात.

**६. समारोप :–**

प्राचीनतम लोकबंधांचे लोकसंस्कृती व लोकसाहित्यातील स्वरूप; भाषाघटनांच्या आधारे व प्राचीन वाङ्मयाच्या आधारे, वर्तमान लोकसंस्कृतीत व लोकसाहित्यात; प्राचीन लोकबंधांच्या होणाऱ्या मौखिक परंपरेतील प्रक्षेपणाच्या आधाराने, तपासावे लागते. भारतीय परंपरेतील, प्राचीनतम लोकबंध श्रुती, स्मृति, पुराणे, रामायण व महाभारत यांतील दिव्यकथातून लोकसंस्कृतीत संक्रमित झालेले असतात. त्यांचे स्वरूप दिव्यकथा, लोककथा, प्रतिके, प्रतिमा, रूपके यांच्या स्वरूपात लोकसंस्कृतीच्या लोकसाहित्यस्वरूपातील



आविष्कारात आढळते. आधुनिक भाषासारणीत हे लोकबंध नवे संदर्भ व नवी रूपे घेऊन प्रकटते. त्याचबरोबर इतिहासपरंपरा व लोकसांस्कृतिक परंपरांतून दिव्यानुभूती घडविणाऱ्या समकालीन अनुभूतींचे रूपांतर दिव्यकथांत होऊन; त्या दिव्य कथा लोकबंधात्मकतेने लोकसंस्कृती व लोकसाहित्यात आविष्कृत होतात.

**७. संदर्भ व टीपा :–**


१) लोकबंध : सहस्रबुद्धे अनिल, नितीन प्रकाशन, पुणे, नवीन सुधारित आवृत्ती २०१२, 'लोकबंध आणि भाषा घटना', पृ. ८५ व ८६.

२) लोकसाहित्याची रुपरेखा, भागवत दुर्गा, वरदा बुक्स, पुणे, दु.आ. १९७७, 'भारतीय परंपरेची ओळख : समारोप'.

३) तत्रैव.

४) 'चाळीसगाव डांगाणी' खंड १ व २, सहस्रबुद्धे (डॉ) अनिल, आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट प्रकाशन मंच, नगर, प्रथम आवृत्ती १ डिसेंबर २०१३.

५) 'रानजाई', बाबर (डॉ) सरोजिनी, टीव्ही मालिका.

६) उनि., चाळीसगाव डांगाणी.


●●●

## प्रकरण अकरावे

# उपसंहार

लोकसंस्कृती आणि लोकसाहित्य यांचा अभ्यास आधुनिक, शास्त्रीय पद्धतीने करण्याचा प्रयत्न, गेल्या तीनएकशे वर्षात, जागतिक पातळीवर, सर्वत्र सुरू झालेला दिसत आहे. लोकसंस्कृती आणि लोकसाहित्य यांच्या अभ्यासातून; मानव्यशास्त्रे, भौतिकशास्त्रे, इतिहास, तत्त्वज्ञान आणि धर्म आदि सर्व अभ्यासक्षेत्रांना, मूलभूत स्वरूपात, प्राथमिक सामग्री मिळते असे लक्षात आले आहे. लोकसाहित्य व लोकसंस्कृतीच्या अभ्यासात 'लोक' अर्थात मानवी जीवनाच्या आरंभबिंदूपासून ते वर्तमानापर्यंतचे दर्शन घडविण्याचे सामर्थ्य आहे हेही लक्षात आले आहे. म्हणूनच लोकसंस्कृती व लोकसाहित्य क्षेत्राच्या अभ्यासास विशेष महत्त्व आलेले आहे. इंग्रजीमध्ये Folk-Culture आणि Folk-Lore असे पारिभाषिक शब्द अनुक्रमे लोकसंस्कृती आणि लोकसाहित्य यांना दिले गेले आहेत. यातील Folk या शब्दाला मराठीत व संस्कृतात 'लोक' असा पारिभाषिक शब्द योजला आहे. संस्कृतोद्भव अशा भाषांनीही 'लोक' हाच शब्द वापरला आहे.

लोकसंस्कृती आणि लोकसाहित्य असे दोन शब्द आपण विचारात घेत आहोत. अभ्यासक्षेत्रात लोकसाहित्य - Folk-lore हा शब्द प्रथम वापरला गेला; तो लोक-विद्या किंवा लोक-शहाणपण असा अर्थ ध्वनित करणारा आहे. प्रारंभिक काळात Folk म्हणजे सामान्यलोक असा मर्यादित अर्थ घेतला गेला. People in General असे म्हणतांना सामान्य लोकांतील, धुरिण, ज्ञानी, शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, चिंतक, कवी, लेखक, कलावंत यांचे समावेशन सामान्य लोक अर्थात People या शब्दात आहे की नाही; याविषयी संभ्रम निर्माण झालेला दिसतो. Class आणि Mass असे दोन स्वतंत्र वर्ग असतात



का? Folk मध्ये अर्थात People in general या अवस्थेत, 'एकात्म लोक' हा अर्थ ध्वनित होतो. तसेच Class आणि Mass असे वर्ग पूर्णतः पृथक मानवी समूह नसतात; हे हळूहळू अभ्यासकांच्या लक्षात आलेले दिसते. Folk मध्ये Class अभिजन किंवा वेद असे लोक आणि इतर जण यांचा एकत्रित विचार लोकसंस्कृती व लोकसाहित्याच्या अभ्यासात केला पाहिजे, असे अभ्यासकांच्या लक्षात आले. यातूनच लोकसंस्कृती व लोकसाहित्याच्या अभ्यासात भारतीय 'लोक' संकल्पना आणि भारतीय परंपरा यांचे; Folk-lore या अभ्यासक्षेत्रातील महत्त्व डॉ. दुर्गा भागवत यांनी मोठ्या प्रमाणावर नोंदविले. त्यांच्या अगोदर भारतीय परंपरेकडे अनेक पाश्चात्य व पौर्वात्य अशा भारतेतर पंडितांनी लक्ष वेधले होते; हे नाकारता येत नाही. मात्र डॉ. दुर्गा भागवत यांनी त्यांच्या, लोकसाहित्य अभ्यासक्षेत्रातील पीएच.डी. करिताच्या अभ्यासाच्या निमित्ताने, झालेल्या अभ्यासावर आधारित 'लोकसाहित्याची रुपरेखा' या ग्रंथात; 'लोकसाहित्याचे जागतिक अभ्यास क्षेत्र' या प्रकरणात जागतिक परंपरांचा आढावा घेतला आहे. त्याबरोबरच 'भारतीय परंपरेची ओळख', 'पारंपरिक वाङ्मयाचे संग्राहक' आणि 'दैवतकथा' अशा स्वतंत्र तीन प्रकरणांमध्ये Folk-Lore आणि Folk-Culture यासंबंधी भारतीय परंपरेने अतिप्राचीन काळापासून अर्थात वेदपूर्व आणि वेदकालापासून केलेल्या अभ्यासाचा, पद्धतशीर, परिचय करून देऊन; Folk-lore या क्षेत्रातील अभ्यासकांना, या अभ्यासक्षेत्राच्या व्यापकतेचा, ऐतिहासिक परंपरेचा परिचय घडविला. त्यांच्या या प्रबंधाकडे, ऑक्सफर्ड विद्यापीठामुळे जगाचे लक्ष गेले आहे.

या प्रयत्नांना पूरक प्रयत्न प्रस्तुत लेखकाने 'लोकबंध' या ग्रंथात मोठ्या साक्षेपाने केला आहे. 'लोक', 'लोकबंध' आणि 'लोकसाहित्य' या तीन उल्लेखातून, Folk अर्थात 'लोक' या शब्दाचे व्यापकत्व स्वीकारणे अपरिहार्य असल्याचे स्पष्ट करून; त्याशिवाय Folk-lore या क्षेत्रातील अभ्यासास सर्वसमावेशकता येणार नाही; हे स्पष्ट केले. प्रस्तुत लेखकाने आत्मप्रौढीचा दोष पत्करून; ह्या मांडणीचे महत्त्व विषद केले आहे.

'लोकसाहित्य' या ज्ञानशाखेविषयी परिचय करून देतांना, भारतीय अभ्यासपरंपरेत, विविध प्रांतात, विविध पारिभाषिक शब्द वापरून, निर्देश करण्याचा प्रघात निर्माण झाल्याचे नोंदवून; Folk आणि lore या पारिभाषिक

शब्दांना मिळालेले अर्थ स्पष्ट करून; लोकसाहित्य हे स्वतंत्र आणि अतिव्याप्त अभ्यासक्षेत्र आहे, हे स्पष्ट अधोरेखित केले आहे. तसेच हे अभ्यासक्षेत्र, सर्व अभ्यासक्षेत्रांना, मूलभूत स्वरूपात पूरक असे क्षेत्र आहे; याचे भान अभ्यासकांना यावे अशी अपेक्षाही व्यक्त केली आहे.

लोकसंस्कृती आणि लोकसाहित्य या अभ्यासक्षेत्रात दैवतकथाशास्त्राचे महत्त्व अनन्यसाधारण आहे, हे लक्षात घेऊन; दैवत विचार; देव, दैवत व दैवतकथा, दैवतकथाशास्त्र यांचा उद्‌गम आणि विस्तार, कसा होत जातो; याचे विवेचन केले आहे. 'मिथक' ही संकल्पना स्पष्ट करून, दैवतनिर्मिती आणि दैवतकथानिर्मिती ही मानवी प्रवृत्ती असल्याचे स्पष्ट केले आहे. दैवतकथांचे सूत्ररूप असे लोकबंधात्मक स्वरूप वर्णन करून; दैवत आणि दैवतकथांचे प्रकार केले आहेत. लोकसंस्कृतीच्या सर्व अंगांशी दैवतकथांचा संबंध असतो, एव्हढेच नव्हे तर धर्म, नीती, तत्त्वज्ञान, कौटुंबिक, सामाजिक, राजकीय व आर्थिक व्यवहाराशी, दैवतकथांचा लोकबंध स्वरूपात संबंध असतो, हे स्पष्ट केले आहे.

लोकसंस्कृती ही संकल्पना, लोकसंस्कृती - संस्कृती - लोकसंस्कृती; हा चक्रनेमीक्रमाने विचारात घ्यावी लागते हे स्पष्ट केले आहे. स्थलकाल परिस्थिती सापेक्षता यांचा विचार सांस्कृतिक चक्रनेमीक्रमात महत्त्वाचा असतो. श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील उल्लेखित; लोकसंस्कृती व संस्कृती चक्रनेमीक्रमात्मक अभिसरण प्रक्रिया स्पष्ट केली आहे. लोकदैवते, लोकधर्म यांचे लोकसंस्कृतीतील स्थान स्पष्ट करतांना अनेक सांस्कृतिक घटकांचा विचार केला आहे. त्यात भगत, मांत्रिक, वैद्य, भाकित सांगणारे; स्थानिक पूर्वज दैवते, वीर, सिद्ध, साधू, गुरू, सद्‌गुरू, योगी, बुवा महाराज यांचा वर्ग; धर्म, पंथ, संप्रदाय संस्थापक, सांप्रदायिक मार्गदर्शक, प्रसारक, भक्त, तत्त्वज्ञ, संत या मंडळींचे महत्त्व; कलाक्षेत्रातील विविध कलांचे लोकसंस्कृतीतील स्वरूप; विद्या किंवा शास्त्रे यांचा उद्‌गम विकास आणि लोकसंस्कृतीतील प्रचलन; यांचे सोदाहरण स्पष्टीकरण केले आहे. त्यात कृषीसंस्कृती हीच भारतीय परंपरेप्रमाणे लोकसंस्कृती होय याविषयी विस्तृत चर्चा केली आहे. लोकसंस्कृतीचे आविष्करण हेच लोकसाहित्य स्वरूपात घडते; असे म्हणताना मौखिकपरंपरा ही सजीव संस्था असून ती लोकमन प्रकट करणारी संस्था आहे याकडे लक्ष वेधले आहे. लोकसाहित्य हे लोकबंधांच्या आधारे, लोकसंस्कृतीचे प्रयोगसिद्ध आविष्कार



रूप आहे; म्हणूनच ते लोकविद्या किंवा जनवाणी म्हणून ओळखले जाते हे स्पष्ट केले आहे.

लोकसंस्कृती आणि लोकसाहित्य यांचा अन्योन्य संबंध असतो. लोकसांस्कृतिक लोकबंध (Folk type) अर्थात मूळ भावबंध (Feeling type) कोणता आहे व तो आविष्कृत करण्यासाठी कोणते कल्पनाबंध (Motif) (Immagination type) स्वीकारले आहेत; ते (भावबंध व कल्पनाबंध) लोकबंध आविष्कृत करतांना विचारात घ्यावे लागते. लोकसांस्कृतिक स्वरूपातील विधिविधाने, 'लोक'ने मानसिक स्तरावर समूहमनस्कतेने, कशी स्वीकारली आहेत; हे स्पष्ट करतांना, विधिविधानातील वर्तनपरंपरा, वस्तू किंवा साधनपरंपरा आणि या दोन्ही परंपरांसाठीचे शाब्द आविष्कार कोणते आहेत; हे समजून घेतले तरच, लोकसांस्कृतिक धारणातत्त्वांचा अर्थात लोकबंधांचा उलगडा होतो. लोकबंधांचे असे आविष्करण म्हणजे लोकसाहित्य असते. म्हणूनच लोकसाहित्य हे लोकसंस्कृती या भावात्मक संकल्पनेचे दृश्य स्वरूप असते, हे स्पष्ट केले आहे.

जागतिक पातळीवर अभ्यासासाठी म्हणून स्वीकारलेली Folk- 'लोक' ही अवस्था किंवा संकल्पना, खरेतर व्यापक स्वरूपातच विचारात घ्यावयास हवी. भारतीय परंपरेमध्ये ही व्यापक 'लोक' संकल्पना वेदांमधील 'पुरुषसुक्तात' अतिशय सशास्त्रतेने स्पष्ट केली आहे. त्या संकल्पनेचे पडसाद ब्राह्मणे, अरण्यके, निरुक्ते, उपनिषदे या सर्वांत तर उमटलेच; परंतु श्रीमद्‌भगवद्‌ गीतेत ही संकल्पना अतिशय सूक्ष्म स्वरूपात आणि 'लोक'च्या, घटकलोक (व्यक्ती), अंगस्वरूपलोक आणि विराटपुरुषरुपलोक (संपूर्ण विश्व-वैश्विक मानव व मानवेतर चेतन आणि जडसृष्टी) (भूलोक) या त्रिविधतेने स्पष्ट झाली आहे. 'लोक' हा विचार करतांना या त्रिविधतेनेच विचार करावा लागतो. केवळ मानवाचा पूर्णतः पृथक विचार करणे, मानवाच्या जीवनप्रणालीच्या दृष्टीने अशक्य आहे. पुरुषसुक्ताचे सार्थ स्वरूपात अवतरण घेऊन; लोक किंवा Folk ही संकल्पना एव्हढ्या व्यापकतेने स्वीकारावी असा आग्रह धरला आहे.

भारतीय दैवतकथा शास्त्रानुसार 'लोक' ही संकल्पना अधिक स्पष्ट करण्याचा प्रयत्न घडला आहे. पौराणिक संदर्भांच्या आधारे 'लोक'ची उत्पत्ती, विस्तार यांचे दर्शन घेता येते. उपनिषदांच्या आधारेही 'लोक'च्या उत्पत्तीचा तात्त्विक विचार भारतीय परंपरेने केला आहे. स्वर्ग, मृत्यू, नरक , पाताळ,

शिवलोक, ब्रह्मलोक, विष्णूलोक आदि अनेक लोकची वर्णने पुराणात आलेली आहेत. त्यात मानव व मानवसदृश्य देव, यक्ष, गंधर्व, किंपुरुष, दानव, राक्षस, विद्याधर आदि 'लोक'ची उत्पत्ती कशी झाली व मानवेतर जीवसृष्टी आणि मानव यांचा संबंध कसा व किती अतूट आहे; हे कश्यप आणि मनू यांच्या कथांवरून, शिवपार्वती, विष्णूलक्ष्मी, ब्रह्ममाया या युग्मावरून, कसे स्पष्ट होते हे पाहिले की 'लोक' या अवस्थेची व्यापक समग्रता विचारात घेणे, किती आवश्यक आहे, हे ध्यानात येते.

भारतीय परंपरेतील लोकसाहित्य आणि लोकसांस्कृतिक लोकबंधांचा विचार करतांना; 'लोकबंध' ही 'लोक'ची धारणासूत्रे किंवा धारणातत्त्वे होत. ती सनातनपणे, तात्त्विकदृष्ट्या आणि भावनिकदृष्ट्या, दृढमूल स्थिर, अशी असतात. मात्र त्यांचे शाब्दपरंपरा, वर्तनपरंपरा आणि साधनपरंपरा या दृष्टीने तपशीलात्मकतेने स्वरूप बदलते. हे लोकबंध जन्मजीवन व मृत्यू यांविषयी असतात. लोकसंस्कृती कृषीकेंद्रिततेनेच प्रकट होत असते. कृषीजीवनाशी निगडित लोकबंध लोकसंस्कृतीला व्यापून असते; हे लोकसाहित्यात्मक आविष्करणातून सहज लक्षात येते. कला, क्रीडा, संगीत, शास्त्रे, धर्मजीवन याविषयीही, लोकसंस्कृतीत लोकसाहित्याविष्कार घडत असतात. लोकसांस्कृतिक प्रक्रियेचा विचार करता; भारतीय परंपरेने मांडलेली, सनातन धर्मकल्पना आणि 'वसुधैवकटुंबकम्' ही जाणीव हे भारतीय लोकसंस्कृती आणि लोकसाहित्याच्या अभ्यासासाठी पायाभूत गृहितक आहे हे लक्षात घ्यावे लागते. वस्तुतः ते जागतिक स्तरावर 'Folk-lore' च्या अभ्यासाचे पायाभूत गृहितक म्हणून स्वीकारावे लागते. वैश्विक पातळीवर विविध प्रकारचे अंगस्वरूप लोक आपले वेगळेपण, तपशीलात्मक, लोकबंधांच्या आधारे प्रकट करीत असले; तरी वैश्विक लोकभावना ही; घटकलोक, अंगस्वरूपलोक आणि विराटपुरुषरुप लोक अशा त्रिविधात्मकतेनेच प्रकटते; हे समजावून घेणे आवश्यक ठरते. लोकसंस्कृतीत धर्मधारणेचे, ढोबळमानाने काही समान असे महत्त्वाचे किंवा अनिवार्य असे घटक विचारात घेता येतात. त्यात (१) दैवते (२) धर्मग्रंथ (३) प्रधान नीती तत्त्वज्ञान व आचार सूत्रे (४) उपासनापद्धती (५) जन्मप्रथा, विवाहप्रथा आणि मर्तिकप्रथा (६) सणोत्सव (७) राज्य व राष्ट्र कल्पना यांचा अनुषंगिक इतिहास, हे महत्त्वाचे घटक होत. भारतीय परंपरेतील लोकसांस्कृतिक आणि लोकसाहित्य स्वरूपातील लोकबंधांचा विचार करतांना; वैश्विक पातळीवरील लोकसाहित्य आणि लोकसांस्कृतिक 'लोकबंध' यांच्या स्वरूप आणि अनुबंधांचे दर्शन स्वाभाविकपणे घडते. लोकसंस्कृतीचा उद्‌गम लोकजीवनाच्या प्रत्यक्ष जगण्याच्या प्रक्रियेतून होत असतो. लोकसंस्कृतीचे प्रत्यक्ष अनुभवन मौखिक परंपरागत जगण्याच्या प्रयोगातून घडते. या दृष्टीने विचार करता, भारतीय लोकसंस्कृती ही वैश्विक पातळीवर अतिप्राचीन काळापासून सनातनपणे प्रकट होत आहे; हे आता जगन्मान्य झाले आहे.



लोकसंस्कृती आणि लोकसाहित्य यांच्या अनुबंधाचा आणि अवस्थांचा अभ्यास करतांना लोकविकृती आणि लोकसाहित्य यांचा अनुबंध विचारही महत्त्वाचा ठरतो. लोकविकृती आणि लोकसाहित्य यांमुळे लोकजीवनात सतत संघर्ष घडत असतो. या संघर्षामुळेच लोकसंस्कृतीच्या आवश्यकतेचे महत्त्व वाढते. लोकसंस्कृतीत सारेच मंगलमय आणि गहिवरून प्रेम करणारे नसते. तसे असावे, अशी लोकसंस्कृतीची अपेक्षा असते. संस्कृती ही अवस्था विकारांवर मात करून; माणसाने अर्जित केलेली अवस्था असते. विकृतींशी खेळकरपणाने संघर्ष करतांना कलात्मकता आणि विनोद यांच्या परंपरा; लोकसंस्कृतीला बळ देतात. लोकसंस्कृतीतील विकृती नष्ट करण्यासाठीचा पारंपरिक असा समूहमनाचा प्रयास असतो.

प्राचीनतम लोकबंधांचे लोकसंस्कृती व लोकसाहित्यातील स्वरूप; भाषाघटनांच्या आधारे व प्राचीन वाङ्मयाच्या आधारे वर्तमान लोकसंस्कृतीत व लोकसाहित्यात प्राचीनतम लोकबंधाच्या होणाऱ्या मौखिक परंपरेतील प्रक्षेपणाच्या आधाराने तपासावे लागते.

लोकसंस्कृती व लोकसाहित्य अभ्यासाचे जागतिक क्षेत्र विचारात घेतले तर; मूलगामी अभ्यासाच्या दृष्टीने, भारतीय 'लोक' संकल्पना आणि लोकसाहित्य व लोकसंस्कृतीचे सनातनत्व विचारात घेणे आवश्यक वाटते. कोणत्याही शास्त्रीय अभ्यासात, जास्तीतजास्त सत्यान्वेषणाजवळ पोचणे आवश्यक असते. त्यासाठी अभ्यासक्षेत्राचे नेमकेपण, महत्त्व, व्यापकत्व आणि त्रिकालाबाधित लक्षात घेऊनच, शास्त्रीय मांडणी करावी लागते. भारतीय संकल्पना आणि परंपरांचे स्वरूप लक्षात घेऊनच ते साध्य होऊ शकेल.

●●●